१९६३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र १४७८

# आव्हान आणि आवाहन

ना. ग. गोरे

REFBK-0013066

साधना प्रकाशन, पुणें २

# आव्हान आणि आवाहन

ना. ग. गोरे

93066

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3५3२८ वि: निबंध
नों दि: १८.८.८३

REFBK-0013066

साधना प्रकाशन : पुणें २

प्रथमावृत्ति
१ ऑगस्ट १९६३

प्रकाशक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रकाशन
४३०-३१ शनिवार
पुणें २

मुद्रक
ह. म. गद्रे
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार
पुणें २

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

किंमत रुपये २·५०

अर्पण—

गेलीं तीस पस्तीस वर्षें
लोकसत्ता व समाजवाद या ध्येयांशीं
ज्यांनीं इमान राखलें आणि
वित्तहानि, शक्तिहानि व मानहानि सुद्धां
पत्करून भारतामध्यें पुरोगामी
विरोधी पक्षाच्या पायाभरणीचें दुर्घट
कार्य जे करीत राहिले व आजहि
करीत आहेत

त्या सर्वांना—

# दोन शब्द

या पुस्तकांत माझे कांहीं लेख एकत्र केलेले आहेत. सुमारें दहा वर्षांच्या काळांत प्रसंगोपात केलेल्या लिखाणामधून त्यांची निवड केली. ह्या लेखांत निमित्त-कारण झालेले प्रसंग जरी शिळे झालेले असले तरी त्यांमधून प्रकट झालेल्या समस्या कायमच असल्याकारणानें वाचकांना ह्या लेखाची उपयुक्तता आजहि पटेल अशी कल्पना आहे.

भारतीय समाज हा एक जडशीळ झालेला समाज आहे. त्याला गतिमान् करणें हें कोणा एकट्या दुकड्याचें काम नाहीं. माझ्या लेखामुळें त्यांत कणमात्र जरी हालचाल निर्माण झाली तरी मला माझ्या श्रमाचें चीज़ झालें असें वाटेल. लोकशाही व जडत्व हीं परस्पर विरोधी असतात. वहात्या पाण्यांतच भात तरारतें. लोकशाहीचें तसेंच आहे.

किर्लोस्कर, लोकमित्र, केसरी, साधना व जनवाणी ह्या नियतकालिकांमधून येथें ग्रथित केलेले लेख प्रथम प्रसिद्ध झाले होते. ते पुस्तकरूपानें संग्रहित करूं देण्याची त्यांनीं उदारता दाखवली, याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

१८१३, सदाशिव
पुणें २.

ना. ग. गोरे

१३०६६

# भारता, वैऱ्याची रात्र आहे ! जागा राहा !*

अलंकारिक भाषेंत बोलावयाचें झाल्यास भारताच्या हिमालयीन सीमारक्षणाची समस्या हिमालयाइतकीच सुदीर्घ, दुर्गम व विशाल आहे असें म्हणतां येईल. भारत सरकारच्या विशिष्ट धोरणामुळें तिला कांहींशी गूढताहि प्राप्त झालेली आहे. तथापि जनतेचा सुबुद्ध सहकार अथवा विरोध हा लोकशासनाचा पाया मानल्यानंतर, राष्ट्राच्या स्वातंत्र्याचेंच भवितव्य ज्या घटनेशीं निगडित झालेलें आहे ती कितीहि गुंतागुंतीची व दुर्गम भासली तरी तिचें यथार्थ स्वरूप समजून घेण्याचा यथामति प्रयत्न करणें हें प्रत्येक सच्च्या नागरिकानें आपलें कर्तव्य मानलें पाहिजे. हा मुद्दा येथें नमूद केला तो अशासाठीं कीं, जी समस्या आज राष्ट्राच्या घोर चिंतेचा विषय होऊन बसलेली आहे, तिचा उगम झाला तेव्हां सरकारनें तिकडे दुर्लक्ष केलें, तिचा लोकसभेंत प्रथम उल्लेख झाला तेव्हां ती क्षुल्लक आहे असें भासवण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला. ज्यांनीं त्याविषयीं सरकारला वारंवार छेडण्याचें धोरण ठेवलें त्यांना युद्धपिपासु म्हणून खुद्द पंतप्रधानांच्या मुखें त्यांची अवहेलना करण्यांत आली आणि त्या प्रश्नाचें गांभीर्य जनतेला पटवून देण्यासाठीं जे कांहीं प्रयत्न झाले त्यांच्यामुळें देशांत घबराट माजेल असे शेरे त्यांच्यावर मारण्यांत आले. चीनसंबंधींच्या ह्या हास्यास्पद भूमिकेचा शेवट असा झालेला आहे कीं, आतां सरकारच हिमालयीन सीमारक्षणाचा प्रश्न अतिशय चिंताजनक बनल्याचें सांगत असून तो सोडवावयाचा असेल तर विद्यमान राज्यकर्त्यांकडेच पुढचीं दहावीस वर्षें तरी शासनाधिकार राहिले पाहिजेत, ह्या मुद्यावर निवडणुकीचे फड मारीत आहे. भारतामधील मतदात्यांचें निबिड अज्ञान आणि राज्यकर्त्यांचा संधिसाधूपणा यांचें भयावह दर्शन ह्या प्रश्नांवरून जसें झालें तसें क्वचित् दुसऱ्या कोणत्याहि प्रश्नानें झालें असेल. हें अज्ञान दूर होणें जरुरीचें आहे.

---

* *हा लेख किर्लोस्करच्या १९६२ दिवाळी अंकांत प्रसिद्ध झाला असला तरी तो चिनी आक्रमणाच्या अगोदर लिहिलेला आहे.*

भारताच्या एकंदर परराष्ट्रीय धोरणाविषयीं कोणाचें कांहींहि मत असलें तरी चीनविषयींचें आपलें धोरण सर्वस्वी चुकीचें ठरलें आहे, याविषयीं दुमत होईल असें वाटत नाहीं. आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत,

" न कोऽपि कस्य चिन्मित्रं न कोऽपि कस्यचिद्रिपुः ।
अर्थतस्तु भविष्यन्ति मित्राणि रिपवस्तथा ।। "

हें महाभारतकारांनीं दोन हजार वर्षांपूर्वी घालून दिलेलें सूत्रच अजून तरी सत्य ठरत आहे. भारत सरकारची पहिली घोडचूक अशी कीं कम्युनिस्ट सरकार आक्रमण करणार नाहीं ही कल्पना त्यांनीं आपल्या परराष्ट्रीय धोरणाचा आधार ठरवून त्याप्रमाणें वर्तन केलें. शंका अशी येते कीं, एवढा सगळा ग्रंथ गेल्या दहा वर्षांत झालेला असूनदेखील, चीनच्या कम्युनिस्ट सरकारच्या हातून हें आक्रमण करण्यांत कांहींतरी गफलत झालेली असावी, आणि त्यांना नीट समजावून सांगितलें तर ते आपली चूक सुधारून घेतील अशा आशेचीं जळमटें अजूनहि आमच्या सरकारच्या परराष्ट्रीय संबंधाच्या कचेरींत कोठें कोठें लोंबत असावींत.

वस्तुतः कम्युनिस्ट सरकार आक्रमण करीत नाहीं, इतर राष्ट्रांना आपल्या वेठीला धरीत नाहीं, त्यांना स्वयंनिर्णयाचा हक्क देतें, ह्या आतां भाकडकथा ठरलेल्या आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर युरोपांतील कितीतरी राष्ट्रें स्वतःच्या बंदुकीच्या टप्प्यांत ठेवून रशियानें आपल्याला अनुकूल करून घेतलीं. हा डोळ्यांसमोर घडलेला इतिहास पंडित नेहरू अथवा कृष्ण मेनन यांना ठाऊक नव्हता असें विधान करण्याचें धाडस कोण करील ? तिबेटबरोबर कम्युनिस्ट चीनच्या कटकटी सुरू झाल्यावर भारतानें समझोत्यासाठीं प्रयत्न केले. पण तिबेटचे प्रतिनिधि पेकिंगला वाटाघाटींना जाण्यासाठीं कलकत्त्याला पोंचले असतील नसतील इतक्यांत चीननें तिबेटांत फौजा घुसवून बलप्रयोगानें तिबेट व्यापला, ही घटना तर पंडित नेहरूंच्या हातीं भारताचीं सूत्रें आल्यानंतरच घडली ना ? पण भारत सरकारनें स्वतःची अशी समजूत करून घेतली, कीं तिबेटावरचें चीनचें आधिराज्य ( सूझरिन्टी ) आपण मान्य केलें कीं चीन-भारत मैत्रींत बिघाड येणार नाहीं आणि तिबेटची स्वायत्तता कायम ठेवण्याबाबतचें वचन आपण चीनला पाळावयास लावून चीन-भारताच्या दरम्यान आघात-निवारक ( बफर ) म्हणून शतकानुशतकें उभें

असलेलें तिबेटहि कायम ठेवतां येईल. जी सरहद्द आज भारत-चीन सरहद्द बनलेली आहे ती आतांपर्यंत वस्तुतः तिबेट-भारत सरहद्द होती. मॅकमोहन रेषा तिबेटनें मान्य केली म्हणजे ती चीनलाहि मान्य आहे असा जो अर्थ इंग्रजांनीं व तिबेटवाल्यांनीं गृहीत धरला त्याचेंहि इंगित हेंच होतें. परंतु तिबेटमध्यें एकदां चिनी सैन्यें घुसून तळ ठोकून बसलीं कीं तिबेटच्या स्वायत्ततेला कायमचें ग्रहण लागणार व त्याचबरोबर त्याचें आघात निवारणाचें सामर्थ्यहि संपुष्टांत येणार हा साधा तर्कदेखील आमच्या सरकारला बांधतां आला नाहीं, हें केवढें आश्चर्य ?

ह्या गाफीलपणाचा पुरेपूर फायदा करून घेण्याचें चीननें ठरवलें व भारतांत ' हिंदी-चिनी भाई-भाई ' ची घोषणा चालू असतां त्यानें आक्साई-चीनमधील रस्ता प्रथम बांधून काढला. दलाई लामाला भारतानें आश्रय दिला म्हणून भारत-चीनचे संबंध बिघडले असें जे सांगतात ते हें विसरतात, कीं चीनचा प्रसाद झांकण्यासाठीं कांहींतरी सबब हुडकण्यांत आपण चक्क कालविपर्यास करीत आहों. माझ्या माहितीप्रमाणें आक्साई-चीनच्या पठार भागांतून रस्ता बनवण्याचा उद्योग चीननें आरंभलेला आहे, ही माहिती आपल्या सैन्यामधील टेहळ्यांनीं भारत सरकारला वेळेवर पोंचवलेली होती. पण " निर्मनुष्य प्रदेशामधून चीन रस्ता काढीत आहे ना ? काढूं द्या, " अशी वृत्ति सरकारनें स्वीकारली आणि तिकडे दुर्लक्ष केलें. प्रथमच जेव्हां चिनी आक्रमणाचा प्रश्न लोकसभेंत चर्चेला आला तेव्हां चिन्यांनीं व्यापलेला मुलूख कसा ओसाड व बिगरमहत्त्वाचा आहे याचें वर्णन खुद्द पंतप्रधानांनीं केलें होतें. त्यावरून वरील तर्काला पुष्टीच मिळते. त्या वेळेपावेतों तरी त्यांनीं उराशीं बाळगलेली कल्पना हीच असावी कीं, लडाखच्या कोंपऱ्यांतला एखादा जमिनीचा तुकडा गिळल्यावर चीन जर गप्प बसणार असेल तर आपणहि फार खळखळ करूं नये; शक्य तर भारतीय जनतेच्या नजरेला ही गोष्ट येऊंच देऊं नये. पण ' न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति । हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ।। ' तशीच नेमकी चीनची अवस्था झाली. आक्साई चीनच्या रस्त्यावरून व्यवस्थित दळणवळण सुरू झालें; तिबेटांतून सिकियांगकडे जाणारा जवळचा मार्ग तयार झाला; तेथपर्यंत पोंचलेल्या सैन्याला रसद पोंचवण्याचीं साधनें उपलब्ध झालीं. त्याबरोबर

चीननें हळूच दुसरें पाऊल उचलून तें आणखी पश्चिमेकडे टाकलें. त्याच-बरोबर निति, बाराहोती, लोंगजू इत्यादि ठिकाणींहि आपलें घोडें पुढें दामटण्यास प्रारंभ केला. लोकसभेमध्यें चीनच्या आक्रमक हालचालींचा गौप्यस्फोट होईपर्यंत खरें म्हणजे सबंध तिबेट घशांत उतरवून, सैन्याचे व विमानांचे तळ बांधून, मुख्य सडका व उपमार्ग तयार करून चीन सज्ज होऊन राहिलेला होता. वेळेच्या दृष्टीनें पाहिलें तर भारताच्या निदान पांच वर्षें तरी तो पुढें सटकला होता. तसेंच त्यानें आपलें धोरण पक्कें करून टाकलें होतें, कीं हिंदी सरकारला आणखी कांहीं काळ तरी निषेध-पत्रकें पाठवण्या-वांचून कांहीं करतां येण्याजोगें नाहीं; आणि अशीं कितीहि निषेध-पत्रकें आलीं तरी त्यांची काडीचीसुद्धां पर्वा आपण करावयाची नाहीं. भारताच्या निषेधाचा परिणाम काय झाला तें जर सांगावयाचें झालें तर चिनी वृत्तपत्रांमधून राशिया-चीनच्या मतभेदांच्या संदर्भांत प्रसिद्ध झालेली व्यंगचित्रकार 'वू'ची एक चित्रमालिका येथें उद्धृत करणें अयोग्य ठरणार नाहीं. ' जाहीरनामे काढून वाघाला वठणीवर आणण्याविषयी ' असें ह्या व्यंगचित्राचें उपहासात्मक शीर्षक आहे. एक शेतकरी गावांत वाघ आल्याची वर्दी मालकाला देतो. मालक म्हणतो, " एवढंच ना ! येथें वाघानें येऊं नये " असा हुकूमच मी लिहून देतों. तेवढा जंगलांत नेऊन चिकटव म्हणजे झालें. त्याप्रमाणें तो शेतकरी जंगलांत गेल्यावर वाघ तेथें येतो. आणि जागेवर उरतें काय ? फक्त वाघोबा ! मालकाचा हुकुमाचा खर्डा गच्च पकडलेला शेतकऱ्याचा हात तेवढा वाघाच्या जाभाडांतून बाहेर लोंबत राहिलेला दिसतो ! लोंगजूपासून कारा-कोरम खिंडीपर्यंतच्या सरहद्दीवर चीननें जीं आक्रमणें आतांपर्यंत केलीं त्यासंबंधीं जर एखादें व्यंगचित्र काढावयाचें ठरलें तर तें याहून वेगळें काढतां येईल कीं काय याबद्दल शंका वाटते.

सध्यां चर्चा अशा प्रकारें चालू आहे कीं, आपलें सारें लक्ष लडाखच्या बाजूला केंद्रित होऊन चीनच्या ईप्सितामध्यें केवळ लडाखचाच भाग अंतर्भूत आहे असा भास व्हावा. पण सरहद्दीच्या प्रश्नाबाबत भारतीय आणि चिनी अधिकाऱ्यांच्या दरम्यान जीं प्रदीर्घ बोलणीं झालीं त्यांवरून चीन भारतामधील केवढ्या प्रदेशाबद्दल दावा मांडीत आहे तें ध्यानांत येतें. भारत सरकारकडून सादर करण्यांत आलेला नकाशा आणि चीननें सादर

केलेला नकाशा एकमेकांवर ठेवावा आणि प्रकाशांत दोन्ही नकाशे धरावें म्हणजे सर्व उलगडा नीटपणें होईल. मग लक्षांत येईल कीं, बारीक-सारीक खिंडी, घाट, गायरानें तर सोडाच, पण चीन जवळजवळ सगळाच लडाखचा टापू आपला म्हणून सांगत आहे. म्हणजे काराकोरम खिंडीच्या जरा पूर्वेपासून पाँगाँग सरोवराजवळील खुरनाक किल्ल्यापर्यंत जें नकाशांत एक पोट आलेलें आपणांस दिसतें तें सर्वच छाटून आपल्या प्रदेशांत जिरवण्याचा चीनचा इरादा उघड दिसतो.

तेथून आसामच्या उत्तर सीमेवर पाहिलें तर किंझिमानें येथें भूतानच्या ईशान्य टोंकाला सुरू होणारी भारताची हद्द पार दक्षिण दिशेला टेक-ड्यांच्या पायथ्यापर्यंत रेटून ब्रह्मपुत्रेच्या उत्तर किनाऱ्यानें पूर्वेकडे जात जात वोलांगच्या आसपास आपली हद्द नेऊन भिडवावयाची अशी चीनची कल्पना आहे. ह्या भागांतील जी आंतरराष्ट्रीय सरहद्द आतांपर्यंत मान्य करण्यांत आलेली होती तिलाच मॅकमोहन रेषा असें संबोधण्यांत येतें. ती रेषा आपण ओलांडणार नाहीं असें आश्वासन चिनी कम्युनिस्टांनीं त्यांच्या भारतीय कम्युनिस्ट सोयऱ्यांस दिल्याचें सांगण्यांत येत असलें तरी, हेंहि त्याचबरोबर ध्यानांत असलेलें बरें, कीं भारत-तिबेटमध्यें झालेला ह्या रेषेबद्दलचा करार खऱ्या अर्थानें भारत-चीन करार होऊं शकत नाहीं, कारण तो झाला तेव्हां चीनचा प्रतिनिधि तेथें हजर नव्हता हा एक आणि भारताच्या नांवानें इंग्रज-साम्राज्यवाद्यांनीं हा करार केलेला आहे, त्याचा आधार निदान भारतानें तरी घेणें योग्य नाहीं हा दुसरा; असे दोन आक्षेप मॅकमोहन रेषेसंबंधीं चीननें आधींच उपस्थित करून ठेवलेले आहेत. पांडवांच्या शस्त्रा-प्रमाणें सध्यां ते जरी शमीच्या झाडावर ठेवलेले असले तरी वेळ पडल्यास त्यांचा उपयोग करण्यांत येईल हें सांगणें नको.

तिबेटमध्यें गेल्या अकरा वर्षांपूर्वीं चिनी सैन्यच नव्हतें असें ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यांत राज्यसभेमध्यें झालेल्या चर्चेच्या वेळीं पंडित नेहरू म्हणाले. सध्यां तेथें किती चिनी सैन्य आहे याचा अंदाजी आंकडा जरी त्यांनीं सांगितला असता तरी ह्या अवधींत चिन्यांनीं केवढ्या प्रचंड प्रमाणा-वर तेथें लष्करी तयारी केलेली आहे तें स्पष्ट झालें असतें. साधारणपणें असा अंदाज आहे कीं, तिबेटमधील निरनिराळ्या छावण्यांत अडीच लक्ष सैन्य

असून त्यांपैकीं कांहीं फौजा कोरियांतील युद्धाचा अनुभव घेतलेल्या करोल सैनिकांच्या आहेत. चीनचें एकंदर लष्करी सामर्थ्यच आपल्या मानानें फार प्रचंड आहे. ४० लक्ष सैनिक, २॥ कोटींचीं नागरिक दलें, ५ ते ६ भारी तोफखाना असलेल्या डिव्हिजन्स, १० चिलखती डिव्हिजन्स, ३ पॅराशूट डिव्हिजन्स, मिग १५, मिव १७ व मित्र १९ अशा जातींचीं सुमारे ३००० तुफानी विमानें व १००० बॉंबफेकी इल्युशिन-२८ जातींचीं विमानें असा त्यांचा सरंजाम आहे.

चीनच्या सैन्याची भिस्त कवायतीवर फारशी नाहीं. विशेष भिस्त आहे ती गनिमी लढाई, रात्रींच्या हालचाली, शस्त्रांची निगा आणि लांब पल्ल्यांच्या मजली मारणें ह्यांवर. २५ ते ३० मैल अंधारांतून मार्ग काढणें, रस्त्याला बांधून न घेतां आडवाटेनें कूच करणें आणि आख्ख्या डिव्हिजननें २४ तासांत ५० मैल अंतर कापून जाणें असल्या सैनिकांच्या करोलपणाची खात्री पटवणाऱ्या घटना चिनी सैन्यानें प्रत्यक्षांत आणलेल्या आहेत. एवढी शक्ति असलेल्या देशानें तिबेटांत दोन अडीच लक्ष सैन्य व शेंपांचशें विमानें पाठविलीं असलीं तर त्यांत नवल नाहीं. त्यांनीं जे दोन नवे रस्ते लडाख भागांत बांधले आहेत ते भारी मोटरींचें दळणवळण त्यावरून होऊं शकेल असे आहेत. त्यांना जोडणारे रस्ते, खंदक, गुदामें, औषधपाणी यांची तेथें व्यवस्था केलेली आहे हें चार वर्षांपूर्वीं करमसिंगानें दिलेल्या निवेदनावरून आपणांस ठाऊक झालेलें आहेच.

चिन्यांना चणचण आहे ती वाहतुकीच्या मोटारीसारख्या साधनांची व त्यांना लागणाऱ्या पेट्रोलची. आपल्या कानांवर ज्या कांहीं वार्ता येत आहेत त्यांवरून चीनची अन्नधान्य परिस्थिति व औद्योगिक परिस्थिति सध्यां मुळींच चांगली नाहीं. अशा वेळीं योग्य संधि आहे, शत्रु दुर्बळ आहे, असें ओळखून आपण आपल्या मुलुखामधून शत्रूला हुसकावण्याची केलेली योजना आखावयाची कीं तो परत सबळ होईपर्यंत वेळ घालवीत राहावयाचें याचा विचार आपल्या राज्यकर्त्यांनीं गंभीरपणें करावयास हवा आहे. तसा तो केला जाईल अशी आपण आशा करूं या.

भारताच्या पंतप्रधानांचें चीनविषयीं कांहींहि मत असलें तरी चीनचें आपल्याबद्दल काय मत आहे तें त्यांना ठाऊक असेल असें वाटतें. ‘ लिंक ’

हें दिल्लीहून निघणारें साप्ताहिक मेनन गटाचें आणि कम्युनिस्टांचें पक्षपाती आहे हें सर्वविश्रुत आहे. त्याच्या १६ ऑक्टोबर १९६० च्या अंकांत प्रसिद्ध बंगाली कम्युनिस्ट हरेकृष्ण कोनारांना चिनी कम्युनिस्टांनीं स्वतःची भूमिका समजावून देतांना सांगितलेली माहिती दिलेली आढळते. भारत सरकार व नेहरू हे उत्तरोत्तर साम्राज्यवादी राष्ट्रांवर विसंबूं लागले असून त्यांचें खरें स्वरूप आतां उघड होऊं लागलेलें आहे. जनतेचा रोष दुसरीकडे वळवण्यासाठीं त्यांनीं लडाखचें कुभांड रचलें आहे इत्यादि. भारत सरकार साम्राज्यवाद्यांच्या ( म्हणजे प्रामुख्यानें अमेरिकेच्या ) आहारीं जात चाललें आहे असा आरोप एकदां केला कीं मग त्यावर आक्रमणच काय, पण प्रत्यक्ष लढाई जरी सुरू केली तरी कम्युनिस्टांच्या हिशोबीं तें धर्मकृत्यच ठरणार ! मग तें पार पाडण्यासाठीं पाकिस्तानसारख्या लोकशाही, समाजवाद व साम्राज्यशाहीविरोध हें सर्वच कोळून प्यालेल्या राष्ट्रांशीं गट्टी जमवावी लागली तरी तोहि आपद्धर्म ठरणार ! चीननें असें करावें ह्याबद्दल भाई सरदेसाई व अधिकाऱ्यांनीं आश्चर्य व्यक्त केलें आहे. गेल्या महायुद्धांत हिटलरबरोबर दोस्ती करून रशियानें निम्मा पोलंड व लॅटेव्हिया, एस्थोनिया, लिथुआनिया हीं तीन राष्ट्रें गिळलीं त्याचें ज्यांना कधीं सोयरसुतक वाटलें नाहीं त्यांनीं चीनच्या कपाळावर नालायकीचा शिक्का मारण्याची हातचलाखी जरी केली तरी त्यामुळें कोण फसणार आहे ? रशिया चीनमधील मतभेदामुळें कम्युनिस्ट पक्षांतर्गत जे डावपेच सध्यां सुरू आहेत त्यांतलाच तो एक डाव होत.

चीनची प्रस्तुतची योजना अशी दिसते, कीं १९५७ मधील अमताघर–हाजीलंगर रस्त्याच्या आधारें आपण पुढें सरकून ज्याप्रमाणें १९५९–६० पर्यंत लानकला खिंड ते क्वारातांग रस्ता पुरा केला व तेथपर्यंतची भूमि कबजांत घेतली, त्याचप्रमाणें आतां ह्या नव्या रस्त्याच्या आधारें चिपचाप नदीच्या खोऱ्यामधून पुढें पुढें सरकत, दीपसांगचें पठार मुठींत आणून काराकोरमची खिंड पोटांत घ्यावयाची आणि सध्यां काश्मीरचा जो भाग पाकिस्तानच्या ताब्यांत आहे तेथपर्यंत दौड मारावयाची; म्हणजे पाकिस्तानशीं हिंदुस्थानाच्या डोक्यावर हातमिळवणी करतां येईल.

इकडे उत्तर प्रदेशाच्या, पश्चिम बंगालच्या, सिक्किम-भूतानच्या आणि

तसेंच आसामच्या उत्तर सरहद्दीवर आणि नेपाळच्याहि उत्तर सीमेवर प्रदेश नव्हे पण जनतेचीं मनें पोखरण्याचें त्यांचें कार्य अव्याहत चालूच राहील. आमच्या मजूर संघटनेचे, किसान पंचायतीचे वा पक्षाचे सदस्य व्हा, त्या पावत्या जपून ठेवा, चिनी सैन्य हिमालय ओलांडून येईल तेव्हां ह्या दाखविल्यात कीं तुमचें भलें होईल असा प्रचार आडनांवाचे आणि बिनआडनांवाचे कम्युनिस्ट पहाडी विभागांत आणि दार्जीलिंगच्या चहाच्या मळ्यांत आजहि करीत फिरत असतात. नेपाळपाशीं रणांगणांवर उतरूं शकेल अशी फौज आहे पांच हजारांच्या आंत. त्यांतून ल्हासा-काठमांडू रस्ता जर तयार झाला तर चीन भारताच्या पोटांत त्या रस्त्याच्या साहाय्यानें केव्हांहि सुरी भोसकूं शकेल. मग आपल्या सैनिकांनीं अभिनंदनीय जवाँमर्दीनें रक्षिलेल्या खिंडी आणि आपल्या इंजिनियरांनीं सारें कौशल्य खर्चीं घालून फोडलेले उत्तर प्रदेशांतले, सिक्किम-भूतानमधले आणि नेफामधले रस्ते निरर्थक बनण्यास वेळ लागणार नाहीं. शिवाय जेव्हां प्रत्यक्ष युद्धाचा दाब निर्माण होईल त्या वेळीं नेपाळ, सिक्किम आणि भूतान यांच्यांपैकीं कोणाच्या निष्ठा कशा फिरतील तें सांगतां येणार नाहीं. नेपाळ नरेश, सिक्किमचे महाराजकुमार आणि भूतानचे प्रधान जिग्मी दोर्जे ही मंडळी फार आंतल्या गांठीची, महत्त्वाकांक्षी आणि धूर्त आहेत. मात्र आपल्या नजीकच्या स्वार्थापलीकडे असलेलीं दूरचीं क्षितिजें हेरण्याची ताकद त्यांच्या ठायीं कितपत आहे त्याची शंका वाटते. तेव्हां त्यांच्या हालचालींचा अभ्यास ठेवून भारताच्या हितसंबंधांना दगाफटका न होईल याची खबरदारी, जरूर ते सर्व उपाय योजून घेतली गेलीं पाहिजे. भारताला चीननें जर परास्त केलें तर प्रधान-मल्ल-निबर्हण न्यायानें अथवा 'मूळ तोडलें कीं फांद्या आपोआच खालीं येतात' या पहिल्या बाजीरावाच्या सुप्रसिद्ध उक्तीप्रमाणें दक्षिण आशियांतील चट् सारे बारीकसारीक देश चीनच्या कक्षेंत येतील याविषयीं शंकाच नको.

आणि नेमकें हेंच चीननें ओळखलेलें आहे. यामुळें पाकिस्तानसकट सर्व छोट्या राष्ट्रांशीं गोड पण भारताबरोबर तेवढें वांकडेपणाचें धोरण त्यानें स्वीकारलेलें आहे. भारत हाच चीनचा आशिया खंडामधील प्रतिबिंदु (काऊंटर पॉइंट) आहे, पर्यायी आकर्षण-केंद्र आहे. जबरदस्तीनें शेत-

कऱ्याला जमिनींतून उपटून सामुदायिक शेतीच्या द्वारां शेतीमालाच्या उत्पादनांत प्रचंड वाढ करावयाची व त्याच्या द्वारां औद्योगीकरणाला खंबीर शेतीचा पाया उपलब्ध करून द्यावयाचा ही योजना चीनमध्ये साफ कोलमडून पडत आहे. भारत त्या कसोटींमधून यशस्वी रीत्या उत्तीर्ण झालेला आहे असें नाहीं; पण एवढें खास कीं, कम्युनिझममार्फत मागासलेल्या देशाची 'न भूतो न भविष्यति' अशी प्रगति साधतां येते हा चीनचा दावा व्यवहारांत सिद्ध झालेला नाहीं. तेव्हां भारताची आर्थिक स्थिति युद्धसिद्धतेचा ताण लावून जर तंगीची करतां आली तर भारतामधील जनतेचें जीवनमान घसरेल, तेथील औद्योगिक प्रगति स्थगित होईल आणि जनतेमध्यें असंतोष निर्माण होईल, अशी चीनची अटकळ असल्यास त्याचें नवल वाटायला नको.

आशियाई राष्ट्रामध्यें विस्तार, लोकसंख्या,सुप्त असें औद्योगिक व कृषिसामर्थ्य आणि निद्रिस्त खनिज संपत्ति यांच्यायोगेंकरून ज्या देशांना निसर्गतःच अग्रस्थान मिळालेलें आहे त्यांत चीन व भारत असामान्य आहे. पण कम्युनिस्ट तत्त्वज्ञानांत कोणत्याहि स्थानीं दोन वस्तु मुळीं बसूंच शकत नाहींत—मग ते पक्ष असोत, विचारपद्धति असोत कीं व्यक्ति असोत. सहजीवन याचा खरा कम्युनिस्ट अर्थ कायमचें सहजीवन असा कधींच असूं शकणार नाहीं तर आपद्धर्म म्हणून सहजीवन, नाईलाज म्हणून सहजीवन. अतएव भारताशीं कपटविरहित मैत्री अथवा स्पर्धा करून आपल्या शासन व जीवनपद्धतीचें समानत्व वा श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास कम्युनिस्ट चीन कदापि तयार होणार नाहीं. उलट भारताचे पाय मागें ओढून किंवा भारतांत पंचमस्तंभ उभा करून किंवा शक्य तर युद्धाच्या कुरापती काढून जर भारताला खच्ची करतां आलें तर तसें करण्यास चीन मागें पुढें पाहणार नाहीं. संयुक्त राष्ट्र संघटनेंत चीनला आसन द्यावयास हवेंच असा आग्रह भारतानें धरला याचे उपकार चीन मानणार नाहीं. कारण जो कम्युनिस्ट नाहीं, जो मार्क्स-लेनिनच्या नांवानें भजन करण्यास तयार नाही तो देश शोषकांचा, साम्राज्यवाद्यांचा, पाखंड्यांचा व कम्युनिस्ट शत्रूंचा असून त्याला आज ना उद्यां नेस्तनाबूत करणें हें आपलें परम कर्तव्य ठरतें अशी कम्युनिस्टांची श्रद्धा आहे. याबाबत रशिया आणि चीनमध्यें जे फरक करूं पाहतात ते एक वेडे तरी असतील अथवा वेडगळ तरी असतील. युद्ध न करतां कम्युनिझमचा प्रचार करणें सद्यः

परिस्थितींत शक्य आहे ही रशियाची भूमिका आणि कम्युनिझमच्या विजयासाठीं युद्ध-होय अगदीं अणुयुद्धदेखील, जरी करावें लागलें तरी आपण कचरतां कामा नये ही चीनची भूमिका यांत फक्त तरतमचा फरक आहे, यापेक्षां अधिक फरक नाहीं. त्यांतदेखील स्थानिक युद्धें, चकमकी होणारच; त्याचा फायदा कम्युनिस्टांनीं घ्यावा; मात्र आपल्यालाहि जाळील असें जागतिक अणुयुद्ध होणार नाहीं एवढी दक्षता घ्यावी हा रशियाच्या भूमिकेचा आणखी बारकावा लक्षांत घेण्यास डांगेगट राष्ट्रवादी व रणदिवेगट तेवढाच परधार्जिणा आहे असल्या कल्पना किती खुळेपणाच्या आहेत तें स्पष्ट होईल. चीनचें आक्रमण हटवण्याचा प्रयत्न भारतानें केल्यास युद्ध उभें राहील या धास्तीनें जर आपण स्वस्थ बसलों तर चीनचें कांहींच बिघडणार नाहीं. युद्धावांचून प्रदेश मिळत गेला अथवा मिळालेला हातीं कायमचा राहिला तर चीन म्हणेल देव पावला! तसा तो शांततावादी आहेच कीं! पेकिंगलासुद्धां नाहीं का शांततावादी मोर्चे निघत, परिषदा होत आणि कबुतरें आकाशांत सोडण्यांत येत! पण त्याचबरोबर लडाखमधील प्रदेश आमच्या हातून सोडवण्याचा उद्योग जर कराल, तर नेफाकडची मॅकमोहन रेषा आम्हीं ओलांडल्यावांचून राहणार नाहीं असा दम भरण्यासहि चीन कमी करीत नाहीं. म्हणून आक्रमण मागें घ्या नाहीं तर युद्धाला तयार राहा, याच भूमिकेवर ठाम उभें राहून भारताला आपले पुढील बेत रचावे लागतील, नाहींतर जो भाग चीनकडे गेला आहे त्याच्यावर उदक सोडण्याची तयारी ठेवावी लागेल. हें दुसरें होण्याची शक्यता मला तरी अधिक दिसते.

भारताच्या अंतर्गत विकासासाठीं लागणारा पैसा, मनुष्यबळ आणि बुद्धि आज हिमालयीन सीमेवर गुंतवून ठेवावीं लागत आहेत आणि तीदेखील ज्याला आपण भाऊ मानलें त्या चीनच्या अपकृत्यामुळें ही खेदाची गोष्ट खरी. पण असल्या घटनांमुळेंच कदाचित् ‘ अनंत रत्नप्रभवस्य तस्य हिमं न सौभाग्यविलोपि जातम्। ’ ही महाकवि कालिदासाची काव्यवाणी सत्यवाणी ठरणार असेल. सैन्याच्या मागोमाग रस्ते, रस्त्यांवरून वाहतूक, वाहतुकीच्या निमित्तानें वस्ती, वस्त्यांमुळें शेतें-मळे, बारीकसारीक उद्योगधंदे आणि मग त्यांच्यासाठीं लागणारी वीज असा राबता सर्रास सुरू होणें अगदीं शक्य आहे. आणि हिमालयीन सरहद्दीचें खरें रक्षण, त्या सर्व भागांत

दाट-विरळ वस्ती व उद्योगधंदे सुरू होऊन त्या भूभागाविषयीं आपुलकी वाटणारी मनुष्यवस्ती जर तेथें होईल तरच होणार. हिमालयाच्या त्या दुर्गम उतारावर विपुल वनसंपत्ति आहे. द्राक्षें, पीच, पाम, सर्व जातीचीं संत्रींमोसंबीं, टरपेंटाईन देणारे वृक्ष यांची लागवड ज्यावर उत्तम प्रकारें होऊं शकेल असे डोंगरउतार आहेत. कांहीं लोकांच्या मतें हिमालयाच्या गर्भात नानाविध खनिजें उपलब्ध होण्याचा संभव आहे. पश्मीनासारखी उत्कृष्ट लोकर देणाऱ्या मेंढ्यांचे कळप पाळण्यास योग्य अशीं कुरणें तेथें आहेत. जलविद्युत निर्माण करण्यास योग्य असे प्रवाह आहेत. युद्धाच्या तयारीमधून युद्ध न निर्माण होतां जर अशी वस्ती तेथें फुलली तर चीनचें संकट हें कदाचित् वरदानहि ठरेल. पण येथेंहि योजकस्तत्र दुर्लभः हेंच खरें आहे !

◎ ◎ ◎

# माओनें मार्क्सवादाचें थडगें पूर्ण केलें *

ज्या दिवशीं चीननें आपल्या फौजांना भारताच्या सरहद्दी ओलांडून आमच्या जवानांवर गोळी चालवण्याचा हुकूम दिला तो दिवस आमच्या इतिहासामधील परिवर्तनाचा बिंदु म्हणून मानला जाईल, असें पंडित नेहरू आपल्या संसदेमधील भाषणांत म्हणाल्याचें प्रसिद्ध झालें आहे. चीननें केलेलें भारतावरील आक्रमण, जगामधील सर्व कम्युनिस्ट राष्ट्रांनीं चीनची बाजू उचलून धरण्यांत दाखवलेली तत्परता, तितक्याच तत्परतेनें साम्राज्यवादी म्हणून पदोपदीं आमच्याकडून अवमानण्यांत आलेल्या देशांनीं भारताला बिनशर्त पाठवलेली मदत आणि खुद्द भारतीय जनतेनें जातीय, पंथीय व भाषिक हेव्यादाव्यांचीं कुंपणें ओलांडून मातृभूमीवरील संकटाच्या क्षणीं दिलेला प्रतिसाद, ह्या सर्वच घटना अत्यंत लक्षणीय आणि चिंतनीय आहेत, यांत शंका नाहीं. नवशक्तिकारांसारख्यांनीं नेहरू-मेननांच्या परराष्ट्र नीतीची लाज झांकण्यासाठीं कितीहि जरी प्रयत्न केले तरी गेलीं कित्येक वर्षें वास्तवतेशीं संबंध नसलेल्या अशा ज्या स्वकपोल-कल्पित सृष्टींत आपण वावरत होतों, तेथून ह्या घटनेनें आपणांस वास्तव जगांत आणून सोडलेलें आहे, असा कबुलीजबाब स्वमुखानें जेथें पंडित नेहरूंनींच दिला तेथें त्यांचा बचाव कोणी कितीहि चलाख वकील असला तरी कसा काय करणार ? परंतु तंद्रावस्थेमधून आपण जागृतावस्थेंत आलों अशी जी कबुली पंतप्रधानांनीं दिली ती मोघम आहे, हें आपण विसरतां कामा नये. आतां झोंप उडालेल्या आपल्या चर्मचक्षूंना जी सृष्टि दिसत आहे तिचें सत्यस्वरूप काय तें पंडितजींच्याकडून कधीं तपशीलवार ऐकावयास मिळण्याचा फारसा संभवहि नाहीं. कारण तसें कठोर परीक्षण करण्याची त्यांची गांधीयुगांतील संवय आतां मोडलेली असून, जोंपर्यंत रशियाचा कौल आपल्या बाजूनें लागण्याची यत्किंचित्‌हि आशा त्यांना वाटत राहील तोंपर्यंत आपल्या परराष्ट्रीय नीतीमधील गृहीत कृत्यांचें शवच्छेदन करण्यास ते धजणार नाहींत. त्याचबरोबर ओघानें हेंहि अपरिहार्यपणें होणार कीं, जागें झाल्यावर देखील बसली जागा सोडून कोणत्या दिशेनें निश्चयानें पाऊल

---

* *साधना १८-११-६२*

उचलावें तें ठरावयास कालावधि लागणार, अथवा तें कधींच ठरणार नाहीं. आणि आज ज्याप्रमाणें चीनच्या हातीं परिस्थितीचीं सूत्रें ( initiative ) आहेत त्याप्रमाणेंच तीं यानंतरहि राहाणार.

## मार्क्सचीं सूत्रें

तथापि येथें चीननें भारताला ज्या युद्धांत खेचलेलें आहे त्यांतून निर्माण झालेल्या समस्त समस्यांचें निरूपण करावयाचें नसून त्यांपैकीं फक्त एका प्रश्नाचाच परामर्श घ्यावयाचा आहे. १८४८ सालीं जगामधील सर्व कष्टकऱ्यांना एक होण्याची साद ज्या कम्युनिस्ट जाहीरनाम्यानें घातली तो कम्युनिझम आज अंशमात्रानें तरी हयात आहे काय, हा तो प्रश्न असून त्याचाच विचार येथें करण्याचें योजिलें आहे. तो जाहीरनामा प्रसिद्ध झाला आणि दुनियेमधील सर्व शोषित, पीडित, बद्ध व त्रस्त जनांना आपण जणूं आकाशवाणी ऐकिली कीं काय, असा भास झाला. अंधरांत दिवा लागला, वाट खुंटल्यासारखी झाली होती ती पुन्हां दिसूं लागली, करपलेलीं मनें परत पालवी दाखवूं लागलीं, असा हा चमत्कार घडवून आणणाऱ्या त्या जाहीरनाम्यांतलीं अथवा त्यांत ग्रथित झालेल्या मार्क्सवादांतलीं मुख्य सूत्रें तरी कोणतीं होतीं ? मार्क्सनें त्यांत असें दाखवून दिलें होतें कीं, प्रचलित समाजव्यवस्था ही खरी लोकसत्ता नाहीं, तींत समता नाहीं, असूं शकत नाहीं. कारण प्रचलित अर्थोत्पादनाची व्यवस्थाच अशी आहे कीं जमीन, यंत्रें इत्यादि उत्पादनसाधनें मूठभर व्यक्तींच्या ताब्यांत असल्यामुळें श्रमजीवी जनता राबून जें धन निर्माण करते त्यांतलें सगळें लोणी धनिक मालकांच्या पदरांत पडतें आणि प्रत्यक्ष श्रम करणाऱ्यांना ताक मिळण्याचीसुद्धां पंचाईत होते. ज्यांच्या हातीं धन तेच समाजाचे खरे चालक-मालक बनतात. ते मतदारांना खरीदतात, नोकरांना वश करून घेतात, सरकारला आपलें मिंधें बनवतात. तात्पर्य, शासनाला कसलेंहि नांव असलें तरी त्याचें कार्य एकच असतें आणि तें म्हणजे धनिकांना अनुकूल अशी समाजव्यवस्था ठेवणें, त्यांच्या हिताची जपणूक व वाढ करणें; उलटपक्षीं श्रमजीवी वर्ग असंतुष्ट होऊन सामाजिक धनाचा अधिक वांटा मागेल तर त्याची मुस्कटदाबी करून त्यांना डोकें वर करूं न देणें. ही विषम उत्पादनव्यवस्था चालू राहावी म्हणून

मागासलेल्या व दुर्बल देशांवर आक्रमणें करून तेथील बाजारपेठा, कच्चा माल व जरूर तर जनतासुद्धां आपल्या अंकित ठेवण्याची तयारी या धनिकशाह्या दाखवतील; नव्हे, अशा विस्तारवादाचा आश्रय केल्यावांचून त्यांना गत्यंतरच उरत नाहीं. आणि एकापेक्षां अधिक देशांनीं विस्तारवादी धोरण स्वीकारलें कीं कोठेंतरी तलवारीवर तलवार पडून युद्धाचा वडवानल पेटल्यावांचून राहात नाहीं. साम्राज्यवाद तो हाच व त्यामुळें युद्धें अपरिहार्य ठरतात तीं अशीं. म्हणजे जगांत धनिकशाही राहील तोंपर्यंत स्वदेशांत कष्टकऱ्यांच्या कपाळीं रक्तशोषण व दडपणूक, परदेशीयांच्या पायांत गुलामगिरीची बेडी आणि जगाच्या नशिबीं युद्धाचा कठोर शाप कायमचा राहणार, ही काळ्या दगडावरील रेघ समजावी.

**मार्क्सचा आशावाद**

पण मार्क्स हें भयाण भविष्य वर्तवून थांबला नाहीं. त्यानें सांगितलें कीं, कष्टकरी जनतेनें एकजूट करून धनिकांची सत्ता जर उलटून टाकली व आपल्या हातीं समाजाचीं सूत्रें घेतलीं तर मात्र सगळेंच चित्र पालटेल. सगळें शोषण बंद पडेल. कारण समाजांत पिळणारा व पिळला जाणारा असे वर्गच उरणार नाहींत. स्वदेशांत तें शोषण थांबलें आणि सदैव खा खा करणाऱ्या राक्षसासारखा असणारा धनिकवर्ग निकालांत निघाला, कीं परदेशांवर चढाई करून तेथील कच्चा माल जबरदस्तीनें आणण्याची अथवा तेथील बाजारपेठेला वा जनतेला आपली ताबेदार करण्याची गरजहि निकालांत निघेल. याचाच अर्थ असा कीं, कामगारांनीं सत्ता स्वतःच्या हातीं घेतली कीं साम्राज्यशाही व तिचें तें राक्षसी संतान युद्ध हीं दोन्ही गतप्राण होणार. आणि मग काय होणार ? कम्युनिझमचा विजय होणार; म्हणजेच समतेचें, बंधुत्वाचें, आनंदाचें राज्य होणार. गुलामगिरी, शोषण, परपीडा हे शब्द केवळ शब्दकोशांत राहणार. आणि ह्या जगांतल्या आनंदवनभुवनाची उभारणी कोठून सुरू होणार ? मार्क्सला साहजिकच वाटलें कीं, आपल्या कल्पनेमधील क्रांतीचा व नव्या जगाचा अग्रदूत व शिल्पकार जर कामगार असणार असें आपण मानलेलें आहे, तर तो जेथें संख्येनें अधिक व संघटनेनें मजबूत तेथेंच नव्या समाजरचनेचा शिलान्यास होईल, याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं. म्हणून कम्युनिस्ट क्रांति प्रथम इंग्लंड, अमेरिका,

अथवा जर्मनीसारख्या यंत्रप्रधान व कामगार-प्रधान देशांत होईल, असेंहि भविष्य तो वर्तवून बसला.

## चुकलेलें भाकीत

पण हें भविष्य तरी असें फसवें निघालें कीं, पहिली कम्युनिस्ट क्रांति झाली ती रशियांत, म्हणजे शेती-प्रधान देशांत. आणि तेव्हांपासून लगो-ऱ्यांचा ढीग ढासळत जावा त्याप्रमाणें मार्क्सवादाचा मनोरा सारखा ढासळत गेला. ‘ कसणारांची जमीन ’ ह्या घोषणेवर रशियांतला शेतकरी क्रांतींत सहभागी झाला आणि मोतीं म्हणून समुद्रांत बुडी घेऊन शंख हातीं घेऊन यावें तशी त्यांची फजिती झाली ! श्रमजीवी वर्गाच्या नांवानें रशियांतील कम्युनिस्ट पक्षानें सर्व सत्ता स्वतःच्या हातीं घेतली आणि मोगल बादशाहीला लाज आणील अशी दुराचारांची व कटांची राजनीति तेथें सुरू झाली. रशियाचा कम्युनिस्ट हुकूमशाहा जो स्टालिन त्यानें तर असें सिद्ध केलें कीं, आजतागायत होऊन गेलेले चेंगिझखानादि सर्व शहेनशहा व सुलतान माझ्यासमोर कःपदार्थ आहेत ! मग कोठचा बंधुभाव आणि कोठलें नागरिक-स्वातंत्र्य ? इकडे ज्या पाश्चात्त्य देशांत श्रम-जीवींचे हाल कुत्रा खाणार नाहीं असें मार्क्सनें वर्तवलें होतें तेथें संघटनेच्या व जागृतीच्या बळावर कामगारवर्गानें आपली स्थिति इतकी सुधारून घेतली, कीं स्ट्रॅचीसारख्या मार्क्सवाद्याला आपला गुरु चुकल्याची कबुली द्यावी लागली ! दुसऱ्या महायुद्धानंतर तर जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, स्वीडन, डेन्मार्क, अमेरिका इत्यादि देशांतील कामगारांचें जणूं मध्यमवर्गीयांत रूपांतरच झालें. आणि रक्तशोषण, पिळणूक, बेकारी हे शब्द एकतर इतिहासजमा झाले किंवा त्यांच्यांतील धार नाहींशी झाली. पाश्चायत्त साम्राज्य-वाद व साम्राज्यें वितळणीस पडून कोलंबसापासूनच्या पांचशें वर्षांत निर्माण झालेला नकाशा उफराटा झाला. युरोप आणि आशियांत मात्र कम्युनिस्ट वर्चस्वाखालीं आलेले देश व तेथील जनता यांचें एकसांचीकरण झालें आणि राशिया व चीन जें जें म्हणेल त्याला ‘ नीचे मुंडी उपर हाथ ’ संमति देण्याची पद्धत सुरू झाली ! दुसऱ्या देशांतील शासनव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि परराष्ट्रीय धोरण आपल्या मर्जीप्रमाणें, जरूर तर बलप्रयोगानें सुद्धां,

नियंत्रित करूं पाहणें म्हणजेच साम्राज्यवाद ही जर व्याख्या बरोबर असेल, तर ह्यांपैकीं प्रत्येक पाप राशियानें व चीननें केलेलें आहे असें मला म्हणावयाचें आहे. पण प्रस्तुत लेखकासारखे जे कोणी ही नवीन लाल साम्राज्यशाहीच होय असें म्हणूं लागले तेव्हां कम्युनिस्टदेखील साम्राज्यवादी बनूं शकतात ह्या विचाराची गोळी अनेकांच्या घशाखालीं उतरतां उतरेना. हंगेरीच्या प्रकरणानंतरचा तापलेला वाद वाचकांच्या अजून स्मरणांत असावा असें वाटतें. पुढें तिबेटचा स्वाहाकार चीननें दिवसाढवळ्या केला, तेव्हां लोकांना थोडी अधिक जागृति आल्याचा भास झाला. पण ती तेवढ्याचपुरती क्षणजीवी ठरली.

## भ्रमांत वावरणारे सुजन

पुष्कळदां प्रश्न पडतो कीं, असें कां व्हावें ? आद्य शंकराचार्य म्हणाले होते कीं, मी श्रुति मानतों, पण उद्यां विस्तवानें हात भाजत नाहीं असें जर त्या म्हणूं लागल्या तर मी तें मानणार नाहीं. कारण तळहातावर निखारा घेतला तर हाताला चटका बसतो असा माझा अनुभव आहे. मार्क्सला कम्युनिझम म्हणजे काय अभिप्रेत होतें त्याबद्दल दुमत होऊं शकेल. पण १९१७ मध्यें राशियांत कम्युनिस्ट पक्षानें आपल्या हातीं बळजबरीनें सत्तासूत्रें घेतल्यापासून आजतागायत त्यानें केलेली वाटचाल आपल्या डोळ्यांनीं पाहिलेली असूनहि जे अजून कम्युनिझमला झुकतें माप देऊं इच्छितात त्यांना काय म्हणावें तेंच कळत नाहीं. आपल्या देशांत जातिद्वेष जसा रक्तांत भिनलेला आहे त्याचप्रमाणें आफ्रिका-आशिया खंडांतील जनतेच्या मनांत पाश्चात्त्यांच्या विषयींचा द्वेष रुजून बसलेला असल्याकारणानें तर आमची न्यायबुद्धि अशी एककल्ली बनलेली नसेल ना ? कीं राशिया-चीन हे इंग्लंड-अमेरिकेला वाकुल्या दाखवतात आणि त्या आम्हांला उघडपणें दाखवतां येत नाहींत म्हणून वर्गांतील वांड मुलांविषयीं भेकड मुलांच्या मनांत जसा छुपा आदर वसत असतो तसा हा हीनगंडाचा प्रकार आहे ? चीन-भारत संघर्ष हा उघड उघड कम्युनिझम आणि लोकशाही यांच्यामधील लढा असतां तो तसा नसल्याचा युक्तिवाद पंडित नेहरूंनीं करावा व साम्राज्यवादी चीन व शांततावादी भारत यांच्यामधील

हा झगडा आहे, कम्युनिझमला नांवें ठेवण्यांत अर्थ नाहीं, असली लिपापोती करावी, याचा अर्थच दुसऱ्या रीतीनें समजूं शकत नाहीं. कम्युनिझम-व्यतिरिक्त कोणतीहि जीवनपद्धति, मग ती यशस्वी होत असली तरीहि, जगांत टिकतां कामा नये, ही जागतिक कम्युनिझमची घोषणा आहे. हिटलरच्या नात्सीवादाची जी प्रतिज्ञा होती तीच तंतोतंत कम्युनिझमची प्रतिज्ञा बनलेली आहे. मानवाला सर्व बंधनांतून व शोषणांतून मुक्त करूं असें तिचें ध्येय उरलें नसून सर्व मानवांना आपल्या कोंडवाड्यांत डांबूं अशी महत्त्वाकांक्षा तिच्यांत निर्माण झालेली आहे. त्यामुळें कम्युनिस्ट हे जनतेचे विमोचक नव्हे तर वैरी ठरत आहेत, उद्धारक नव्हे तर बंदिपाल झाले आहेत. हें स्पष्ट दिसत असतांहि हिटलरच्या पोलंडवरील आक्रमणा-मधून निर्माण झालेलें युद्ध हें फॅसिझम व लोकशाही यांच्यांतील युद्ध आहे, याचें ज्ञान ज्यांना तत्काळ झालें त्याच नेहरूंना भारत-चीन संघर्षाचें खरें स्वरूप समजूं नये अथवा समजलें तरी तें स्वच्छ शब्दांत सांगण्याचें धैर्य होऊं नये याचें आश्चर्य वाटतें ! अजूनहि मार्क्सवादाची जबरदस्त भुरळ ह्या तथाकथित बुद्धिवादी नेत्यांच्या मनावर असून मार्क्सवादी पक्ष वा मनुष्य लोकशाहीचा मारेकरी होऊं शकतो असें मानण्यास त्यांचें मन आणि तसें बोलून दाखवण्यास त्यांची जिव्हा अजून धजत नाहीं हेंच खरें.

## आणि मार्क्सवादाचा मुडदा पडला !

१९१७ मध्यें ज्या दिवशीं आपल्या विरुद्ध प्रचंड बहुमतानें निवडून आलेल्या सोशल रेव्होल्यूशनरी व मेनशेव्हिक पक्षाच्या घटना समितीमधील सदस्यांना लेनिनच्या कम्युनिस्ट सोजिरांनीं बंदुकीचा धाक दाखवून घटना समिति बरखास्त केली त्याच दिवशीं मार्क्सवादाचा मुडदा पडला ! लोकसत्तेला सार्थ, सजीव व सघन करूं इच्छिणारा मार्क्सवादामधील आत्मा त्याच दिवशीं उडून गेला. राहिलें तें मार्क्सवादाचें केवळ कलेवर. स्टालिनच्या कारकीर्दीत त्यावर एक सुरेख थडगें बांधण्यास सुरुवात झाली होती. तें कार्य चिनी कम्युनिस्टांनीं भारताच्या लोकसत्ताक फौजांवर गोळ्या झाडून पूर्ण झाल्याचें जगाला आतां जाहीर केलें आहे ! यानंतर कम्युनिझम प्रगति, क्रांति, शांतता व समानता याचें प्रतीक होय हा प्रचार वेडे अथवा घालवेडे यांच्या

व्यतिरिक्त कोणाला करण्याची वा पटण्याची शक्यता उरलेली नाहीं. हें फार महान् कार्य केल्याबद्दल जगानें चीनचें सदैव ऋणी राहिलें पाहिजे. यानंतर बाल, याहोवा यांच्यासारख्या नरबलि प्रिय असणाऱ्या देवतांच्या पंक्तीला मार्क्सला बसवण्याची खाशी व्यवस्था माओ-चाओनीं करून ठेवली आहे. मनुष्यमात्राला बंधनमुक्त करण्याची प्रतिज्ञा करून निघालेल्या प्रेषिताचें मानवजातीला गुलाम करूं पाहणाऱ्यांच्या कुळदैवतांत रूपांतर करण्याची किमया चिनी कम्युनिस्टांनीं करून दाखवली हा त्यांचा केवढा पराक्रम !

## आंतरराष्ट्रीय झगडा

आंतरराष्ट्रीय कम्युनिझमचें अंतरंग या घटनेनें निर्विवादपणें उघडें झालें असल्यामुळें आंतरराष्ट्रीय लोकशाहीला आपल्या भवितव्याचा विचार करणें प्राप्त आहे. तसें केल्यास जगांत गट पडतील व दोन गट झाले तर जागतिक संघर्ष अटळ होईल, ह्या युक्तिवादांत कांहीं दम राहिलेला आहे असें मला वाटत नाहीं. आपण लोकशाहीचा गट स्थापन केला किंवा लोकशाहीच्या गटांत सामील झालों तर कम्युनिस्ट गटाला आपण वेढलों गेलों असें वाटेल आणि त्यांतील पुरोगामी विचार कुंठित वा हतबल होतील ही तर्कप्रणालि देखील चूक आहे. कारण कम्युनिस्ट गट आतां बचावात्मक धोरण घेत नसून तो आक्रमक बनलेला आहे आणि कोणताहि गट जेव्हां केव्हां आक्रमक बनतो तेव्हां तो उदारमतवादी राहणें असंभवनीय होतें. तेव्हां कम्युनिस्ट गटामधील उदारमती प्रवाह यापुढें वाढणार नसून त्यामधील आक्रमक, संहारक व उग्र मतप्रवाहांची सरशी होण्याची अधिक शक्यता आहे. सबब लोकसत्तावादी राष्ट्रें पूर्वीप्रमाणेंच जर पांगलेलीं राहिलीं तर तीं स्वखुषीनें पांगळीं राहिलीं असाच त्याचा अर्थ करावा लागेल. आंतरराष्ट्रीय कम्युनिझम विरुद्ध आंतरराष्ट्रीय लोकशाही असाच संग्राम यापुढील काळांत अपरिहार्य आहे आणि भारत हेंच त्याचें रणक्षेत्र बनण्याचीहि शक्यता आहे. तें तसें बनावें कीं न बनावें हें चीनवर जसें अवलंबून आहे तसें भारतावरहि आहे. आम्हीच जर आमचा प्रदेश सोडून देण्यास तयार होणार असूं तर वाद निकालांतच निघेल. त्यामुळें आमच्या तटस्थतेचें पातिव्रत्यहि संभाळलें

जाईल आणि परत कांहीं काळ हिंदी-चिनी भाई भाई बनतील ! एक मनुष्य व एक रेडा यांचा खुराक बकासुराला जोंपर्यंत चालू होता तोपर्यंत एकचक्रा नगरींतील नागरिक देखील सुरक्षित नव्हते काय ?

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३५७३८७ वि: निबंध
क्रमांक ........ नों: दि: १७.८.६७

# माओत्से तुंगच्या रणनीतीची चतुःसूत्री *

'नेफा'मध्यें चीनची फौज पावसाळ्यांतल्या लोंढ्याप्रमाणें आमच्या सैनिकांवर कोसळली आणि तिच्या अनिवार्य दाबामुळें आमच्या फौजा एका महिन्यांत सुमारें शंभर ते दीडशें मैल खालीं रेटल्या गेल्या, हतप्रभ होऊन बसल्या. ह्या घटनेला इतिहासांत तोड सापडली तर ती हिटलरच्या पांझर तुकड्यांच्या मुसंडीमध्येंच सांपडेल. आमच्या पीछेहाटीचें कारण सांगतांना भूतपूर्व संरक्षणमंत्री श्री. कृष्ण मेनन असे म्हणाले होते कीं, चिन्यांच्या संख्याधिक्क्यानें व शस्त्राधिक्क्यानें आम्ही पराभूत झालों (outnumbered & outweaponed). पण नंतर असें अनुभवास आलें कीं, जलद हालचालींतहि आमच्या फौजांवर त्यांनीं मात केली. त्यावर पंडितजींची मखलाशी अशी कीं, ते रात्रींच्या काळोखांतून गुपचूप आले. हें सांगणाराचा आशय असा असावा कीं, चिन्यांनी हिम्मत असेल तर दिवसाढवळ्या आमच्यावर चालून यावयाचें होतें, मग आम्ही आमचें पाणी त्यांना दाखविलें असतें! वस्तुतः एकदां युद्ध सुरू झाल्यावर शत्रूची संख्या मोठी होती, शस्त्रें अधिक कारीगर होतीं, तो झपाट्यानें अंगावर आला, रात्रींचा आला, आम्ही बेसावध असतां आला, अशा सबबी सांगणें म्हणजे आपल्या अपात्रतेची जाहिरात करण्यासारखेंच आहे. तथापि एकसारख्या चुका करीत राहण्याऱ्यानें आपल्या चुकांची कबुली दिली कीं तो शुद्ध होतो, इतकेंच नव्हे तर तो अधिकच थोर मुत्सद्दी ठरतो, अशी आपल्या देशाची परंपरा आहे. त्यामुळें चीनला शत्रु न मानण्याची घोडचूक करणाऱ्यांचें कांहींच चुकलें नसून शत्रूप्रमाणें वागण्यांत चीननेंच कांहीं भयंकर गोष्ट केलेली आहे असें जनतेला पटवून देण्यांत आमच्या राज्यकर्त्यांना झपाट्यानें यश येत आहे यांत शंका नाहीं.

तथापि एवढें आतां सगळ्यांच्याच लक्षांत आलें असावें कीं, (१) चीन हा आपला मित्र नसून शत्रु आहे; (२) तो कम्युनिस्ट पंथाचा कट्टा अभिमानी व प्रसारक असून शस्त्रबलानें देखील आपल्या सत्तेचा

---

* केसरी ३०-११-१९६२

प्रसार करण्यांत त्याला कसलीहि व कोणाचीहि शरम वाटत नाहीं; आणि ( ३ ) वाटाघाटी काय किंवा युद्ध काय, दोन्हीहि एकच एक राजकीय उद्दिष्ट साधण्याचीं दोन साधनें होत, असें तो मानीत असून गरजेप्रमाणें तो दोहों-पैकीं कोणतेंहि एक साधन सारख्याच सफाईनें वापरण्यांत तरबेज आहे.

हे तीन मुद्दे अगदीं जन्मजात 'ढ' माणसाच्या सुद्धां ध्यानांत यावेत अशी जरी परिस्थिति आज निर्माण झालेली असली तरी कम्युनिझम व शांतता-वाद यांची सांगड तयार करण्यांत गेल्या महायुद्धापासून कम्युनिस्टांनीं असें कांहीं यश मिळविलें आहे कीं अजूनहि अनेक विद्वज्जनांच्या मनांतली संश-याची सर्व कोळीष्टकें झटकलीं गेलीं असतीलच अशी ग्वाही देतां येणार नाहीं. त्यांचें समाधान व्हावें आणि अनुभवानें ज्या अज्ञ लोकांची कम्यु-निझमच्या आक्रमणाविषयीं खात्री पटलेली आहे त्यांना आपलीं मते ग्रंथगत आधारांच्या साहाय्यानें वज्रलेप करून घेतां यावीं म्हणून चिनी कम्युनिस्टांचा प्रणेता व आचार्य असा जो माओत्से तुंग त्याचे ह्यासंबंधींचे विचार येथें मांडण्याचें योजिलेलें आहे.

युद्धाचें स्वरूप व रणनीति हीं प्रत्येक जमान्यांत बदलत असल्याकारणानें प्रत्येक कालखंडासाठीं वेगळें युद्धशास्त्र असतें हें क्लॉज्‌विट्‌झचें मत माओला मान्य आहे. चीनमधील कम्युनिस्ट पक्षावर प्रारंभीं चँग कै-शेकच्या सैन्याचें असह्य दडपण राहिल्याकारणानें कम्युनिस्टांना आपल्या स्थानापासून सुमारें सहा हजार मैलांचा प्रवास करून देशाच्या वायव्य कोपऱ्यांत आपलें बस्तान बसवावें लागलें होतें. हा जो प्रचंड खटाटोप चिनी कम्युनिस्टांना करावा लागला व सरकारी फौजांशीं जो सतत लढा द्यावा लागला त्यामध्यें मिळालेल्या अनुभवावरून माओ त्से-तुंगनें आपली नवी सेना, नवें युद्धतंत्र निर्माण केलेलें आहे. प्रथम खडें सैन्य आणि जरूर पडली म्हणून त्यामधूनच गनिमी अथवा तुफानी तुकड्या तयार केल्या, अशी प्रक्रिया चीनमध्यें घडलेली नसून तेथें गनिमी सैन्यांतून खड्या सैन्याचा विकास झालेला दिसतो. त्यामुळें साहजिकच चिनी सैन्याचें स्वरूप व नीति प्रामुख्यानें गनिमी पद्धतीची राहिलेली आहे. प्रचंड सैन्यसंभार तयार करावयाचा, सैन्याचा समुद्रच निर्माण करावयाचा कीं ज्यामध्यें शत्रूला बुडवून टाकतां येईल ही माओत्से तुंगची प्रथमपासूनची आवडती कल्पना दिसते. कारण त्यानें

पंचवीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या गनिमी तंत्रासंबंधींच्या लेखांतहि ( A vast sea of guerrilas ) गनिमी सैनिकांचा अफाट समुद्र असे शब्द वापरलेले आढळतात. सैनिकांच्या लाटामागून लाटा शत्रूवर पाठवण्याचें तंत्र माओच्या सैन्यानें कोरियामध्यें वापरलें आणि ' नेफा ' मध्येंहि परवां परवां त्याच तंत्राचा अवलंब केला. या तंत्रामध्यें सैनिकांची हानि मनस्वी होते पण ध्येय-प्रचारासाठीं हवे तेवढे नरबलि देण्याची तयारी कम्युनिस्ट चीननें दाखवलेली आहे. त्यांच्या देशांत माणसांचा तुटवडाहि नाहीं आणि कम्युनिस्ट शासनपद्धतींत व्यक्तीला महत्त्वहि नाहीं. पण ह्या तंत्रांत ज्या मानानें मनुष्यहानि होते तेवढी शस्त्रहानि मात्र होत नाहीं. कारण दोन-तीन सैनिकां-मागें एक चांगलें हत्यार अशी चिनी सैन्याची बांधणी असून, एका सैनिकाच्या हातून शस्त्र गळून पडलें कीं तें दुसऱ्यानें उचलावयाचें अशी ही पद्धति असावी.

हूल पश्चिमेला उठवली तर घाव पूर्वेला घालावयाचा हें चीनच्या एका पुराण्या युद्धविशारदानें प्रतिपादलेलें तत्त्व आहे आणि तें फार उपयुक्त असें आहे असें माओ म्हणतो. भारताच्या बाबतींत तरी तें फारच फलदायी ठरलेलें आपण पाहतोंच आहों. कारण भारत सरकारची अशी कल्पना शेवटपर्यंत होती कीं, आपली तयारी लडाखमध्यें अपुरी आहे पण नेफामध्यें आपण शत्रूला पुरून उरूं. यामुळेंच पंडित नेहरूंनीं सिलोनला जातां जातां दीड महिन्यापूर्वी सहजगत्या सांगावें तसें सांगितलें असावें कीं, चिन्यांना मॅक्मोहन रेषेच्या पार पिटाळून लावण्याचा आदेश आपण आपल्या सेनेला दिलेला आहे. याचा अर्थ असा कीं, लडाखमधील तयारीच्या मानानें आपली ' नेफा ' कडची तयारी बेताची असल्याची बतावणी चीननें केली, ती यशस्वी ठरली आणि अननुभवी भारतीय सेनानी जनरल कौल हे त्या आमिषास नेमके बळी पडले. " हिंदी-चिनी भाई भाई " च्या घोषणा प्रथम देऊन नंतर चिनी सैनिकांनीं आपल्या ठाण्यावर गोळ्यांचा पाऊस पाडला असेंहि ऐकिवांत आहे. ह्यावरून माओनें फसव्या रणनीतीमध्यें कसा उच्चांक गांठलेला आहे हें लक्षांत येईल.

चीनच्या सैन्यामध्यें सेनाधिकाऱ्यांच्या बरोबरीनें राजकीय शिक्षक ( Political Commissars ) ठेवण्यांत येतात. सर्वच कम्युनिस्ट देशांचें

हें वैशिष्ट्य आहे. परंतु चीननें ही पद्धति कांटेकोरपणानें अंमलांत आणलेली दिसते. भारतीय सैन्यांत आपल्या देशासंबंधीं, लोकशाहीसंबंधीं, आपल्या थोर परंपरेसंबंधीं, आपल्या समाजवादी उद्दिष्टांसंबंधीं, सैनिकांचीं मनें तयार करण्यासाठीं काय परिश्रम घेतले जातात त्याची चौकशी केली तर बरीच करमणूक होईल आणि ह्यासंबंधींची अनास्था पाहून एखाद्याला चीडहि येईल. मेनन-गटाचीं 'लिंक' आणि 'ब्लिट्झ्' हीं स्वदेशाचा तेजोभंग करणारीं, पाश्चत्त्य राष्ट्रांची सतत नालस्ती करणारीं आणि कम्युनिस्टांचा उदोउदो करणारी दोन साप्ताहिकें हेंच आमचे सैन्याधिकारी व सैनिक यांचें मुख्य बौद्धिक अन्न होतें व अद्यापिहि असावें ! 'जगांत कम्युनिस्ट क्रांति घडवून आणण्याची जबाबदारी तुमच्या शिरावर आहे, तुम्ही जागतिक क्रांतीचे अग्रदूत आहां' अशी भावना कम्युनिस्ट चीनच्या सैनिकांत जागृत करण्याची पराकाष्ठा केली जाते. "जगांत दोन प्रकारचीं युद्धें होत असतात. न्याय्य युद्धें व अन्याय्य युद्धें. भांडवलशाही राष्ट्रें करतात तीं सगळीं अन्याय्य व आपण करतों तीं सर्व न्याय्य युद्धें होत. जगांत साम्राज्यवादी व कम्युनिस्ट असे राष्ट्रांचे दोनच गट असून तटस्थ राष्ट्रें असा गट वास्तविक अस्तित्वांतच नाहीं, तो केवळ फसवेगिरीचा प्रकार आहे. तटस्थ राष्ट्रांना आपल्याकडे ओढून तरी घेतलें पाहिजे किंवा साफ करून टाकलें पाहिजे, तिसरा मार्ग नाहीं. आपण परदेशांशीं युद्ध करतों तेव्हां ते तेथील श्रमिक जनतेच्या मुक्तीसाठीं करतों, स्वतःच्या पाव आण्याच्या फायद्यासाठीं नाहीं. म्हणून कम्युनिस्ट सेना ह्या कधींहि आक्रमक होऊं शकत नाहींत, आक्रमण करूं शकत नाहींत; इतर देशांतील श्रमजीवी जनतेचें दास्यविमोचन करण्यासाठींच त्यांचा जन्म आहे" इत्यादि.

हा प्रचार इतका पद्धतशीरपणें चालतो कीं, त्यामुळें अनेक शहाणे लोकहि फसतात. आपल्या सरकारचें कम्युनिस्ट देशाविषयींचें धोरण ह्या समजुतीवरच आधारलेलें नव्हतें काय कीं कम्युनिस्ट कधीं आक्रमण करणार नाहींत ! १९६० सालीं मे महिन्यांत एका मराठी वृत्तपत्रांत यासंबंधीं येऊन गेलेलें प्रतिपादन पुन्हा एकदां डोळ्यांखालून घालण्यासारखें आहे. तें प्रतिपादन पुढीलप्रमाणें होतें—"लोकसंख्या आणि शस्त्रबळ भारत-पाकिस्तानपेक्षां चीनचेंच अधिक आहे. कम्युनिझमला शस्त्रानें उत्तर देणें हा

वेडेपणा आहे. “ प्राण गेला तरी हरकत नाहीं ” असें बोलण्यांत प्राणहि जाईल आणि सीमाप्रदेशहि जाईल, ही वस्तुस्थिति आहे. आणि इंग्लंड-अमेरिकेची मदत घेऊन युद्ध पुकारल्यास शेवट चांगला होणारच नाहीं. म्हणजे सारांश हा कीं, कम्युनिस्ट आक्रमण मोडणें दिसतें तेवढें सोपें नाहीं. लोकशाही मार्गानें समाजवाद आणण्याच्या घोषणा करणाऱ्यांना गेल्या बारा वर्षांत या ध्येयाच्या दिशेनें दोन पावलेंहि प्रगति करतां येत नाहीं मग समाजवाद कुठला आणि कसला येणार ?

‘ भारत-चीन सीमावाद हा खरोखरचा वाद आहे कीं भारत-पाकिस्तान-मधील शेतकरी-कामगारवर्गाला जागृत करण्यासाठीं जागतिक कम्युनिस्ट चळवळीच्या लढ्याचा तो एक भाग आहे, याचाभारत-पाकिस्तानच्या नेत्यांनीं विचार करावा हेंच बरें... कम्युनिझममध्यें प्रादेशिक आक्रमणाला स्थान नाहीं. शिवाय आज ना उद्यां भारत-चीन सीमावाद भारतीय कम्यु-निस्टच सोडवतील हें अधिक सत्य आहे.’

हा उतारा ४ मे १९६० च्या सांजमराठामधील चौघडा आणि सनईतला आहे एवढें सांगितल्यावर अधिक टीपाटिपणी करण्याचें कारण पडूं नये.

वाटाघाटी, चर्चा, बोलणीं यांच्याविषयींची माओची भूमिका सुद्धां अत्यंत व्यवहारवादी आहे. त्यानें स्वच्छच म्हणून ठेवलें आहे कीं “ क्रान्ति-कारक क्वचित्‌च तडजोड करतात. केवळ आपला व्यूह अधिक चांगला जमवतां यावा म्हणून तडजोडी करण्यांत येत असतात. म्हणजे वाटाघाटींचे उद्देश दोन : आपली बाजू भक्कम करण्याकरतां वेळ काढणें आणि शत्रूला निराश करणें, दमवणें, ताप देणें. क्रांतिकारकांच्या कडून एकहि महत्त्वाचा मुद्दा पदरांत पाडून घेण्याची अपेक्षा कोणीहि करूं नये. कारण आपल्या व्यूहाचा एकसंधपणा कायम राहावा आणि अंतिम जयाला उपकारक परिस्थिति निर्माण व्हावी एवढाच त्यांच्या बोलणीं सुरू करण्यामधील उद्देश असतो. ” आपली भूमिका जो शत्रु इतक्या स्पष्टपणें व ठामपणें आधींच जाहीर करून ठेवतो, त्याला विश्वासघातकी म्हणून नांवें ठेवण्यांत कांहीं अर्थ आहे काय ? येथें आपणच आपले शत्रु अशी स्थिति झालेली नाहीं काय ?

" राजकीय सत्ता ही बंदुकीच्या नळीमधून प्राप्त होत असते, " हा जसा माओत्से तुंगचा सिद्धान्त आहे त्याचप्रमाणें " युद्ध करूनच युद्धाचा शेवट करतां येईल, " अशीहि त्याची शिकवण आहे. हें युद्ध करीत असतांना आपल्या सोईसाठीं अधूनमधून बोलणीं करावीं लागलीं तर तीं अवश्य करावीं; पण आपलें उद्दिष्ट काय तें विसरूं नये आणि तयारींत खंड पडूं देऊं नये असें माओचें स्पष्ट सांगणें आहे. वाटाघाटींच्या देखाव्याआड युद्धाची तयारी करीत राहणें, शत्रुसेनेला बुडवून नष्ट करील एवढा सेनेचा समुद्र निर्माण करणें, सैनिकांना लष्करी शिक्षणाच्या बरोबरीनें राजकीय शिक्षण देऊन त्यांचीं मनें तयार करणें आणि जगांत कम्युनिस्ट विचारपद्धति व समाजपद्धतीवांचून दुसऱ्या कोणत्याहि पद्धतीला थारा उरूं द्यावयाचा नाहीं हें ध्येय नित्य नजरेसमोर ठेवून त्या दृष्टीनें सर्व हालचाली करणें ही माओ त्से-तुंगच्या रणनीतीची चतुःसूत्री आहे. तिच्यावर त्याचा इतका जबरदस्त विश्वास आहे, कीं आपल्या रणनीतीसमोर पाश्चात्त्य देशांचें सैनिकसामर्थ्य अथवा ॲटमबाँबसारखीं संहारक शस्त्रें हीं कागदी वाघाप्रमाणें आहेत ( paper tiger ) असें तो मानतो.

आपल्याला कोणत्या प्रकारच्या दुष्मनाशीं सामना करावयाचा आहे तें आपल्या सरकारनें जरी समजून घेतलेलें नसलें तरी लोकशाहींत जनतेनें समजून घेतलेलें असावें म्हणजे त्याचा पुढें-मागें उपयोग होण्याचा संभव !

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम.................... वि: ..............
क्रमांक .................... नों दि: ..............

# ही आत्मवंचना ! *

कोलंबो योजना म्हणून जी तडजोड गेल्या महिन्यांत कोलंबो येथें जमलेल्या सहा तटस्थ राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं सुचविली तिला तत्त्वतः मान्यता दिल्याचें प्रथमतः चीननें आणि आतां भारतानें जाहीर केलेलें आहे. ही मान्यता देतांना त्या तडजोड मसुद्याचा तपशीलवार अर्थ आपण काय समजलों ह्या बाबतींत चीननें कोलंबोकडे जो कांहीं खुलासा पाठविलेला आहे तो मात्र अजून गुलदस्तांतच आहे. भारताकडून गेलेला खुलासा वृत्तपत्रामधून फुटला असला तरी तो ज्याअर्थीं संसदेसमोर ठेवण्यास आपल्या पंतप्रधानांनीं नकार दिलेला आहे त्याअर्थीं तो देखील अजून गुप्तच आहे असें मानलें पाहिजे. याचा अर्थ असा कीं, चीन व भारत यांनीं सीमा प्रश्नाबाबत नक्की काय करावयाचें ठरविलें आहे याचा तपशील आपणांस आज ठाऊक नाहीं. कदाचित् चीनच्या व भारताच्या प्रतिनिधींच्यामध्यें बोलणीं होत जातील तसतसा तो तपशील उलगडत जाणार असावा !

तथापि सुदैवाची गोष्ट अशी कीं, कोलंबो योजनेविषयींच्या सर्वच गोष्टी कांहीं आपल्यापासून गुप्त ठेवण्यांत आलेल्या नाहींत. उदाहरणार्थ, अरब प्रजासत्ताक, घाना, सिलोन, ब्रह्मदेश, इंडोनेशिया आणि कांबोडिया ह्या भारताच्या समानशील मित्रराष्ट्रांचे प्रतिनिधि सिलोनच्या राजधानींत जमले, त्यांनीं अनेक दिवस डोकेंफोड करून हा तडजोडीचा मसुदा एकमतानें बनवला आणि तो देखील अशा खुबीनें बनवला कीं, त्यांत कोणी कोणावर आक्रमण केलें, कोणाची कांहीं आगळीक चूक झाली कीं नाहीं, कोण दोषी, कोण निर्दोषी यांचा थांगपत्ता लागूं नये. तदनंतर पेकिंगपर्यंत ही मंडळी पोंचली. तेथें त्यांनी विश्वशांतीच्या ध्यासानें खंगलेल्या पेकिंगच्या कम्युनिस्ट नेत्यांना आपला मसुदा पटवून दिला. एवढें झाल्यावर आपले हे थोर मित्र दिल्लीला आले. दिल्लींत तर त्यांना कांहींच त्रास पडला नाहीं. दिल्लीच्या परराष्ट्रीय खात्यामध्यें तडजोड ह्या शब्दावांचून दुसरा कोणताहि शांततेच्या पावित्र्याचा भंग करणारा शब्द उच्चारण्याची मनाई गेल्या पंधरा

---

* *लोकमित्र, दिवाळी अंक १९६२.*

वर्षांपासून जारी आहे हें समजल्यावर त्यांना अत्यानंद झाला आणि आपल्या शिरावरची ही प्रचंड जोखीम आतां दूर होणार ह्या विषयींचा आनंद अरब प्रजासत्ताकाचे पंतप्रधान अली साब्री यांनीं दिल्लीहून निघतांनाच व्यक्त केला. गेलीं सुमारें सात आठ वर्षें चीन जें कांहीं भारताच्या उत्तरसीमेवर करीत आहे त्याला सीमासंघर्षाहून अधिक महत्त्व नाहीं व जी तडजोड सुचविलेली आहे ती दोन्ही देशांना न्याय देईल अशी आहे असेंहि त्यांनीं सांगून टाकलें. एकंदरींत आदर्श अशी ही तडजोड असल्यामुळें तिचा तपशील समजण्यापूर्वींच भारतीय कम्युनिस्ट पक्षानें ती स्वागतार्ह आहे असें ठरवलें !

तेव्हां लढाईचें पर्व आणि आणीबाणीचा काळ अधिकृत रीत्या नसला तरी अनधिकृत रीत्या संपून आतां परत शांततापूर्ण वाटाघाटींचा कालखंड सुरू झालेला आहे आणि चीन परत आपल्यावर हल्ला चढवीपर्यंत तो संपणार नाहीं, एवढी साधी गोष्ट ज्यांना उमगणार नाहीं त्यांच्या मठ्ठपणाची तारीफ करावी तेवढी थोडीच ठरणार आहे. एकच खबरदारी आपण घ्यावयाची आणि ती देखील पुढचे दोन चार महिने, कीं आणीबाणी संपली आहे अशासारखीं गैरसोयीचीं विधानें उघडपणें कोठेंहि करावयाचीं नाहींत. शिवाय खाजगींत आपणां सर्वांनाच म्हणजे मंत्र्यापासून चपराशापर्यंत सर्वांना जें मान्य आहे तें उघड बोलण्याची जरुरी तरी काय ?

चीनला आक्रमक म्हणण्यास आपलीं खास मित्र-राष्ट्रें जर तयार नाहींत तर आपण तरी त्याला आक्रमक म्हणा कशाला ? परंतु आपल्या सीमेचा प्रश्न असल्यामुळें निदान दोन प्रश्नांचा तरी विचार आपण केला तर तें पंचशीलाला सोडून होणार नाहीं, अशी मला आशा वाटते. पहिला प्रश्न असा कीं, तपशील सोडून देऊन निदान ढोबळ मानानें तरी लडाखपासून लोहितपर्यंतच्या सरहद्दीची परिस्थिति ह्या कोलंबोयोजनेनुसार कशी असणार आहे ? ह्या एकंदर सरहद्दीचे विभाग तीन : पश्चिम विभाग, मध्य विभाग आणि पूर्व विभाग. पूर्व विभागांत म्हणजे नेफांत मॅकमोहन रेषेच्या पलीकडे चीनच्या फौजा जातील, मॅकमोहन रेषेपर्यंत भारतीय सेना जाऊं शकतील आणि थागला पहाड व लांगजू या दोन टापूंत मात्र उभय राष्ट्रांच्या संमतीनें काय व्यवस्था करावयाची तें ठरेल. याचा अर्थ असा असेल काय, कीं थागला

पहाडाची जागा सोडली तर जवळजवळ ८ सप्टेंबरची परिस्थिति परत निर्माण होईल. कारण त्याहि वेळीं आपण लांगजूचा टापू खालींच सोडलेला होता. थागला पहाड ही ह्या युद्धांत अतिशय मोक्याची जागा ठरली असल्याकारणानें तिच्याविषयीं मात्र चीन घोळ घालीत असावा.

त्यानंतर मध्यविभाग. त्या विभागांत बाराहोतीसारखे टापू आहेत. तेथें आहे हीच परिस्थिति कायम राहावी असें सुचविण्यांत आलेलें आहे. नेपाळमध्यें काठमांडूपर्यंतचा रस्ता बांधण्याची सोय झाल्यानंतर मध्यविभागाविषयीं चीनला विशेष महत्त्व वाटूं नये हें सहाजिक आहे. कारण आंधळा मागतो एक डोळा तर देव देतो दोन, असें घबाड चीनला नेपाळकडून प्राप्त झालेलें असल्यावर बाराहोतीसारख्या किरकोळ जागांकरितां तो कशाला तट्टून बसेल ?

त्यानंतर पश्चिम विभाग. ह्या लडाखच्या सीमेवरील भागांतच चीनच्या कारवाया १९५४–५५ पासून सुरू आहेत. कोलंबो योजनेमधील स्पष्टीकरण वाचूनहि तेथें कोणती परिस्थिति राहणार तें स्पष्ट होत नाहीं. कारण ७ नोव्हेंबर १९५९ ला चीनच्या प्रत्यक्ष कबजांतील ( ॲक्चुअल कंट्रोल ) भूमीची रेषा कोणती हा तीव्र मतभेदाचा विषय बनलेला आहे. जी रेषा चीनच्या पंतप्रधानांनीं भारताच्या पंतप्रधानांना २१ नोव्हेंबर व २८ नोव्हेंबर रोजीं पाठवलेल्या खलित्यांत नमूद केलेली आहे ती ८ सप्टेंबरनंतर केलेल्या आक्रमणामुळें निर्माण झालेली रेषा आहे. स्पांगूर सरोवर, हॉट स्प्रिंग, गालवानचें खोरें व चिपचापचें खोरें अशी ती दक्षिणेकडून उत्तरेकडे सरकून काराकोरम खिंडीच्या जरा पूर्वेस थांबते. आपले पंतप्रधान जी रेषा सांगत आहेत ती स्पांगूर सरोवर, कोंगका खिंड, शामालुंगपा या ठिकाणांवरून अक्षांश रेखांश ७९०, ३५० च्या छेदावरून हाजीलंगरपाशीं आकसाय चीन रस्त्याला जाऊन भिडते. ह्या दोन रेषांत हजारों मैलांचा प्रदेश सामावलेला आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

सारांश, प्रत्यक्ष कबजाची रेषा अजून ठरावयाची आहे. ती ठरली म्हणजे तिच्या दोन्ही अंगांना २० किलोमीटरपर्यंत चिनी व भारतीय सेना असणार नाहींत आणि ह्या ४० किलोमीटरच्या बिगर लष्करी पट्ट्याचा कारभार कसा व कोणी करावयाचा हें भारत-चीनचे प्रतिनिधि ठरवतील.

कोट्यवधि रुपयांच्या साधनसामुग्रीची हानि, शेंकडों सैनिकांचें बलिदान, हजारोंची धरपकड, जगभर मानहानि आणि नाचक्की एवढें मोल देऊन आपण तडजोड म्हणून काय पत्करीत आहोंत ? तर हजारों चौरस मैलांचा टापू चीनला बहाल करणें. ८ सप्टेंबर हा शब्द पंतप्रधान नेहरूंनीं उच्चारला तेव्हांच मी मनाशीं खूणगांठ घातली कीं, हा शब्द आपल्या मानगुटीस बसणार. मागच्या लोकसभेंत त्यांनीं लांगजू हें लष्करी दृष्ट्या महत्त्वाचें नसल्याबद्दल असेंच विधान बेछूटपणें केलेलें होतें तेंच नेमकें या वेळीं आपणांस भोंवतें आहे. कारण प्रतिपक्षी साहजिकच असा युक्तिवाद करतो कीं, बिन-महत्त्वाच्या ठिकाणाबद्दल एवढी खळखळ कां ? ८ सप्टेंबरच्या रेषेच्या मागचा चीनकडे जाणारा प्रदेश त्यांनीं किती विकसित केलेला आहे तें चायनीज ॲग्रेशन इन् मॅप्स् ह्या सरकारच्या नकाशा-पुस्तिकेंतील क्रमांक २ च्या नकाशावरून दिसून येईल. लानाक खिंडीपासून हाजी लंगरपर्यंत बनवलेल्या मुख्य रस्त्यापासून पश्चिमेकडे म्हणजे भारताकडे जाणारे किती फाटे दोनचार वर्षांच्या काळांत चीननें बनवले होते ते पाहून खरोखर त्यांच्या उपक्रम-शीलतेचें कौतुक वाटतें आणि नेफामध्यें रस्ते बांधण्यासाठीं निर्माण केलेल्या " टस्कर " संघटनेची निष्क्रियता तुलनेनें अधिकच डोळ्यांत भरून सन शरमिंधें बनून जातें.

मजा अशी आहे कीं, ८ सप्टेंबरच्या रेषेच्या पूर्वेला जो आक्साय-चीन रस्ता बांधला गेला आणि तदनंतरच्या काळांत त्याला आधारभूत मानून चीननें जे पूर्वपश्चिम फाटे काढले त्यांचें अस्तित्व लक्षांत न येण्याइतका अक्षम्य आंधळेपणा .आपण दाखवला तो लपवतां आल्यास पाहावा म्हणून याच पुस्तिकेंत " क्लिअरिंग ऑफ द अस्काय चनि रोड " असे शब्द वरच्यावर वापरले आहेत. त्यांत सुचवायचें असें कीं रस्ता जणू काय पूर्वापार होताच. त्याची फक्त साफसफाई व डागडुजी चिन्यांकडून करण्यांत आल्यामुळें ती गोष्ट भारत सरकारच्या ध्यानांत आली नाहीं. हा शुद्ध सत्यापलाप आहे. खेंचरें जा[ण्याचा रस्ता मोटरींना योग्य बनवणें आणि तो देखील लष्करी अवजड मोटरींना, ही कांहीं गुपचूपपणें करण्याची गोष्ट नाहीं. तिबेटांत बंड झालें तर तें मोडण्यासाठीं जवळचा व बिनधोक मार्ग म्हणून हा रस्ता राजरोस बनवण्यांत आला आणि ऐकीव गोष्ट अशी आहे

कीं, त्या वेळच्या त्या भागांतील सेनापतीनें भारत सरकारच्या कानावर ही घटना घातलीहि होती. पण ती परराष्ट्रखात्याच्या कचरा पेटींत पडली कीं संरक्षण खात्याच्या तें ठाऊक नाहीं. उपरांत असेच अनेक रस्ते चिन्यांनीं बांधले, ते सगळे ८ सप्टेंबर रेषा मान्य केली तरी चिन्यांच्या ताब्यांत राहातीलच. ज्या महाभागांना, त्यांत पंडितजींचाहि समावेश होतो, आमची ८ सप्टेंबर विरोधाची भूमिका समजत नाहीं त्यांच्याबद्दल काय म्हणावें ? त्यांना, ब्रह्माऽपि नरं न रंजयति। एवढेंच म्हणतों आणि गप्प बसतों.

आतां दुसरा प्रश्न असा कीं, चीननें हा जो पवित्रा टाकला तो कशासाठीं टाकला असावा असें आमचें भारत सरकार मानतें. स्वतःच्या देशांतील असंतोष शांत करण्यासाठीं, कीं भारताची बेअब्रू करण्यासाठीं, कीं केवळ गफलतीनें कीं आणखी कशासाठीं ? माझें त्याबाबतचें निदान असें आहे कीं, चीननें हें जें आक्रमण भारतावर केलें तें तो कम्युनिस्ट आहे म्हणून आणि सच्चा कम्युनिस्ट आहे म्हणून. रशिया-चीन-वादामधील चीनची बाजू वाचल्यानंतर माझी खात्री झालेली आहे कीं, खरा पाक कम्युनिस्ट चीनच आहे. रशिया वगैरे कम्युनिस्ट देश अकरमाशी किंवा नव्या परिभाषेंत १४ कॅरट कम्युनिस्ट झालेले आहेत. त्याच न्यायानें भारतामधील रणदिवे गटाचे कम्युनिस्ट हेच खरे तत्त्वस्थ कम्युनिस्ट व डांगे गटाचे कम्युनिस्ट हें संधिसाधु व भेसळ कम्युनिस्ट ठरतात. ज्यांना माझ्या म्हणण्याबद्दल शंका वाटत असेल त्यांनीं ३१ डिसेंबर १९६२ च्या पीपल्स डेलीमधील संपादकीय अवश्य नजरेखालून घालावें अशी माझी त्यांना विनंति आहे. सध्यांची जागतिक परिस्थिति, अमेरिकन गटाचें सामर्थ्य आणि त्याची भूमिका, रशियादिक सुधारणावादी कम्युनिस्टांचें धोरण, भारतासारख्या तटस्थ देशांचें मूल्यमापन आणि ह्या जागतिक संदर्भांत सच्चा कम्युनिस्ट पक्षाचें कर्तव्य, आदिकरून विषयावर इतकें सडेतोड, संदेहातीत आणि शास्त्रपूत ( म्हणजे मार्क्सवादी दृष्टीनें ) विवेचन क्वचित्च वाचावयास मिळतें. ज्याला कोणाला स्वतःला कम्युनिस्ट म्हणवून घ्यावयाचें असेल, त्यानें सध्यांच्या जगांत कसें वागलें पाहिजे याचें मार्गदर्शन अर्जुनाला " मामनुस्मर युद्धय च ' असें सांगणाऱ्या श्रीकृष्णाच्या अधिकारानें येथें सांगितलेलें आढळेल. हें संपादकीय आणि माओ त्से तुंगसारख्या

चीनच्या भाग्यविधात्यांचीं आतांपर्यंतची प्रतिपादनें वाचल्यानंतरहि, भारतानें चीनकडून इतिउत्तरच्या काळांत कोणत्या गोष्टीची अपेक्षा करावी ह्याबद्दल जे साशंक राहतील त्यांची तुलना ' माइन काम्फ ' लिहिणाऱ्या हिटलरनें जग गिळण्यासाठीं जबडा उघडल्यानंतर आश्चर्यानें आ वासून बघत राहणाऱ्या बावळटाशींच करणें प्राप्त आहे. भारतीय नेतृत्व अथवा भारताची भूमिका ही आपल्याला अनुकूल आहे तोंपर्यंत शांततामय सहजीवनाला हरकत नाहीं; पण ती जर विरुद्ध जाईल तर कम्युनिझमच्या विश्वविजयास्तव त्याला पायदळीं रगडला पाहिजे, याव्यतिरिक्त अन्य कोणताहि अर्थ चीनच्या तात्त्विक भूमिकांमधून निघूं शकणार नाहीं.

म्हणून कम्युनिस्ट चीननें अणुबॉंब तयार केला तरी आम्हांला त्यापासून चिंता नाहीं. चिनी लोक चांगले आहेत, फक्त त्यांचे राज्यकर्ते चुकले आहेत असलीं विधानें अजूनहि जेव्हां आमचे पंतप्रधान करतात त्या वेळीं कमालीची विषण्णता मनाला प्राप्त होते. आमच्या मनांत असेल तर आम्हींहि अणुबॉंब करूं असें म्हणणाऱ्यांनीं लक्षांत ठेवावें कीं, फ्रान्स-सारख्या देशाला देखील चार वर्षांच्या सायासानंतर तें अस्त्र सिद्ध करणें शक्य झालें. चीनची अणुबॉंबबद्दलची भूमिकाहि त्यांनीं लक्षांत घ्यावी. " अणुबॉंबच्या सिद्धीमुळें न्याय्य युद्ध व अन्याय्य युद्ध यांच्यांतील फरक नष्ट झाला आहे हें म्हणणें आम्हांस मान्य नाहीं; अणुयुद्धामुळें मानवजातीचा संहार होईल, मग जे मूठभर वांचतील ते भांडवलशाहीवाले असले काय नि साम्यवादी असले काय, हा युक्तिवाद आम्ही स्वीकारूं शकत नाहीं; अणुबॉंब शत्रूपाशीं आहे म्हणून त्याच्यासमोर गुडघे टेकावे, क्रांतिकारक लढे बंद करावे हें आम्ही मान्य करीत नाहीं " अशी चीनची भूमिका आहे. ह्यापेक्षां स्वच्छ, संशयातीत भूमिका कोणती असूं शकेल ? त्याच्याच तोडीची स्वच्छ भूमिका आमची असावयास नको काय ? आमची दोलायमान वृत्ति संपणार तरी केव्हां ? कीं ही आत्मवंचना अशीच चालूं राहणार ? आणि भारतीय जनता ती चालूं देणार ?

० ० ०

# युद्धपरिस्थिति आणि तरुण *

' युद्धपरिस्थिति प्राप्त झाली असतां देशामधील तरुणांनीं काय करावें ? ' असा प्रश्न उपस्थित करणें हेंच कांहींच्या मतें विक्षिप्तपणाचें द्योतक ठरण्याचा संभव आहे. कारण ते म्हणतील कीं, देशांतील सध्यांसारख्या परिस्थितींत तरुणांनीं करावयाचें कर्तव्य कोणतें तें स्पष्टच आहे. खांद्यावर बंदूक टाकून आघाडीवर कूच करण्यासाठीं अथवा गृहसंरक्षक दलांत सामील होण्यासाठीं त्यांनीं सिद्ध असावें, हेंच त्यांचें कर्तव्य. तें इतकें स्पष्ट असतां तें दाखवण्याचा प्रयत्न करणें म्हणजे दिवस उजाडल्यावर सूर्य दाखवण्याचा उद्योग करण्याप्रमाणें होणार आहे.

> हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं
> जित्वा वा मोक्ष्यसे महीम् ।
> तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय
> युद्धाय कृतनिश्चयः ॥

हा आदेश प्रत्यक्ष भगवंतांनीं दिल्याला दोन हजारांवर वर्षें झालेलीं नाहींत काय ? मग पुन्हा तोच प्रश्न विचारून तेंच उत्तर मिळवण्याचा खटाटोप कशासाठीं करावयाचा ? परंतु दोन अडीच हजार वर्षांपूर्वीं जो आदेश गीतेनें दिला त्या वेळीं युद्धाची जी परिस्थिति होती त्यापेक्षां आजची स्थिति फार वेगळी आहे. केवळ पक्षकार, शस्त्रें आणि साधनेंच चालू जमान्यांत बदललीं आहेत असें नसून युद्धाची पद्धति, युद्धाचा विस्तार, युद्धाला कारणीभूत होणाऱ्या समस्या आणि त्यांच्या बरोबरच युद्धाचीं उद्दिष्टें हीं सगळींच इतकीं बदललेलीं आहेत कीं, युद्ध करणाऱ्यांनीं 'कृतनिश्चय' बनून त्यांत उतरावें, एवढाच गीतेच्या आदेशांतील भाग सनातन म्हणून स्वीकरणीय मानतां येईल. आधुनिक युद्धें सुरू होण्यापूर्वींच्या समरांत ज्यांना धनुष्य, तरवार वा बंदूक पेलतां येत नसे त्यांचें खरोखरच कांहीं काम नसे. त्यामुळें जीं उंचीपुरीं व धट्टीकट्टीं जवान माणसें असत तींच युद्धांत उतरत.

---

* *साधना २९-१२-६२*

बाकीच्या माणसांना म्हणजे स्त्रिया, वृद्ध, बालकें, अशक्त पुरुष, इत्यादींना, इतकेंच कशाला लढाऊ जाती म्हणून ज्यांना समजण्यांत येई त्यांच्या व्यतिरिक्त जातींतल्या धडधाकट तरुणांनासुद्धां, बऱ्याचेंच काम करावयाचें असे! युद्धाचा निकाल एका मैदानावर चारसहा तासांत होऊन जाई. महाभारतीय युद्ध अठरा दिवस चाललें आणि रामरावण युद्ध दहा दिवस चाललें, म्हणजे तत्कालीन दीर्घ युद्धांची ती परिसीमाच म्हणावयाची ! पानिपतावरचें अथवा कोरेगांव भीमेचें युद्ध एकेका रणांगणावर पांचसहा तासांत संपून इतिहासाचें एक सबंध प्रकारण संपलें, तर पहिलें महायुद्ध चार वर्षें व दुसरें सहा वर्षें चाललें. ह्यावरून आणि पहिल्या महायुद्धांत सर्व युरोप, ॲटलांटिक व हिंदी महासागर तर दुसऱ्या युद्धांत युरोप, आफ्रिका, जपान, सिंगापूर ते मणिपूर एवढा भूभाग; पॅसिफिक, ॲटलांटिक व हिंदी महासागर एवढा जलभाग व त्यावरचा आकाशभाग एवढ्यांचें रणांगण बनलें होतें. त्यावरून प्राचीन कौरवपांडवी व रामरावणी युद्धें, जुनीं चौहान-घोरी अथवा गिलचे-मराठी युद्धें आणि आजकालचीं महायुद्धें यांच्यामधली जमीन-अस्मानाची तफावत सहज लक्षांत यावी.

## युद्धांत सर्वजण सामील

तेव्हां चीन-भारताचा संघर्ष सुरू झाला असतां जे तरुण खांद्यावर बंदुका टाकण्याची तयारी करतील त्यांनींच तेवढें आपलें कर्तव्य बजावलें असें होईल, ह्या म्हणण्यामुळें कितीतरी तरुणांना आपण युद्धविषयक कर्तव्यक्षेत्राच्या मर्यादा संकुचित करून विनाकारण अकर्मक बनवीत आहोंत, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. आधुनिक युद्धांचा हा विशेष आहे कीं तीं कोणालाच आपल्या संहारक दाढांपासून दूर समजत नाहींत. लष्करी व मुलकी, रणांगणावरचा व रणांगणाबाहेरचा असले तपशील तीं मानीत नाहींत. प्रत्यक्ष बंदूक चालवणाऱ्या सैनिकापासून तों त्याच्यापासून पांचशें मैल मागें त्याच्यासाठीं भटारखान्यांत रोटी भाजणाऱ्या स्वयंपाक्यापर्यंत, त्याचे बूट शिवणाऱ्या चांभारापर्यंत, त्याचें घर संभाळणाऱ्या त्याच्या पत्नीपर्यंत, आणि जनतेचें लक्ष प्रत्यहीं रणांगणावरील हालचालीवर केंद्रित राखून तिची हिंमत खचूं नये ह्याकरतां लेखणी चालवणाऱ्या संपादकापर्यंत सगळे जण एका अर्थीं युद्धच

खेळत असतात, असें म्हणणें योग्य ठरेल. सध्याच्या रणांगणाची ही व्याप्ति आपण ओळखली कीं मग आपलें युद्धविषयक कर्तव्य कोणतें तें समजणें व तें पार पाडणें बरेंच सोपें होईल. कारण मग असें समाधान लाभेल कीं समाजाच्या सर्व हितकारक व क्षेमकारक प्रवृत्ति नेहमीपेक्षां उत्कृष्ट चालाव्या म्हणून प्रत्येक व्यक्तीनें तिच्या बुद्धिशक्तीला अनुसरून आपापलें काम करण्याची शिकस्त केली म्हणजे युद्धकर्तव्य बजावल्याप्रमाणेंच आहे. मात्र ह्या उद्योगांत असें कांहीं नसावें कीं, ज्याच्या योगानें समाजाची फसवणूक होईल, राष्ट्राच्या मनाची द्विधा अवस्था होईल, त्याची प्रतिष्ठा भंगेल, त्यांत ढिलाई निर्माण होईल.

## सर्वांच्या कर्तबगारीला संधि

आपल्या देशाला युद्ध जिंकण्यासाठीं आज कशाची गरज आहे तें सरकारनें जनतेला स्पष्टपणानें सांगितलें पाहिजे हें तर खरेंच; पण तें स्वतः जाणून घेण्याची पराकाष्ठा तरुणांनींहि केली पाहिजे. एकदां दहा-पांच रुपये युद्ध निधीला दिले किंवा एखाद्या निदर्शनांत भाग घेतला म्हणजे राष्ट्राचे नागरिक म्हणून आपलें काम आपण बजावलें असें मानणें चुकीचें होईल. नवे संरक्षणमंत्री श्री. चव्हाण एकदां म्हणाले कीं, "घोंगड्या विणणारा धनगर हा नेफांत राहणाऱ्या जवानाइतकाच मोलाचा आहे." हें त्यांचें विधान मुळींच अवास्तव नाहीं. कारण कांबळ्यामुळें जवानाच्या शरीराचा थंडीपासून बचाव होतो. पण त्याहि क्षेत्रांत संशोधनाला म्हणजेच अधिक प्रयत्नांना जागा आहे, हें पंडित नेहरूंच्या ताज्या उद्गारावरून लक्षांत येईल. आपल्या सैनिकांना जी सामुग्री बरोबर वाहून न्यावी लागते ती उत्तरोत्तर हलकी कशी होईल त्याचें संशोधन करा, असें त्यांनीं आपल्या शास्त्रज्ञांना सुचवलें आहे. अशाच प्रकारच्या संशोधनाची गरज दारूगोळ्याच्या, शस्त्रांच्या, अन्नाच्या, औषधांच्या, तंबु-राहुट्यांच्या, वाहनांच्या, दिवाबत्तीच्या व इतर अनेक बाबतींत आहे हें जर तरुणांनीं ध्यानांत घेतलें तर आपली बुद्धि व योजकता चालवण्यासाठीं त्यांना किती नवीं नवीं क्षेत्रें निर्माण होतील त्याची कल्पना करा. युद्ध म्हटलें कीं निर्वासितांचा प्रश्न आलाच. चिनी सैन्याला आपण मागें रेटीत नेलें तर निर्वासितांचा प्रश्न उद्भवणारा नाहीं.

पण आपल्याला मागें हटावें लागलें तर तो मोठ्या प्रमाणावर निर्माण होईल. निर्वासितांचे लोंढे वाहूं लागले कीं सैन्याची हालचालसुद्धां कशी थंड पडते त्याचें वर्णन गेल्या महायुद्धांत बेल्जम व फ्रान्समधून ज्या सैन्याला जर्मन फौजांसमोर माघार घ्यावी लागली त्यांच्या अधिकाऱ्यांनीं लिहिलेल्या अनेक ग्रंथांत वाचावयास मिळते. आपल्या देशांत जर असा प्रसंग दुर्दैवानें आला तर निर्वासितांचीं तात्पुरतीं घरें उभारणें, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करणें, त्यांच्या छावण्या चालवणें इत्यादि अनेक कामांसाठीं तज्ज्ञ, प्रेमळ व कर्तव्यदक्ष अधिकारी लागतील. निर्वासितांची भाषा जर त्यांना येत असेल तर उत्तमच. नेफामध्यें घुसलेल्या चिनी सैनिकांनीं जरुरीपुरती हिंदी व तमील भाषा शिकून घेतली होती, हा त्यांच्या योजनाबद्ध आक्रमणाचा आमच्याकडील तरुणांनीं न विसरण्यासारखा भाग नव्हे काय? चिनी सैन्याला केवळ नेफामधून हुसकावून लावून चालणार नाहीं, तर त्याला तिबेटच्या पार हाकललें पाहिजे असें प्रतिपादन करणारी लहान थोर मंडळी आपल्यामध्यें आहेत. त्यांच्या म्हणण्यांत तथ्य नाहीं, असेंहि मला म्हणावयाचें नाहीं. पण आपल्या मनांत जर खरोखर चिनी सेनांना तिबेटपार करण्याचें उद्दिष्ट असेल तर किती विविध बाजूंनीं तयारी करावी लागेल तें नीट समजावें यासाठींच केवळ या गोष्टीचा उल्लेख केला. पण केवळ युद्धासाठींच नव्हे; मी तर म्हणेन कीं आशिया व आफ्रिका खंडांतील सर्व राष्ट्रांशीं उत्तम परराष्ट्रीय संबंध जोडतां यावेत यासाठीं सुद्धां आफ्रो-आशियाई भाषा शिकवण्याची सोय महाराष्ट्रांतील विद्यापीठांनीं परस्परसहकार्यानें करावी आणि तिचा लाभ घेण्यासाठीं विद्यार्थ्यांनीं तयार व्हावें असें मला मनापासून सुचवावेसें वाटतें.

## आक्रमणाचें स्वरूप ओळखलें पाहिजे

ज्या चीनच्याबरोबर यापुढें अनेक वर्षें आपणांस सामना द्यावयाचा आहे, त्यानें आपल्यावर आक्रमण काय म्हणून केलें? शिकंदर, तैमूर, नादिरशहा अशा सेनानींच्या लाटा भारतावर पूर्वीं येऊन गेल्या, तशी ही चिनी लाट आहे काय? कीं सोळाव्या शतकापासून आपल्यापेक्षां ज्ञानानें, संघटनेनें, साधनांनीं श्रेष्ठ असलेल्या पोर्तुगीज, फ्रेंच व ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं

आपल्यावर मात केली आणि त्यांपैकीं ब्रिटिशांनीं तर आपल्यावर दीडशें वर्षें राज्य केलें तसाच हा प्रकार आहे ? आपल्या प्राचीन देशांत कोणत्या गोष्टींची सतत उणीव पडली म्हणून आपणावर आक्रमकांची लोभी अथवा पापी नजर सतत जाते ? आपल्या राष्ट्रीय जीवनांत कोणतीं जीवनसत्त्वें कमी पडत गेल्यामुळें आपलें हें राष्ट्र परचक्रासमोर सतत मारच खात आलेलें आहे ? पुरातत्त्वभूषण राजवाडे म्हणाले होते कीं, विज्ञानांत आम्हीं कमी पडलों, त्यामुळें आम्हांला पाश्चात्त्यांसमोर हार खावी लागली, त्यांची गुलामी पत्करावी लागली. आतां चीनसमोर आम्ही हार कां खात आहोंत ? त्यांचें विज्ञान तर आमच्याहून अधिक श्रेष्ठ खासच नाहीं ? त्यांच्यापेक्षां आमची विरश्रीहि कमी नाहीं. मग त्यांच्यांत आमच्याहून अधिक आहे तें काय ? चीनची तरफदारी कालपर्यंत करणारे प्रतिष्ठित व सुशिक्षित लोक आणि त्यांच्या सैन्याकडे मुक्तिदाते म्हणून लपूनछपून पाहाणारे सामान्य लोक अजूनहि आमच्यांत आहेत याचें कारण काय ? केवळ सर्व तरुणांनीं हातांत शस्त्रें घेतलीं म्हणून या प्रश्नांचीं उत्तरें मिळतील, अशी जी कल्पना मांडण्यांत येत आहे ती माझ्या मतें फार भ्रामक आहे. चीनच्या कम्युनिस्ट राजवटीचें आकर्षण आपल्याकडील ज्या वर्गांना वाटत होतें वा आहे त्यांना वाटणाऱ्या आकर्षणाचें मूळ शोधून न पाहतां ' रक्त द्या, खांद्यावर बंदुका घ्या ' अशा नुसत्या घोषणा केल्या तर आपण ह्या युद्धाचें पैलतीर यशस्वी-पणें गांठूं असें मला वाटत नाहीं. आणि यदाकदाचित् मित्रराष्ट्रांच्या सढळ मदतीच्या जोरावर आपण युद्धांत यशस्वी झालों तरीहि युद्धानंतरच्या काळांत आपणावर शांतता गमावण्याची पाळी येईल ! चीनची स्वारी हें केवळ शस्त्राचें आक्रमण नसून तें एका विजिगीषु समाजव्यवस्थेनें, आपल्या पन्नास ठिकाणीं फाटलेल्या व चिरफाळलेल्या समाजाला दिलेलें आव्हान आहे. हें जर आपण न ओळखूं तर परत तेंच संकट या ना त्या दिशेनें आपल्यावर चालून आल्याशिवाय राहाणार नाहीं, याची जाणीव तरुण पिढीनें ठेवावी.

## समाजपरिवर्तन अटळ

कामगार मैदानावर कांहीं दिवसांपूर्वीं कॉ. डांग्यांची सभा श्रोत्यांनीं चालूं दिली नाहीं. पण जो थोडा वेळ त्यांना मिळाला त्यांत कॉ. डांग्यांनीं

बजावलें कीं, "आतां तुम्ही आमची सभा उधळीत आहां, पण तीन वर्षांनीं या देशावर राज्य कोण करतो तें तुम्ही पाहाल." आपल्याला आज धिक्कारणारा हा समाज दोन तीन वर्षांनीं परत कम्युनिस्टांच्या जाळ्यांत सांपडल्यावांचून राहणार नाहीं, असा आत्मविश्वास कॉ. डांग्यांना कां वाटला ? आज स्वतंत्र पक्षाची व जनसंघाची जी मंडळी, आहे ह्या समाजव्यवस्थेला हात लावूं नका, आमच्या सोन्याला शिवूं नका, हँड्स ऑफ अवर गोल्ड, असा पवित्रा घेत आहेत, त्यांत यांचें उत्तर मिळेल. युद्धकाळांत सर्व समाज ढवळून निघणें अपरिहार्य असतें. गेलीं दोन महायुद्धें जरी भारतांत झालेलीं नसलीं तरी त्यांच्या लांबच्या आंचेनें देखील भारतामधील समाजांत केवढी उलथापालथ झाली याची ज्यांना कल्पना आहे ते खुद्द भारतांत चाललेल्या युद्धांत येथील समाजरचना जशीच्या तशी राहावी अशी कल्पना खासच पुढें मांडणार नाहींत. आजकालच्या युद्धाला सर्व जनतेचा सहकार लागतो. साहजिकच युद्धामुळें येणारी सावधानता व जागृति सर्व थरांत पसरणेंहि अपरिहार्य होतें. ही गोष्ट गृहीत धरून 'आपण स्वयंप्रेरणेनेंच समाजांत जरूर ते फेरबदल करणार कीं समाजामधील ही वाफ जबरदस्तीनें दाबून ठेवून युद्धानंतर तिचा स्फोट होणें अपरिहार्य बनवणार,' असा हा रोकडा सवाल आहे. गेलीं हजार वर्षें आपल्यांत कोणताहि अंतर्गत बदल घडवून न आणतां केवळ आपले शस्त्रधारी शत्रूच्या तोंडावर देऊन परचक्रें परत फिरवण्याचा प्रयत्न आपण करीत आलों आहों आणि जवळ जवळ प्रत्येक वेळीं आपण मार खाल्लेला आहे. आतां तरी आपण शहाणे होऊन खऱ्या समाजवादी समाजाची उभारणी करण्याचा यत्न, युद्धप्रयत्नांचा भाग म्हणून करणार आहोंत कीं पुढचें पाठ आणि मागचें सपाट असेंच चालावयाचें आहे, याचें उत्तर तरुण पिढीनें निर्भयपणें दिलें पाहिजे.

## हें समजून घेतलें पाहिजे

या वेळीं तरुणांनीं सध्यां जो फसवा प्रचार भारतामधील डांगे-कम्युनिस्ट करीत आहेत त्याचाहि नीट विचार केला पाहिजे. डांगे-कम्युनिस्टांची हातचलाखी त्यांनीं समजून घेतली पाहिजे. चीनच्या आक्रमणासंबंधीं लोकसभेंत जेव्हां प्रथम चर्चा झाली तेव्हां 'कम्युनिस्ट चीन भारतावर स्वारी करणें शक्य

नाहीं. ' अशी हमी भाई डांगे यांनीं पंडित नेहरूंच्या द्वारां सर्व देशाला दिली होती ! आतां चीननें स्वारी केली नाहीं, असें म्हणण्याची सोयच राहिलेली नाहीं. म्हणून श्री. हिरेन मुकर्जी लोकसभेंत म्हणाले त्याप्रमाणें असा युक्तिवाद करण्यांत येत आहे कीं, चीनचें हें वर्तन मुदलांतच कम्युनिझमविरोधी आहे ! कम्युनिझमच्या कुळाला चीननें कलंक लावलेला आहे ! रशियानें लॅटव्हिया, लिथुआनिया, इस्थोनिया हीं तीन सबंध राष्ट्रें व पोलडंचा, रुमानियाचा व फिनलंडचा बराचसा प्रदेश गेल्या महायुद्धांत गिळला तेव्हा कम्युनिझमचें तोंड काय उजळून निघालें होतें ? चीनच्या फौजांनीं तिबेटची धूळदाण उडवली तेव्हां काय ? मार्क्स लेनिननीं स्वर्गांत टाळ्या पिटल्या होत्या ? आणि चीननें पुनरपि स्वारी करून नेफा, आसाम, बंगाल वगैरे भाग बळजबरीनें आपल्या निशाणाखालीं आणण्यांत यश मिळवलें तर भारतांतले कम्युनिस्ट आपल्या कपाळाचें मार्क्सवादाचें कुंकू पुसून टाकणार आहेत आणि जागतिक कम्युनिस्ट कम्युनिझम मेला म्हणून सुतक पाळणार आहेत काय ? युरोपच्या भूमीवर हल्ला चढवल्यास अमेरिकेशीं गांठ पडून जगाचा होवो वा न होवो आपला सर्वनाश अवश्य होणार आहे अशी जर रशियाची शंभर टक्के खात्री नसती तर पूर्व युरोपप्रमाणेंच पश्चिम युरोप पायदळीं तुडवण्यांत ख्रुश्चोव्हला मार्क्स-लेनिनची भीति वाटणार होती काय ? ख्रिस्ताचें नांव घेत घेतच पाश्चात्त्य राष्ट्रांनीं जगाला आपलें गुलाम केलें. इस्लामचें ( शांतीचें ) गुणगान करीत करीतच जिब्राल्टरपासून इंडोनेशियापर्यंत मुसलमानी तख्तें उभारलीं गेलीं आणि बुद्धधर्मीय जपाननें सगळा दक्षिण आशिया झोडपून काढला. विश्वशांतीसाठीं कबुतरें उडवणारे कम्युनिस्ट आज त्याच मार्गानें जगज्जेते बनूं पाहात आहेत. आपापसांतील शक्तिसंतुलन बिघडूं लागलें तर एक कम्युनिस्ट राष्ट्र दुसऱ्या कम्युनिस्ट राष्ट्राचा गळा घोटीलहि, पण तो विश्वशांतीच्या ध्येयाला हरताळ फांसला जात होता अथवा एका निरपराध राष्ट्राची हत्त्या होत होती म्हणून नव्हे, हें आपण समजून घ्यावयास हवें आहे.

**युद्धाचें दुर्दरी स्वरूप**

एक शेवटचा मुद्दा. युद्ध हें देखील आतां शास्त्र बनलेलें आहे. तें संहाराचें व विनाशाचें शास्त्र आहे यांत शंका नाहीं. पण आजच्यासारख्या प्रसंगीं

तें स्वाभिमान व संस्कृति याच्या रक्षणाचें शास्त्र ठरलें आहे, हेंहि मान्य करावयास हवें. आणि म्हणूनच त्याचा शास्त्र म्हणून, विद्या म्हणून तरुणांनीं अभ्यास करावयास हवा. आपल्या देशांत अजून त्या शास्त्राचा, त्याच्या अंगोपांगांसह पद्धतशीर अभ्यास सुरू झालेला नाहीं. तशी सोयहि कोठें नाहीं. म्हणून त्या शास्त्रांतील तज्ज्ञ निर्माण होणें आवश्यक आहे. हें फार मोठें, पण देशरक्षणासाठीं अत्यंत आवश्यक कार्य तरुण पिढीनें शिरावर घ्यावयास हवें आहे, असें मला वाटतें.

◎ ◎ ◎

# महाराष्ट्र : भारताचा खड्गहस्त ? *

## गर्व करण्यासारखें काय आहे ?

भारतामधील उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब व राजस्थान ह्या उत्तरेकडील आणि आंध्र व तमीळनाड ह्या दक्षिणेकडील राज्यांच्या मानानें महाराष्ट्रापाशीं गर्व करण्यासारखें प्राचीन ऐतिहासिक धन फार अल्प आहे. पण तेराव्या शतकापासून संतांनीं व सतराव्या शतकापासून महाराष्ट्रांतील वीरपुरुषांनीं व मुत्सद्यांनीं कांहीं उल्लेखनीय कामगिरी करून दाखविली यांत शंका नाहीं. बाकीचे सगळे प्रांत झोंपले असतां महाराष्ट्रानें सापेक्षतया अधिक जागरुकता दाखवल्यामुळें देशभर त्याचा बोलबाला झाला आणि मराठी माणसालाहि असा गर्व झाला कीं, लेखणीच्या तसेंच तलवारीच्या क्षेत्रांत आपण कोणी विशेष आहोंत. अशी अहंपणाची भावना मनांत वावरत असल्याकारणानेंच

**महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेलें ।**
**मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले ॥**

अशीं गीतें रचलीं गेलीं व महाराष्ट्र हा भारताचा खड्गहस्त आहे, हिमालयाचें रक्षण सह्याद्रि करील अशीं वाक्यें उद्गारलीं जाऊं लागलीं. हें सर्वच बोलणें जर अर्थवादात्मक आहे असें मानावयाचें असेल तर ह्या दाव्याचा अधिक खोल विचार करण्याचें कारण उरत नाहीं. परंतु त्यांत संपूर्ण सत्य नसलें तरी मराठी मनाचें स्वप्न सूचित झालेलें आहे, एवढी जरी धारणा असेल तरी तिच्याविषयीं थोडा खोल विचार करणें फलादायी ठरेल.

## लष्कर भरतींतहि मागें

भारताचा खड्गहस्त बनणें म्हणजे देशांतील सैन्यांत बहुसंख्येनें सामील होणें असा त्या शब्दांचा अगदीं वाच्यार्थ घेतला तरी प्रस्तुतच्या महाराष्ट्राचें

---

* *लोकमित्र १-५-६३*

चित्र आश्वासक नाहीं हें उघड आहे. लष्करभरतींत महाराष्ट्र पहिला तर राहोच पण दुसऱ्या अथवा तिसऱ्या क्रमांकांतहि नाहीं. तो खूप खालीं म्हणजे नवव्या किंवा दहाव्या क्रमांकावर आहे. या बाबतींत पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, केरळ इत्यादि प्रांतांनीं महाराष्ट्राच्या पुढें कितीतरी आघाडी मारलेली आढळते. लक्षांत घेण्यासारखी दुसरी गोष्ट अशी कीं, जी कांहीं थोडीफार सैन्यभरती येथें होते ती देखील महाराष्ट्राच्या एका विशिष्ट भागांतील शेतकऱ्यांतून. रत्नागिरी व कुलाबा हे कोंकणांतले दोन जिल्हे आणि कोल्हापूर, सातारा, सांगली, अहमदनगर हे घाटावरचे जिल्हे एवढ्या टापूमधून प्रामुख्यानें सैन्यामध्यें जवानांचा भरणा होतो. मराठवाडा, नासिक, खानदेशच्या टापूंतून किंवा विदर्भ व वऱ्हाड यांमधून होणारी सैन्यभरती शून्य किंवा अगदीं तुरळक आहे. शिवाजीमहाराजांनीं हिंदवी स्वराज्याकरतां ज्या भागांतून माणसें मिळवलीं, जवळपास त्याच भूमीमधून अजूनहि वीरवृत्तीचें पीक निघत राहिलें आहे याचें आश्चर्य वाटतें. संतवाणीनें जागृत झालेला महाराष्ट्राचा भाग व शिवाजीमहाराजांच्या पाठीशीं उभ्या राहिलेल्या लोकांचा भाग, हे कितपत मिळते-जुळते आहेत त्याचा तपास, संतांनीं स्वराज्याची पार्श्वभूमि तयार केली असा सिद्धांत आग्रहानें मांडणाऱ्यांनीं जसा केला पाहिजे तसाच आधुनिक काळाचा इतिहास लिहिणाऱ्यांनीं याचा विचार केला पाहिजे, कीं गेल्या शंभर-सव्वाशें वर्षें भारतीय स्वातंत्र्याचे जे प्रयत्न झाले त्यांत महाराष्ट्रानें नेतृत्व व कर्तृत्व यांत मोठा वांटा उचललेला असतांहि सैन्यभरतीच्या क्षेत्राचा विस्तार मुळींच वाढलेला दिसत नाहीं, हें कसें ?

परंतु देशाचा खड्गहस्त बनणें म्हणजे केवळ सैन्यांत मोठ्यांत मोठ्या संख्येनें भरती होणें इतका त्याचा संकुचित अर्थ करून चालणार नाहीं. दुसरे उद्योगच नाहींत म्हणून, उपासमार होते आहे, ती टळावी म्हणून, सैन्यांत भरती होऊन कोणताहि प्रांत देशाचा खड्गहस्त बनूं शकणार नाहीं. देशनिष्ठा, आपल्यासमोर उभ्या ठाकलेल्या संकटाचें यथार्थ आकलन, समृद्ध जीवनाची आकांक्षा, स्वातंत्र्याची चाड आणि आपण आपले भाग्यविधाते बनण्याची दुर्दम्य ईर्षा या गुणांचा अनुषंगी परिणाम म्हणून ज्या विभागांतील जनता स्वयंस्फूर्तीनें देशरक्षणासाठीं सिद्ध होईल तोच विभाग देशाचा खऱ्या अर्थानें खड्गहस्त बनूं शकेल.

## आणीबाणीची हवा विरून गेली

आज भारताला जो संकटकाल प्राप्त झालेला आहे त्याचें स्वरूप यथार्थतेनें जाणून घेण्याचा प्रयत्न आपण करीत आहोंत काय ? चीननें गेल्या ऑक्टोबरांत आपल्यावर स्वारी केली तेव्हां गाढ झोंपेंत असलेल्या माणसाला विंचवानें कडाडून दंश केल्यामुळें तो विव्हळत जागा व्हावा तसे आपण जागे झालों. कांहीं काळ वीरश्रीचीं भाषणें आपण केलीं, शेंकड्यांनीं रणगीतें तयार झालीं, पुढाऱ्यांनीं धांवपळ केली, सदैव फिरतीवर असलेले मंत्री पूर्वीपेक्षांहि अधिक प्रवासभत्ते पदरांत पाडून घेऊं लागले, अनेकांनीं आपल्या गांठीचा पै-पैसा संरक्षण निधीस दिला आणि शेंकडों मंडळींनीं रक्तदानासाठीं नांवें नोंदविलीं, आणि पुढें सगळें गप्पगार झालें. नागरिकांच्या संरक्षण समित्या अपसुकच बरखास्त झाल्या आणि आणीबाणीची जी कांहीं हवा म्हणून असते तीच सकाळच्या धुक्याप्रमाणें नाहींशी झाली. सैन्याची जमवाजमव, त्याचें शिक्षण, सामग्री संचय, हत्यारें व दारूगोळा यांची निर्मिति अशासारखीं खास सरकारनें करावयाचीं जीं कामें आहेत तेवढीं चालू आहेत. त्यांच्या प्रीत्यर्थ आवश्यक तो पैसा उभा करण्यासाठीं सरकारनें जी कंबरमोडी करवाढ केली तिची कटु स्मृति तेवढीच नागरिकांपाशीं उरलेली आहे. बाकी सर्व मामला थंड, यथापूर्व चालू आहे. सर्व देशभर हीच परिस्थिति आहे. महाराष्ट्रांतलेंहि वातावरण कोणत्याहि प्रकारें वेगळें नाहीं.

## चीनची तयारी, भारताची अव्यवस्था

चीनचें आक्रमण हा चीनच्या सर्वंकष योजनेचा एक भाग आहे याची जाणीव महाराष्ट्रांतील जनतेला नाहीं. इतकेंच नव्हे तर ती जनतेपर्यंत पोंचवण्याची जरुरी कोणालाच वाटत नाहीं. चीनमध्यें सामान्य जनता व सैन्य यांच्या हत्यारा-अवजारांत फरक असेल, पण त्यांच्या विचारांत, वृत्तींत, आचारांत अथवा उद्दिष्टांत फरक नाहीं. १९४९ सालापासून भारताचा व चीनचा चालू युगांतला प्रवास सुरू झाला. चीनचा विस्तार भारतापेक्षां मोठा आहे असें म्हटलें तर त्याला पोसावी लागणारी लोकसंख्याहि आपल्या दीडपटीहून अधिकच आहे हें विसरून चालणार नाहीं. दळणवळणाचे

आपल्या देशांत त्या वेळीं उपलब्ध असणारे मार्ग, पोलाद, सीमेंट, रसायनें इत्यादींचें उत्पादन, यंत्रज्ञ व तंत्रज्ञ यांच्या शाळा, परराष्ट्राकडून कर्ज मिळण्याची शक्यता इत्यादींच्या बाबतींत चीन भारताच्या मागें होता, फार फार तर बरोबरीनें होता. पण आज त्याचें स्वरूप पार पालटून गेलेलें आहे. आपल्या जवळ जवळ तिप्पट पोलाद चीन तयार करीत आहे तर आपले उत्तमोत्तम पोलाद कारखाने, दोनदोनशें कोटि रुपये भांडवलाचे, गचाळ व्यवस्थापनामुळें, कसे तरी रडत-खडत चालू आहेत. आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा सुमारें २५ टक्के अंश चीन परत उद्योगव्यवसायांत गुंतवीत आहे तर भारताला ६ टक्के गुंतवणूक करतां करतां नाकीं नव येत आहेत. हजारों लाखों चिनी तरुण-तरुणी खेडोंपाडीं कामें करीत आहेत, शाळा चालवीत आहेत, बांधबंदिस्ती करीत आहेत, रस्ते बनवीत आहेत, औषधपाणी करीत आहेत. तर आमच्याकडे डॉक्टरीची परीक्षा पास झाल्यावर एक वर्ष इंटरन्शिप करावी लागते म्हणून आमच्या तरुण डॉक्टरांची कुरकूर चालू आहे. तिकडे चीननें आपल्या समाजांतील आर्थिक विषमतेचें प्रमाण एकास सातावर आणलें आहे, तर आमच्याकडे अजून फूटपायरीचा दगड उशाला घेणाऱ्या बेकारापासून तों रबरफोमच्या गादीवरसुद्धां रात्रभर तळमळणाऱ्या कुबेरापर्यंत नागरिकांचे सर्व प्रकार जसेंच्या तसे शाबूत राहिलेले व शाबूत राखलेले आढळतात. चीनमध्यें स्वातंत्र्य दिनाच्या मिरवणुकींत जसे लक्षावधि लोक सामील होतात, जसे शेताच्या ताली बांधण्यासाठीं किंवा धरणाच्या भिंतीला भराव घालण्यासाठीं तेथें लाखोंच्या संख्येनें स्त्रिया व पुरुष खांद्यावर कुदळ-फावडीं घेऊन बाहेर पडतात, तसेंच ते लाखोंच्या संख्येनें देशाच्या रक्षणासाठीं हातांत बंदुका घेऊन बाहेर पडतात. प्रचंड संख्येनें कोणत्याहि एका उद्दिष्टासाठीं हालचाल, सर्व समाजाचा संवादी, एकात्म प्रयत्न हा जेथील नागरिकांचा स्थायीभाव गेलीं पंधरा वर्षें बनत आहे, त्या देशांत प्रचंड प्रमाणावर सैन्यसंघटन ही एक स्वाभाविक क्रिया बनते. त्याच्यासाठीं खास प्रचार, खास कायदेकानू करण्याची गरजच भासत नाहीं. याच्या उलट, जेथें सगळें समाजजीवनच विस्कळित झालेलें आहे, जेथील स्थितिप्रिय लोकांपुढें कायदा व सद्विचार या दोघांनाहि हात टेकण्याची पाळी आलेली आहे, जेथील ध्येयसृष्टि जळून गेलेली आहे तेथें अग्निपरीक्षेचा क्षण

आला नाहीं तों पावेतों सब कुछ ठीकचा देखावा दिसत राहातो. पण तो क्षण येतांच सगळा पोकळ डोलारा कागदी डोल्यासारखा निमिषार्धात जळून राख होतो.

## हुकूमशाही कीं गुलामगिरी ?

यावर असा आक्षेप घेण्याचा प्रघात पडलेला आहे कीं, चीनमधील जनता हें जें सर्व करते तें तेथें सर्वाधिकारशाही आहे म्हणून. चीनमध्यें कम्युनिस्ट पक्षाची हुकूमशाही आहे आणि तिच्या प्रत्येक बरोबर अथवा चूक आदेशानुसार जनतेला उठाबशा काढाव्या लागतात, हें कबूल करून देखील शेवटीं ह्या प्रश्नाचें उत्तर मिळत नाहींच कीं अशा प्रकारचें ६०।७० कोटींचें आक्रमणशील राष्ट्र जर आपल्या देशाच्या उंबरठ्यावर येऊन उभें राहिलें तर आपण काय करावें ! आपणहि लोकशाही बरखास्त करून सर्वाधिकारशाही स्थापावी काय ? या प्रश्नाचीं उत्तरें एकापेक्षां अधिक आहेत. एक निदानीचें उत्तर देऊन ठेवतों; तें असें कीं, राष्ट्रामधील जनतेला जागी करण्यासाठीं व एकदिलानें उभी करण्यासाठीं हुकूमशाहीवांचून दुसरा उपाय उरला नाहीं आणि परकीयांची गुलामगिरी पत्करण्यावांचून अन्य मार्ग राहिलेला नाहीं, तर अशा प्रसंगीं भारतांत हुकूमशाही आली तरी मी ती पत्करीन पण गुलामगिरी पत्करणार नाहीं. एवढें सांगितल्यानंतर मात्र असें म्हणावेसें वाटतें कीं लोकसत्ताक शासनाच्या द्वारां लोकांना जागृत व संघटित करण्याचा मनःपूर्वक प्रयत्नच गेल्या पंधरा वर्षांत झालेला नाहीं. ज्या सत्तारूढ पक्षाला जनतेनें घसघशीत बहुमतानें गेलीं पंधरा वर्षें अविच्छिन्न राज्य करूं दिलें, मनास येतील तसे निर्णय घेऊं दिले, ते फिरवूं दिले वा रद्द करूं दिले, त्यांनीं लोकजागृतीचें, संघटनेचें व समाजक्रांतीचें कार्य करण्याकरतां भारतीय जनतेला जर आवाहन केलें असतें तर जनतेनें त्यांना प्रतिसाद दिली नसती हें बोलणें नुसतें बाष्कळपणाचेंच नव्हे तर कृतघ्नपणाचें आहे. प्रचलित राज्यकर्त्यांना सामाजिक क्रांति अभिप्रेतच नाहीं ही मुद्याची गोष्ट आहे. त्यांना ती अभिप्रेत असती तर आजच्या आणीबाणीच्या काळांतहि टंगळ-मंगळ, लांचलुचपत, नफाखोरी, भाववाढ, वाढती बेकारी त्यांनीं चालू दिली असती काय ? राष्ट्राचा सगळा देहच त्यांनीं नासूं दिला आहे.

ऐदी व मद्दड बनूं दिलेला आहे. रणांगणावर चीनची व भारताची गांठ पडो वा न पडो, भारताचा पराभव अनेक दृष्टींनीं झालेलाच आहे, हें आम्हीं नसलें तरी जगानें केव्हांच ओळखलें आहे.

## महाराष्ट्राला काय करतां येईल ?

अशा दुरवस्थेंत महाराष्ट्राला भारतापेक्षां वेगळें असें कांहीं करतां येईल काय ? श्रीकृष्णांनीं करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलून इंद्राच्या क्रोधापासून व्रजवासियांचें रक्षण केलें त्याप्रमाणें महाराष्ट्र कांहीं करूं शकेल असें येथें मुळींच सुचवावयाचें नाहीं. पण घटनेच्या व लोकशासनाच्या मर्यादा कोठेंहि न उल्लंघितांसुद्धां महाराष्ट्राला पुष्कळ करून दाखवितां येईल आणि त्याच्या साहाय्यानें वातावरणांतली मरगळ, अस्ताव्यस्तपणा व बेफिकिरी दूर करण्याच्या कामीं इतर राज्यांना मार्गसूचन करतां येईल असें मात्र आग्रहानें सांगावेसें वाटतें. सांगलीजवळ विमानतळ बांधला तो उपयुक्त कीं अनुपयुक्त याचा विचार बाजूला ठेवून त्याच्यामधून व्यक्त झालेली निर्धाराची, सहकार्याची व उद्योगाची जी धग आहे ती पकडून आपण ती सगळीकडे पोंचवली पाहिजे. उदाहरणार्थ दिवा–दासगांव रेल्वे रस्ता बनवला जात आहे तो आपण हजारोंच्या श्रमदानानें बनवण्याचा विचार कां करूं नये ! मुंबईमधील हजारों तरुण-तरुणींनीं चेंबूरपासून जो एस्प्रेस हाय वे बनवावयाचा आहे तो पुरा कां करूं नये ? लकडी पूल ते पद्मावती हा पुण्याचा संकल्पित रस्ता पुण्यांतील स्वयंसेवकांनीं कां बांधूं नये ? पर्वती, सिंहगड, माथेरान अशा ठिकाणीं फिरावयास जाणाऱ्या प्रत्येकानें एक झाड तरी लावलेंच पाहिजे असा शिरस्ता कां घालूं नये ? प्रत्येक ग्रामपंचायतीनें निदान पांच एकरांत तरी बाभळ, कडूनिंब, करंज अशासारख्या झाडांचें बन तयार केलेंच पाहिजे असा नियम कां होऊं नये ? भेसळ करणारे, नफेबाज, लांचखाऊ यांना जबरदस्त शासन करण्याचें राज्यसरकारनें जर ठरवलें तर तर केंद्र सरकार त्यांचा हात अडवणार आहे काय ? पुढच्या पांच वर्षांत महाराष्ट्रांतील निरक्षरता नष्ट करावयाची, रोगराई हटवावयाची, संतातिनियमन फार मोठ्या प्रमाणावर करावयाचे, गांवांतील सर्व पडके भाग साफसूफ करून तेथील मालाच्या साहाय्यानें शाळा, धर्मशाळा, सार्वजनिक

संडास, समाजमंदिरें बांधावयाचीं आणि हें सगळें त्वरेनें व्हावें म्हणून साहित्य, शिक्षण, रोगविज्ञान, स्थापत्य या शास्त्रांतील नवपदवीधरांना पदव्युत्तर दोन वर्षे सक्तीनें गांवोगांव पाठवावयाचें असा कार्यक्रम आपण आंखला तर कोणी नको म्हणणार आहे काय ? कोणी जर असा प्रश्न विचारील, कीं या कार्यक्रमाचा आणि देशरक्षणाचा संबंध काय, तर त्याला एवढेंच उत्तर आहे कीं, सांप्रतच्या जमान्यामध्यें चीन-भारतासारख्या दोन देशांत जेव्हां युद्ध होत असतें तेव्हां तें रणांगणावर सैनिका-सैनिकांत होत नसून उभय देशामधील जनतेंत होत असतें. अशा युद्धांतील शेवटचा निर्णय हुकूमशाही राष्ट्र व लोकसत्ताक राष्ट्र यांपैकीं ज्या राष्ट्रांतील सर्वसामान्य नागरिक अधिक जागृत, अधिक एकजीव व अधिक दमदार असतात त्यांच्या बाजूनें लागावयाचा ही काळ्या दगडावरील रेघ समजावी.

## नागरिकांचें राष्ट्रीय शील

गेल्या महायुद्धाच्या काळांत इंग्लंडमध्यें वसत असलेल्या एका हिंदी डॉक्टर मित्रानें सांगितलेली कथा येथें संक्षेपानें सांगण्यासारखी आहे. हिंदी डॉक्टरांची नेमणूक एका हवाई हल्ल्याच्या वेळच्या आश्रयस्थानावर झाली होती. त्यांची पाळी सकाळीं सातला संपली कीं एका इंग्रज डॉक्टरची पाळी सुरू होई. एक दिवस सकाळीं त्या इंग्रज डॉक्टरला नोकरीवर उपस्थित होण्यास वीस-पंचवीस मिनिटें उशीर झाला. तो आला तेव्हां त्याचा खिन्न चेहरा पाहून हिंदी डॉक्टरनें तुमची प्रकृति बरी नाहीं का ? असें विचारलें. प्रथम त्यानें तो प्रश्न उडवूनच लावला. पण पुन्हा पुन्हा विचारल्यावर त्यानें सांगितलें कीं "पहांटे दूध-केंद्रावर दूध आणण्यासाठीं गेलों असतां मागें माझ्या घरावर बॉंब पडून माझी पत्नी, मुलेंबाळें, घरदार सगळें उध्वस्त झालें. त्यामुळें पंधरा-वीस मिनिटें कामावर हजर राहण्यास थोडा उशीर झाला. माफ करा." असें नेत्रदीपक राष्ट्रीय शील इंग्लंडमधील सामान्य नागरिकांत होतें म्हणून त्यांचा पंतप्रधान हिटलरला खडसावून सांगू शकत होता कीं 'तुझ्या विमानामधून आगीचा पाऊस पाड, पण मी तुझा निःपात करीपर्यंत शस्त्र म्यान करणार नाहीं.' राष्ट्रांतील नागरिक भ्याड, आळशी व विस्कळित आणि सैनिक तेवढे शूर, दक्ष व प्राण पणाला लावून

लढणारे असें दृश्य कधीं पहावयास मिळणारच नाहीं. राष्ट्राचें सामर्थ्य अशा व्यक्तींनीं बनत असतें.

चिनी आक्रमणाचें मूलभूत स्वरूप लक्षांत घेऊन मराठी माणसें जर पुढच्या तयारीस लागणार असतील तरच खऱ्या अर्थानें महाराष्ट्र देशाचा खड्गहस्त बसणें शक्य होईल. नाहींपेक्षां विराटपुत्र उत्तराचें मोरोपंतांनीं वर्णन केल्याप्रमाणें होईल कीं;

" स्वपरबळाबळ नेणुनि बालिश बहु बायकांत बडबडला !"

◎ ◎ ◎

# पं. नेहरूंच्या ताज्या लेखांतील बिचकते विचार *

दिनांक ३१ मार्चच्या ‘ टाइम्स ऑफ इंडिया ’ च्या अंकांत ‘ बदलता भारत ’ ( चेंजिंग इंडिया ) या मथळ्याचा पंडित जवाहरलाल नेहरूंचा एक विस्तृत लेख प्रसिद्ध झालेला आहे. मुळांत न्यूयार्कहून प्रसिद्ध होणाऱ्या ‘ परराष्ट्रीय घडामोडी ’ ( फॉरिन अफेअर्स ) नामक जगप्रसिद्ध नियत-कालिकामध्यें प्रकाशित करण्यासाठीं म्हणून पंडितजींनीं लिहिलेला हा लेख आहे. १९२५ ते १९४० मधल्या ज्या तरुण पिढीनें महात्माजी व पंडितजी यांच्या नित्य लेखनामधून विचार घेतले व स्फूर्ति मिळविली त्यांना आज बऱ्याच दीर्घ कालानंतर पंडितजींच्या हातचा लेख वाचावयास मिळत आहे, याचा आनंद वाटल्यावांचून राहणार नाहीं. राजकारणाच्या रगाड्यांत स्वस्थ बसून लेख लिहायला व विचार करावयाला पंडितजीं-सारख्यांना फुरसत तरी कोठून मिळणार ? पंतप्रधान म्हणून ते बोलतात मात्र पुष्कळ. कांहीं विषयांवर अधिकारानें आणि कांहीं विषयांवर केवळ अधिकारवशात् ! अलीकडे तर पंडितजींचीं भाषणें म्हणजे लागू-गैरलागू, प्रस्तुत-अप्रस्तुत अशा उद्गारांची एक गोधडीच असते. वक्त्याला लाभणाऱ्या मोकळीकीचा कदाचित् हा परिणाम असावा. पण असें विस्कळीत बोलणारे पंडितजी लिहावयास बसले म्हणजे बदलतात; तोलून, जपून लिहूं लागतात. अथपासून इतीपर्यंतच्या प्रतिपादनांत विचारांची सांखळी तुटूं नये याची काळजी घेऊं लागतात. वाऱ्यावर विरणारीं भाषणें आणि कागदावर शब्द-बद्ध होणारा लेख यांमध्यें भारतामधील सर्वश्रेष्ठ पदावर असलेल्या व्यक्तीच्या विचाराविष्कारांत पडणारी ही तफावत लक्षणीय नव्हे काय ?

## अलिप्तवादाचा अन्वयार्थ

पंडितजींचा हा लेख म्हणजे भारताच्या परराष्ट्रीय नीतिविषयींचा एक प्रबंधच आहे. भारताचें पंतप्रधानपद गेलीं सोळा वर्षें सतत भूषवणारे पंडितजी स्वतंत्र भारताच्या परराष्ट्रीय नीतीचेहि एकमेव नियंते म्हणून ह्या

---

* *साधना ६-४-१९६३*

काळांत जगभर ज्ञात झालेले आहेत. कॉंग्रेस सत्तारूढ नव्हती तेव्हांहि कॉंग्रेसच्या परराष्ट्रीय संबंधांची प्रायः सर्व मदार पंडितजींवरच असे. परराष्ट्रीय नीतिविषयक ज्यांचा अधिकार येणेंप्रमाणें सर्वमान्य आहे त्यांनीं राष्ट्रावर गुदरलेल्या आणीबाणीच्या काळीं आपल्या देशाचें धोरण जगाला समजावून द्यावें म्हणून लिहिलेल्या या लेखाला असाधारण महत्त्व प्राप्त व्हावें हें साहजिक होय. भारत हें सार्वभौम राष्ट्र म्हणून जन्माला आल्यापासून त्याच्या अंतर्गत समाजरचनेच्या व परराष्ट्रीयसंबंधांच्या मूलभूत प्रेरणा कोणत्या प्रकारच्या आहेत, तें या प्रबंधांत उलगडून दाखवण्याचा प्रयत्न पंडितजींनीं केलेला आहे. भारतीय स्वातंत्र्य कसें सिद्ध झालें, भारतीय मनाची विधायक ठेवण घडवण्याचें श्रेय महात्माजींच्याकडे व भारतीय परंपरेकडे कसें जातें, १९५० च्या जानेवारींत लोकसत्ताक भारत स्थापित झालें त्या वेळेपासून लोकशासन व आर्थिक समानता हीं उद्दिष्टें डोळ्यांसमोर ठेवून देशाचा विकास साधण्यासाठीं काय प्रयत्न झाले व त्यामुळें कोणतें फळ पदरांत पडलें; आणि ह्या पार्श्वभूमींतूनच भारताचें अलिप्ततावादाचें परराष्ट्रीय धोरण ओघानेंच कसें निर्माण झालें, त्याचा आढावा घेण्यांत प्रबंधाचा जवळ जवळ निम्मा भाग खर्ची पडलेला आहे. प्रबंधामधील जो मुख्य विषय भारत-चीन संघर्ष त्याला हात घालण्यापूर्वीं पाश्चात्त्य वाचकांच्या मनाची तयारी करण्याचा हेतु मनांत ठेवून हा भाग लिहिण्यांत आलेला आहे, हें उघड आहे. कारण भारतामधील जागृत वाचकाला यामध्यें नवीन अथवा विशेष महत्त्वाचें असें कांहींच आढळणार नाहीं. अलिप्ततावाद अथवा सर्वराष्ट्रसमभाव हा कोणा व्यक्तीच्या प्रतिभेमधून जन्माला आलेला नसून तो देशाच्या विशिष्ट परिस्थितीचा परिपाक आहे, ही जणूं प्रतिपादनाच्या ओघांत पंडितजींनीं सांगून टाकलेली गोष्ट मात्र महत्त्वाची आहे. कारण त्यामुळें अलिप्ततावादाला राजनीतीच्या क्षेत्रामधील एखाद्या विलक्षण शोधाचें अथवा अहिंसा–सत्यअस्तेयाच्या बरोबरीच्या एका अभिनव धर्मतत्त्वाचें स्थान देण्याचा जो प्रयत्न पंडितजींचे खुशमस्करे लोक करीत असतात त्यांच्या उद्योगाला पायबंद बसण्याचा संभव आहे. अलिप्ततावाद म्हणजे जगन्मैत्री, अलिप्ततावाद म्हणजे क्रियास्वातंत्र्य, अलिप्ततावाद म्हणजे निःपक्षपाती निर्णय अशीं अनेक स्पष्टीकरणें ह्या

छोट्याशा प्रबंधांत पंडितजींना द्यावीं लागलेलीं आहेत. ह्यावरून त्या शब्दाची व्याख्या व अमलबजावणी गैरप्रकारें होत असल्याचे प्रसंग पंडितजींच्या मनांत हें लेखन करतांना घोळत असावेत असा तर्क करण्यास हरकत नसावी. त्याचबरोबर असाहि विचार मनांत आल्यावांचून राहात नाहीं कीं, सर्वराष्ट्रसमभावाची जी नीति गेलीं पंधरा वर्षें आम्हीं यशस्वीपणें हाताळली असा दावा पंडितजी ह्या लेखांतहि करतात, त्या नीतीची चीनच्या आक्रमणाच्या निमित्तानें जशी अग्निपरीक्षा होऊन शत्रु कोण मित्र कोण याची पारख होऊन गेली, तशी कसोटी या पूर्वींच्या काळांत कधींच न लागल्यामुळें 'वृद्धा नारी पतिव्रता' या न्यायानेंच केवळ ती शाबूत राहिली, असेंहि घडलें नसेल काय ?

**महत्त्वाचा उत्तरार्ध**

पंडितजींच्या प्रतिपादनाला भावनेची धार चढते आणि त्यांत विचारांची प्रांजलता निर्माण होते ती प्रबंधाच्या उत्तरार्धांत; जेथून ते चीनच्या आक्रमणाविषयीं लिहूं लागतात तेथपासून. "परिस्थितीचीं सूत्रें नेहमींच आक्रमण करणाऱ्याच्या हातीं असतात. चिन्यांचें वागणें तर भलतेंच आंतल्या गांठीचें आणि फसवें असा अनुभव आलेला आहे !" अशी सुरुवात करून, "हिमालयाची तटबंदी ही आतां निर्धास्त राहिलेली नाहीं. तिला खिंडार पडलें कीं हिंदचें मैदान व हिंदी महासागरहि उघडा पडेल. मग भारताचा धोका दक्षिणेकडील व आग्नेय आशियांतील सर्वच राष्ट्रांचा धोका ठरेल. म्हणून ह्या आक्रमणाला तोंड देण्याचा आणि आपल्या भूमीचें अखंडत्व सुरक्षित राखण्याचा भारताचा निर्धार म्हणजे ह्या सर्व भागांतील शांतता व स्थैर्य अबाधित राखण्याच्या बाबतींतला महत्त्वाचा घटक होय," असा सिद्धांत ते विचारांच्या एका झेपेंत मांडून टाकतात. पंडितजींचें हें निदान शंभर टक्के अचूक आहे. पण त्यामध्यें ही कबुली येऊन गेलेली नाहीं काय कीं, प्रस्तुतचा तंटा हा सीमातंटा नसून त्याच्या कक्षा फार विस्तीर्ण आणि त्याचें मूळ फार खोलवर गेलेलें आहे ! श्री. पां. वा. गाडगीळांच्यासारखे जे नेहरूंचे स्वयंसेवक वकील त्यांना चीनचा कावा प्रथमपासून कळला असल्याचे खुळे युक्तिवाद सध्यां करूं पाहात आहेत, त्यांनीं पंडितजींचीं वरील वाक्यें पुन्हा वाचून पाहावींत.

## महत्त्वाचे उलगडे

वरकरणीं सीमातंट्याप्रमाणें दिसणाऱ्या संघर्षांची खरी कळ कोठें आहे ? त्यांचेंहि उत्तर आतां पंडितजींनीं निःसंदिग्धपणें दिलेलें आढळेल. पंडितजी काय म्हणतात पाहा : " आंतरराष्ट्रीय परिस्थितीचें जें विश्लेषण ढोबळ मानानें त्यांनीं (चिन्यांनीं) केलेलें आहे त्यापासून चीनच्या हिंदविरोधी नीतीचा उगम झालेला दिसतो. चीनच्या एकंदर परराष्ट्रविषयक नीतीच्या बुडाशीं जीं उद्दिष्टें व गृहीत कृत्यें आहेत त्यांचें प्रतिबिंब या विरोधांत उमटलेलें आहे. शांतता व सहजीवन यांना औपचारिक मान्यता देणें ह्या धोरणांत बसतें. त्यांतहि शांतता व सहजीवन या शब्दांचे खास चिनी अर्थ आहेतच. पण त्यांच्या धोरणांत वस्तुतः अलिप्ततेला जागाच नाहीं. साम्राज्यवादी आणि साम्यवादी अशीच जगाची वांटणी झालेली आहे, त्यांच्यांत परिणामीं युद्ध होणें अटळ आहे, इतकेंच नव्हे तर त्यांच्यांत कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपाची तेढ पेटत ठेवलीच पाहिजे—नव्हे निर्माण केली पाहिजे अशी भूमिका घेतली म्हणजे तटस्थतेला वावच उरत नाहीं....हें विश्लेषण जर बरोबर असेल तर चीनचें आव्हान आमच्या परराष्ट्रीय नीतीला नसून आमच्या अन्तर्गत धोरणालाहि आहे, असें मानणें भाग आहे. " चीनच्या आव्हानाचें हें सर्वंकष स्वरूप पंडितजींनीं मान्य केलें, ही फार संतोषाची गोष्ट होय. पण त्याच्या पुढचा आपोआप उत्पन्न होणारा प्रश्न ते उपस्थित करीत नाहींत. अर्थातच त्याचें ते उत्तरहि देत नाहींत, ही तितकीच खेदाची गोष्ट आहे. तो प्रश्न असा कीं, भारताच्या जीवनपद्धतीला चीननें जागतिक रोषाचा आणि त्याचबरोबर कम्युनिस्ट बंधुराष्ट्रांच्या रोषाचा धोका पत्करूनसुद्धां जें सर्वंकष आव्हान दिलेलें आहे त्याचा व कम्युनिस्ट मतप्रणालीचा कांहीं अंगांगी संबंध आहे किंवा नाहीं ? कीं चीननें जें चालवलें आहे तें एका साम्यवादी पण वाममार्गी अथवा दुराचारी राष्ट्रानें केलेलें साहस आहे ?

## उशिरा आलेली जाग

खरी गोष्ट अशी आहे कीं, चीनच्या भूमिकेंत तटस्थतेला स्थान नसल्याचा साक्षात्कार पंडितजींना इतक्या विलंबानें होण्याची गरजच नव्हती. कारण

" तटस्थता ही भोंदूगिरी आहे, तिसरा मार्ग असूंच शकत नाहीं, " हे माओत्से तुंगचे उद्गार सुप्रसिद्ध आहेत. तसेंच रशियाबरोबर व त्याच्या कम्युनिस्ट चेल्यांबरोबर चीननें जें तुंबळ विचारसंगर चालविलेलें आहे त्याची दखल समंजसपणानें जर आमचें परराष्ट्रीय खातें घेत असेल तर आपण जागतिक परिस्थितीचें जें तात्पर्य काढलेलें आहे तेंच अस्सल मार्क्सवादी तात्पर्य असून ख्रुश्योव प्रतिपादन करतो तें सर्व पाखंड आहे, हा चिनी कम्युनिस्टांचा आग्रह पंडितजींच्या लक्षांत सहज आला असता आणि मग भारताशीं चीननें सुरू केलेलें वैर युयुत्सु साम्यवादी मतांत कसें चपखल बसतें तेंहि त्यांना समजलें असतें. मार्क्सवादाचें कंकण बांधलेला रशिया आपल्याला थोडीफार मदत करीत असल्याचा अनुभव आल्यामुळें पंडितजींना चिनी आक्रमणाची सांगड मार्क्सवादाशीं घालतांना संकोच वाटत असेल काय ? माझ्या अल्प बुद्धीला असें वाटतें कीं, आपल्या आडाख्यांप्रमाणें भांडवलशाही राष्ट्रांना नामोहरम करण्याच्या कामीं ख्रुश्योव दिवसेंदिवस अपेशी ठरत असून लवकरच त्याला आपली भूमिका बदलावी तरी लागेल अथवा बेरिया व मॅलेंकॉव्ह ज्या मार्गानें अदृश्य झाले त्यांपैकीं कोणत्या तरी एका मार्गानें अस्तंगत व्हावें लागेल ! त्याची स्तालिनविरोधी भूमिका नरम होत चालली आहे, यांतलें रहस्य दुसरें काय असूं शकते ? उद्यां जर ख्रुश्योवला बाजूला सारून चीनची भूमिका रशियन कम्युनिस्टांनीं मानली तर मग साम्यवाद व चिनी आक्रमण ह्यांच्यांत फरक करतां येईल काय ? मग भाई डांगे व भाई रणदिवे यांच्यांत फरक करणें शक्य होईल काय ? रशिया व चीनचे मतभेद ध्येयाबाबत नाहींत, विचाराबाबतहि नाहींत, फक्त डावपेचाबद्दल आहेत, हें पंडित नेहरू किती वर्षांनीं ओळखणार ?

## पंडितजींचें एकांगीं विवेचन

साम्यवाद अथवा मार्क्सवाद आणि चीनची भारतविषयक नीति यांच्यांतील परस्पराश्रय शोधून काढण्याचें ज्याप्रमाणें पंडित नेहरूंनीं टाळलें आहे त्याचप्रमाणें भारताच्या संकटकालीं जीं राष्ट्रें त्याच्या मदतीला धांवून आलीं त्यांच्यामधील ह्या आपुलकीचें मूळ त्यांनीं शोधण्याचा प्रयत्न न केल्यामुळें त्यांच्या प्रबंधांत उणीव राहिलेली आहे. भारताविषयीं अमेरिकेनें

जी ' गाढ सहानुभूति ' दाखवली तिचा उल्लेख त्यांनीं केलेला आहे व ' मूलभूत गोष्टींत अमेरिकेमध्यें व भारतांत बरेंच साम्य आहे ' असाहि एक ओझरता उल्लेख करून त्यांनीं तो विषय आटोपता घेतलेला आहे. यापेक्षां अधिक कांहीं बोललें तर आपण भारताला अमेरिकेच्या गोटांत नेल्याचा आरोप आपल्यावर केला जाईल, ही भीति पंडितजींच्या मनांत घर करून राहिली नसती तर त्यांना आपलें विवेचन अधिक प्रांजल खासच करतां आलें असतें. लोकशाही शासनपद्धतीवरील दृढ विश्वास, व्यक्ति-स्वातंत्र्याची कदर, निःपक्षपाती न्यायदानावरील श्रद्धा हीं मूल्यें भारतीय व अमेरिकी जीवनांत समान आहेत, असें जर पंडितजींना म्हणावयाचें असेल तर त्यांनीं तें निःसंकोचपणें कां म्हणूं नये ? असा प्रांजलपणा जर आम्हीं पत्करणार नाहीं तर एकीकडे आम्ही अमेरिकेची मदत रोजच्या रोज मागत राहूं व घेतहि राहूं—आज तें घडतेंच आहे—आणि दुसरीकडे स्वतः अलिप्ततेचें ढोंग माजवीत राहूं ! पंडितजींनीं भारताला या हास्यास्पद भूमिकेमधून सोडवलें पाहिजे. भारताची अलिप्तता जर खरी असेल तर साम्यवादी विचारसरणी असहिष्णु व आक्रमक आहे हा सिद्धांत मान्य करूनहि त्याला राजकीय क्षेत्रांत प्रसंगानुरूप कम्युनिस्ट राष्ट्रांशीं संधि-विग्रह करतां येईल आणि अमेरिकी जीवनपद्धतींतील व परराष्ट्रीय नीतींतील दोष दाखवूनसुद्धां मूलभूत प्रेरणा समान असल्याकारणानें तिच्या गोटांत सामील न होतांहि स्वच्छ मनानें जरूर ती सर्व मदत उघडपणें घेतां येईल.

◎ ◎ ◎

# होय, आम्ही नेहरू-मंत्रिमंडळाचा राजीनामा मागतों.*

प्रसोपाच्या भोपाळ अधिवेशनामध्यें देशांतील राजकीय परिस्थिति-संबंधींचा जो ठराव संमत करण्यांत आला त्याचे पडसाद सर्वत्र उठलेले दिसतात. बहुतेक सर्व प्रतिष्ठित वृत्तपत्रांनीं त्याबाबतचे आपले संपादकीय अभिप्राय व्यक्त केले असून त्यावरून निदान एक गोष्ट स्पष्ट झालेली आहे. ती अशी कीं, ज्या पक्षाचें वर्णन हीं वृत्तपत्रें बहुशः अवहेलनेच्या भाषेंत करतात तो जेव्हां जेव्हां देशापुढील समस्याविषयीं आपलें मत प्रकट करतो त्या त्या वेळीं त्याच्या मताची गंभीरपणानें दखल घेतल्यावांचून ह्या माननीय संपादकांना गत्यंतर उरत नाहीं.

## टीकाकारांची घसरगुंडी

या खेपेला देखील या अनुभवाची पुनरावृत्ति झाली आहे. बहुतेक वृत्तपत्रकारांनीं भोपाळच्या ठरावाची दखल तुच्छतादर्शक शब्दांत घेतलेली आहे. परंतु जरा बारकाईनें पाहाणाऱ्याच्या हें लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं कीं, प्रसोपावर टीका करणाऱ्यांच्या सराईत लेखण्यासुद्धां या वेळीं मधून मधून अडखळल्या आहेत, बावरल्या आहेत. त्यांनीं प्रसोपावर केलेले प्रहार निःशंक मनानें केलेले नाहींत. प्रसोपानें केलेलें सद्यःस्थितीचें विश्लेषण अथवा मार्गदर्शन असमाधानकारक, असमर्थनीय व अस्वीकार्य आहे असा शेरा मारीत असतांना आपल्यापाशीं देखील वेगळें मार्गदर्शन अथवा दुसरा उपाय नाहीं याची तापदायक जाणीव त्यांच्या ठिकाणीं असल्याचीं लक्षणें दिसत आहेत. त्यामुळें नवशक्तिकारांसारख्या विद्वानांची अशी फसगत झालेली आहे कीं, प्रसोपाचे पूर्वाध्यक्ष साथी अशोक मेहता यांनीं देशाच्या परिस्थितीचें जें विदारक चित्र आपल्या अध्यक्षीय भाषणांत मांडलें त्याची मुक्तकंठ स्तुति केल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं प्रसोपाच्या राजकीय ठरावाचा धिक्कारहि तितक्याच

---

* साधना २१-५-६३

मुक्तकंठानें त्यांना करावा लागलेला आहे. पण वृत्तपत्रकारांचें कशाला ? आमचा समधर्मीय असा जो समाजवादी पक्ष त्याची कांहीं थोडीथोडकी धांदल उडालेली नाहीं. समाजवादी पक्षाशीं एकी करावी म्हणणारा व ती नको म्हणणारा असे दोन गट प्रसोपांत आहेत अशी स्वतःची समजूत त्यांनीं करून घेतली होती, ती भोपाळच्या अधिवेशनांत खोटी पडली. काँग्रेसला स्पष्ट विरोध करण्याची भूमिका प्रसोपा कधींच घेऊं शकणार नाहीं अशीहि एक सोईस्कर समजूत त्यांनीं करून घेतली होती, तीहि खोटी ठरली. तेव्हां आतां त्यांचे मधु लिमयांच्यासारखे प्रवक्ते म्हणूं लागले आहेत कीं, प्रसोपाच्या ह्या ठरावामधील विरोधाची भूमिका म्हणजे 'तेरड्याचा रंग तीन दिवस' अशी ठरल्यावांचून राहणार नाहीं ! आमच्या ह्या निःसंशय विद्वान मित्रमंडळीवर एका दमांतच असे उलट-सुलट बोलण्याचा प्रसंग कां बरें गुदरला ? बरोबरच आहे. प्रसोपा ही एक लहान परंतु सजीव संघटना आहे; ती कोणत्याहि एका विचारपंथाची व या महंताची पुजारी बनलेली नाहीं; तिनें आजवर कितीहि चुका केल्या असल्या तरी हरएक राष्ट्रीय संकटाच्या प्रसंगीं शिकारी कुत्र्याच्या इमानानें देशासाठीं व जनतेसाठीं प्राण पणाला लावून ती उभी राहिलेली आहे; तिच्या चुकीच्या वाटणाऱ्या पवित्र्यांतहि देशनिष्ठेचें व जनतानिष्ठेचें हें सूत्र दिसून आल्याखेरीज राहणार नाहीं; हीं साधीं सत्यें ज्यांनीं अजून ओळख-लेलीं नाहींत त्यांची अशी घसरगुंडी होणारच, त्याला इलाज काय ?

### चार ठराव

भोपाळच्या अधिवेशनासमोर एकंदर चार ठराव कार्यकारिणीनें मांडलेले होते. चीनचें आव्हान, राजकीय परिस्थिति, समाजवादी ऐक्य आणि आर्थिक परिस्थिति. यांपैकीं आर्थिक परिस्थितीसंबंधीचा ठराव वेळेच्या अभावीं अधिवेशनासमोर येऊं शकला नसला तरी त्याचा मसुदा ज्यांनीं नजरेखालून घातलेला असेल त्यांच्या हें सहज ध्यानीं येण्यासारखें आहे कीं, हे चारहि ठराव मिळून एक प्रतिमा बनलेली आहे. त्या सर्वांमधून वाहणारा जीवनरस, त्या सर्वांमधून डोकावणारी दृष्टि, त्यांच्यांतील मूलप्रेरणा एकच आहे. असेंहि म्हणणें गैर ठरणार नाहीं कीं, चीनचें प्रत्यक्ष आक्रमण झालेलें

नसतांनासुद्धां गेल्या वर्षी मे महिन्यांत पाटण्यास जी प्रसोपाची बैठक झाली तिनें केलेल्या ठरावांतील प्रेरणा व दृष्टीच याहि ठरावांत आहे. परंतु त्यावेळीं संभाव्य वाटणारें चीनचें आक्रमण भोपाळच्या अधिवेशनाच्या वेळीं सिद्ध झालेलें होतें. हा फार मोठा फरक परिस्थितींत पडलेला असल्या-कारणानें पाटण्याच्या बैठकीमधील ठरावांत ज्या भावना सौम्य होत्या त्या भोपाळला अधिक तीव्र बनल्या, संथ होत्या त्या गतिमान व स्थूल होत्या त्या रेखीव झाल्या. या चारहि ठरावांमधील अधिष्ठित विषय चीनचें आव्हान व त्याचा प्रतिकार हा असून त्याला मध्यवर्ती कल्पून इतर सर्व विषयांचा परामर्ष तदनुषंगानें घेतलेला आहे. ही भूमिका ज्यांना उलगडली नाहीं अथवा ज्यांनीं समजून घेण्याचा प्रयत्न केला नाहीं त्यांच्या प्रसोपाविषयींच्या रागालोभाला दोष न देतां आम्ही इतकेंच म्हणतों कीं, कोणत्याहि जबाबदार राजकीय पक्षाच्या अधिवेशनांतून प्रकट होणाऱ्या ठरावांचें एक विशिष्ट स्थापत्य असतें (अथवा असावयास हवें) आणि तें समजून घेऊन शत्रु-मित्रांनीं टीका करावयास हवी. तरच तिला कांहीं वजन प्राप्त होईल; तसें या वेळीं घडलें नाहीं हें दुर्दैव.

## एकच प्रश्न आणि उत्तरहि एकच

आतां आपण ठरावांतील विवाद्य ठरलेल्या मुद्यांकडे वळूं. आजची सर्वांत भयावह, व्यापक व जी दीर्घकाल टिकून राहील अशी समस्या कोणती ? सर्वच राष्ट्रवादी या प्रश्नाचें उत्तर "चीनचें आव्हान" असें देतील यांत प्रसोपाला तिळमात्र शंका नाहीं. अगदीं लबाड राष्ट्रवादी डांगे-गटाचे कम्युनिस्टसुद्धां. पण असें असूनहि ह्या सगळ्यांनीं एक होऊन चीनच्या आव्हानाचा प्रतिकार करावा असें कोणीच कां सुचवीत नाहीं ? याचें कारण एवढेंच कीं, सगळ्यांची राजकीय भेळ बनवून तिच्यामार्फत चीनच्या आक्रमणाचा प्रतिकार होऊं शकेल इतकें तें साधेंसुधें अथवा अल्पकालीन अथवा केवळ सैनिकी आक्रमण आहे असें कोणी मानीत नाहीं. चिनी आक्रमणामुळें भारतानें आजवर टाळलेले अनेक सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रश्न देशासमोर आ वासून उभे राहिलेले असून ते जर खंबीर-पणें सोडवले नाहींत तर चीनचा अजगर आम्हांला गिळो वा न गिळो

हीं अंतर्गत प्रश्नांचीं साप-फुरशींच राष्ट्राच्या मरणाला कारणीभूत होतील असा धोका निर्माण झालेला आहे. किंबहुना आतां अशीहि जाणीव झालेली आहे कीं, हें विषारी दांतांचें बेणें जर आधींच निकालांत काढलें असतें तर चीन आपल्यावर आक्रमण करण्यास एक तर धजला तरी नसता किंवा त्यानें जरी तेवढें साहस केलें असतें तरी त्याच्या टोल्यास टोला देण्याचें सामर्थ्य आपल्याला एकवटतां आलें असतें. पण गेल्या पंधरा वर्षांत पोकळ वासा बनलेल्या या देशाला तें कसें साधावें ? आंतून भूस भरलेल्या वाघाचें पोट उंदराचें पिटुकलेंदेखील खुशाल कुरतडतें. मग इतरांनीं त्याच्या मिशा उपटाव्या यांत नवल काय ?

हें भूस कोणतें ? हा पोकळपणा कोणता ? त्याचें वर्णन काँग्रेसमध्यें अलीकडेच बिभीषणाची भूमिका वठवूं लागलेल्या काकासाहेब गाडगीळांपासून तों देशाला गेलीं पन्नास वर्षें अखंड सल्ला मोफत पुरवणाऱ्या पंडित कुंझरूपर्यंत सर्वांनीं चालवलेलें आहे. वृत्तपत्रांचे रकाने त्या वर्णनानें दुथडी भरून वाहात असतात. त्याची कुजट घाण आतां सर्वदूर इतकी पसरलेली आहे कीं, भारताच्या सत्यप्रियतेचा, शांततावादाचा, निर्लोभी वृत्तीचा उल्लेख ज्या ज्या वेळीं होतो तेव्हां तेव्हां परदेशी तज्ज्ञ तोंडाला रुमाल लावून हसतात. देशामध्यें भाववाढ, स्वार्थीपणा, लांचलुचपत, चैन व वशिलेबाजी आदिकरून जंतूंचा बुजबुजाट इतका झालेला आहे कीं तेथें वरील शब्द उच्चारले कीं ते प्रेतावर फेंकलेल्या फुलांप्रमाणें दिसूं लागतात. नवशक्तीचे विद्वान् लेखक श्री. पां. वा. गाडगीळ यांनीं बऱ्याच वर्षांपूर्वीं ‘रशियन राज्यक्रांति’ नांवाचा ग्रंथ लिहिला होता. त्यांतील पुढील उतारा वाचला तर ‘रणांगण’ या शब्दाऐवजीं आणीबाणीची परिस्थिति आणि व्यक्तिवाचक रशियन नांवाऐवजीं चपखल बसणारीं भारतीय नांवें त्यांत वापरल्यास तो येथील सांप्रतच्या स्थितीचें हुबेहूब वर्णन करणारा ठरेल असें वाटतें. उतारा असा आहे :

“ बाजारांत सट्टा व जुगार यांस ऊत आला होता. रणांगणावर सांडणाऱ्या रक्ताच्या फेसांतून अफाट संपत्ति वर येत होती. खुद्द राजधानींत भाकरी मिळेना कीं जळण मिळेना. पण...झारिनाची परिचारिका विरूबोवा सांगते कीं, कधींहि हल्लींइतके झगे आम्ही शिवले नव्हते आणि हिऱ्यांची

खरेदी हल्लींइतकी कधींच झाली नव्हती. आघाडीचे नव्हे तर पिछाडीचे वीर, लढायला थेरडे पण भोगायला तरणे अशा माणसांनीं नाचणारणींचे अड्डे तुडुंब भरलेले असत...कितीहि खर्च केला तरी कोणास त्याची फिकीर वाटत नसे. जणूं आभाळांतून सोन्याचा पाऊस पडत होता. वरिष्ठ वर्गांतील पुरुष आपले खिसे भरीत होते. स्त्रिया झगे पसरून पैसा भरून घेत होत्या. बँकवाले, अधिकारी, कारखानदार, शास्त्रीपंडित, सरदार, महालांतील दासी, लोकसभेचे सदस्य, आघाडीचे व पिछाडीचे सेनापति, जहाल वकील, राजघराण्याचे नातेवाईक व विशेषतः नातेवाईकीणी, सगळी-जणें त्या रक्ताच्या चिखलांत हात घालघालून त्यांतल्या सोन्यानें आपली तुंबडी भरून घेत होतीं. ही वैभवाची गंगा अकस्मात् ओसरेल या भीतीनें प्रत्येकाला लूट करण्याची घाई झाली होती. साहजिकच युद्ध थांबवण्याची कल्पना निघाली कीं त्यांचा देशाभिमान थरारून येई व ते या कल्पनेचा धिःकार करीत.''*

मजा अशी आहे कीं भारताची धुरा पंतप्रधान म्हणून गेलीं पंधरा वर्षें जे अखंडपणें सांभाळीत आहेत ते पंडित नेहरूदेखील कधीं वैतागानें तर कधीं राजकीय पवित्रा म्हणून देशाचें चित्र चिंताजनक असल्याचें बोलून दाखवतात; आपण इतके दिवस स्वप्नभूमींत वावरत असल्याची कबुली देतात. गेल्या दोन पंचवार्षिक योजनांच्या काळांत उत्पादनवाढीचा जो वेग होता तो मंदावला असून शेतीच्या उत्पादनांतील वाढ तर शून्याच्या आसपास आल्याचें, आणि तेवढ्याच काळांत झालेली लोकसंख्येची वाढ हिशेबांत घेतली तर ती शून्याच्याहि मागें सरकत असल्याचें सरकारी आंकड्यांवरून दिसत आहे. नवशक्तिकारांनीं ज्यांची वाखाणणी केली त्या अशोक मेहतांच्या अध्यक्षीय विवेचनांमधील विदारक प्रकाश तो हाच.

### खरी गोष्ट अशी आहे कीं

राष्ट्रीय जीवनाची ही सर्रास पीछेहाट कशामुळें झाली ? ह्या पीछेहाटीला जबाबदार कोण ? ह्या जबाबदारीला संपूर्णतया काँग्रेस जबाबदार असून समाजक्रांतीचें तिनें स्वखुषीनें स्वतःच मान्य केलेलें ध्येय साध्य करण्याच्या

---

*( ' रशियन राज्यक्रांति ' : पां. वा. गाडगीळ )

दृष्टीनें ज्या दृढ निश्चयानें तिनें आपलीं पावलें टाकावयास हवीं होतीं तो तिनें कधींच दाखवला नाहीं असें म्हणणें क्रमप्राप्त झालेलें नाहीं काय? १९५२, १९५७ व १९६२ सालीं झालेल्या सार्वत्रिक निवडणुकींत काँग्रेसनें जेव्हां प्रचंड विजय मिळवले तेव्हां काँग्रेसच्या ध्येयधोरणांना जनतेनें पाठिंबा दिलेला आहे असाच अर्थ लावण्यांत आला होता कीं नाहीं? काँग्रेसला समाजपरिवर्तन हवें होतें आणि जनतेलाहि हवें होतें. मग तें नको होतें तरी कोणाला? मग तें प्रारंभापासून रेंगाळत रखडत राहिलें तें काय म्हणून? आर्थिक विषमतेचें प्रमाण ब्रिटिश येथून निघून गेले तेव्हां जें होतें तें दोन पंचवार्षिक योजना पार पाडल्यानंतर जवळ जवळ तिप्पट व्हावें, मोठमोठ्या धरण-योजना पार पडूनहि आमचें शेतीउत्पादन जैसे थे असावें, बेकारांची संख्या घटण्याऐवजीं वाढावी, आणि ज्याला आपला भाई म्हणून उराशीं कवटाळलें तो आपला मारेकरी ठरावा हे सर्व उफराटे प्रकार काँग्रेसच्या गेल्या पंधरा वर्षांच्या राजवटींत घडले. ते तिच्या कारभारांत कोणी विघ्नसंतोषी गटांनीं अथवा पक्षांनीं अडथळे निर्माण केल्यामुळें कीं काय? खरी गोष्ट अशी आहे कीं, जिची बरोबरी धरित्रीच करूं शकेल अशी अनन्यसामान्य क्षमाशीलता फक्त भारतीय जनतेंतच आढळते. येथील जनतेच्या सोशिकपणाला आणि अल्पसंतुष्टपणाला सीमा नाहीं. राज्यकर्त्यांच्या हातांत मेणासारखे बनून राहण्याची ही वृत्ति तिच्या हाडींमासीं खिळलेली असल्याकारणानेंच कीं काय, "राजा कालस्य कारणम्" अशी ठाम श्रद्धा तिच्या ठायीं आढळते. मग चाकावर चढवलेल्या या तयार मातीला घड्याचा आकार देतां आला नाहीं तर तो कुंभाराचा दोष कीं मातीचा?

## फसवा युक्तिवाद

कांहीं विद्वान् मित्र असाहि एक मुद्दा उपस्थित करतात कीं भारतामध्यें जें कांहीं भलेबुरें घडलें आहे त्याचा विचार सुटकपणानें करून योग्य निष्कर्ष काढतां येणार नाहीं. आफ्रो-आशियाच्या ज्या विशाल जनविभागांत भारत उभा आहे त्यांतील जीं राष्ट्रें भारताच्या आगेंमागें बंधमुक्त होऊन आपापला कारभार पाहूं लागलीं त्यांची परिस्थिति कशी आहे तें

पाहून मग आपण भारताच्या प्रगतिविषयीं तुलनात्मक शेरा मारावयास हवा. आपाततः हा युक्तिवाद योग्य वाटतो. पण तो कसा फसवा आहे तें थोडा विचार केल्यास ध्यानांत येईल. आफ्रिकेमधील घाना, केनया किंवा कांगो या देशांशीं, अथवा दक्षिणपूर्व आशियांतील ब्रह्मदेशापासून इंडोनेशियापर्यंतच्या देशांशीं भारताची तुलना करून भारताचा क्रमांक त्या सर्वांत वरचा आहे हें ( वस्तुस्थिति तशी नाहीं हें वेगळेंच ) सिद्ध करण्यापासून काय साधणार आहे ? एकतर ज्या ब्रिटिशांच्या हुकमतींत भारत सुमारें दीडशें वर्षें राहिला त्यांची हुकमत फ्रेंच, डच व बेल्जियन लोकांच्या हुकमतीपासून वेगळी होती. कांगोमधील साम्राज्यशाही अस्तंगत झाली तेव्हां असें सांगतात कीं, तेथील रहिवाशांत मॅट्रिकइतकें शिक्षण झालेलीं पांच माणसें मिळणें दुर्लभ होतें. भारताची स्थिति तशी होती काय ? दुसरी गोष्ट अशी कीं, ज्या दिवसापासून भारतांत इंग्रजांची राजवट सुरू झाली त्याच दिवसापासून भारताचें पुनरुत्थान व्हावें म्हणून अहर्निश तळमळणारे राजा राम मोहन रॉय यांच्यासारखे दूरदर्शी जीवनवीरहि जन्मास आले. आणि विशेष असें कीं, त्यांची परंपरा पुढील दीडशें वर्षें अविच्छिन्न चालू राहिली. त्यांतला शेवटचा दुवा म्हणजे महात्मा गांधी. ते तर त्यागमय सेवेचें एक अग्निहोत्रच होते. समाज-सुधारकांची, लोकाग्रणींची, विचारवंतांची, लेखकांची, संपादकांची व स्वयंसेवकांची अशी परंपरा वांट्यास आलेला दुसरा एकतरी देश आफ्रो-आशियामध्यें दाखवतां येईल काय ? कोणत्याहि प्रकारें भावनावश न होतां असें रास्तपणें म्हणतां येणार नाहीं काय कीं चीनला देखील अशी परंपरा लाभलेली नव्हती ? बरें भारतीय जनतेकडे पाहावें तर फक्त टिळकांसारख्या वा गांधीजींसारख्या विभूतींच्या हांकेलाच तिनें स्वातंत्र्यपूर्व काळांतच साद दिली असें नव्हे तर स्वातंत्र्योत्तर देखील ज्या वेळीं गोवा विमोचनासारखे व संयुक्त महाराष्ट्रासारखे जिव्हाळ्याचे प्रश्न निर्माण झाले तेव्हां सामान्य कार्यकर्त्यांच्या हाकेसरशी धावून जाण्यासहि तिनें मागेंपुढें पाहिलें नाहीं. असा हा भारताचा दिव्य भव्य वारसा ज्यांनीं आपल्या हातांनीं उधळून टाकला त्यांच्या करंटेपणाचा आणखी वेगळा पुरावा देण्याची जरुरीच काय ? प्रसोपाची अशी खात्री होऊन चुकलेली आहे कीं, आपल्या निर्वेध पंधरा

वर्षांच्या कारकीर्दींत जी काँग्रेस पूर्वींच्या नेत्यांनीं तिच्या स्वाधीन केलेला वारसा सांभाळूं शकली नाहीं व चीनच्या आक्रमणासारखा जबरदस्त आघात मस्तकावर होऊनहि जी जागी होत नाहीं, तिच्यावर इतःपर भरंवसा ठेवून चालणार नाहीं, हें जनतेला पटवून दिलें पाहिजे.

## दोन आक्षेप

वस्तुतः प्रसोपाची ही मागणी म्हणजे आतांपर्यंत काँग्रेसवर टीका करणाऱ्यांच्या युक्तिवादामधील शेवटचें तर्कसिद्ध विधान होय. पण प्रसोपानें तें विधान केल्याबरोबर नवशक्तिकारांसारखी काँग्रेसचीं पोटांतून कैवारी असणारी मंडळी व प्रभातकारासारखी कडवी विरोधक मंडळी सारखीच बेचैन व्हावी हें विशेष. आम्ही जणूं देशाच्या ललाटावरचा कुंकुमतिलक पुसून टाकण्यास निघालेले अमंगल साहसिक आहोंत असा कैवाऱ्यांचा आरोप आहे. तर काँग्रेसला गाडण्यासाठीं जनसंघ वा स्वतंत्रांना पाचारण न करण्याचा आमचा सोवळेपणा, प्रभातकारांसारख्या आमच्या मित्रांस नापसंत वाटतो. या दोन्ही आक्षेपांचा विचार टाळून चालणार नाहीं.

## दुबळें सौभाग्य काय कामाचें ?

नवशक्तिकारांसारख्यांच्या अंतःकरणामधील भीतीचें स्वरूप समजण्यासारखें आहे. नवरा बरा-वाईट कसाहि असो, तो आहे म्हणून कपाळावर सौभाग्यचें चिन्ह तरी आहे. तो जाऊन कपाळ पांढरें पडलें तर जगांत तोंड कसें दाखवावें, अशी ज्याप्रमाणें हिंदु स्त्रीची असहाय अवस्था होते तशी नेहरू सरकारच्या अभावीं देशाची होईल, असें ह्या मित्रांना वाटत असतें. ‘ एकच प्याल्यां ’तील सिंधूची ही भूमिका लोकशाहीच्या व समाजवादाच्या जमान्यांत भारतीय जनतेनें वठवावी असें नवशक्तिकार जर सुचवीत असतील तर या हतभागी देशाला विशेष भवितव्य नाहीं असें म्हणणें भाग आहे. शिवाय या निमित्तानें आमच्या ह्या मित्रांना एका घटनेची आठवण करून दिल्यावांचून राहवत नाहीं. १९४२ च्या जूनमध्यें लुई फिशर या विख्यात पत्रपंडितानें वर्धा मुक्कामीं गांधीजींची भेट घेऊन त्यांनीं जी देश सोडून निघून जाण्याची सूचना ब्रिटिश सरकारला केली होती त्यासंबंधीं त्यांना प्रश्न विचारले. गांधीजी—फिशरची ही मुलाखत पुढें पुस्तकरूपानें

प्रसिद्ध झाली. त्यांत शब्दशः उद्धृत केलेले गांधीजींचे उद्गार आजहि खऱ्या क्रांतिकारकांनीं चिंतन करण्यासारखे आहेत. गांधीजी म्हणाले होते:

" माझी सूचना एकतर्फी आहे. मागाहून भारतीय लोक काय करतील, काय न करतील त्याची फिकीर न करतां ब्रिटिशांनीं माझ्या सूचनेनुसार चालावें. ते येथून गेल्यावर कांहीं काळ सांवळागोंधळ माजेल असें देखील मीं गृहित धरलें आहे. जर व्यवस्थितपणें त्यांनीं काढता पाय घेतला तर त्यांच्या जाण्यानंतर सध्यांच्या पुढारी मंडळींकडून तात्पुरतें सरकार निर्माण करण्यांत येईल. तथापि दुसरेंहि घडेल. ज्यांना राष्ट्राचा विचारच नाहीं व जे स्वार्थापुरतेच पाहाताच ते उचल खातील आणि उपद्रवी गटांना हातांशीं धरून कोणत्याहि मार्गानें जमेल तेथें सत्ता बळकावूं पाहतील. "

गांधीजींप्रमाणेंच नव्हे तर त्यांच्याहिपेक्षां कडक शब्दांत ब्रिटिशांना शिव्या देणारे त्या वेळीं कांहीं थोडेथोडके पुढारी नव्हते. पण ब्रिटिशांना 'चालते व्हा' म्हणणारे गांधीजीच निघाले आणि त्यांनीं ब्रिटिश सरकारला 'चलेजाव' म्हटल्याबरोबर सगळ्यांना गोऱ्या कुंभाराचीं थापटणीं लागून कच्चीं मडकीं कोणतीं व पक्कीं कोणतीं तें कळून चुकलें. लीगवाले, हिंदुमहासभावाले, प्रागतिक यांनीं तर गांधीजींना वेड्यांत काढलेंच, पण जागतिक क्रान्तीचा कायम ठेका ज्यांनीं स्वतःकडे घेतलेला आहे ते कम्युनिस्ट देखील उलटले. ऐन युद्धाच्या काळांत जपान सीमेवर येऊन ठेपलेला असतांना गांधीजी जें काय बोलत आहेत तें देशघातकी आहे असा अभिप्राय राजगोपालाचारींनीं तर दिला होताच, पण सध्यांचे पंतप्रधान नेहरू हे देखील जवळजवळ त्याच मताचे होते असें म्हणतात. गांधीजींच्या विरोधकांचा जो युक्तिवाद होता तो केवळ कातडी बचाऊ स्वरूपाचा होता काय? तसा आरोप करणें म्हणजे त्या वेळची जिनांची लीग, संस्थानिकांचा स्वार्थ, जपानचें आक्रमण यांची गंभीरता नीट न समजून घेतां त्यांच्यावर टीका करण्याप्रमाणें आहे. खरें पाहिलें तर कठोर वस्तुस्थिति गांधीजींच्या विरुद्ध होती. मग गांधीजींच्या बाजूला काय होतें? इतिहासाचा ओघ कोठें वळण घेणार तें जाणण्याचें ज्ञान, डोळ्यांना दिसणाऱ्या स्थैर्याच्या खालीं समाज चेंगरला जात असून तें स्थैर्य आपल्या हातानें नष्ट करण्याची सिद्धता न दाखवल्यास समाजाचा कणा कायमचा मोडून जाईल ही जाणीव, आणि

समाजाला दिखाऊ स्थैर्याच्या पिंजऱ्यांत कोंडून ठेवण्यास कारणीभूत होणाऱ्या सरकारला "चालते व्हा" म्हणण्याची हिंमत. ते शब्द त्या वेळीं जर उच्चारले गेले नसते तर तत्पूर्वी शंभर वर्षे भारतांत झालेलें बलिदान, पेटलेला असंतोष व उसळलेली स्वातंत्र्याकांक्षा यांच्यावर मुक्यानें मरण्याची आपत्ति कोसळली असती. असा क्षण म्हणजे क्रांतिकारकांची कसोटी पाहाणारा क्षण असतो. त्याच्या हांकेला साद देणारे क्रांतिकारक यशस्वी होतीलच असेंहि नाहीं. पण यश येवो वा अपयश, आंतून आलेल्या हुंकाराला जे साद देत नाहींत त्यांनीं क्रांतिकारकत्वाचा दावा करूं नये. अशांच्या हातून समाजाचा कायापालट होणें कदापि शक्य नसतें.

## या क्षणाचें मोल ओळखा

प्रश्न असा आहे कीं, तसा क्षण आज आलेला आहे कीं नाहीं ? चीनच्या आव्हानाला पर्याप्त उत्तर देणें पंडित नेहरूंच्या नेतृत्वाला व जी काँग्रेस त्यांच्या पाठीशीं उभी आहे त्या काँग्रेसला कदापि शक्य होणार नाहीं अशा निर्णयाप्रत जे कोणी आले असतील त्यांनीं पंडित नेहरूंना "जा" म्हटलेंच पाहिजे. ते गेल्यावर देश बुडेल असें मानणारे खुशाल मानोत. आम्ही तसें मानीत नाहीं. उलट आम्ही असें मानतों कीं, पंडितजी राजकीय मंचावर उभे आहेत तोंपर्यंत गोरोबाची थापटणी कोणाला लागणार नाहीं आणि समाजवादी व समाजवादविरोधी यांची निवडानिवड होणार नाहीं. ज्वालामुखीच्या पोटांत महाभयानक रसायन खदखदूं लागलें तरी त्याच्या माथ्यावरील वृक्षांच्या हिरवेपणामुळें बघणाऱ्यांची जशी दिशाभूल होते आणि खालच्या दाबामुळें शिखर हवेंत उडेपर्यंत आंतील खळबळाटाची कल्पना त्यांना करतां येत नाहीं तशीच आज देशाची स्थिति पंडितजींमुळें झालेली आहे. युद्धाच्या काळांत अधिकारारूढ पक्षाचा स्वार्थीपणा, सत्ताहव्यास कमी होतो, समाजांतला धनिक वर्ग निर्धनाला लुबाडतांना कचरतो, समाजवादाच्या दिशेनें झपाट्यानें पावलें पडूं लागतात, समाजांत सहजच श्रेष्ठ-कनिष्ठ भावनेला ओहोटी लागते असें, सर्व युद्धग्रस्त राष्ट्रांचा इतिहास सांगतो. पण भारतांत सर्व चक्रें उलटीं फिरत असून तीं सुलटीं फिरण्याचा संभव दिसेनासा झालेला आहे. अशा वेळीं घरच्या घरीं बोटें मोडीत बसून काय

होणार आहे ? भलत्या भिडेनें स्वस्थ बसलें तर देशासकट आपण सगळे रसातळाला जाऊं. त्या दुर्घटनेचे साक्षी होण्यापेक्षां तिला जे राज्यकर्ते जबाबदार आहेत त्यांना जा म्हणून स्पष्टपणें सांगितलें तर बिघडलें कोठें ?

अशा वेळीं स्वतंत्र पक्ष, जनसंघ यांच्याशीं प्रसोपानें सहकार्य कां करूं नये ? त्यांना प्रतिगामी कां म्हणावें ? हा सोंवळेपणा कशाला ? असे प्रश्न निर्माण झाले आहेत. राजकारणाची चिकित्सा चालू असतां पक्षोपपक्षांचें मूल्यमापन व नामकरण वास्तवतेनुसार करणें क्रमप्राप्त ठरतें, त्याला इलाज नाहीं. तसें नसेल तर काँग्रेसला तरी एवढा दोष देण्याचें कारण काय ? काँग्रेसला सत्तास्थानें खालीं करा असें प्रसोपा कशासाठीं सांगत आहे ? काँग्रेसनें वाजवीपेक्षां अधिक समाजवाद आणला म्हणून कीं काय ? चिनी आक्रमणाला यशस्वी तोंड द्यावयाचें असेल तर काँग्रेसनें सामाजिक व आर्थिक विषमते-कडची वाटचाल बंद ठेवली पाहिजे कीं, ती अधिक जलदीनें केली पाहिजे ? राजेरजवाड्यांचे तनखे, भांडवलदारांची चैनचमन, मंत्रिमंडळांची उधळमाधळ, बिनअटक भाववाढ हीं सर्व रोंखली पाहिजे कीं तशींच चालू ठेवलीं पाहिजेत ? चीनच्या ताब्यांत आमचे जे जवान जातात त्यांचा बुद्धिपालट चीन करील अशी भीति आपणांला कां वाटते ? त्याची जर छाननी केली तर चीनच्या आक्रमणाचें जें आर्थिक व सामाजिक स्वरूप आहे तें किती भयावह व मूलगामी आहे त्याची यथार्थ कल्पना आपणांस येऊं शकेल. महार पलटणींतल्या एखाद्या युद्धकैद्याला जर चिन्यांनीं विचारलें कीं, तूं ज्या देशासाठीं लढतोस-मरतोस त्या देशांत तुझ्या आयाबहिणींना गांवच्या विहिरीवर पाणी तरी भरूं देतात काय ? दुसऱ्या एखाद्या जवानाला जर विचारलें कीं, तुझ्या कामगार भावाला ज्या मुंबईत फूटपाथवर झोंपावें लागतें तेथें चार कुटुंबांचा संसार सहज मावेल अशीं संगमरवरी न्हाणीघरें असलेले धनिकांचे महाल आहेत हें खरें कीं नाहीं ? तिसऱ्याला जर विचारलें तुझ्या देशांत गेल्या दहा वर्षांत लक्षाधीश हे कोट्याधीश बनले आणि गरीब आणखी गरीब झाले असें तुमचे लाडके पंतप्रधानच कबूल करतात, यावर तुझें म्हणणें काय ? आणीबाणीच्या परिस्थितींत देखील चितेवर पोळ्या भाजणारे व्यापारी आपल्या गिऱ्हाइकांना लुटण्याचा धंदा अव्याहत चालू कसे ठेवूं शकतात ? आपल्या जवानांपाशीं, इतकेंच नव्हे

तर त्यांच्या अधिकाऱ्यांपाशीं तरी या मर्मभेदी प्रश्नांचीं उत्तरें आहेत काय? जनसंघाकडून व स्वतंत्रांकडून तरी तीं समाधानकारक रीतीनें मिळूं शकतील काय? भारताच्या आमूलाग्र समाजपरिवर्तनाची जे तयारी ठेवणार नाहींत त्यांना असाच अनुभव येईल कीं, कम्युनिझमच्या या प्रचारी रेट्यापुढें आपला देश टिकूं शकणार नाहीं. प्रतिज्ञा करूनहि हें परिवर्तन काँग्रेस घडवीत नाहीं म्हणून देश कुमकवत राहिलेला आहे, त्यांतलीं दरोबस्त माणसें राष्ट्राभिमानानें पेट घेऊं शकत नाहींत, हाच आपला काँग्रेसवर आरोप आहे ना? मग काँग्रेसला काढून आपण जर तिच्या जागीं असे राज्यकर्ते आणले कीं ज्यांना मनोमन देखील समाजपपरिवर्तन नको तर देश अधिक सुदृढ बनेल कीं दुर्बल? केवळ गंमत म्हणून खेळावयाला राजकारण हा खोखोचा खेळ कां आहे?

याचा विचार आम्हांला सोंवळे म्हणणाऱ्या आमच्या मित्रांनीं करावा आणि जनसंघाच्या व स्वतंत्रांच्या पुढाऱ्याअनुयायांनींहि करावा. गेलीं हजार वर्षें तरी भारतीय समाज दगड बनून पडलेला आहे. केलीच कांहीं सुधारणा तर ती फार जिकीरीनंतर, अगदीं गळ्यापर्यंत पाणी चढल्यानंतर आणि ती देखील तोंडदेखली, अर्धीमुर्धी, अदपाव छटाक. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत नव्या विज्ञानानुसार राजीखुशीनें फेरघडी बसवावयाची कीं नाहीं असा रोकडा प्रश्न भारतीय नेत्यांच्या समोर या घटकेला आहे. त्यांचें प्रांजल उत्तर देण्याची तयारी असेल तर काँग्रेसचें काय करावयाचें त्याचें उत्तरहि त्यांतच मिळून जाईल.

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ..........
क्रमांक .................... नों: दि: ..........

# राजीनाम्याच्या मागणीविषयीं आणखी थोडें *

' होय, आम्ही नेहरू मंत्रिमंडळाचा राजीनामा मागतों ' हा लेख साधना साप्ताहिकांत प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर बरेंच टीकात्मक लिखाण झालें. तें अपेक्षितच होतें. ह्या देशाच्या भवितव्यावर येथील व आफ्रो-आशियांतील कोट्यवधि जनतेचें भवितव्य अवलंबून असल्या कारणानें भारताच्या भाग्य-विधात्यांनीं आतां बाजूला सरावें असें आम्हीं म्हटल्यावर तें कोणी सहजा-सहजीं मान्य करील अशी अपेक्षा करणें चूकच ठरलें असतें. यास्तव ज्यांनीं साधनेमधील लेख वाचण्याची तसदी घेतली, इतकेंच नव्हें तर त्यावर कडाडून टीका केली, त्या टीकाकारांचे आभार मानणें उचित होय.

टीकाकारांच्या लेखनांत जे महत्त्वाचे मुद्दे येऊन गेले त्यांचा परामर्ष घेण्यापूर्वी कांहीं बिनमहत्त्वाच्या मुद्यांचें निराकरण केलेलें बरें. उदाहरणार्थ, ' महाराष्ट्र टाइम्स ' मध्यें साधनेंतील माझा लेख ' तपासण्याच्या ' निमित्तानें श्री. गोविंद तळवलकरांनीं त्यांच्या मतें असा मोठा खोंचक प्रश्न विचारलेला आहे कीं, भारतामधील आजची परिस्थिति क्रान्तिपूर्वकाळांतील रशिया-मधल्या परिस्थितीसारखी आहे असें जरी वादाकरितां मान्य केलें, तरी येथें लेनिन कोठें आहे ? याचें उत्तर देणें कठीण नाहीं. रशियन क्रान्तीच्या आठ-नऊ महिने आधीं लेनिन ज्या वेळीं स्वित्झरलंडमधून पेट्रोग्राडला येऊन उतरला त्या वेळीं त्याला जर श्री. तळवळकरांनीं पाहिला असता, तर भावी काळ ज्याला ' महान् क्रान्तिनेता लेनिन ' म्हणून ओळखील तो हा, असें त्यांनाहि वाटलें नसतें. आधीं लेनिन कोठें आहे तो दाखवा, मग क्रान्ति करावयाची कीं नाहीं तें बघूं, हा दृष्टिकोन इतिहासाच्या अभ्यासकाला शोभ-णारा नाहीं आणि राजकीय कार्यकर्त्याला तर नाहींच नाहीं. क्रान्तिनेतृत्व ही क्रान्तिकालांतून उद्भवणारी घटना आहे. कधीं कधीं क्रान्तिकाल वांझोटाहि ठरेल, नाहीं असें नाहीं. पण आजच्या प्रमाणें परिस्थिति राष्ट्रासमोर ज्या वेळीं असते त्या वेळीं ती क्रान्तिसूचक परिस्थिति आहे कीं नाहीं तें ठरवणें हेंच फार महत्त्वाचें असतें. नेत्याची वाट पहात बसावयाचें नसतें.

---

* साधना १३-७-६३

**नवशक्तिकारांचा फोल युक्तिवाद**

नवशक्तिकारांनीं तर माझ्या लेखावर खूपच आक्षेप घेतलेले आहेत. रशियांतील झारशाहीच्या परिस्थितीचें वर्णन मीं श्री. पां. वा. गाडगीळांच्या ग्रंथामधून उद्धृत केल्यामुळें मी कोठल्या तरी पुस्तकांतलें कांहीं तरी घोकून पोपटपंची करीत आहे असें त्यांना वाटलें. श्री. गाडगीळांचा तो ग्रंथ घोकून पाठ करण्यासारखा आहे असें मला कधींच वाटलें नाहीं. पण त्यांतील कांहीं मुद्दे लक्षांत ठेवण्यासारखे आहेत असें मी समजत होतों. तेवढेंहि नवशक्तिकारांना जर वाटत नसेल तर माझा नाइलाज आहे. मांजरीला आपल्या पिलाची आठवण राहात नाहीं, तसें तर येथें झालेलें नसेल? महात्मा गांधींचें १९४२ च्या चळवळीच्या वेळचें मत मीं उद्धृत केलें. त्यावरहि नवशक्तिकारांनीं असा शेरा मारला कीं, गांधीजींचें राजारणहि पुढें तडजोडीचें, सौम्य होत गेलें. गांधीजींचे अंधभक्त आम्ही नाहीं व कधींहि नव्हतों. अजूनहि असा विचार मनांत येऊन जातो कीं, आपले अव्वल सहकारी तीन चार वर्षांच्या तुरुंगवासामुळें पार ढेपाळून गेलेले असून लढ्याचें अग्निदिव्य पुनश्च करण्यास ते कदापि तयार होणार नाहींत हें गांधीजींना पुरतेपणीं ठाऊक झालेलें असल्यामुळेंच त्यांनीं उत्तरोत्तर तडजोडीचें धोरण स्वीकारलें. स्वराज्यप्राप्तीनंतर तर कॉंग्रेसच विसर्जित करण्याचा सल्ला त्यांनीं दिला आणि स्वतः ते राज्यकर्त्यांपासून पूर्णपणें विभक्त झाले. १९४६ सालच्या पावसाळ्यांत श्री. जयप्रकाश नारायण व गांधीजी यांच्या दरम्यान जी चर्चा महाबळेश्वरीं झाली त्या वेळीं ती ऐकण्याचा सुयोग मला प्राप्त झाला होता, त्याच्याच अनुषंगानें मी हें विधान करीत आहे. तशी स्थिति पंडितजींसमोर आहे काय? लबाड्या, स्वार्थीपणा व भ्रष्टाचार यांनीं ज्यांचे हात कोपरापर्यंत व पाय ढोपरापर्यंत बरबटलेले आहेत अशा दहावीस मुखंडांना जर पंडितजींनीं गचांडी देऊन बाहेर काढलें तर कॉंग्रेसचें व त्याबरोबरच राष्ट्राचें तेज वाढेल कीं कमी होईल? ही गोष्ट पंडितजींना अशक्य आहे काय? १९४२ मध्यें माझ्याबरोबर कोणी या अथवा न या, मी ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध एकटा उभा राहीन असें म्हणण्याची हिंमत गांधीजींनीं दाखवली; या महायुद्धांत भारत स्वतंत्र झालाच पाहिजे, मग त्यासाठीं मला प्राणार्पण करावें लागलें, फॅसिस्टांना मी वश

झालों असा आरोप माझ्यावर झाला तरी पर्वा नाहीं, असा वज्रनिर्धार सुभाषचंद्रांनीं दाखवला; म्हणून तर त्यांना क्रांतिदर्शी म्हणावयाचें. म्हणूनच त्यांची अशा आणीबाणीच्या प्रसंगीं आठवण करावयाची. बापजाद्यांच्या कमाईतली शेवटची पै खर्ची पडेपर्यंत आपल्या महालांतल्या कोळीष्टकें चढलेल्या हंड्या–झुंबरांखालीं बसून स्वतःला महाराज म्हणवून घेणारे पुराणे राजेरजवाडे आमच्या पुण्यांत खंडीभर आहेत. त्यांना कोणी क्रांतिदर्शी म्हणत नाहीं कीं गांधी–सुभाषचंद्रांनींहि कांहीं वेळां तडजोड केली होती म्हणून त्यांच्यासारखेच हें असें समीकरण कोणी मांडीत नाहीं. मुद्दा असा आहे कीं, सध्या ज्या परिस्थितीमधून भारत जात आहे ती क्रांतिकालीन परिस्थिति आहे आणि ती हाताळण्यास पंडित नेहरूंचें सरकार नालायक ठरलें आहे, हें मुख्य विधान नवशक्तिकार व आमचे अन्य टीकाकार मान्य करतात कीं नाहीं ?

## राजीनाम्याची मागणी कशासाठीं ?

भारतासारख्या देशांत विरोधी पक्ष वाढवणें हें फार जिकीरीचें व मुदतीचें काम आहे, हें आमच्या ज्या टीकाकारांनीं येथील स्वातंत्र्याचा इतिहास वाचला असेल त्यांना उमगू शकेल. पण तो मुद्दा बाजूस ठेवून टीकाकारांचा हा आक्षेप आम्ही मान्य करतों कीं, विरोधी पक्षांनीं निराशा केली. पण काँग्रेसला खुर्चीवरून खेंचा आणि आम्हांला तेथें नेऊन बसवा असें प्रसोपानें अथवा दुसऱ्या एखाद्या विरोधी पक्षानें कधीं म्हटलें आहे काय ? नेहरू मंत्रि-मंडळानें अधिकारत्याग केला कीं, एका वेगळ्याच पातळीवर राजकारण जाईल. देशाच्या राजकारणाची, अर्थकारणाची व समाजकारणाची वेगळी घडी बसवतां यावी म्हणून नेहरू मंत्रिमंडळानें आपण अधिकारत्याग करीत असल्याचें जाहीर करतांच काँग्रेसच्या झाडाचा आश्रय घेऊन जनतेच्या मान-गुटीस बसलेलीं अनेक भूतपिशाच्चें, अनेक भोंदू व संधिसाधु आपापल्या स्थानीं परततील. नव्या विशुद्ध हवेचे झोत सुरू झाले म्हणजे विरोधी पक्षांची देखील झाडलोट होऊन त्यांना जर कांहीं असंतुष्ट आत्मे येऊन चिकटलेले असतील तर तेहि झटकले जातील. या प्रक्रियेमधून नव्या दमाचें, अधिक शिस्तीचें व कडवें सरकार निर्माण कां होणार नाहीं ? मग त्यांत नेहरू राहातील अथवा एवढा कठोर कार्यक्रम आपल्या स्वभावास मानवणार नाहीं

असें वाटल्यास ते दूर सरतील. पंतप्रधानांच्या प्रकृतीस मानवणारे तेवढेच कार्यक्रम व तेवढींच धोरणें हा प्रकार येथून पुढें बंद व्हावयास नको काय ? त्याबाबत स्पष्टपणें आपल्या अंतःकरणांतील राग व्यक्त करण्याची जनतेनें तयारी केल्यावांचून भारतांत कॉंग्रेसनें चालवलेल्या मनमानी कारभाराला आळा तरी कसा घालतां येणार आहे ? नेहरू मंत्रिमंडळाकडे राजीनाम्याची मागणी करण्यामध्यें प्रसोपाचें उद्दिष्ट हेंच आहे.

### स्थैर्य आणि जडता यांत विवेक हवा !

जनतेमध्यें नवी जागृति करण्याचा मुद्दा निघाला कीं, आमच्या टीकाकारांचा त्यावरील आक्षेप अगदीं ठरलेला आहे. तो असा कीं, नेहरू मंत्रिमंडळाचा राजीनामा मागण्यासाठीं जनतेला तुम्ही प्रवृत्त करूं लागलात म्हणजे देशांतील स्थैर्य बिघडेल त्याचें काय ? असल्या युक्तिवादामुळें आमचे कांहीं सहकारी देखील संभ्रमांत पडत असावेत असें दिसतें. या बाबीचा विचार करतांना त्यांनीं स्थैर्य व जडता यांच्यामध्यें कृपा करून गफलत करूं नये, एवढेंच त्यांना आग्रहपूर्वक सांगावेसें वाटतें. आज भारतामध्यें जें दृश्य दिसत आहे तें स्थैर्याचें नसून जडतेचें आहे. जडतेलाच जर आपण स्थैर्य म्हणूं लागलों तर उद्या गतीला आपण बेतालपणा अथवा गोंधळ समजण्याचीहि चूक करूं ! भारतीय समाज गेलीं शेंकडों वर्षें स्थिर राहिला, जड बनला, एखाद्या प्रचंड शिळेप्रमाणें अविचल, अपरिवर्तनीय बनून राहिला म्हणून तर तो आज असा ऐक्यहीन, तेजोहीन, ज्ञानहीन व धनहीन बनलेला आहे. समाज हा ग्रहाप्रमाणें चल राहिला तरच स्थैर्ययुक्त व समतोल राहील. त्याचें चलन बंद पडलें कीं तो अराजकाच्या अवकाशांत कोठेंतरी उल्केप्रमाणें कोसळून जळून भस्म झाल्याशिवाय राहाणार नाहीं. म्हणून प्रसोपाची मागणी समाजांतील जडता घालवण्यासाठीं असून त्याचें स्थैर्य बिघडवण्यासाठीं केलेली नाहीं हें समजून घेण्याची आवश्यकता निर्माण होते. राजवटीची स्वार्थी स्थिरता व समाजाचें हितकारी स्थैर्य यांचें समीकरण मांडणें फार धोक्याचें ठरेल.

### निर्धन सधनांतलें वाढतें अंतर

उत्पादनवाढ गेल्या पंधरा वर्षांत औद्योगिक क्षेत्रांत झाली हें नाकबूल

करण्याचें कारण नाहीं. तशी ती गेल्या महायुद्धाच्या काळांत इंग्रज तख्तनशीन असतांहि झाली होतीच. राष्ट्राच्या अन्तर्गत गरजा व शेजाऱ्यांशीं जो मुकाबला करावयाचा आहे त्या मुकाबल्याच्या गरजा यांच्या मापानें झालेली वाढ पुरेशी होती काय व सध्यां पुरेशा प्रमाणांत होत आहे काय ? हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. पहिल्या दोन योजनांच्या काळांत जी बऱ्या प्रमाणांत वाढ झाली असें आपण म्हणतों ती देखील केवळ चीनसारख्या हुकूमशाही राष्ट्राच्या मानानें नव्हे तर जपान-जर्मनीसारख्या लोकसत्ताक राष्ट्रांच्या मानानेंहि असमाधानकारक ठरते. तृतीय पंचवार्षिक योजनेंत तर पहिल्या दोन योजनाच्या वेळचें प्रमाणहि राखतां आलेलें नाहीं. बरें, जी थोडीफार औद्योगिक वाढ होत आहे तिच्यामुळें समाज समतळ बनत आहे काय ? याचेंहि उत्तर ' नाहीं ' असेंच द्यावें लागतें. 'श्रीमंत श्रीमंत होत आहेत व गरीब गरीब होत आहेत' या विधानाचा इन्कार करतांना नवशक्तिकारांनीं हें ध्यानांत घ्यावयास हवें कीं, योजनांपूर्वीं ज्यांच्यापाशीं मुळांत कांहीं होतें त्यांच्याकडे नव्या उत्पादित संपत्तीचा फार मोठा ओघ जात असून, तिचा नाममात्र झिरपा श्रमजीवी वर्गाकडे जात आहे असें म्हणावयाचें असतें. किंमती पुढें व वेतन मागें ही शर्यत कांहीं थांबत नाहीं आणि निर्धन व सधन यांच्यामधील अंतरहि वाढतच आहे. या विधानांना सभेंतील टाळीचीं वाक्यें असें जर नवशक्तिकार समजत असतील तर ती दुःखाची गोष्ट समजली पाहिजे. कारण याबद्दलचे आंकडे जाहीर झालेले असून पंडित नेहरूंनींहि त्याविषयीं खंत प्रकट केलेली आहे. खरें पाहूं जातां याचा अर्थ नवशक्तिकार म्हणतात त्याप्रमाणें समाजांत स्थैर्य आहे असा होत नसून समाज खालीं खालीं घसरत आहे असाच होतो. गेल्या पंधरा वर्षांत वाढलेली लोकसंख्या जमेस धरल्यास तर हें चित्र भयाण दिसूं लागतें. शेतीमालाच्या उत्पादनांतील जैसे थे अवस्था नवशक्तिकार कबूलच करीत आहेत.

**सरकारची जबाबदारी पूरक**

पण ही सगळी वस्तुस्थिति क्षणभर डोळ्याआड करून आपण नवशक्तिकार म्हणतात त्याप्रमाणें असें धरून चालूं कीं, सध्यांची अनवस्था उत्पादनाच्या क्षेत्रांत नसून ती विभाजनाच्या क्षेत्रांत माजलेली आहे. त्याचें कारण सांगतांना मात्र ते श्री. एस्. एम्. , श्री गोरे यांच्या सारख्यांना

जबाबदार धरतात. कारण काय तर म्हणे सहकारी तत्त्वावर जनतेनें संघटना करून विभाजनाचा प्रश्न खाजगी नफेबाजांच्या हातून काढून घेण्याच्या कामीं पुरेसा प्रचार केला नाहीं. या आरोपाला काय म्हणावें ? प्रसोपाच्या प्रेरणेनें चाललेल्या सहकारी संस्थांवर सरकारी कृपादृष्टि कशा प्रकारची आहे तें नवशक्तिकारांनीं थोडी चौकशी केल्यास सहज समजून येईल. पण तें राहूं द्या. देशभर काँग्रेसवाल्यांनीं सहकारी संस्थांचें जाळें पसरलें असून सीमेंट, पत्रे, पोलाद, कोळसा इत्यादि अत्यावश्यक मालाच्या विभाजनासाठीं स्टे. ट्रे. कॉर्पोरेशन अस्तित्वांत आहे ना ? मग या जिन्नसांमध्यें जो काळा बाजार होतो त्याची जबाबदारी कोणावर ? विरोधी पक्षावर कीं सरकारवर ? जवळ जवळ सगळें भांडवल ज्या सहकारी कारखान्यांना पतपेढ्यांकडून व सरकार-कडून मिळतें त्यांनींहि टेंडरें मागवून साखर विकण्याच्या शर्यतींत भाग घ्यावा व तें सरकारनें चालूं द्यावें याचा अर्थ काय ?

'बिलंदर' काँग्रेसवाले कांहीं करतील अशी आशा नवशक्तिकारांना नाहीं. पंडितजींच्या चुका तर 'अक्षम्य' आहेत, असें त्यांनीं स्वतःच प्रति-पादन केलेलें आहे. फरक एवढाच आहे कीं प्रसोपा ज्या कारणासाठीं नेहरूमंत्रिमंडळाचा राजीनामा मागतो आहे त्याहून वेगळ्या कारणासाठीं तो मागावा असें त्यांनीं सुचवलेलें आहे. याबाबत नवशक्तिकारांना नम्रपणें एवढेंच सुचवावेंसें वाटतें कीं, पाण्यांत उतरलेल्याला त्याच्या मर्जीप्रमाणें पोहूं द्यावें; सदैव कांठावर ठाण मांडून बसलेल्यानें अथवा सदैव कांठ बदल-णाऱ्यानें त्याला सल्ला देऊं नये. तो पोहून पैलतीराला लागला तर त्याच्या अभिनंदनासाठीं व बुडाला तर त्याच्या दुखण्यासाठीं दोन कॉलम खरडण्याची तयारी ठेवावी म्हणजे पुरे !

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३५४३२०... वि: ...निबंध...
क्रमांक ......................... नों दि ...१७.८.६०

# महाराष्ट्रांतील कार्यकर्त्यांप्रत *

मित्र हो,

प्रजा सोशालिस्ट पार्टीच्या महाराष्ट्र शाखेचें हें जरी पाचवें अधिवेशन असलें तरी मुंबई, नागविदर्भ व मराठवाडा यांच्यासह गतवर्षी बनवण्यांत आलेल्या विशाल अशा महाराष्ट्र शाखेचें हें पहिलेंच अधिवेशन असल्या कारणानें ह्या अधिवेशनाला परंपरेच्या अखंडपणाबरोबरच विशालत्वाच्या अनुषंगाने प्राप्त होणारी प्रौढता आणि नाविन्याची नवलाई हें दोन अधिक गुणहि प्राप्त झालेले आहेत असें म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. गतवर्षी पुणें मुक्कामीं आपण आपल्या पक्षाचें अखिल भारतीय अधिवेशन मोठ्या उत्साहानें पार पाडलें होतें. त्यामुळेंच कीं काय महाराष्ट्रांतील पक्षा-विषयीं कांहीं अनुकूल ग्रह भारतांतील सर्व राज्यामधून अधिवेशना-करतां जमलेल्या प्रतिनिधींच्या मनांत फैलावले असून महाराष्ट्रांतील कार्याविषयींच्या त्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. तेव्हां आपल्या अंगी चिकटवण्यांत आलेला हा मोठेपणा खरा आहे हें सिद्ध करून दाखविण्याची जबाबदारीहि आपणावर येऊन पडलेली आहे हें विसरून चालणार नाहीं. म्हणून सबंध वर्ष आपणाला खूप कसून कार्य करावयास हवें. याचें आणखीहि एक कारण असें कीं यंदा आपल्या रजत महोत्सवाचें वर्ष आहे. त्या निमित्त नोव्हेंबरांत मुंबई नगरींत आपण मोठ्या समारंभपूर्वक जमणार आहोंत. देशभर लाखांनीं सदस्य करण्याची आण आपण घेतलेली आहे. देशोदेशीं जे लोकसत्ताक समाजवादी आहेत त्यांना आपण या समारंभाकरतां बोलावणार आहों. गेलीं पंचवीस वर्षें आपण आपल्या देशांत जी लोकशाही समाजवादाचीं मूल्यें रुजवण्याचा प्रयत्न केला त्यांचा आढावा त्या रजत महोत्सवाच्या प्रसंगानें आपण घेऊं. पंचवीस वर्षांपूर्वी म्हणजे १९३४ सालीं ज्या वेळीं कॉंग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना झालीं त्या वेळेपासून आतांपर्यंत जगांत, आपल्या राष्ट्रांत आणि आपल्या पक्षांत अनेक स्थित्यंतरें झालीं. त्यावेळच्या नेत्यांपैकीं आतां थोडेसेच

---

* अहमदनगर येथें १९५९ च्या एप्रिल महिन्यांत भरलेल्या महाराष्ट्र प्र. सो. पार्टीच्या अधिवेशनांतील अध्यक्षीय भाषण.

उरले आहेत. पक्षाचें नांव व निशाणहि बदललें आहे. पक्षाच्या विचार-सरणींत व कार्यपद्धतींत प्रसंगोचित पालट घडून आला आहे. अशा प्रकारें ही धारा कितीहि वाकडी वळली असली, तिचा प्रवाह केव्हां विशाल तर केव्हां सूक्ष्म झाला असला, कधीं वाहता तर कधीं खंडित झाला असला तरी लोकशाही आणि समाजवाद ह्या ज्या त्याच्या दोन थडी त्या मात्र अभंग राहिलेल्या आहेत उगमापासून आतांपर्यंत त्यांचें उल्लंघन आम्ही कधी केलेलें नसल्यामुळें १९२५ ते १९५९ चा प्रवाह ही एकच सरिता आहे याचें प्रमाण मिळतें.

स्वातंत्र्य पूर्व कालांत आपल्या लोकशाही निष्ठेमुळेंच आपण राष्ट्रवादी राहिलों. स्वातंत्र्य संग्रामाच्या बिनीवर राहिलों. जातीय संघटनापासून दोन कोस दूर राहिलों. ज पक्ष लोकसमाजवादी नव्हते त्यांनीं स्वातंत्र्य संग्रामाशीं द्रोह तरी केला किंवा ते जातीय संघटनांच्या कुंपणाआड दडून तरी बसले. आता देश स्वतंत्र झाल्यावर लोकशाही राष्ट्रवादाची कांहीं गरज उरली आहे काय? होय. कशी तें परवाच्या तिबेटच्या प्रकरणावरून आपल्या लक्षांत आलेंच असेल. स्वातंत्र्यापूर्वीं ज्यांनीं स्वातंत्र्य लढ्याशीं बेईमानी केली तेच पुनः ह्या प्रकरणीं खडयासारखे हिंदी जनतेपासून वेगळे झाले. तथापि स्वातंत्र्योत्तर काळांत राष्ट्रवादापेक्षां समाजवादाला प्रकट होण्यास अधिक व नित्यस्वरूपाचा अवसर मिळावा हें सहाजिकच होतें. सत्ता विकेंद्रीकरणाची प्रवृत्ति असेंहि त्याचें वर्णन करता येईल. ह्या प्रवृत्तीमुळेंच आर्थिक व राजकीय क्षेत्रामधील विकेंद्रीकरणाचा आणि जनाभिमुखतेचा आपला पक्ष पुरस्कार करीत आला आहे. जमीनधारणेच्या कमाल मर्यादा घालून आपखुशीची सहकारी शेती वाढवावी, असा कार्यक्रम पुढें येतांच स्वातंत्र्य संग्रामाच्या वेळीं ज्यांनीं जातीय संघटनांचा आश्रय घेतलेला होता ते त्याला जाहीरपणें विरोध करूं लागल्याचें दृश्य आज दिसत आहे. सारांश अत्यंत बिकट अशा आंतरराष्ट्रीय परिस्थितीमधून आपणास वाट काढीत जावयाचें असल्यामुळें आणि अंतर्गत आर्थिक व सामाजिक परिस्थितींत कायापालट घडवून आणण्याचें कार्यहि आपणास त्याच वेळीं पार पाडावयाचें असल्यामुळें आपणाला राष्ट्रवाद व समाजवाद ह्या दोन चक्षूंपैकी कोणताहि चक्षू मिटून पुढें पाऊल टाकतां येणार नाहीं. आपल्यावरील ह्या दुहेरी जबाबदाऱ्यांचें भान

आपल्या पक्षांमधील लहानांतील लहान कार्यकर्त्याला जसजसें होईल तसतशी पक्षाची वैचारिक मजबुती वाढेल.

ज्यांना आपल्या पक्षाची ही भूमिका ठाऊक नाहीं किंवा कळत नाहीं किंवा जे वेड पांघरून पेड गांवाला जाणारे आहेत ते आमच्या आंतरराष्ट्रीय भूमिकेमुळें बेचैन होतात आणि मग कोल्हें चावल्यासारखें वाटेल तसे बडबडत सुटतात. मग तें आम्हांला विचारतात कीं इस्र नाज हा तुमचा काका होता का मामा? दलाईची भलाई करणारे तुम्ही कोण? शिलाई लामा कीं धुलाई लामा? महाराष्ट्राला शापभूत होणाऱ्या ह्या विनोदीवृत्तीची चर्चा आपणांस येथें कर्तव्य नाहीं. आपणाला एवढेंच ध्यानांत घ्यावयाचें आहे कीं आपल्या पक्ष कार्यकर्त्यांना जर स्वतः डोळसपणें कार्य करावयाचें असेल आणि जनतेला डोळसपणा आणून द्यावयाचा असेल तर जगांत काय राजकारणें शिजत आहेत, कोणते प्रवाह कसे कोठें जात आहेत, संधि–विग्रह कसे बनत व बिघडत आहेत, वचनें कशीं दिलीं व मोडलीं जात आहेत, त्यावर बारीक नजर ठेवून मगच आपण आपले शत्रु व मित्र निवडले पाहिजेत. मराठशाहींतील नेत्यांवर हा आरोप केला जातो कीं त्यांच्यांत वावरणारे "ताम्र" कोण, ते कोठले, त्यांची नीति काय, त्यांचें ज्ञान व त्यांचें बळ किती याचा पत्ता त्यांच्यांतील नाना फडणिसासारख्या मुत्सद्यासहि नव्हता. नाना फडणिसाची ही आंधळी गादी ज्यांना चालवावयाची त्यांनीं चालवावी, आपण त्यासाठीं उमेदवारी करण्याचें कारण नाहीं. आपण आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय बुद्धिबळाच्या पटावर प्याद्याफर्ज्यांच्या हालचाली कशा होत आहेत तें अभ्यासलें पाहिजे आणि आपल्या देशाला देखील त्या पटावरच्या घरांतूनच खेळावयाचें आहे हें कधींच विसरतां कामा नये. अमेरिकेंत व कानडांत किती धान्य पिकलें यावर जर आमची बारा वाजतांची भूक भागणार कीं नाहीं तें ठरणार आहे, जर्मनी–रशियामधून यंत्र–तज्ञ मिळाले तर आमचीं धरणें, कारखाने जर उभे राहाणार आहेत तर तेथील सर्व मानवी व्यापारांचा पायाच असें जें राजकारण त्याच्याकडे आम्ही दुर्लक्ष केलें म्हणून त्यांच्यांतील घडामोडींचा परिणाम आमच्या जीवनावर झाल्यावांचून कसा राहील? म्हणून परराष्ट्रीय राजकरणांत लक्ष घातल्याबद्दल आपणाला जे शिव्या देतात त्यांना प्रत्युत्तरें देण्यांत फारसा वेळ खर्ची न टाकणें चांगलें.

नवीन विज्ञानामुळें एका बाजूनें जग जवळ येत चाललें आहे तर सत्तास्पर्धामुळें तें फाटत चाललें आहे. हे दोन्ही ताण आपण समजून न घेतां चाललों तर आपला व्यवहार एकांगीं झाल्यावांचून कसा राहील ? ज्या देशामधील जनतेला ते ताण समजतील तोच देश ह्या ताणांपैकीं कोणत्या ताणाच्या बाजूनें कोणत्या वेळीं आपलें बळ टाकावयाचें याचा योग्य निर्णय घेऊं शकेल.

अल्जेरिया, न्यासालँड, हंगेरी येथें जें घडलें व तिबेटांत जें घडत आहे त्यामुळें एक मूलभूत प्रश्न उत्पन्न होत आहे तो असा कीं औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या किंवा लहान असणाऱ्या देशांना गुलामगिरींच्या जोखडाखालीं मान तुकवण्यावांचून दुसरी गतीच नाहीं कीं काय ? हंगेरी वा तिबेटमध्यें ज्या रशियन वा चिनी फौजा गेल्या त्या म्हणे मुक्ति फौजा ! कोणाची मुक्ति ! कोणापासून ? आणि ती करणारे हे कोण ? आफ्रिकेचें वाटप करून घेणारे युरोपियन साम्राज्यवादी जगाला आजवर हेंच सांगत आलें कीं आम्ही आफ्रिकेंत गेलों नसतों तर या देशांतील संपत्ति उजेडांत आली नसती, रोगराई हटली नसती, नरमांस भक्षण चालूं राहिलें असतें आणि स्त्रीपुरुषाचा नागडेपणा कायम राहिला असता. पोर्तुगीज गोव्यांत उतरले तेंव्हांपासून आम्ही हीच कैफियत ऐकत आहोंत नव्हे काय ? मग गोव्यांतील मशिदी व देवळें उध्वस्त करणाऱ्या, असंख्य स्त्रीपुरुषांना इन्किझिशनद्वारा ठार करणाऱ्या पण त्याजबरोबर आम्हांला कंदील, घड्याळ बंदुकीची दारु व मुद्रणकला देणाऱ्या इग्नेशस लायोलाच्या जेसुइटांत व तिबेटी लोकांचे बुद्धमठ धुळीस मिळवून, चिनी फौजांना विरोध करणाऱ्या खंपा-आमदोना कंठस्नान घालून तेथें नवी संस्कृति फुलवण्याचा दावा करणाऱ्या माओच्या कम्युनिस्टांत फरक कोणता ? मागासलेल्या देशांचा उद्धार करण्याची ही पद्धति जर योग्य असेल तर चिनी कम्युनिस्टांनीं किंवा भारतीयांनीं आणखी दक्षिणेकडे वा आणखी उत्तरेकडे सरकून नेपाळ, भूतान, सिकिम इत्यादि प्रदेश " मुक्त " कां करूं नयेत ? नाहीं; ह्या विसाव्या शतकांत, चंद्रसूर्याला वाकुल्या दाखवण्यापर्यंत आमचें विज्ञान प्रगत झालेल्या ह्या कालांत, मागासलेल्या प्रदेशांची प्रगति साधण्याचे, मुक्ति सेना पाठवण्याहून कांहीं तरी वेगळे मार्ग काढण्याची जबाबदारी तथाकथित प्रगत देशावर खासच येऊन पडते एकीकडे फांशीची शिक्षा रद्द करा म्हणत असतांना दुसरीकडे सबंध देशचे देश त्यांच्या मागासलेपणाच्या

गुन्ह्याबद्दल (!) फांशी जात आहेत त्याची आपण पर्वा करूं नये काय? कीं महत्वाचा प्रश्न फक्त फासाचा दोर इंग्लंड–फ्रान्समध्यें बनवलेला होता कीं रशिया–चीन मध्यें एवढाच आहे? ज्यांना पाश्चात्य वसाहतवाद्याविषयीं घृणा वाटते, अमेरिकेबद्दल तर विशेषच घृणा वाटते, त्यांच्या हें कसें लक्षांत येत नाहीं कीं कम्युनिस्टांकडूनहि जर ह्या वसाहतवादी वृत्तीचाच व्यवहार करण्यांत आला तर सोव्हिएट गट व अमेरिकन गट अशी जगाची वाटणी अधिक झपाट्यानें होईल. तिबेटांतील घडामोडी पाहिल्यावर उद्या जर नेपाळ, भूतान ब्रह्मदेश, कांबोडिया, इंडोनेशिया हे आग्नेय देश व इराण, इजिप्त आदि पश्चिम आशियाई देश अधिकाधिक प्रमाणांत अमेरिकेकडे वळूं लागले तर भारत त्यांना कोणत्या प्रकारें परावृत्त करूं शकेल? डल्लेस आपल्या अधिकारावरून निवृत्त झाला खरा पण त्याचें कार्य चौ-एन्-लाय उत्तम प्रकारें करीत आहे असेच मग म्हटलें पाहिजे. कारण एका बाजूनें पाश्चात्य राष्ट्रें आणि दुसऱ्या बाजूनें कम्युनिस्ट राष्ट्रें जितक्या झपाट्यानें तटस्थ जगाचा विस्तार गुंडाळीत नेतील तितक्या लवकर जगाची राखरांगोळी करणारें युद्ध जगावर कोसळणार आहे. याचाच अर्थ असा कीं कोणत्याहि गटांत नसलेल्या देशांची संख्या जितकी वाढत जाईल तितकें जगाच्या दृष्टीनें भलें ठरणार आहे मग त्या राष्ट्रगटाला तुम्ही तिसरा मार्ग म्हणा, तटस्थ गट म्हणा. आम्ही ह्या तिसऱ्या शक्तीचे वा मार्गाचे पुरस्कर्ते आहोंत.

भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीनेंहि तिबेटमधील घडामोडींना महत्त्व आहे. काश्मीर हा भारताचा भाग आहे हें चीननें मान्य केल्याचा अधिकृत उल्लेख कोठेंहि मिळत नाहीं; भारताच्या हिमालयीन टापूपैकीं कांहीं भाग चीनच्या नकाशांत चीनचे म्हणून दाखवले जातात व तसा नकाशा नुकत्याच कलकत्ता येथें भरलेल्या आफ्रो–एशियन परिषदेच्या वेळींहि प्रदर्शनांत मांडण्यांत आलेला होता. यंदाच्या चीनच्या अर्थसंकल्पांत संरक्षणासाठीं अधिक रक्कम खर्ची टाकण्यांत येणार आहे. भारताच्या संरक्षणाचा विचार करतांना केवळ पाकिस्तानचा विचार करून भागणार नाहीं, हें यावरून उघड होतें. दोन राष्ट्रांतील आंतरराष्ट्रीय संबंध हे त्यांच्यामधील तुलनात्मक सामर्थ्याचें फलित होय असें मानणारींच पाकिस्तान व चीन हीं राष्ट्रें आहेत. म्हणून पाकिस्तान हिंदुस्तानचा विचार करतांना आम्हांला आमच्या सीमांवर बेरुवारी अथवा तुकेर-

ग्रामसारखे प्रकार पुनरपि होणार नाहींत याची जशी काळजी घेतली पाहिजे त्याचप्रमाणें चीन भारताच्या सरहद्दीचा विचार करतांना लडाख आदिकरून हिमालय–टापूची चांगली बंदिस्ती ठेवून नेपाळ व भूतान हीं राष्ट्रें भारताशीं अधिक संलग्न कशीं होतील त्याचाहि विचार व्हावयास पाहिजे. आपली ढोल तयार करतांना झाडाची साल मऊ कोठें आहे तें हेरून तेथेंच सुतार-पक्षी आपली चोंच खुपशीत असतो. हिमालयीन टापूतले सर्व कच्चे दुवे मजबूत करणें ह्या दृष्टीनें महत्त्वाचें ठरतें. ह्या सर्व भागांत चांगले रस्ते बांधणें, लहान-मोठे उद्योग सुरू करणें, जनतेच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवणें, औषध-पाण्याची व्यवस्था करणें या आद्य महत्त्वाच्या बाबी गणल्या जाव्यात आणि त्यांच्याकडे केंद्र सरकारनें तांतडीनें लक्ष पुरवावें. हिमालय हें यापुढें ध्यान-धारणा करण्याचें तपोवन राहणार नसून ती एक जागती सरहद्द होणार आहे, याची वेळींच दखल घेतलेली बरी.

पण कोणत्याहि देशाचें खरें संरक्षण केवळ सैन्याच्या बळावर होत नसतें. तेथील जनतेमध्यें कस कितपत आहे त्यावर तें अवलंबून राहतें. देशामधील उद्योगधंदे किती प्रमाणांत वाढले, त्यांतल्या त्यांत मूलभूत उद्योगधंद्यांची वाढ कितपत झाली, अन्नधान्याचा प्रश्न देशानें किती प्रमाणांत सोडवला, देशांतील एकंदर उत्पन्नाचा किती भाग विकास कामाकडे खर्च होत आहे, देशांतील लोकसंख्येची वाढ आणि देशांतील उत्पादनाची वाढ यांचा कांहीं आशादायक मेळ बसत आहे काय? म्हणजे देशांत जें तयार होतें तें सगळेंच्या सगळें तेथील जनता वापरून फस्त करतें कीं त्यांतला बराचसा अंश राखून ठेवून तो पूर्वींच्या भांडवलांत भर म्हणून टाकीत जाते? अंतर्गत कलहांत, खेंचाताणींत, उधळमाधळींत किती शक्ति जळून जाते? उत्पादनाचीं नवीं साधनें वापरून तें वाढवण्याची प्रवृत्ति किती आणि पूर्वा-पार चालत आलें त्यालाच चिकटून बसण्याचा हट्ट किती? या व अशा अनेक प्रश्नांच्या उत्तरावरून देशाचें सत्य सामर्थ्य अजमावतां येतें. या प्रश्नांचीं उत्तरें पाहिलीं तर आपल्या देशाची विकासाची गति समाधाकारक नाहीं, ती बऱ्याच प्रमाणांत वाढवणें अवश्य आहे, हें मान्य करावें लागेल.

हुकुमशाही देशांत ह्या गोष्टी सुलभतेनें करतां येतात त्याचें मुख्य कारण असें कीं तेथें सरकारी आवाजाव्यतिरिक्त दुसरा आवाजच ऐकूं येत नाहीं.

तिबेटांत लक्षावधि चिनी स्त्री पुरुषांना वसाहतीसाठीं पाठविण्याचा निर्णय सरकारनें घेतला कीं तेथें होय नाहीं म्हणण्याची कोणाचीं हिंमत असत नाहीं. आपलें बिऱ्हाड बाजलें उचलून लोक सरकार दाखवील त्या वाटेनें चालूं लागतात. याच्या उलट आमच्याकडे निर्वासितांसाठीं संबंध दंडकारण्य तयार केलें तरी त्यांची समजूत घालण्यांतच वर्षेंच्या वर्षें निघून जातात. आमच्या तृतीय पंचवार्षिक योजनेची सगळी भिस्त देशांतील अन्नोत्पादन किती वाढतें ह्यावर आहे हें सगळ्यांना मान्य आहे. पण तलाव बांधले तर पाणी घेण्याची पात्रता नाहीं किंवा तयारी नाहीं; नव्या लागवडीच्या पद्धतीबद्दल उत्सुकता नाहीं; उत्पादक व ग्राहक यांच्यामधला जो दलाल तो कृत्रिम टंचाई करून किंवा भाव पाडून एकदां ग्राहकांच्या तर एकदा उत्पादकाच्या पोटांत लाथ मारण्यास मागें पुढें पाहात नाहीं; सहकारी शेतीचे प्रयोग, सहकारी साहाय्य केंद्रें चालवून शेती सुधारा म्हणावें तर शिकलेलें मनुष्यबळ हाताशीं नाहीं, अशा अनेक अडचणी येतात. तृतीय पंचवार्षिक योजना नऊ हजार कोटीची करावी की दहा याबद्दल वादविवाद होत असले तरी १९६७ सालापर्यंतची लोकसंख्येची वाढ लक्षांत घेतां आहे ही स्थिति सांभाळावयाची असली तरी देखील ५००० कोटीहून लहान योजना शक्य होणार नाहीं हें सर्वच मान्य करीत आहेत आणि लहान योजना आखली म्हणून तरी तिला लागणारें सर्व भांडवल परदेशांतून कां येणार आहे? देशातील जनतेला त्यांतला बराचसा भाग उचलावा लागेलच कोणत्याहि पक्षाचें सरकार दिल्लीला स्थापन झालें तरी ह्या जबाबदारीमधून त्याला सुटतां येणार नाहीं. देशांतील प्रजोत्पादनाचा वेग इतका प्रचंड आहे कीं त्याच्या लोंढ्यांत सर्व योजना वाहून जातील असें कांहींचें आपणास सांगणें आहे तिकडेहि दुर्लक्ष होता कामा नये. अशा परिस्थितींत सत्तारूढ पक्ष आणि विरोधी पक्ष यांचे संबंध कसे असावेत हा फार मूलभूत प्रश्न उत्पन्न होतो.

या बाबतींत बुद्धिपुर:सर गैरसमज करून घेण्यांत येणार नसेल तर असें म्हणतां येईल कीं लोकशाहींत प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वावर सत्तारूढ पक्ष व विरोधी पक्ष यांचेसंबंध आधारलेले असावेत. लोकमान्य टिळकांनीं या शब्दाचा प्रयोग फार वेगळ्या परिस्थितींत केलेला होता याची जाणीव मला आहे. येथें जो संबंध अभिप्रेत आहे त्यांत पक्ष मोडून सत्तारूढ पक्षाशीं

एकरूप होण्याच्या कल्पनेला थारा नाहीं. येथें जें अभिप्रेत आहे तें असें व एवढेंच कीं सहकारी शेतीच्या, लहान धंदे वाढीच्या, ग्रामपंचायती बळकट करण्याच्या वगैरे ज्या अनेकानेक योजना सरकातर्फे मांडल्या जात आहेत त्या विरोधी पक्षांनींहि पुरेपूर राबवाव्यांत. त्यांतूनच त्यांना नवे संबंध जोंडतां येतील, जनतेचा पैसा जनतेकडे परत पोहोंचवतां येईल आणि जनतेच्या वाढल्या बळांतून आपलें बळहि वाढवतां येईल. हें करतांना जेथें सामाजिक अन्याय व पक्षपात होत असेल, दिरंगाई होत असेल, लाचलुचपत वा वाशिलेबाजी होत असेल तेथें सरकारशीं लढावें पण विरोध करावयाचा तर जळीं स्थळीं विरोधच करा आणि सहकार्य करावयाचें तर आपापलीं बिऱ्हाडें मोडा असल्या एकांतिक भूमिकेवर काम करणें श्रेयस्कर ठरणार नाहीं.

नवे बोजे लादण्यापूर्वी हाताशीं असणाऱ्या सामग्रीचा सरकार अधिकांत अधिक उपयोग करून घेत आहे काय तेंहि पाहिलें पाहिजे. महाराष्ट्रांतलें उदाहरण द्यावयाचें तर कापड गिरण्यांचें देतां येईल. नागपूरपासून सोलापूर पर्यंत अनेक कापड गिरण्या या घटकेला बंद पडलेल्या आहेत आणि हजारो कसबी कामगारांवर आज रस्तोरस्तीं भटकण्याची पाळी आलेली आहे. राष्ट्रांतील द्रव्यबळाचा व मनुष्यबळाचा हा केवढा अपव्यय आहे बरे? आज ह्या गिरण्यांच्या चालकांनीं जमवलेलें भांडवलच तेवढें उधळलें नसून त्यांनीं सरकारकडून व बँकांकडून घेतललीं कर्जें आणि कामगारांच्या प्राव्हिडंट फंडाच्या रकमांचीहि विल्हेवाट लावली आहे ह्या गिरण्यामधील कांहीं यंत्रसामग्री बाद झालेली असेल असें मानलें तरी लाखो वार कापड उत्पादन करण्याची व हजारो कामगारांना पोसण्याची ताकद अजूनहि त्या यंत्रांत आहे. खाजगी मालकी हक्काचा बागुलबोवा जर ह्या गिरण्यांची व्यवस्था लावण्याच्या मार्गांत येत असेल तर शक्य तितक्या लवकर तो दूर सारला जावयास हवा.

छोटे मोठे उद्योगधंदे व शेती ह्या मुद्यावर महाराष्ट्रातर्फे असा आग्रह धरण्यांत यावा कीं, कोयनेची वीज मुंबईस पुरवून तेथील खुराड्यांत भर घालण्यासाठीं ती वापरण्याऐवजीं महाराष्ट्रभर लहान मोठ्या उद्योगधंद्याचें जाळें विणण्यासाठीं तिचा वापर करण्यांत यावा. कोल्हापूर, सांगली सातारा, रत्नागिरी आदिकरून दक्षिण व पश्चिम महाराष्ट्राच्या जिल्ह्यांतून अल्युमिनियम,

खतें, कागद, सोडा ॲश, अशा अनेक पदार्थांच्या उत्पादनाची व्यवस्था व्हावयास हवी. कारण तशी व्यवस्था होण्याजोगीं साधनें तेथें उपलब्ध आहेत. विदर्भांत मँगनीझ आणि लोखंड याचे विपुल सांठे आहेत. त्यांच्या शुद्धीकरणाचे कारखाने तेथें निघावयास हवेत. मराठवाडा आणि नागविदर्भ यांच्या प्रगतिसाठीं पूर्णा तापी वगैरे नद्यावरील फलदायी धरणयोजनाविषयीं आग्रह धरावयास हवा. महाराष्ट्रांतल्या साखरकारखान्याकडे खंडानें असलेल्या हजारो एकर जमिनी सहकारी तत्त्वावर कसण्याची व त्यांतून उसाचें एकरी उत्पादन कायम ठेवण्याची हमी शेतकरी देत असतील तर शेत मालकांना त्या परत करण्यांत याव्यांत. हे आणि असेच दुसरे अनेक प्रश्न महाराष्ट्रांत आहेत कीं, ज्या बाबतींत राजसत्तेवर दडपण आणावें लागेल आणि त्याचबरोबर जनतेचें मानस योग्य दिशेनें प्रगत होणाऱ्या विधायक कार्यासाठीं तयारहि करावें लागेल. भारतामध्यें या पुढील काळ पुनर्रचनेचा काळ ठरणार आहे, हें जर खरें तर त्या क्षेत्रांतच पक्षोपपक्षांत स्पर्धा होणें अपरिहार्य दिसतें आणि त्या स्पर्धेत जास्तींत जास्त जनहित जो करून दाखवील, जनतेला अधिकांत अधिक मार्गदर्शन पुरवील त्याची शक्ति वाढत जाणेंहि क्रमप्राप्त ठरतें. तात्पर्य आंदोलनात्मक कार्याइतकेंच लक्ष आमच्या कार्यकर्त्यांनीं विकास योजना औद्योगिक वसाहती, सधन योजना, पाटबंधारे, अधिक धान्योत्पादन, संतति नियमन इत्यादि बाबीकडे पुरवलें पाहिजे. केवळ रशिया, चीन किंवा अमेरिका एवढेच देश जगांत नसून आपल्याला आपला पुरुषार्थ वाढवण्याच्या कामीं गुरु करतां येतील असे जपान, नॉर्वे–स्वीडन, पश्चिम जर्मनी, इझराएल इत्यादि अनेक छोटे पण गुणाढ्य देश जगांत आहेत याची जाणीव आपणास असावी. सनातन भांडवलशाही वा कम्युनिस्ट सर्वाधिकारशाही यांना बांधून न घेतां त्यांनीं आपली आश्चर्यजनक प्रगति साधलेली आहे हें विशेष.

महाराष्ट्रांमध्यें सध्या जें वादळ चालू आहे त्याबद्दल चार शब्द बोलणें उचित होईल. समितीचा एक पक्ष बनवावा असा आग्रह ज्यांना तसें वाटतें त्यांना धरण्याचा अधिकार आहे. आपलें प्रतिपादन करतांना या एकपक्षवाद्यांकडून विरुद्ध मताच्या पण समितींत निष्ठेनें काम करणाऱ्या अन्य पक्षीय कार्यकर्त्यांवर कठोर, निरर्गल प्रहार करण्यांत येतात अशी तक्रार करण्यांत कांहीं अर्थ आहे असें मला वाटत नाहीं. कारण समितीच्या मताविरुद्ध ज्यांनीं

ज्यांनीं मत प्रतिपादन केलें त्यांना मराठाकार नागडें उघडें करीत असतांना जर आम्ही टाळ्या पिटल्या होत्या, तर आतां त्यांनीं आमचें धोतर हिसकवण्यास सुरुवात करतांच आम्हांला तक्रार करण्यास अधिकार काय ? गेल्या कांहीं वर्षांत राज्यकर्त्यांबरोबरचा आमचा विरोध आम्हीं योग्य तेवढ्या क्षेत्रांत मर्यादित करूं शकलों नाहीं, हें सत्य आहे. समितीच्या समुद्र-मंथनामधून शून्यवादाचें ( nihilism ) अथवा मूर्तिभंजनवादाचें हालाहल निर्माण होतांना स्पष्ट दिसत आहे. हें विष पचवणारा कोणी नीलकंठ उत्पन्न झाला नाहीं तर आतापर्यंतच्या मंथनांतून निघालेल्या चौदा रत्नासकट महाराष्ट्राच्या सर्वच नाश होणें अशक्य नाहीं. इतरांना भक्षण करून झालें, आतां आत्मभक्षण सुरू आहे. त्याची गति संथ करण्याचा मार्ग इतकाच दिसतो कीं, अरे ला कारे न म्हणतां आपण आपली भूमिका स्पष्टपणें पण संयमानें मांडीत जावें आणि सत्तारूढ पक्षाशी व समितींतल्या विरोधकांशीं दोन हात करतांना देखील सभ्यता व संयम न सोडतां ( त्यांनीं सोडला तरी ) कसें बोलतां, लिहितां व लढतां येतें तें आचरणानें दाखवावें.

प्रजा सोशॅलिस्ट पार्टीतर्फे महाराष्ट्रांत कार्य करणारे आम्ही गेलीं पंचवीस वर्षें कांहीं निष्ठा उराशीं बाळगून कार्य करीत आहोंत हें मात्र आमच्या टीकाकार मित्रांनीं ध्यानीं ठेवावें. आमच्यामधील कांहीं जणांना आमदारक्या व खासदारक्या मिळाल्या त्या १९५७मध्यें.त्यापूर्वीं आम्ही कोणी आमदार वा खासदार नव्हतों. जे होते त्यांनीं देखील १९४८ मध्यें पक्ष कॉंग्रेसपासून वेगळा होतांच आपापल्या खुर्च्या सोडल्या होत्या. पक्ष मोडा नाहींतर समितीमुळें मिळालेल्या खुर्च्या सोडा असाच विकल्प आमच्यासमोर समिति ठेवणार असेल तर आम्ही खुर्च्या सोडूं, पण पक्ष मोडणार नाहीं हें स्वच्छ सांगून टाकलेलें बरें. आमच्या निष्ठा आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि प्रांतीय अशा आहेत. इतर पक्षांत म्हणजे शेतकरी कामगार, रिपब्लिकन, कम्युनिस्ट, लाल निशाण आदि करून पक्षांतर्फे काम करणारे जे खंदे कार्यकर्ते आहेत त्यांच्याहि अशाच जाज्वल्य निष्ठा असणार यांत शंका नाहीं. त्यांनींहि ज्या अर्थीं पक्ष मोडणें आपणांस शक्य नाहीं असें सांगितलेलें आहे त्या अर्थीं पक्ष सोडा अथवा खुर्ची सोडा असा विकल्प आल्यास मीं सांगितलेली भूमिकाच तेहि घेतील

असें दिसतें. तेव्हां प्रश्न उरतो तो असा कीं, वेगवेगळ्या पक्षांचे कार्यकर्ते दूर सरले तर समितीचें जें काय बाकी उरेल तें विशेष दरारा निर्माण करील काय ?

पण खरोखरी असा प्रसंग ओढवून आणण्याची कांहीं जरुरी आहे काय ? मराठाकार, प्रभातकार, प्रबोधनकार यांना व त्यांच्या चाहत्यांना आम्ही एवढीच विनंति करूं कीं चांगला कारागीर आपल्या हत्यारावर कधींच रागावत नाहीं, हें त्यांनीं प्रथम ध्यानीं ठेवावें. सुईनें शिवतां येईल, लांकडें फोडतां येणार नाहींत. घणानें दगडांचा चूर करतां येईल, मूर्ति घडवतां येणार नाहीं. तेव्हां समितीचें हें हत्यार कसें आहे, त्याच्या मर्यादा कोणत्या त्या ओळखून तें राबवलें तर तें कारीगर होईल, कदाचित् अपेक्षेहून थोडें अधिकच काम करील. पण त्याच्याकरवीं त्याच्या कक्षेपलीकडील कामाची अपेक्षा धरली तर तें मोडून पडेल. येथें परस्परांना शब्दांच्या कैचींत पकडून कांहीं साधणार नाहीं. कोणत्याहि यंत्राच्या धातुक्षीणतेची ( मेटल फटिग ) रेषा कोणती तें सुज्ञ यंत्रज्ञ ओळखतो व त्या बेतानें तो तें राबवतो; न हून तें यंत्र कोलमडून पडतें.

महाराष्ट्रांतल्या वेगवेगळ्या पक्षांतील कार्यकर्त्यांनीं तशीच परिस्थिति आली तेव्हां केंद्र कचेऱ्यांशींहि विरोध दर्शविला नाहीं काय ! पण म्हणून आम्ही आपलें पक्ष सोडूं कीं काय ? नवऱ्याला सुद्धां वेळ प्रसंगीं खडसावण्यास कमी न करणाऱ्या बाईला "मग काडीमोडच करा ना," असा सल्ला देणाऱ्या वकिलाच्या अकलेची तारीफ करावी तेवढी थोडीच ! आतां इष्ट-मित्र, गण-गोत, निष्ठा-तत्त्वें ही सर्वच 'बेघडी मौज' मानणारे जे कोणी महाभाग असतील त्यांच्याशीं एवढ्या गंभीर भावनांची चर्चा करून तरी फायदा कोणता ? म्हणून माझ्या मतें उत्तम मार्ग हा कीं कोणी पक्ष मोडणार किंवा सोडणार नाहींत ( आणि डावपेंच म्हणून कोणी सोडले तरी ते अंतःस्थपणें आपापले गोट बांधूनच राहतील ) ही सिद्ध गोष्ट मानून ही काथ्याकुटणी बंद करावी. ह्या धुळवडी-पासून कांहीं भलें निष्पन्न होईल अशीं लक्षणें दिसत नाहींत.

संयुक्त महाराष्ट्राची समस्या आम्हांला सोडवावयाची आहे तेव्हां महाराष्ट्रांत सवत्या पक्षसंघटना बंद करून त्यांचा एक पक्ष करावा असा आग्रह धर-णाऱ्यांनीं हेंहि ध्यानीं घ्यावें कीं, अखिल भारतापुढील समस्या सोडवण्याच्या

कामीं प्रस्तुतची पक्ष-पद्धति व शासन-व्यवस्था कुचकामी ठरलेली आहे म्हणून हा साराच खेळ बंद करून सगळ्यांनीं मिळून काम करावें असें मत आग्रह-पूर्वक मांडणारेहि आहेत. अशामध्यें त्यागी व थोर देशसेवकांची गणना आहे. त्यांचें म्हणणेंहि आम्हीं मान्य केलेलें नाहीं. मग जी घटना अखिल भारतीय पातळीवर आम्ही अमान्य करतों ती आम्हीं राज्यपातळीवर मान्य केली तर तें कितपत सुसंगत ठरेल ? आमच्या महाराष्ट्राच्या मागणीसाठीं इतर प्रांतीयांनीं काय केलें आहे, असाहि सूर अनेकवार उमटतांना दिसतो. या विचारसरणीला तरी किती महत्त्व द्यावयाचें तें ठरविलें पाहिजे. उद्या बंगाल जर म्हणूं लागला कीं, आमची बेरूबारीजवळची भूमि गेली त्याबद्दल इतर प्रांतांनीं काय केलें? आसामनें जर असें गाऱ्हाणें मांडले कीं, आमच्या सीमेवर नित्य धाडी पडतात त्याबद्दल इतर प्रांत फारसें बोलतांना दिसत नाहींत, हें कसें ? तर त्याला उत्तर एवढेंच कीं, ज्या त्या प्रांतांचीं दुःखें ज्याचीं त्यानेंच मुख्यत्वें करून साहिलीं पाहिजेत. इतर प्रांत प्रायशः सहानुभूति दाखवतील, क्वचित् सभा घेतील, ठराव करतील विशेष प्रसंगीं थोडेंफार आर्थिक साहाय्य करतील किंवा संसदेंत ठराव आला तर तुमच्या बाजूनें मतें देतील; याहून अधिक साहाय्य मिळालें नाहीं म्हणून आपण गांगरण्याचें कारण नाहीं. अथवा आपण वेगळेपणाची भावना उगाळीत बसणेंहि ठीक नाहीं.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या निमित्तानें मराठी प्रदेशावरून जो महा-पूर येऊन गेला त्याचा उपयोग सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीनें जितका करून घ्यावयास हवा होता तितका आपण करून घेऊं शकलों नाहीं ही गोष्ट नाकबूल कशी करतां येईल ? चळवळीच्या ऐन भरांत पूर्वींच्या अस्पृश्य समाजांतील उमेदवारांना सर्वसाधारण जागांवर निवडून आणून मराठी जनतेनें एक अवघड राजकीय कोंडी फोडून दाखवली. पण सार्वत्रिक निवडणुकीनंतर आपण लहानमोठ्या निवडणुकांत असें कांहीं गुरफटून गेलों कीं, सामाजिक परिवर्तनाचें कार्य तसेंच पडून राहिलें. वस्तुतः महाराष्ट्रांत जी अपूर्व जागृति व्यक्त झाली होती तिच्या आश्रयानें येथील सामाजिक परिषदेच्या कार्यालाहि खूप चालना मिळावयास हवी होती. पण तसें कांहींच झालें नाहीं. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीनेंहि ठोस काम झालें नाहीं. महाराष्ट्र चेंबर व मराठा चेंबरच्या विद्यमाने महाराष्ट्राच्या विकासाविषयीं एक विस्तृत आराखडा

तयार करण्यांत आला. पण त्याचा राजकीय पाठपुरावा करण्याचें कोणी मनावर घेतलें असें दिसत नाहीं.

गेल्या दोन तीन वर्षांत महाराष्ट्राचें सामाजिक स्वरूप पार बदलून टाकील अशी जी गोष्ट घडली ती म्हणजे महार बंधुभगिनींनीं केलेला बौद्ध धर्माचा सामुदायिक स्वीकार. शेकडों वर्षें चालत आलेले हिंदुसमाजाबरोबरचे संबंध दलित-वर्गीयांनीं एका घावासरशीं तोडून टाकले. ज्या धर्मानें त्यांना पायपुसणें बनवून ठेवलें होतें तो धर्मच त्यांनीं भिरकावून दिला आणि आपखुशीनें नवा धर्म स्वीकारला. त्यामुळें त्यांच्यांत केवळ नवी अस्मिताच उत्पन्न झाली नसून जगांत त्यांना आतां नवे सगेसोयरे निर्माण झालेले आहेत. हिंदुधर्माचे ते इतःपर पाल्य राहिले नसून बौद्ध धर्माचे ते पालक बनले आहेत. ह्या नव्या अस्मितेला आणि बौद्धधर्मांतर्गत करुणावादाला धरून आमचे बौद्ध मित्र भारतीय राजकारणाकडे पाहातील व आपल्या संख्येला आणि संघटनेला शोभेशी भूमिका वठवतील असा विश्वास वाटतो.

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५५२७ वि: निबंध
क्रमांक ........ नों दि: १७-८-१९

# नवा महाराष्ट्रधर्म *

महाराष्ट्रधर्म हा शब्द रामदासस्वामींनीं कोणत्या अर्थीं वापरला होता आणि तदनंतरच्या काळांत त्या शब्दाचा वापर करणाऱ्यांच्या मनांत नेमका कोणता अर्थ अभिप्रेत होता तें कळण्यास मार्ग नाहीं. कांहीं विद्वानांचें म्हणणें असें आहे कीं हिंदु धर्म या अर्थींच तो शब्द वापरला जाई, तर कांहींचें म्हणणें असें कीं, त्या शब्दांतील आशय अधिक व्यापक अथवा खोल होता. आपणांला ह्या वादांत शिरण्याचें कारण नाहीं. विसाव्या शतकांत नांदणाऱ्या मराठी माणसांची जीवनदृष्टि अथवा जीवननिष्ठा कोणती असावी तें स्थूलमानानें दर्शविणारा शब्द या अर्थीं मी महाराष्ट्रधर्म हा शब्द ह्या लेखांत वापरीत आहे.

१ मे १९६० पासून ‘ महाराष्ट्र ’ हें राज्य उदयास येणार असल्यामुळें आणि ह्या नवजात राज्याची प्रगति कशी होणार त्याविषयीं परप्रांतीय लोकांत साहजिकच कुतूहल असल्यामुळें तर मराठी माणसांनीं आपल्या जीवननिष्ठेचा विचार गंभीरपणानें करणें आवश्यक होऊन बसलेलें आहे.

मराठी माणसांच्या विषयीं परप्रांतीय लोकांत कोणत्या भावना वसत आहेत त्यांचा तपास केला तर त्या संमिश्र स्वरूपाच्या आहेत असें म्हणावें लागेल. परप्रांतीय लोकांसंबंधीं आपली दृष्टि तरी कोठें उदारतेची असते ? गुजराती म्हणजे भित्रा, मारवाडी म्हणजे कंजूष, कानडी म्हणजे भांडखोर, पंजाबी म्हणजे मठ्ठ असले रबरी शिक्के आपल्यापाशीं कांहीं थोडेथोडके नाहींत. तेव्हां मराठी लोकांच्या बाबतींतहि इतरांनीं असलेच रबरी शिक्के कां वापरूं नयेत ?

तथापि आपल्या सुदैवानें गेल्या तीन चार शतकांत सर्व भारताचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतील अशा सच्चरित्र, कर्तृत्ववान् पुरुषांची अखंड पंक्ति महाराष्ट्रांत निर्माण झाल्याकारणाने मराठी माणसाविषयीं कांहीं चांगले समजहि सर्वत्र निर्माण झालेले आढळतात. मराठी मनुष्य शूर असतो खाबू नसतो, विद्याप्रेमी असतो भंपक नसतो, इत्याहि इत्यादि. इतरांनीं आपल्याला जे

---

* किर्लोस्कर, मे १९६०

गुण चिकटवले ते सर्व खरोखरच आपल्या अंगीं आहेत असा भ्रमहि आपल्यापैकीं अनेकांना झालेला दिसतो. तेव्हां परप्रांतांत आपल्याविषयीं जे चांगले अथवा वाईट ग्रह आढळून येतात त्यांची वजाबाकी आपण करून टाकावी आणि आपल्याला जें काय व्हावयाचें आहे व करावयाचें आहे तें ठरवून त्याप्रमाणें प्रयत्नाला लागावें हा मार्ग मला तरी श्रेयस्कर वाटतो.

पहिली गोष्ट मराठी माणसानें करावी ती अशी कीं, महाराष्ट्र निर्माण होतांना त्यांत ज्या उणीवा राहून गेलेल्या आहेत त्या दुरुस्त करण्याचा यत्न जरूर करीत राहावें; पण त्यांच्यासाठीं खंत करीत, रडतकुढत राहूं नये. गुजरातला मोठी रक्कम द्यावी लागणार आहे, डांग गेला, खानदेशांतील १५० आणि उंबरगांवांतील ५० गांवें गमवावीं लागलीं, बेळगांवची कुचंबणा चालू आहे, ह्या नुकसानीच्या बाबी तर खऱ्याच. पण त्यामुळें खचून न जातां आलेल्या प्रदेशाचें ‘ आनंदभुवन ’ कसें बनवावें त्याचा विचार आणि आचार लगोलग सुरू व्हावा. गेल्या महायुद्धांत जर्मनीची, जपानची कोणत्या तऱ्हेची बेचिराखी झाली होती ती आठवावी आणि गेल्या पंधरा वर्षांत त्यांनीं आपला कायापालट कोणत्या दिव्यौषधीनें घडवून आणला त्याचा विचार करावा; म्हणजे मराठी लोकांनीं देखील खंत करण्याचें कारण नाहीं, हें मी कां म्हणत आहे तें ध्यानांत येईल.

आपला जो मुलूख परप्रांतात गेलेला आहे तो आपणांला कदाचित् परत मिळवतां येणार नाहीं; पण पैशाची तूट आपण सहज भरून काढूं. भंडाऱ्यापासून कोल्हापुरापर्यंत जो मराठी मुलूख पसरलेला आहे तो कांहीं लहान नाहीं. त्यांत उपजाऊ भूमीचें वैविध्य आहे, नागपूर, मुंबई, सोलापूर यांसारखीं औद्योगिक केंद्रें आहेत, बंदरें आहेत, जलविद्युत् भरपूर प्रमाणावर तयार करतां येण्याजोगीं साधनें आहेत, साडेतीन कोटि कणखर माणसांचें मोठें धन महाराष्ट्रापाशीं आहे. एवढें सगळें मनुष्यबळ नव्या स्फूर्तीनें व नव्या संकल्पानें जर कामावर जुटलें, तर पैशांची तूट तर भरून निघेलच, पण जे मराठी भाग महाराष्ट्रापासून वेगळे झालेले आहेत त्यांच्या मनांतील आपल्याकडे येण्याची ओढहि कायम राहील.

महाराष्ट्रांत जाति आहेत आणि त्यांच्यांतील दुजाभावहि तीव्र आहे; पण इतर प्रांतांतल्याप्रमाणें त्यांच्या गुणवत्तेमधील किंवा आर्थिक स्थितीमधील अंतर

फार मोठें नाहीं. शिवाय नव्या महाराष्ट्रांत मराठा ही जी सर्वांत मोठी जात, तिच्या हातीं जवळ जवळ सर्व राज्यकारभाराचीं सूत्रें जाणार असल्या-कारणानें तिच्या मनांत जी एक कटुतेची भावना सतत वसत होती तिचा उपशम होईल आणि महाराष्ट्रांतील ब्राह्मणांपासून बौद्धांपर्यंतच्या सर्व गटांमध्यें बुद्धि, व्यापार, राज्यकारभार यांच्या क्षेत्रांमध्यें निकोप स्पर्धा सुरू होईल अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं.

महाराष्ट्रीय लोक इतर राज्यांतील लोकांपेक्षां बुद्धीच्या क्षेत्रांत पुढें आहेत हा भ्रम जर आपण अजूनहि ठेवणार असूं, तर मात्र आपलें पाऊल पुढें पडण्याचें तर राहोच, उलट मागें पडत जाईल याविषयीं मला शंका नाहीं ! सरकारी वरिष्ठ नोकऱ्यांचे निकाल पाहिले किंवा स्थापत्य, रसायन, अर्थशास्त्र, कायदा, इतिहास-संशोधन इत्यादि शाखांच्या ज्या परिषदा भरत असतात त्यांमध्यें मराठी माणसांनीं कोठें किती चमक दाखवली त्याचा अंदाज घेतला, तर आपला भ्रमनिरास होण्यास अडचण पडूं नये. तात्पर्य, महाराष्ट्रांतील सर्व शाळांनीं आणि विद्यापीठांनीं असें जाणलें पाहिजे कीं, नव्या महाराष्ट्रीयांची पिढी तयार करण्याची जिम्मेदारी आपणांवर असून महाराष्ट्राच्या भावी उत्कर्षाचा इमला आपण घालूं त्या पायावर उभा राहणार आहे. ह्या जाणिवेनें म्हणजे एका दृष्टीनें जरा कठोर बनून त्यांनीं नव्या पिढींतले प्रशासक व शास्त्रज्ञ तयार करण्याच्या कामीं लागावयास हवें आहे. समाजाचें पुनरुत्थान शिक्षणापासून करणाऱ्या आधुनिक ज्योतिबांची, टिळक-आगरकरांची व भाऊराव पाटलांची आज जरुरी आहे.

गांधी-वधापासून किंबहुना महाराष्ट्रांत ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद सुरू झाला तेव्हांपासून असा जो एक सूर महाराष्ट्रांत अधूनमधून उमटत असतो, कीं ब्राह्मणांनीं राजकीय सत्तास्थानापासून किंवा राजकारणापासूनच दूर राहावें तो मात्र मला मुळींच पसंत नाहीं. ही जातिव्यवस्था दृढमूल करण्याचीच एक पद्धति आहे असें मला म्हणावेंसें वाटतें. महाराष्ट्रांतील सर्व समाज जर कधींकाळीं एकजिनसी व्हावयाचा असेल तर असले नवे वर्णभेद निर्माण करून तो कधींच होण्याची आशा करावयास नको ! उद्या जर कोणी असें म्हणूं लागेल कीं, नवबौद्धांनीं वा हरिजनांनीं कारखाने काढूं नयेत, वैश्यांनीं लष्करांत जाऊं नये किंवा मराठ्यांनी शिकवूं नये, तर त्याला कांहीं अर्थ आहे

काय ? उलट मी असें म्हणेन, सर्व व्यक्तींनीं आपापल्या मगदुराप्रमाणें व कलाप्रमाणें शिक्षण, अर्थकारण, उद्योगकारण आणि राजकारण करावें. मग त्यांची जात कोणतीहि असो. अशा स्पर्धायुक्त समाजांतच कर्तृत्वाला धार चढत असते आणि त्यांतून सर्वच समाज तेजःपुंज बनतो. एकेका जातीनें एक एक क्षेत्र संभाळावें असें म्हटलें कीं, समाजांत जडता आलीच. म्हणून प्रसंगोपात्त विरक्तीच्या पायीं कोणीं कांहीं म्हटलें तरी तें परमार्थानें घेऊन चालण्यासारखें नाहीं.

मराठी माणसांना आपली उन्नति करून घ्यावयाची असेल तर 'मी नेटका प्रपंच करीन' अशी ईर्षा त्यांनी मनांत बाळगण्यास शिकावें. भारताची ऐहिक प्रगति झपाट्यानें होत नाही याचें कारण असें की आपल्याकडील माणसें कोणत्याहि नीचांतल्या नीच पातळीवर जगण्यास तयार असतात. पुलाखाली, झाडाखाली, पालाखाली, ओलींत, उघड्यावर, कपडा असो नसो, अन्न असो नसो, आम्ही जगतों जुगतों आणि प्रजा वाढवतों ! मी भारतांत सर्वत्र असें पाहतों की जगण्यासाठी आमच्या अटी अशा कांही नसतातच ! ही 'बिनशर्त जगण्याची' किंवा केवळ जगणें हाच जणूं एक पुरुषार्थ असें मानण्याची वृत्ति महाराष्ट्रांतहि दिसून येते आणि ती महाराष्ट्रीयांनी त्याज्य मानली पाहिजे. मी व माझा परिवार चांगलें खाऊं, चांगलें लेऊं, चांगल्या घरांत राहूं, माझीं मुलें चांगलें शिक्षण मिळवतील, धष्टपुष्ट होतील अशी आपली महत्त्वाकांक्षा असली पाहिजे. देवापाशीं दही, दूध, गायी, धन, मुलें मागणाऱ्या वैदिक पूर्वजांना आपण हसण्याचें कांहीच कारण नाही.

दीनवाणें, दरिद्री, संस्कृतिशून्य जीवन जगण्यास ज्या वेळीं आमचें मन इन्कार करूं लागेल, त्याच वेळीं महाराष्ट्राच्या उत्कर्षाच्या बीजाला अंकुर फुटतील ! नाहीपेक्षा मालकाची जमीन खंडकऱ्याला दिली तर तींत तो दुप्पट पीक काढण्याऐवजी मण दोन मण कमीच पीक काढूं लागतो ह्याचें कारण काय ? मजुरी भरपूर सुरू केली तर आमच्याकडील कामगार महिन्या-काठीं २६ दिवसांच्या ऐवजीं २२ दिवसच काम करूं लागतो ह्याचा अर्थ काय ? आमचीं खेडीं, शहरें अशीं भकास व गलिच्छ कां दिसतात ? सुंदर-सुंदर इमारती, सार्वजनिक बागा, पोहण्याचे तलाव व पुष्करण्या यांचे लोक हं हां म्हणतां उकिरडे करून टाकतात याला काय म्हणावें ! तेव्हां 'मी

नेटकें, सुंदर व स्वच्छ जीवनच जगेन ' अशी ईर्षा मराठी माणसांनी बाळगावी आणि त्याचबरोबर हेंहि समजून असावें, कीं ज्या समाजाचा मी घटक आहें त्याची एकंदर संपत्ति वाढवल्यावांचून एकाच व्यक्तीला सुख लाभणार नाहीं व लाभलें तरी तें निश्चितपणें उपभोगतां येणार नाही.

'भाषावार प्रांतरचनेमुळें भारताच्या राजकारणांत विष कालवलें गेलें आहे' असें मीं मानीत नाहीं. महाराष्ट्रानें आपल्याला वेगळें राज्य हवें म्हणून आग्रह धरला हेंहि सर्वथैव अुचित झालें अशी माझी धारणा आहे. पण त्यासाठीं जो प्रचार करण्यांत आला त्यामुळें मराठी अभिरुचि बिघडली आणि राजकारणाकडे प्रांतीय नव्हे, तर राष्ट्रीय दृष्टिकोनांतून पाहण्याचा जो गेल्या दोन-तीनशें वर्षांचा वारसा आमच्याकडे आला होता तोहि नजरेआड झाला यांत शंका नाही. आतां महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून देशाचा विचार करण्याची प्रथा सुरू करण्यांत महाराष्ट्रानें पुनश्च पुढाकार घ्यावा. दिल्लीच्या लोकसभेंत बसलें की असें दिसतें, की रेल्वेचा प्रश्न निघाला की मराठी सभासद कोंकण रेल्वे मागतो, बंदराचा प्रश्न निघाला की ओरिसाचा प्रतिनिधि परादीपचें नांव घेतो, बंधाऱ्याची मागणी आली की बंगाली माणसाला फराक्कावांचून दुसरें नांव सुचत नाही, असें होअूं लागलें तर सर्व भारताचा विचार करावयाचा तरी कोणी ? कीं देशाच्या स्वातंत्र्यानंतरचें पुढचें पाऊल प्रांतिक स्वातंत्र्यांत पडणार आहे ? रानडे, टिळक, गणेश व्यंकटेश जोशी यांनी ज्या ज्या समस्यांचा विचार केला तो भारतीय दृष्टिकोनांतून. फराक्काचे धरण, नागार्जुनसागराची योजना, भाक्रा-नानगलचें धरण व राजस्थांतील कालवे, पोलादकारखान्यांची वाढ, अशांसारख्या प्रश्नांवर महाराष्ट्रांतील पहिल्या दर्जाचे राजकीय नेते कधी विचार करतांना आढळत नाहीत हें दुर्दैव नव्हे काय ?

अितके दिवस आम्हांला मराठीभाषिक राज्याचा ध्यास लागलेला होता हें ठीकच होतें. पण आता तें मिळाल्यानंतर आम्ही पुनरपि अखिल भारतीय समष्टींत मिसळून जाण्याचा जितका मनःपूर्वक प्रयत्न करूं तितका आमचा तोल सावरण्यास मदत होणार आहे. राष्ट्रहिताला अविरोधी अशा प्रकारें महाराष्ट्राचें हितसंवर्धन आणि महाराष्ट्राच्या अुत्कर्षाशीं सुसंगत अशी स्वार्थ-साधना ही नव्या महाराष्ट्रांतील व्यक्तिमात्राची जीवनदृष्टि राहावी.

◎ ◎ ◎

# नामदार श्री. यशवंतराव चव्हाण, यांसी—*

सा. न. वि. वि.

महाबळेश्वर येथें भरलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या शिबिरामध्यें समारोपादाखल आपण जें भाषण केलेंत तें या पत्राचा विषय आहे. आपल्या भाषणाची अधिकृत नक्कल माझ्यापाशीं नाहीं. पण ' लोकसत्ता ', ' विशाल–सह्याद्रि ' आणि ' सकाळ ' ह्या तीन वृत्तपत्रांत आपल्या भाषणाचीं जीं तीन वृत्तें प्रसिद्ध झालीं आहेत त्यावरून असें दिसतें कीं, त्यांनीं आपल्या भाषणाचा वृत्तांत देतांना आपल्या प्रतिपादनाचा विपर्यास केलेला नसावा. तेव्हां ह्या वृत्तपत्रांतील मजकूर मी विश्वासार्ह मानून चालतों आणि त्याच्या संदर्भांत कांहीं लिहावें म्हणतों.

निवडणुकीचे नारळ आतां फुटूं लागलेले आहेत. आपलें भाषणहि नारळफोडीचेंच भाषण असल्यामुळें आणि निवडणूक–प्रचारांत वक्रोक्ति, अत्युक्ति, परनिंदा व आत्मस्तुति या गोष्टी क्षम्य मानण्याचा प्रघात असल्यामुळें आपल्या भाषणाचा मुद्दाम परामर्ष घेण्याचें कारण नव्हतें. पण एक तर आपल्या भाषणांत आपण आमचे ज्येष्ठ नेते एस्. एम्. जोशी यांचा व माझा सखेद गौरवानें आणि आमच्याबरोबर ज्यांनीं गेलीं चौदा वर्षें खडतर काळ सोसला त्या आमच्या शेंकडों हजारों सहकाऱ्यांचा उद्दाम अधिक्षेपानें उल्लेख केलेला आढळतो. आपल्या ह्या भाषणांतील दुसरी लक्षणीय गोष्ट अशी कीं, ज्या आदिशक्तीचा उल्लेख समर्थांनीं श्रीरामवरदायिनी म्हणून केला आणि देशावर म्लेंच्छ सत्तेची पकड बसली असतां जिला त्यांनीं " परंतु रोकडे कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवी, " अशी रोखठोक विनंति केली तिची महापूजा बांधून व शिवरायांकडे साष्टांग प्रणिपातपूर्वक आशीर्वाद मागून जणूं कांहीं अफझुलखानासारख्या गनिमावर तुटून पडण्यासाठीं वाघनखें घेऊन आपण बाहेर पडत आहोंत अशा संचारित आवेशानें आपण बोललांत. " आपण राजे असतों तर माडगूळकरांच्या हातीं सोन्याचा तोडा घातला असता, " हे आपले उद्गार वाचून इतिहासवेत्त्यांना अगिनदास शाहीर व शिवबा यांची आठवण होईल आणि

---

* जनवाणी १९६१

आपल्या मनांतील संचाराविषयीं मीं जें वर लिहिलें तें त्यांना निराधार वाटणार नाहीं अशी आशा वाटते. खूप विचार करून हें भाषण करीत असल्याचा निर्वाळा आपणच दिलेला असल्याकारणानें त्यांतील सर्वच विधानें चिंत्य ठरावींत अशी आपली अपेक्षा असणार हें उघड आहे. श्री भवानीचा प्रसाद व शिवरायांचा आशीर्वाद यांनीं पावन झालेले, परत महाराष्ट्रधर्म जागविण्याचें ऐतिहासिक कार्य आपल्यावर येऊन पडलेलें आहे ह्या जाणिवेंतून उत्स्फूर्त झालेले व दीर्घ चिंतनानें पक्व झालेले विचार, ज्यामधून प्रतिज्ञापूर्वक व्यक्त करण्यांत येत आहेत आणि विरोधी पक्षांशीं वैचारिक पातळीवर झुंज घेऊन त्यांना परास्त करण्याची ईर्षा ज्यांत आपण प्रथमच व्यक्त केल्याचा अनुभव येत आहे त्या भाषणाचा विचार करण्याचें टाळणें केव्हांहि क्षम्य ठरणार नाहीं. आपल्या आव्हानाचा स्वीकार करावा आणि आपली इच्छा असेल तर लेखणीनें अथवा वाणीनें जनतेसमोर आमची बाजू मांडण्यास मी केव्हांहि तयार आहे हें आपणांस कळवावें या हेतूनेंच हें पत्र लिहिण्याचें ठरविलें आहे.

## ‘ दिगंबर ’ प्रचार

मात्र आपण करतां त्यांतले कांहीं डाव माझ्या शक्तीबाहेरचे आहेत हे अगोदरच कबूल केलें पाहिजे. उदाहरणार्थ, आपल्या भाषणाच्या आधीं श्री भवानीची महापूजा बांधण्याचा जो उपक्रम आपण केलात त्यानें माझ्यासारखा समाजवादी अगदीं स्तिमित होऊन जातो. कारण आपणांला मी आजपर्यंत समाजवादी मानवतावादी मानीत होतों. एके काळीं आपण, आपलाच शब्द वापरावयाचा तर ‘ आमच्या कळपांत ’ होतात. निवडणुकीचा नारळ फोडण्यापूर्वीं उद्यां मला जर कोणीं कोणत्याहि देवतेची महापूजा करण्याचें सुचवलें तर मला तें कसें जमणार ? आपण आपल्या महाबळेश्वरच्या भाषणांत जातीयवादाचा उहापोह करण्याच्या ओघांत दिगंबर जैनांना समाधान देण्यासाठीं श्री. शांतिलाल शहांना मंत्री करण्यासंबंधींची जी घोषणा केलीत व श्री. बर्वे यांना केवळ विधानसभेचे सभासद म्हणून न राबवण्याचा जो मनोदय व्यक्त केलात त्यामुळेंहि माझ्यासारखे अनेक लोकसत्तावादी चकित झाले असतील. मतें जिंकण्यासाठीं आपण केलेला हा दिगंबर प्रचार निवडणूक–कायद्याला संमत असलेल्या रास्त प्रचाराच्या

व्याख्येंत बसतो कीं नाहीं तें कायदेपंडितच सांगूं शकतील. पण मुख्य मंत्रि-पदाची भूमिका क्षणभर विसरून आपण जर आपल्या उद्गारांचा फेरविचार कराल तर विरोधी पक्षावर मात करण्यासाठीं केलेला हा डाव रास्त नव्हता अशी ग्वाही आपलें मन देईल. श्री. बर्वे एकाएकीं काँग्रेसच्या उंबरठ्यावर कसे आले त्यासंबंधींची जी भूमिका त्यांनीं आपल्या शाळकरी प्रबंधांत मांडलेली आहे तिच्यामुळें कोणाचेंच समाधान झालेलें नव्हतें, तें आतां झालें. पण तें इतक्या चमत्कारिकपणें आपण कराल अशी मात्र अपेक्षा नव्हती. जातवार उमेदवारच नव्हे तर जातवार मंत्री नेमण्याच्या घोषणा निवडणुकीपूर्वींच करून जातीयवाद नष्ट करण्याची ही योजना योग्य काळीं आपण राष्ट्रीय एकात्मतेसाठीं नेमलेल्या कमिटीसमोर मांडाल अशी आशा आहे. त्यामुळें राष्ट्रीय एकात्मता सिद्ध होईल व काँग्रेसचा अशक्त-पणाहि जाईल.

## आपल्या राजिनाम्याची मागणी

विरोधी पक्षांतील कांहीं पक्षांनीं आपल्या मंत्रिमंडळाच्या राजिनाम्याची मागणी केली म्हणून आपला त्यांच्यावर रोष झालेला दिसतो. जे कम्युनिस्ट जिवंत विरोधकांना थडग्यांत गाडतात व मेलेल्यांना थडग्याबाहेर काढतात त्यांनीं लोकशाही तत्त्वांचा आधार घेऊन आपल्याकडे राजिनामा मागावा हा कमालीचा 'इनोद' आहे यांत शंका नाहीं. त्यांचा आपण उपहास केला असतात तर मी तो समजूं शकतों. पण विरोधी पक्षांना आपणांकडे राजिनामा मागण्याचा हक्क काय; माझा पक्ष, जनता अथवा माझी सदसद्विवेकबुद्धि जेव्हां सांगेल तेव्हांच मी पदत्याग करीन असा जेव्हां आपण सिद्धांत बनवूं पाहतां तेव्हां तो कठोरपणें तपासणें आवश्यक ठरतें. मंत्रिमंडळाचा राजिनामा केव्हां मागावा ह्याबद्दल दुमत होऊं शकेल; पण तो मागण्याचा विरोधी पक्षांना हक्कच नाहीं हा सिद्धांत केराच्या टोपलींत टाकण्याच्या योग्यतेचाच मानला पाहिजे. काँग्रेस जनांची सदसद्विवेक बुद्धि त्यांना राजिनामा देण्यास सुचविण्याइतकी जागृत आहे यावर काँग्रेसजन तरी विश्वास ठेवतील काय ? आणि 'जनतेनें राजिनाम्याची मागणी करावी' याचा तरी अर्थ काय ? जनतेच्या वतीनें बोलण्याचा दावा विविध पक्ष करीत राहतात; ती एक अखंड क्रिया असते

व बहुमतानें निवडून आलेला पक्षहि आतां जनतेचा विश्वास गमावून बसलेला आहे असा आरोप विरोधी पक्षाला कोणत्याहि क्षणीं मांडण्याचा अधिकार असतो. लोकसत्ताक शासनाची ही कार्यपद्धति इतकी सर्वश्रुत व सर्वमान्य आहे कीं कोणावरीलहि रागानें आपण अशी विपरीत विचारसरणी मांडावी याचें नवल वाटतें. आधीच काँग्रेसमध्यें शिगेला पोंहोंचलेली अरेरावी आपल्या ह्या अहंकारी प्रोत्साहनानें उतूं जावयास लागेल व तिचे दाहक चटके जनता, सामाजिक कार्यकर्ते व नोकरशाही यांना सरसकट बसूं लागतील याचा आपणांस विसर तर पडला नाहीं ? आपली ही भूमिका व कम्युनिस्टांना अभिप्रेत असलेला लोकशाही आचार यांतलें वाढतें साम्य अस्वस्थ करणारें आहे.

प्रतापगडाच्या उत्तुंग व पावन वातावरणांत, शालीनता, सौजन्य व विद्वत्ता या गुणांस्तव ज्याची सर्वत्र चहा सुरू आहे अशा मुख्य मंत्र्याच्या निवडणूक-प्रचाराची ही उंची पाहून अशी धास्ती वाटूं लागते कीं, ज्या वेळीं हा प्रचार कृष्णा–कोयनेच्या, गोदा–गिरणेच्या व तापी–वैनगंगेच्या खोऱ्यांत उतरेल त्या वेळीं त्याचें स्वरूप कसें झालेलें असेल ? भवानीच्या प्रसादाला यावच्चंद्र-दिवाकरौ राज्य करण्याच्या परवान्याचें ( अधिक परिचित शब्द म्हणजे परमिटचें ), मुख्य मन्त्र्यांच्या आत्मविश्वासाला धटिंगणपणाचें, त्यांनीं दिलेल्या मंत्रीकरणाच्या आश्वासनांना सामान्य लांचलुपतीचें आणि त्यांनीं केलेल्या विरोधी पक्षाच्या उपहासाला मारपिटीचें ओंगळ स्वरूप सर्वसामान्य काँग्रेस-जन आणून देणार नाहींत अशी उमेद बाळगण्याव्यतिरिक्त माझ्यासारखीं सामान्य माणसें काय करणार ?

### सीमा प्रश्न व गोवामुक्ति

आपण आपल्या भाषणांत कम्युनिस्ट पक्ष, समिति, रिपब्लिकन पक्ष व प्रजा सोशलिस्ट पक्ष अशा चार संघटनांवर प्रामुख्यानें भर दिलेला दिसतो. महाराष्ट्राच्या प्रमुख पक्षाचे प्रमुख नेते म्हणून आपल्या पक्षाच्या निवडणूक-प्रचाराचा श्रीगणेशा एवढ्या समारंभपूर्वक करीत असतांना आपणाला बेळगांवच्या सीमा प्रकरणाबद्दल किंवा गोमंतकाच्या मुक्तीबद्दल कांहीं विवेचन करण्याची आवश्यकता वाटली नाहीं. ह्यावरून आमच्या राज्यकर्त्यांच्या दरबारीं त्या भागांतील जनतेची किंमत किती केली जात असावी याची

कल्पना करतां येण्यासारखी आहे. असो ! कम्युनिस्ट, समिति आणि रिपब्लिकन यांच्याविषयीं आपण जें प्रतिपादन केलें त्याचा समाचार त्या त्या संघटनांचे नेते आवश्यक वाटल्यास घेतील. मी प्र. सो. पक्षासंबंधीच्या आपल्या आक्षेपांचाच फक्त विचार करणार आहे.

## फार वेळां आळवलेलें गाणें

आमच्या पक्षाविषयीं बोलतांना आपण जी चाल चाललात ती आमच्या चांगलीच परिचयाची आहे. ती अशी कीं, दर वेळीं प्र. सो. पक्षाविषयीं बोलतांना त्यांतल्या एकदोन व्यक्तींविषयीं भलती आपुलकी व जिव्हाळा दाखवून मग लगेच एकंदर पक्षाविषयीं निरतिशय तुच्छतेनें बोलावयाचें. आपल्या कृपेसाठीं जी एकाददुसरी व्यक्ति निवडावयाची ती कोण असावी तें प्रांतानुसार, संदर्भानुसार किंवा बोलणाऱ्या व्यक्तींनुसार ठरवावयाचें. म्हणजे पंडितजी बोलले तर त्यांनीं म्हणावयाचें कीं, प्रजा सोशलिस्ट पार्टींत आचार्य नरेंद्र देव किंवा अशोक मेहता हीं दोन भलीं कर्तृत्ववान माणसें आहेत, पण बाकी सर्व फोलकटें. मद्रासमध्यें कामराज नाडरनीं म्हणावयाचें कीं, तुमच्यांत चिन्नदुराय आणि विजयालक्ष्मी अशीं एकदोनच माणसें चांगलीं आहेत, बाकी कोण आहेत ? गुजराथेंत ईश्वरभाई देसाई किंवा जसवंत मेहता, उत्तर प्रदेशांत त्रिलोकीसिंग, आसामांत हरेश्वर गोस्वामी, ओरिसांत सुरेंद्र द्विवेदी इत्यादि. याच नमुन्यावर महाराष्ट्रांत जोशी व गोरे; बाकी सर्व कचरा. मुख्य मंत्र्यांनीं हें ध्यानीं घ्यावयास हवें होतें कीं, हें गाणें गेल्या १५ वर्षांत अनेकांनीं आळवून पाहिलेलें आहे श्री. खाडिलकर, अत्रे, डांगे प्रभृति उघड व छुप्या कम्युनिस्टांनीं तर जोशी व गोरे ह्यांच्यापैकीं एकाला गोंजारण्याच्या व दुसऱ्याला ठोकरण्याच्या युक्त्या वारंवार करून पाहिलेल्या आहेत. ह्या परिचित शल्य–तंत्रांतील पुढची क्रिया ही कीं आमच्या जिवाला जीव देऊन जे शेंकडों तरुण कार्यकर्ते अक्षरशः पोट बांधून नानाविध क्षेत्रांत कार्य करीत आहेत त्यांना ‘ कळप ’ ह्या किंवा अशा-सारख्या नीच शब्दांनीं हिणवावयाचे आणि मग कणवेचा प्रचंड झटका आल्यासारखें दाखवून म्हणावयाचें कीं “ अशी ही दर्जेदार मंडळी, ह्या तुच्छ संभ्रमित लोकांच्या संगतींत दिसावी ना ! हर, हर, केवढी ही दुःखद

घटना ! ह्या क्षुद्र लोकांच्याबरोबर फूटपायरीवर बसण्यापेक्षां हे भले लोक आमच्या शेजारी येऊन सुखासनावर कां बरें पहुडत नाहींत ? ” अथवा विस्मयाचा आविर्भाव आणून बोलावयाचें कीं “ असली तत्त्वभ्रष्ट, शिस्तहीन, सत्ताहीन आणि नेतृत्वहीन संघटना जिवंत तरी कशी राहते बुवा ! कांहीं लक्षांतच येत नाहीं. ह्या चारदोन डोचक्यांविषयीं आम्हांला आदर आहे म्हणून, नाहींपेक्षां ह्या पक्षाला नुसतें बोलून बोलून यमसदनास पाठवतां आलें असतें ” यशवंतराव, ह्या बाळगोपाळांच्या मेळाव्यांत कांहीं वर्षें आपणहि होतात तो काळ कधीं आठवता काय ? कांहीं काळ आपण कैलासवासी रॉय यांचे अनुयायी होतात त्याचाहि विसर आपणांस खात्रीनें पडलेला नसेल. भाई रॉय यांना कधींहि प्रचंड संख्येनें अनुयायी मिळाले नाहींत आणि क्रांतिकर्ता म्हणून त्रिखंड गाजलेल्या ह्या धीमान् वीराला भारतांत कांहीं म्हणावी अशी संघटना उभारतां आली नाहीं. म्हणून रॉय तेवढे चांगले, बाकीचा खकाणा असें त्यांच्याबद्दल कोणी म्हणावें काय ? ज्यांना इतर सर्व पक्ष नष्ट व्हावेत अथवा करावेत आणि आपलेंच एकपक्षीय शासन चालावें असें वाटतें त्या सर्वाधिकारशाही पक्षांनीं ही वृत्ति दाखवावी व सतत तेजोभंग करून, असत्य प्रचार करून, आमिषें नाचवून इतर पक्ष नष्ट करून टाकण्याचा यत्न करावा हें समजूं शकतें. पण आपल्यासारख्यांनीं हें तंत्र अवलंबण्याची जरुरी काय ? कीं आपण कधीं अल्पमतांत असूं, कधींकाळीं अपयशाचे लोखंडी चणे खाण्याची तयारी आपणांसहि ठेवली पाहिजे हा विचारदेखील आपणांस इतका असह्य वाटूं लागलेला आहे कीं जे यशवंत होत नाहींत ते तुच्छच असले पाहिजेत असें समीकरण आपण मांडूं लागलेले आहांत ? एका काळीं ज्याच्यापाशीं पैसा तो सर्व गुणश्रेष्ठ असें मानलें जाई. आतां हातीं सत्ता तो गुणाढ्य असें मानण्याचा काळ आलेला आहे. पण हें कालानुसारी वर्तन सामान्य जनांना शोभून दिसलें तरी आपणासारखे लोकनेते जर त्याप्रमाणें वागूं लागतील तर लोकमान्य महात्माजीसारख्या धुरीणांनीं खस्ता खात, लोकापवाद सहन करीत ज्या संस्थेला सत्तास्थानापर्यंत पोहोंचविलें तिच्या इतिहासाची विस्मृति आपणांस फार लवकर झाली असें खेदानें म्हणावें लागेल.

## कठोर प्रहार खुशाल करा

मी म्हणतों कीं आपल्यासारख्या विचारवंतांनीं असा कां विचार करूं नये कीं प्रजा सोशलिस्ट पक्षाला अनेकांनीं शिव्याशाप देण्याचा क्रम चालू ठेवला असतांहि तो जिवंत आहे हें कसें ? हें कोडें आपणांसहि पडलेलें दिसतें. पण त्याचें उत्तर तसें पाहिलें तर सोपें आहे. प्रजा सोशलिस्ट पक्ष जिवंत राहिला तो जोशी-गोरे त्यांत आहे म्हणून नव्हे. कारण जेथें जयप्रकाश, नरेंद्र देव, मेहरअल्ली गेल्यानें पक्ष संपला नाहीं तेथें आमचा काय हिशेब ? प्रजा सोशलिस्ट पक्ष जिवंत राहिला आहे याचें कारण हरळीच्या मुळ्याप्रमाणें ह्या देशाच्या भूमीमध्यें असे मानणारे जनसमुदाय सर्वत्र आहेत कीं जे असें म्हणण्यास तयार आहेत कीं तुमच्यापाशीं सत्ता नसेल तर नसो, धन नसेल तर नसो, मोठ्या माणसांच्या नांवाची जादू नसेल तर तीहि नसो, पण जोपर्यंत सच्चा समाजवाद, निष्कलंकित राष्ट्रवाद आणि शुद्ध लोकशाही यांच्यावर तुम्ही निष्ठा ठेवून रहाल तोंपर्यंत आम्ही तुमच्या पाठीशीं आहोंत. आम्ही वाट पहाण्यास तयार आहोंत. मात्र तुम्ही या तत्त्वांची कास सोडूं नका. यशवंतरावजी हे आमच्या पक्षाच्या जीवनाचें जीवन आहे. आमच्या मुळ्यांना सजीव ठेवणारे हे भूमिगत झरे शोधण्याचे कष्ट करण्यास जे तयार नाहींत त्यांना आपल्याप्रमाणें विस्मय वाटतो आणि रागहि येतो. आमच्या पक्षाच्या प्रल्हादाला जिवंत ठेवणारा हा नारायण जोंपर्यंत जागा राहील तोपर्यंत पक्ष मरणार नाहीं. आपण आम्हाला भले म्हटलेंत तर उत्तमच आहे. पण आपण आमच्यावर रागावलांत एवढ्यानें आम्ही मरणार नाहीं. तेव्हां जोशी–गोरे आहेत म्हणून आपण पक्षावर टीका करीत नाहीं आणि म्हणून पक्ष जिवंत राहतो अशी गैरसमजूत आपण कृपया करून घेऊं नये. आपण आपले कठोरांतले प्रहार आमच्यावर अवश्य करावे.

" हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकापि वा । "

## कॉंग्रेसमध्यें कोण आहेत ?

भारतामध्यें अनेक चिल्लर पक्षांची खोगीरभरती झालेली आहे हें खरें असलें तरी त्याच्या मागील ठळक प्रेरणा तीन चारच आहेत आणि त्यांची वासलात चेष्टा करून लावतां येणार नाहीं. भारत पुनरपि सांधून घेतला

पाहिजे; येथील समस्त अहिंदु रहिवाशांनीं आपल्याला योग्य वाटेल त्या मार्गानें स्वतःचें शासन चालविण्याचा हिंदूंचा अधिकार मान्य केला पाहिजे; ही जनसंघ, हिंदुमहासभा व तत्सम पक्ष यांची भूमिका असून तिला मनोमन मान्यता देणारे लोक सर्वत्र आहेत. भारतासारख्या मागासलेल्या देशांना स्वतःची उन्नति त्वरेनें करावयाची असेल व येथील वरिष्ठ वर्गाची सत्ता नष्ट करावयाची असेल तर कम्युनिझमचीच कास धरली पाहिजे, मग येथें एकपक्षीय हुकुमशाही का येईना आणि रशिया—चीन सारख्यांचें त्यासाठीं साहाय्य का घ्यावें लागेना, असें मानणारी जीं मंडळीं आहेत तीं कम्युनिस्टांच्या मागें आहेत. लोकसत्ता, देशाचें निर्विवाद सार्वभौमत्व आणि लोकसत्तेचा भाजाकार न करतां शोषणमुक्ति हींच आदर्श समाजाचीं ध्येयें असू शकतात असें जो मानतो तो प्रजा सोशलिस्ट पक्षांत आहे आणि यांतलें कांहींच मनापासून न मानणारे अथवा वादाची कटकट नको म्हणून यांतलें सर्व कांहीं कबूल म्हणून उसाच्या फडासारखे हात उचलणारे जे पोटभरू आहेत त्यांचा मोठ्यांतला मोठा तळ, यशवंतरावजी, आपल्या लाडक्या काँग्रेसमध्येंच आहे हें कृपा करून विसरूं नका. उत्तर प्रदेश, बिहार, म्हैसूर, आंध्र व ओरिसा येथील काँग्रेस संघटनांत जीं जीवघेणीं भांडणें आहेत— ज्यामुळें महिनेन्‌महिने जनतेच्या कामाकडे लक्ष देण्यास सरकार म्हणून कांहीं जाग्यावरच नसतें— त्यांच्यामागें कोणता ध्येयवाद, कसली तत्त्वनिष्ठा, कोणता सेवाभाव असतो ?

## हीं तीं बाळंतीं

कृष्णेचें सगळें पाणी देवपूजेसाठीं वापरलें जात नाहीं, हें अगदीं खरें. पण त्याचबरोबर हें खरें नाहीं काय कीं, रकाळ्याच्या तळ्यांत आपल्यासारखे चार साखरेचे दाणे टाकून त्याच्या पाण्याची चव सुधरणार तर नाहींच; पण ते चार दाणे मात्र हरवून जातील ? विचारभ्रांत पक्ष माझा कीं आपला ? पंडित नेहरूंच्यासमोर बसून गेलीं पांच वर्षें आपल्या पक्षांतील वैचारिक एकसंधपणाची खोली अजमावण्याची आणि आपल्याच पक्षांतील विचारशून्यांच्या मागील बांकावर बसलेल्या पलटणी पहाण्याची संधि मला मिळाला

होती ज्या सरकारचा यूनोमधील शिष्टमंडळाचा नेता प्रत्येक वारीनंतर एवढा मोठा घाणीचा पसारा करून ठेवतो कीं, ती काढण्यासाठीं देशांतील सर्व वृत्त-पत्रें व पंतप्रधानासकट सर्व मुत्सद्दी नाकाला फडकीं बांधून महिनापंधरा दिवस फिनेल ओतीत राहतात, त्याच्या स्वच्छ व स्पष्ट विचारसरणीविषयीं कोणी काय बोलावें ? पण यासाठीं दिल्लीपर्यंत जाण्याचेंहि कारण नाहीं. आपल्या-भोंवतीं जमलेल्या खाडिलकर, मोरे, तुषार आदिकरून नवागतांत आणि आपल्यांत काय वैचारिक ऐक्य आहे हो ? समितींत प्र. सो. पक्ष राहात असेल तर मी अजूनहि काँग्रेसमध्यें जाण्याचें रहीत करीन असें खादीचे कपडे शिवण्यास टाकल्यानंतरहि आम्हांला सांगणारीं हीं माणसें आपल्या शेजारीं बसवून घेऊन आपण जेव्हां आम्हांला भोंगळ म्हणतां तेव्हां आपली विस्मरण-शक्ति आपल्या स्मरणशक्तीइतकी प्रचंड असली पाहिजे असें म्हणण्यावांचून गत्यंतर उरत नाहीं.

आपला देश अशा जमान्यांत दास्यमुक्त झालेला आहे कीं, यापुढें येथील कोणताहि पक्ष लोकसत्ता, देशाचें सार्मभौमत्व, कल्याणकारी राज्य व शोषण-मुक्ति यांच्या सर्वस्वीं विरुद्ध भूमिका घेऊन जनतेसमोर जाऊं शकणार नाहीं. परंतु काळानें लादली म्हणून हीं ध्येयें नाइलाजानें स्वीकारणें वा पंडित नेहरूंसारखी व्यक्ति गमावली तर आपल्याला गाशाच गुंडाळावा लागेल म्हणून एखादें ध्येय मान्य करणें वेगळें आणि इतिहासाचा ओघ लक्षांत घेऊन स्ययंप्रज्ञेनें, स्वसंमतीनें व स्वप्रयत्नानें त्या ध्येयासाठीं सत्तेचा लोभ न धरतां झगडत राहणें वेगळें. अशा कसोटीला या देशांतील फक्त प्र. सो. पक्षच उतरूं शकेल असें मला सविनयपणें व निश्चितपणें सांगावेसें वाटतें.

**अन्तःप्रेरणा वेगळ्या म्हणून वेगळे पक्ष**

काँग्रेस. प्र. सो. पक्ष व कम्युनिस्ट यांच्याच नव्हे तर इतर पक्षांच्या निवडणूक–जाहीरनाम्यांत देखील मूलभूत तफावती कां दिसत नाहींत त्याचें कारण आतां ध्यानीं येईल. असें असूनहि हे पक्ष वेगळे राहतात, आणि राहातील. कारण त्यांचे जाहीरनामे कांहींहि असोत त्यांच्या अन्तःप्रेरणा वेगळ्या आहेत, त्यांचीं उद्दिष्टें भिन्न आहेत आणि यांच्या जनसेवेंतील तडफ व भाव यांत फरक आहेत. त्यामुळें काँग्रेसनें धनिक–निर्धनांतला भेद नष्ट

करण्याच्या कितीहि रागीट घोषणा केल्या तरी त्याबाबतींत ती कोणतेंहि परिणामकारक पाऊल टाकणार नाहीं. लोकशाहीवर कम्युनिस्टांनीं कितीहि निष्ठा व्यक्त केली तरी लोकशाहीला लाथेनें तुडवणाऱ्या क्रुश्चेव्हचे व माओचे पाय त्यांना सोडतां येणार नाहींत आणि जनसंघानें आपण धर्मातीत असल्याचा केवढाहि टाहो फोडला तरी त्याला अहिंदूंचा विश्वास संपादन करतां यावयाचा नाहीं.

## आभारी आहोंत

असो. आम्हां दोघांबद्दल आपण जे प्रशंसेचे उद्‌गार काढलेत त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोंत. असाच लोभ असूं द्यावा. आपण सौजन्याचा हा आविष्कार केलात त्याचा प्रतिध्वनि लगेच उमटून आचार्य अत्र्यांनीहि आमच्याबद्दल दोन बरे शब्द उच्चारले! आपण एवढी खात्री बाळगा कीं, आपल्या पक्षाला विरोध करीत असतांहि महाराष्ट्रांतून अभद्र, असत्य, अज्ञान व दारिद्र्य नष्ट करण्याचे जे जे सत्य प्रयत्न आपण कराल त्यांत आम्ही सर्व शक्तीनिशीं सहकार्य करूं. सविरोध सहकार्य ही कल्पना प्रगल्भ लोकसत्तेला अंगीभूत असली तरी आपल्याकडे अजून तरी ती बरीच अपरिचित आहे. लोकसत्तेचा नव्यानें प्रयोग होत असतां या दृष्टीनें जनमानस तयार होण्यास कांहीं काळ लागणारच.

शेवटीं सूचना एवढीच कीं, केवळ रंगरूट जमा करण्याच्या हव्यासानें लोकसंग्रह करूं नका. त्यांचें राजकीय कुळशील पाहा. नाहीं तर सैन्याऐवजीं शिकारखाना तयार होईल! आपण आम्हांला जो प्रश्न टाकलात तोच आपणांला विचारून थांबतों कीं, "आपण येथें कसे?"

◎ ◎ ◎

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें, सार्वजनिक
अनुक्रम ३५५३-२८ ... दि: ...
क्रमांक .................... नों. ...

# निवडणुकीनंतरचा महाराष्ट्र *

निवडणुकीनंतरच्या महाराष्ट्राचें अगदीं मोजक्या शब्दांत वर्णन करा असें जर मला कोणीं सांगितलें तर तें मी 'एकपक्षीय महाराष्ट्र' ह्या दोन शब्दांत करीन. संयुक्त महाराष्ट्राच्या ध्यासानें वेड्या झालेल्या, चिडलेल्या मराठी जनतेनें महाराष्ट्र राज्याची प्रस्थापना होतांच मोहरा बदलला आहे ही गोष्ट कोणाहीपासून छपून राहिलेली नव्हती.

तथापि १९५७ च्या आधींपासून संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य करून घेण्याची ईर्षा ज्यांनीं बाळगली आणि काँग्रेसच्या सत्तासामर्थ्याला व द्रव्य-सामर्थ्याला न जुमानतां आंदोलनाची कमान ढिली पडूं न देण्याची संघटना-चातुरी ज्यांनीं दाखविली, त्यांना जनता वापरून मळलेल्या वस्त्राप्रमाणें दूर सारील याची मात्र कोणालाच अटकळ आली नव्हती. परंतु प्रत्यक्ष अनुभव आला तो असा कीं, शेतकरी कामगार पक्ष, प्रजा सोशॅलिस्ट पार्टी, कम्युनिस्ट पार्टी, आणि रिपब्लिकन पक्ष यांच्यापैकीं कोणाचीच मुलाहिजा मतदारांनीं केली नाहीं. मग लाल निशाण, हिंदुमहासभा इत्यादि चिल्लर पक्षांचें तर विचारूंच नका. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांतील त्यांची कामगिरी त्यांनीं जशी पाहिली नाहीं, त्याचप्रमाणें स्वातंत्र्यपूर्व काळांतील त्यांचें देशकार्य आणि स्वातंत्र्योत्तर काळांतील त्यांची जनसेवा यांचीहि कदर केली नाहीं. समुद्रकांठीं लहान मुलांनीं बांधलेले वाळूचे गड-किल्ले एका लाटेच्या फटकाऱ्याबरोबर विरघळून कोलमडून पडावेत तशी महाराष्ट्रांतील वेगवेगळ्या पक्षांची मोठी अनुकंपनीय अवस्था झाली.

जो अनुभव फेब्रुवारीमधील सार्वत्रिक निवडणुकांच्या समयीं आला, तोच नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुकींतहि आला आहे. धुळें, ठाणें, बीड, अकोला, उमरावती आणि चांदा हे जिल्हे सोडले तर बाकीच्या सर्व जिल्ह्यांत काँग्रेसच्या हातीं निर्विवाद बहुमत आलेलें आहे. जवळजवळ साडेबाराशें जागांपैकीं काँग्रेसनें ८२७ जागा काबीज केलेल्या असून प्र. सो. पा., शेतकरी कामगार, रिपब्लिकन, कम्युनिस्ट, जनसंघ यांना अनुक्रमें

---

* महाराष्ट्र टाईम्स, १९-६-६२

५३, ६५, ३५, ४६ आणि ५ अशा मूठभर जागा मिळवितां आलेल्या आहेत. त्या मानानें स्वतंत्रांना २३३ जागा मिळवतां आल्या हें विशेष समजलें पाहिजे ! तथापि त्यांपैकीं अनेकजण बडखोर काँग्रेसवाले होते हें विसरून चालणार नाहीं. तेव्हां हें मान्य केलें पाहिजे कीं, फेब्रुवारीच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्यें जनमताच्या प्रवाहानें जी पलटी खाल्ली ती तत्कालिक आहे असें मानण्याची चूक न करतां तिच्यामधून जनमानसाचा कांहीं एक स्थायीभाव प्रकट होत आहे असें दिसतें.

ह्या स्थायी भावाचें स्वरूप कोणतें ? प्रेरणा कोणती ? काँग्रेसनें संयुक्त महाराष्ट्र आणला अशी जनतेची समजूत झाल्यामुळें तिनें बैलजोडीला मतदान केलें; काँग्रेस समाजवाद प्रस्थापित करील अशी खात्री पटल्यामुळें श्रमजीवि वर्गानें आपल्या मताचा कौल काँग्रेसच्या बाजूनें दिला; अशा प्रकारचें प्रतिपादन जे करतात ते चालू घटनेचा फार सोपा अर्थ लावतात असें म्हणणें प्राप्त आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वावर जनतेचा विश्वास आहे म्हणून ती पंडितजींना मतदान करते काँग्रेसला नव्हे, हा खुलासा देखील याच मासल्याचा होय. संयुक्त महाराष्ट्र, समाजवादी समाजरचना, पंडित नेहरूंवरील विश्वास ह्या बाबींना काँग्रेसयशाच्या पृथक्करणांत कांहींच अर्थ नाहीं असें येथें सुचवायचें नाहीं. सुचवायचें आहे तें असें कीं, ह्या बाबी मूलभूत नव्हेत; त्या दुय्यम आहेत. त्या नसत्या तरी देखील लोकमताचा कौल जसा लागला आहे त्याचप्रमाणें लागला असता. अगदीं स्पष्टच बोलावयाचें झाल्यास संयुक्त महाराष्ट्र न होतां द्विभाषिक राहिलें असतें तरीहि १९५७ मधील काँग्रेसच्या ससेहोलपटीची पुनरावृत्ति परत होण्याचा संभव फार कमी होता !

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या यथार्थ अवतारकृत्याची कल्पना ज्यांना आलेली नाहीं किंवा नव्हती त्यांना माझें हें विधान कदाचित् पटणार नाहीं. कारण कारणमीमांसेच्या खोल पाण्यांत शिरणें टाळून त्यांना कोठल्या तरी एखाद्या पक्षाच्या माथीं अपयशाचें खापर फोडून मोकळें व्हावयाचें असतें आणि सर्व पक्ष पुनश्च एकवार काँग्रेसविरोधी एकजूट करून राहिले तर पाठमोऱ्या झालेल्या विजयश्रीला परत सन्मुख करतां येईल असा आवडता अथवा मतलबी सिद्धांत त्यांना जनतेच्या व त्याहीपेक्षां स्वतःच्या भांबावलेल्या अनुयायांच्या तोंडावर फेकून त्यांना गप्प करावयाचें असतें.

दा. क्र. 73086

माझ्या अल्पमतीला असें वाटतें कीं, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन ही एक अपवादात्मक व अनाहुत घटना होती. गेल्या पंचवार्षिक योजनांमुळें समाजाच्या स्वरूपांत, बांधणींत व मानसांत जे फेरबदल होत आहेत ते कांहीं काळ संयुक्त महाराष्ट्राच्या आगंतुक प्रश्नामुळें दृष्टीआड झाले आणि त्यांची परिणामकारकता ह्या प्रश्नामुळें कांहीं काळ मंद ठरली इतकेंच. पण कांहीं काळ जातांच संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांतून निर्माण झालेल्या वृत्तींनाहि गंज चढवील व दुर्बळ बनवील अशी शक्ति त्यांच्यांत होती आणि तीच आतां प्रभावी बनल्याचें दिसून येत आहे.

गेल्या दोन पंचवार्षिक योजनांच्या सामाजिक परिणामांकडे जसें लक्ष द्यावयास पाहिजे तसें दिलें जात नाहीं, ही वस्तुस्थिति आहे. गरीब अधिक गरीब होत आहेत आणि धनिक अधिक धनवान बनत आहेत. हे शब्द पंडित नेहरूंच्यापासून सगळ्या पंथांतील सगळे प्रचारक नेहमीं उच्चारीत असतात. पण त्याचा नेमका अर्थ काय? समाजांत १९४८ सालापूर्वीं जीं पांचपन्नास धनाढ्य घराणीं होतीं तीं तर आज कुबेरपदवीला पोंचलेलीं आहेत यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें बेकार-टाकारांची, फूटपायरीवर झोंपणारांची संख्या वाढलेली आहे हेंहि सत्य आहे. पण ह्या दोन टोंकांमधील समाजांत गेल्या दहा वर्षांत कांहीं नवीन घडलेलें आहे आणि तें फार प्रचंड प्रमाणांत घडलेलें आहे. महाराष्ट्रासारख्या औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या म्हणजे इतर राज्यांच्या मानानें पुढारलेल्या आणि कपाशी, ऊंस, तंबाखू, भाजीपाला इत्यादि रोकड माल पिकवणाऱ्या राज्यांत तर ही प्रक्रिया बऱ्याच मोठ्या प्रमाणावर घडून आलेली दिसेल. ती म्हणजे शहरामधून खिशांत पूर्वी कधींहि खुळखुळलीं नसतील इतकीं नाणीं पगाराच्या किंवा मजुरीच्या रूपानें नित्य खुळखुळत असणारा नोकरवर्ग किंवा कामगारवर्ग निर्माण झालेला आहे आणि खेड्यापाड्यांतून दहा, वीस, तीस एकर शेती विहिरीच्या पंपावर करून बाजारी पिकें काढणारी शेतकरी मंडळी दिसूं लागलेलीं आहेत. ह्या मंडळींना राजकीय आंकांक्षांचे पंख फुटूं लागलेले आहेत आणि पैसा मोजला कीं, कामें होतात ही गुरुकिल्ली अनुभवामधून त्यांच्या हातीं लागलेली आहे.

पार्लमेंटच्या जागेसाठीं पन्नास हजार ते एक लाख, विधिमंडळाच्या

जागेसाठीं वीस ते पंचवीस हजार, जिल्हा परिषदेसाठीं पांच ते दहा हजार रुपये खर्च केले आणि त्यांच्या जोडीला कॉंग्रेसचें तिकीट असलें कीं, निवडणुकीची मरीआई पावते याची त्यांनीं खूणगांठ मारून ठेवलेली आहे. मग त्याग, सेवा, ज्ञान, सचोटी, राजकीय भूमिका अथवा कार्यक्रम यांची कांहीं गरजच लागत नाहीं, अगदीं कॉंग्रेसच्या कार्यक्रमावर देखील विश्वास असण्याचें कारण नसतें, याची खात्री पटलेली असल्याकारणानें असल्या गोष्टींविषयीं जे बोलतात अथवा आग्रह धरतात त्यांना ते खुळ्यांत काढतात आणि समाजांत आज कोणत्या गोष्टीची बूज आहे याची जाणीव त्यांना नाहीं हें ओळखून त्यांना मनांत अथवा उघडपणें हंसतात.

ह्याच वर्गाच्या जोडीला कल्याणकारी राज्यांत अपरिहार्यपणें निर्माण होणारी अधिकारीवर्गाची फौज येऊन बसली आहे. ही मंडळी रात्रंदिवस आपल्या पोशिंद्यांना म्हणजे राज्यकर्त्यांना म्हणजेच कॉंग्रेसला शिव्या मोजीत असतात. पण मनांतून इतकी भेकड असतात कीं, मतपेटींत गुप्तपणें मत टाकतांना सुद्धां राज्यकर्त्यांविरुद्ध मत टाकण्याची त्यांची हिंमत होत नाहीं.

गेल्या दहा वर्षांत ठिकठिकाणीं आणखी एक वर्ग निर्माण झालेला आहे; तो समाजाच्या परिघावर राहाणाऱ्यांचा. शहरांच्या कडेकडेनें पत्रे, फळकुटें, गोणपाटें जमा करून त्यांचीं खोपटें फौजेच्या छावण्यांसारखीं उभारून त्यांत राहणारा हा वर्ग आहे. ह्या मंडळींचे मोर्चे डाव्या पक्षांतील पुढाऱ्यांनीं जरी हवे तितके काढले तरी त्यांची राजकीय निष्ठा समजून घेणें अथवा तिची बांधणी करणें हें वाळूचा दोर वळण्याइतकें दुर्घट काम आहे. पक्ष प्रचारकांना ते सरळ मताचा भाव काय तें बोला, असेंच सांगत असतात.

हे तिन्ही वर्ग तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील दहा हजार कोटि रुपयांच्या जलसंचयाचे पाट जसजसे वाहूं लागतील तसतसे पाटांच्या कडेकडेनें शिंदीचीं व केकेताडीचीं बनें वाढतात तसे फोफावत जाणार आहेत हातीं घेतलेलें काम लवकरांत लवकर फत्ते करणें हें त्यांचें ध्येय आहे आणि पैसा हें त्यांचें माध्यम आहे. त्यांच्या दृष्टीनें बाकी सर्व क्षुद्र आहे. हा सर्व समाज कॉंग्रेसच्या पाठीशीं उभा राहणार हें निश्चित समजावें. फारफार तर तो स्वतंत्र म्हणून व्यक्तिगत सामर्थ्यावर राजकारणाच्या आखाड्यांत उतरेल. **तात्पर्य, कॉंग्रेस**

**समाजवाद आणील म्हणून तो काँग्रेसवाला बनत नसून, ती समाजवाद आणणार नाहीं ही खात्री झालेली असल्यामुळेंच तो काँग्रेसच्या झेंड्याखालीं एकत्र होत आहे. याचा अर्थ असा कीं, आज काँग्रेसी समाजवादाच्या झेंड्याखालीं समावादाच्या विरोधी शक्ति एकत्र होत आहेत. सत्ता आणि साधनें हीं त्यांचीं आराध्य दैवतें असून समाजवादाच्या खोल भावनात्मक आशयाची अथवा त्यांतील समाजपरिवर्तनाच्या कळकळीची त्यांच्या लेखीं शून्य किंमत आहे.**

वर वर्णन केलेल्या घटनांची दखल घेण्यास जे तयार नाहींत ते पार गडबडून गेलेले आहेत. प्रसोपाच्या श्री. धारियांच्यापासून शेतकरी-कामकरी पक्षाच्या श्री. घाऱ्यांच्यापर्यंत सगळ्या पक्षांतर करणाऱ्यांचा दावा असा आहे कीं, ते समाजवाद प्रत्यक्षांत आणण्यासाठीं काँग्रेसमध्यें जात आहेत. आपल्या पूर्वींच्या पक्षनेत्यांना त्यांचा असा सल्ला आहे कीं, त्यांनीं आपापल्या पक्षांचीं निशाणें उतरवून, गुंडाळून ठेवावींत. हें एकीकडे चालू असतां तिकडे नंदाजींच्यासारखे नेते हळहळत आहेत कीं, काँग्रेसमध्यें समाजवादाचा विचार मागें पडत असून तो सुदृढ करण्यासाठीं काँग्रेसमध्येंच एक समाजवादाचें व्यासपीठ तयार करावयास लागलें पाहिजे. ह्या त्यांच्या मनोदयाला खुद्द पंडितजींचाहि आशीर्वाद लाभलेला आहे अशी जाहिरात करण्यांत आलेली होती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हा जर सिद्ध साधकपणा असेल तर काँग्रेसनें ह्या कलेंतहि उच्चांक गांठलेला आहे असें म्हणावें लागेल.

ह्या सर्व घडामोडींचा परिणाम असा होत आहे कीं, महाराष्ट्रांत आजच्या घटकेला तरी एकच राजकीय पक्ष उरलेला दिसतो. त्या पक्षामधील पूर्व प्रसोपावाल्यांचें, पूर्व कम्युनिस्टांचें, पूर्व शेतकरी कामगारवाल्यांचें प्रमाण काय तें सांगणें सोपें नाहीं. जातीचा अडसर जर इतका पक्का नसता तर माझी खात्री आहे कीं, नवबुद्धांमधील अनेक महत्त्वाकांक्षी मंडळी आज काँग्रेसमध्यें घुसली असती आणि रिपब्लिकन पक्ष नाममात्र बाहेर उरला असता. महाराष्ट्र काँग्रेसच्या आजच्या सामर्थ्यावर जे भाळून गेलेले आहेत ते श्री. रघुनाथ खाडिलकरांच्यासारखे विद्वान् एकपक्षीय लोकशाहीची तरफदारी उघडपणें करूं लागलेले आहेत, ही मोठी सूचक गोष्ट आहे. संयुक्त महाराष्ट्र समितीकडे लोकमताचा पूर होता तेव्हां हीच मंडळी संयुक्त आघाड्यांची

कडवी पुरस्कर्ती होती हा भाग वेगळा. पण जेव्हां ह्या कामचलाऊ मंडळींच्या वरच्या, म्हणजे यशवंतराव चव्हाणांच्यासारख्या मंडळींच्या तोंडून एक-पक्षीय राजकारणाच्या तरफदारीचे शब्द उमटूं लागतात तेव्हां पुढील धोक्याची ही, अबुद्धिपुरस्सर दिलेली ही पूर्वसूचना तर नव्हे, अशी शंका मनांत येते.

महाराष्ट्र हें एकपक्षीय राज्य झालें आहे असें मीं म्हटलें त्या मागचा विचार हा असा आहे. अनेक ठिकाणीं काँग्रेसला विरोध म्हणजे सरकारला विरोध नव्हे तर राज्याला विरोध, राजद्रोह, असा प्रचार होतो आहे याची जाणीव असल्यामुळेंच मी असें म्हणतों आहे. एकपक्षीय लोकशाहीची तात्त्विक चर्चा करण्यामध्यें गांवगन्ना पसरलेल्या उपरिनिर्दिष्ट नवसमाजांतून निर्माण होत असलेल्या नव्या नेतृत्वाला कांहींच रस नाहीं. त्याला ह्या नवीन शब्दाचा जो अर्थ समजतो तो एवढाच आहे कीं, आपण म्हणूं तसें झालें पाहिजे. मग आपलें म्हणणें खरें करण्यासाठीं जें कोणतें साधन कारीगर ठरेल तें बेधडक वापरावयाचें.

निवडणुकींत काँग्रेसला जवळ जवळ एकाधिपत्य प्राप्त झालेलें असल्यामुळें तिच्या समाजवादाची जशी कसोटी लागणार आहे त्याचप्रमाणें तिच्या लोकशाहीचीहि पारख होणार आहे. फार मोठी जबाबदारी तिच्यावर येऊन पडलेली आहे. विरोधी पक्षांच्या सुद्धां सत्त्वपरीक्षेची ही घटका ठरावी. नाहींपेक्षां एकपक्षीय लोकशाहीचा संक्षेप एकपक्षीय शासनांत होण्यास वेळ लागणार नाहीं. अर्थात् त्याचेंहि गुणवर्णन करणारे भाट जरूर पडतांच निर्माण होतीलच.

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...३५३२७... वि: ...निबंध...
क्रमांक ........................ नों दि ...१७.९.८७

# आत्महत्त्येचा सल्ला देणाऱ्या मित्रांप्रत *

## अनाहूत सल्लागार

अलीकडे प्रसोपाचें भवितव्य हा आमच्या कांहीं मित्रांचा व सहानुभूतिदारांचा मोठा चिंतेचा विषय होऊन राहिलेला दिसतो. वारंवार त्यांच्याकडून जे अनाहूत सल्ले प्रसोपाला देण्यांत येत असतात त्यांवरून दोन अनुमानें अपरिहार्यपणें निघतात : एक असें कीं, आमच्यासारखे जे हजारों कार्यकर्ते आजतागायत पक्षाचें कार्य यथामति व यथाशक्ति करीत आहेत त्यांच्यापेक्षां अधूनमधून आमची अल्पशी भलामण व शक्य तेथें आमची भरपूर निंदा करणाऱ्या ह्या मित्रांना पक्षाच्या व आमच्या भवितव्यतेची काळजी आमच्यापेक्षांहि अधिक लागलेली आहे ! दुसरें असें कीं, देशाचें राजकीय वातावरण सुधारण्यासाठीं आणि देशांतील लोकसत्ताक समाजवादी शक्ति वाढण्यासाठीं जर कोणती गोष्ट प्रथम होणें अवश्य असेल तर ती म्हणजे प्रसोपाचा शक्य तेवढ्या लवकरच अन्त ! अहोरात्र लोकशाही समाजवादासाठीं तळमळणाऱ्या ह्या मित्रांनीं मोठी उमेद बाळगलेली असावी कीं, आपण जो दिवस उजाडावा म्हणून इतके दिवस वाट पाहत होतों तो मुंबईला १४ जुलै रोजीं भरणाऱ्या प्रसोपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीच्या वेळीं उजाडणार आहे. त्या बैठकींत प्रसोपा विसर्जित केल्याची जरी नाहीं तरी किमानपक्षीं साथी अशोक मेहतांच्या राजिनाम्याची तरी सुवार्ता कानीं येईल आणि मग थोड्याच दिवसांनीं पक्षाची उत्तरक्रिया साजरी करण्याचा मंगल क्षण प्राप्त होणार आहे, अशी हमी आपणांस मिळेल.

प्रसोपाच्या प्राणोत्क्रमणाची वाट डोक्याला टापशी बांधून पाहत बसलेल्या आमच्या सग्यासोयऱ्यांत श्री. द्वा. भ. कर्णिक यांची भर नुकतीच पडलेली दिसते. ते आमच्या इष्टमित्रांत इतक्या तळमळीनें सामील झाल्याचें पाहून आम्हांला जितका आनंद वाटला तितकेंच दुःख त्यांना आपली डोक्याची टापशी उतरवावी लागणार या विचारानें आम्हांस झालें. उपहासाचाच आश्रय करून त्यांना उत्तर द्यावयाचें झाल्यास तें असें देतां येईल कीं, प्रसोपाच्या

---

* जनवाणी, ऑगस्ट १९६२

निधनाविषयींची त्यांची व तत्समांची उत्सुकता ' माझ्यासारखी कशी होईल ' ह्या नमुन्याची आहे. दिवंगत मानवेंद्र रॉय यांच्यासारखा झुंजार क्रांतिकारक व प्रकाण्ड पंडित म्हणून त्रिखंड गाजलेला नेता लाभून सुद्धां ज्यांना भारतांत कधीं उभारी धरतां आली नाहीं, समुद्रांत जाऊन कोरडे राहणाऱ्या कर्म-दरिद्र्याप्रमाणें १९४२ च्या क्रांतियुगांत सुद्धां जे ब्रिटिशांशीं एकनिष्ठ राहिले आणि आज राजपुरुषांच्या सन्निध राहून आनंदानें कालक्रमणा करीत असतां चैनी विधवेप्रमाणें वर्षांतून एखादा अर्धा दिवस एकत्र जमून रॉयसाहेबांच्या नांवानें दोन नक्राश्रु ढाळण्यापलीकडे जे कांहींहि करीत नाहींत त्यांनीं जिवाची होड लावून राजकारण करण्याची जिद्द बाळगणाऱ्यांच्या राजकीय कुंकवाची उठाठेव करण्याची कांहीं जरूरी आहे काय ?

## प्रसोपानें बजावलेली कामगिरी

तथापि अशा उपहासानें बोलणें आपणांस शोभणार नाहीं. कारण त्यामुळें मुख्य प्रश्नाचा विचार बाजूला पडतो. प्रसोपानें आपल्या पंधरा वर्षांच्या आयुष्यामध्यें आमच्या मतें जी बहुविध व बहुमोल राष्ट्रसेवा केलेली आहे तींत एक मोठी गोष्ट केली ती ही, कीं कोणत्याहि प्रश्नावर स्पष्टपणें विचार करण्याची व तो बोलून दाखवण्याची प्रवृत्ति लोकांत उत्पन्न केली. कॅाँग्रेसच्या दबदब्यांतून आणि कम्युनिस्टांच्या घटपटांमधून लोकमानस मुक्त केलें. कोणत्याहि युद्धयमान गटांत सामील न होण्याचें स्वतंत्र धोरण म्हणजे काय तें उक्तीनें व कृतीनें स्पष्ट केलें; लोकसत्ताक समाजवादी समाजाचें चित्र स्वच्छपणें लोकांच्यापुढें यावें याचा आग्रह धरला. साहजिकच हें करीत असतां देशांतील व परदेशांतील अनेक देश, अनेक व्यक्ति, अनेक पक्ष व अनेक प्रसंग यांचें निर्भीड आलोचन करणें हें प्रसोपाचें कर्तव्य होऊन बसलें. ही प्रक्रिया सुरू करून त्यानें स्वतःवर अनेकांचा रोष ओढवून घ्यावा हें देखील स्वाभाविकच मानलें पाहिजे. प्रसोपाच्या हातून गेल्या पंधरा वर्षांत खरोखरच कांहीं प्रमाद घडल्याकारणानें म्हणा अथवा त्याचें आचरण कांहीं प्रसंगीं मित्रांना सुद्धां प्रमादरूप वाटल्याकारणानें म्हणा त्यांनीं आपल्या पक्षाचे वाभाडे काढण्यास कसी केलें नाहीं. आजहि तसाच प्रसंग उत्पन्न झालेला असून आपण आपलें अस्तित्व स्वखुषीनें संपवीत नाहीं हा आपल्या हातून फार मोठा अपराध घडत आहे

असें वाटत असल्याकारणानें हे आपले मित्र आपणांस धारेवर धरीत आहेत असेंच आपण गृहीत धरून चालूं या व त्यांच्या म्हणण्याचा विचार करूं या.

सकृद्दर्शनींच एका गोष्टीचा अचंबा वाटतो ती गोष्ट अशी कीं, प्रसोपा आतां संपलेली आहे असें ठाम विधान करणारेच आम्ही तो पक्ष बरखास्त करावा असेंहि मोठ्या तळमळीनें सांगत असतात. माणूस जर मेलेला आहे अशी तुमची खात्री आहे तर त्याला आपला बिछाना गुंडाळ म्हणून सांगण्यांत शहाणपणा कोणता ? असें सांगण्याची आवश्यकता तरी काय ? आतांपर्यंत काय कमी पक्ष मेले ? प्रागतिक पक्ष, सत्यशोधक पक्ष, किसान-कामगार पक्ष स्वराज्य पक्ष, रॉय पक्ष अशीं किती नांवें सांगावीं ? पण त्यांनीं मरावें असा कोणी गंभीरपणें सल्ला दिल्याचें अथवा आग्रह धरल्याचें ऐकिवात नाहीं. ते स्वेच्छया मेले किंवा परिस्थितीमुळें मेले. प्रसोपा स्वेच्छया मरण्यास तयार नाहीं हें तर दिसतेंच आहे. परिस्थितीनें त्याला मारलेलें नाहीं हेंहि स्पष्ट आहे. कारण मग आमच्या शत्रुमित्रांच्या ह्या मुलखा-वेगळ्या आग्रहाला कांहीं अर्थच राहिला नसता. तेव्हां सध्यांच्या प्रचाराचा हेतु आम्ही आत्महत्त्येला तयार व्हावें म्हणून आमचें मन वळवण्याचा असावा आणि आम्ही त्यांच्या इच्छेचा आदर करीत नाहीं म्हणून आमच्यावर त्यांचा हा राग होत असावा. ह्या त्यांच्या विचित्र आग्रहाची कारणमीमांसा ते कशी करतात तें आपण तपासून पाहूं या.

## पराभव म्हणजे फांशीची शिक्षा नव्हे

प्रसोपाला आत्मविसर्जनाचा सल्ला देणारांची भाषा वेगवेगळी असली तरी त्यांच्या युक्तिवादाचीं मुख्य सूत्रें दोन तीनच आहेत; तीं पुढीलप्रमाणें मांडतां येतील : ( १ ) प्रसोपाला निवडणुकींत हार खावी लागली ह्यावरून त्या पक्षाच्या विचारसरणीला जनतेचा पाठिंबा नाहीं हें दिसून येतें; तेव्हां पक्ष बरखास्त करावा हेंच योग्य होय; ( २ ) कॉंग्रेसनें समाजवादाचा स्वीकार केलेला असल्यामुळें आतां वेगळ्या समाजवादी पक्षाची गरज राहि-लेली नाहीं; आणि ( ३ ) चळवळींच्या क्षेत्रांत प्रसोपाला लोहियावाद्यांची अथवा कम्युनिस्टांची बरोबरी करतां येणार नाहीं. त्यामुळें विधायक कार्यक्रम कॉंग्रेसनें नेला व आंदोलनात्मक कार्यक्रमांत लोहियावाद्यांची व

कम्युनिस्टांची मक्तेदारी निर्माण झाली अशी अवस्था होऊन प्रसोपाला कोठेंच स्थान उरणार नाहीं. आतां ह्यांपैकीं एकेक मुद्दा विचारासाठीं घेऊं या.

प्रसोपाला यंदांच्या सार्वत्रिक निवडणुकींत कमी मतें मिळालीं हें खरेंच आहे. पण एक गोष्ट विसरतां कामा नये कीं, १९५७ च्या निवडणुकींत प्रसोपाला ज्या जागा विधान सभांमधून आणि लोकसभेंत मिळालेल्या हात्या त्यांपैकीं बंगाल व मुंबई राज्यांत मिळालेल्या जागा सयुक्त आघाडीच्या राजकारणामधून मिळालेल्या असल्याकारणानें पक्षांची खरी ताकद अजमावण्याच्या दृष्टीनें त्या भ्रामक ठरतात. त्या आघाड्या संपून प्रसोपानें आपल्या स्वतःच्या कार्यक्रमावर निवडणुकी लढवण्याचें धोरण १९६२ मध्यें सर्व राज्यांत अंगीकारल्यामुळें त्याच्या पदरांत कमी जागा पडाव्या हें अपेक्षितच होतें. मात्र हें मान्य केलें पाहिजे कीं, प्रसोपाला अपेक्षित जागाहि मिळल्या नाहींत. दुसरी गोष्ट अशी कीं १९५२ मध्यें जनसंघासारखे पक्ष निवडणुकीच्या आखाड्यांत उतरलेले नसल्यामुळें देखील त्यांच्या अनुयायांचीं मतें जीं प्रसोपासारख्या विरोधी पक्षाला मिळालीं होतीं तीं ह्या वेळीं त्यांच्या अधिकृत उमेदवारांच्या पेटींत पडलीं. ह्या पालटामुळें प्रसोपाच्या मतांत तर छाटणी झालीच; पण त्याच्या कांहीं जागाहि गेल्या असाव्यात. आमचा पराभव झाला हें नाकारण्याची आमची इच्छा नाहीं; पण त्याचा अर्थ मतदारांकडून पक्षाचा धिःकार झाला असा लावायचा काय? आणि मतदारांनीं कांहीं प्रसंगीं धिःकार कला तरी लगेच पक्ष गुंडाळून ठेवण्याच्या तजविजीला लागावयाचें काय?

## पवन-कोंबड्यांचें युग

येथें राजकीय पक्षांच्या जीवितयात्रेसंबंधीं एक मुद्दा नमूद करावयास हरकत नाहीं. पक्ष संस्थापना व पक्ष संवर्धन ह्या कांहीं लघुकथा नव्हेत. हंगामी फुलझाडांप्रमाणें आज बीं रोंवलें आणि महिन्याभरानें फुलें खुडलीं असें राजकीय पक्षांचें होत नाहीं. दुसऱ्याला सांवली देण्याची ऐपत येण्यासाठीं वर्षानुवर्षें तपश्चर्या करीत राहणाऱ्या वटवृक्षांशींच देशव्यापी राजकीय पक्षांची तुलना होऊं शकेल. एवढी प्रतीक्षा अथवा रग ज्यांच्यांत नाहीं त्यांनीं पक्षसंन्यास घ्यावा, पक्षत्याग करावा अथवा पक्षांतर करावें हें स्वाभा-

विकच आहे. पण कोणी आला आणि कोणी गेला तरी त्याची खंत, उरलेल्या पक्ष कार्यकर्त्यांनीं करतां कामा नये. उलट मी तर म्हणेन कीं, ज्यांना आतां पक्षसंघटनेबद्दल उत्साह अथवा विश्वास यापैकीं कांहींच वाटत नसेल त्यांनीं शक्य तितक्या लवकर पक्ष सोडून जावें. त्यांना मारूनमुटकून पक्षांत ठेवण्याचा अट्टाहास इतरांनीहि करूं नये. कारण प्रस्तुतचा काळ हा पवन-कोंबड्यांचा काळ आहे हें आपण ओळखलें पाहिजे. कॉँग्रेसच्या वळचणीला जाऊन राहण्याची अहमहमिका आज कार्यकर्त्यांत सुरू आहे. पण तिची अवस्था लोकमान्यांची रवानगी मंडालेला झाल्याच्या काळांत काय झाली होती, १९२४ मध्यें सत्याग्रहाचें पहिलें पर्व संपल्यावर कॉँग्रेसला कोण पुशीत होते आणि १९३४ मध्यें सत्याग्रह परत घेतल्यावर तिची अवस्था काय होती हें कॉँग्रेसमधील आजचे हौशे, गवशे व नवशे जरी विसरत असले तरी राजकारणाच्या अभ्यासकांनीं काय म्हणून विसरावें ?

## समाजवादाचे कलेवर कीं आत्मा

कॉँग्रेसनेंच समाजवादाचा स्वीकार केल्यामुळें समाजवादाच्या सिद्धीसाठीं वेगळ्या पक्षाची आवश्यकता राहिलेली नाहीं ह्या युक्तिवादाचा आतां परामर्ष घेऊं. कॉँग्रेसनें समाजवादाचा स्वीकार केला म्हणजे काय केलें ? काशीच्या बडव्यानें पाठींत बडगा मारून 'तेरे पितर सरग गये' म्हटलें कीं, आपले पितर खरोखरच स्वर्गांत पोहोंचले आहेत असें समाधान मानणाऱ्या भाविकांच्या बुद्धीनें ज्यांना ह्या कॉँग्रेस-घोषणेचा स्वीकार करावयाचा असेल त्यांच्याशीं वाद घालण्याची माझी इच्छा नाहीं. पण तुमच्या व कॉँग्रेसच्या समाजवादामध्यें काय फरक राहिलेला आहे असें जे सच्चेपणानें विचारतात त्यांना मला असें सांगावयाचें आहे कीं, कॉँग्रेसनें समाजवादाचा स्वीकार केलेला आहे हें मान्य करण्यासच मी तयार नाहीं. आजच्या युगांतील कोणतेंहि लोकसत्ताक भांडवलदारी सरकार जेवढीं लोककल्याणाचीं कामें करतें तितकीं देखील अजून कॉँग्रेसनें केलेलीं नाहींत. पुढच्या दोन योजनांच्या काळांत देखील तीं करील असा भरंवसा मला नाहीं. मग समाजवादी समाजरचनेची गोष्टच कशाला ? कॉँग्रेसची घडण समाजवादी नाहीं, कॉँग्रेसचे अर्थसंकल्प समाजवादी नाहींत, कॉँग्रेसचा आचार समाजवादी नाहीं. तिचा समाजवाद हातीं सर्व

सत्ता असूनहि केवळ कागदावरचा आहे आणि तसाच तो राहणार आहे, अशी खात्री नसती तर समाजवादी सरकारला भांडवलदार वर्ग अधिकांत अधिक पाठिंबा देतो आहे असें अद्भुत दृश्य देशांत दिसणें संभवनीय तरी झालें असतें काय ? सिंहाच्या नाकाडावर कावळे बसूं लागले म्हणजे तो मेलेला आहे याचा वेगळा पुरावा शहाणा मनुष्य तरी खासच मागणार नाहीं.

तथापि येथें आपण अधिक स्पष्ट बोलूं. काँग्रेस जर समाजवादी झालेली आहे तर तिचें समाजवादी स्वरूप सर्व राज्यांत व्यक्त व्हावयास नको काय ? पण पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, आसाम, म्हैसूर इत्यादि राज्यांतील शासन समाजवादी असल्याची अथवा होत चालल्याची भाषा प्रसोपानें आत्महत्त्या करावी असें आर्जवून सांगणारे सल्लागार चुकूनहि करीत नाहींत हें कसें ? मध्यवर्ति सरकार समाजवादी तत्त्वानुसार करआकारणी करीत नाहीं हें तर महाराष्ट्राचे अर्थमंत्री श्री. बर्वे यांनीं नुकतेंच हळहळून सांगितलें. काँग्रेस समाजवादी नाहीं असें सांगत श्री. नंदाजी गांवगन्ना हिंडत आहेत. राहातां राहतें एकटें महाराष्ट्र राज्य आणि येथेंच ज्ञानबाची खरी मेख आहे.

## अवतारी समाजवादाच्या सरंजामदारी कल्पना

संयुक्त महाराष्ट्र स्थापन होऊन श्री. यशवंतराव चव्हाणांच्या हातीं राज्याचीं सूत्रें आल्याबरोबर एकेकाला जसा कांहीं साक्षात्कार होऊं लागला. भाई बागलांसारख्यांना वाटलें कीं, बहुजनसमाजाचें राज्य आपणांस हवें होतें तें आलें ! भाई खाडिलकर, मोहित्यांना पटलें कीं, आतां आपल्या पक्षाची आवश्यकता उरलेली नाहीं, देशांत एकपक्षीय शासन असणेंच योग्य आहे ! आपल्यापैकीं ज्यांना निवडणुकीपर्यंत काँग्रेस समाजवादी दिसत नव्हती, पूतना मावशीसारखी वाटत होती, त्यांना निवडणुकींत हबका बसल्याबरोबर तीच काँग्रेस आपल्या सख्ख्या आईसारखी दिसूं लागली ! केवढा हा चमत्कार ? वास्तविक समाजवादाचा ठराव काँग्रेसनें आवडीच्या अधिवेशनांत म्हणजे किती तरी वर्षें आधीं केलेला होता. पण त्या वेळीं मुंबई राज्याचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण नव्हते ना ? त्यामुळें आपलें राज्य आलें असें या महाभागांना वाटेना ! म्हणजे संस्था तीच. तिची संघटना तीच, तिचें वर्णन तेंच, तिचे नेते तेच, तिची घोषणा तीच पण एक " शेतकऱ्याचा

मुलगा " मुख्य प्रधान झाल्याबरोबर सगळ्या निष्ठांची जणूं उलथापालथ झाली, परक्याचें राज्य आपलें झालें, पुतनेच्या उरांतून खऱ्या दुधाचा पान्हा फुटला आणि आश्चर्यांत आश्चर्य असें कीं, इतर सर्व काँग्रेसी राज्य-सरकारें अजून भांडवलदारी राहूनहि फक्त महाराष्ट्रांत तेवढी समाजवादाची गंगा प्रकटली आहे, असें मोठमोठे राजकीय नेते, वृत्तपत्रांचे संपादक आणि पक्ष कार्यकर्ते मानूं लागले. श्री. यशवंतरावांचें हें भाग्य पाहून स्वर्गातले देव देखील त्यांचा हेवा करतील यांत शंका नाहीं. आतां तर त्यांच्या जोडीला एका कामगाराचा मुलगा कामगार मंत्री झाला आहे आणि ब्राह्मणाचा मुलगा अर्थमंत्री झाला आहे. तेव्हां महाराष्ट्र राज्यांत शेतकरी, कामगार व कनिष्ठ मध्यम वर्गाचा शास्त्रशुद्ध समाजवाद येणें कोठें दूर आहे की काय ? आणि जर कां चार वर्षांनीं हेच यशवंतरावजी दिल्लीस जाऊन मंत्री झाले तर मग सगळ्या भारतांतच समाजवाद येणार यांत काय संशय ? मग बाकीचें सर्व चित्र जसेंच्या तसेंच का राहीना ! ह्या युक्तिवादावर कोण काय उत्तर देणार ? हाय रे मार्क्समुने ! हाय रे वीरा मानवेंद्रा ! ! भारतीयांच्या मनांतील एका व्यक्तीवर अवलंबून रहाणाऱ्या संरजामशाही निष्ठा इतक्या बलवत्तर कीं, त्यांच्यापुढें तुमची सारी तार्किकता, सारी विद्वत्ता व ऐतिहासिक प्रक्रियांचें तुमचें सारें ज्ञान फुंकरीसरशीं उडून जाणाऱ्या कस्पटासमान ठरावें ना ! " श्रीसंतांच्या पुण्यप्रतापें करून सर्वत्र फत्तेच होईल, " असें मानणाऱ्या गळेपडू अनुयायांचीं बाजारबुणगीं भोंवतीं जमा झाल्यावर श्री. यशवंतरावांसारखा कोणी कितीहि समाजवादी असला तरी तो काय तलवार गाजवणार आहे, असा प्रश्न मनाला पडतो.

भारताच्या राजकारणाचें रणांगण समजून घेण्याची प्रामाणिक इच्छा बाळगणाऱ्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, काँग्रेसनें प्रसोपाची दमछाक केली, जनसघाला नामोहरम केलें, हिंदी कम्युनिस्टांना लोळवलें म्हणून समाजवादाचें उद्दिष्ट गांठतां येईल अथवा येथें लोकशाही कायम होईल असें मुळींच नाहीं. देशाचें दारिद्र्य व विषमता, चीन व पाकिस्तानसारख्या शत्रूंचीं कारस्थानें आणि खुद्द काँग्रेसमधील संधिसाधु व सत्तापिपासू यांच्याविरुद्ध तिला जबरदस्त लढे द्यावे लागणार आहेत. ह्या संकटांच्या खाईतून जावें लागलें म्हणजे तिची खरी कसोटी होणार आहे. सवाई माधवरावानें

आपल्या बोथाटीनें नाना फडणविसांचें पागोटें खालीं पाडलें आणि तो त्याला हंसला. तेव्हां नानांनीं जें उत्तर केलें तें काँग्रेसवाल्यांनीं व त्याच्या समस्त भाटांनीं ध्यानीं ठेवावें. नाना म्हणाले, "आमचें पागोटें पडलें त्याची एवढी चिंता नाहीं. तुमचें सांभाळा, कारण तें देशाचें आहे." हीं जीं महासंकटें उंबरठ्यावर आणि वेशीवर आ वासून उभीं आहेत त्यांची जाणीवहि काँग्रेस-जनांना दिसत नाहीं. काँग्रेसमधले कोणी दशलहरे आणि कोणी बहिरे आपल्या हातीं सत्ता कशी ठेवावी यासाठीं अशीं कारस्थानें करण्यांत चूर आहेत कीं त्यांच्यापुढें उत्तर मोंगलाईतील व उत्तर पेशवाईतील दरबार फिके पडावेत.

आम्हांला जर जनतेनें खरोखरी झिडकारलेलें असेल तर आम्ही काँग्रेस-मध्यें गेलों तरी तिचा आमच्या जाण्यानें काय फायदा होणार आहे? फार तर तेथें आमच्यापैकीं दोघाचौघांना खुर्च्या मिळतील. उलट महाराष्ट्रांतल्या पक्षानें जर आत्महत्त्या करून घेतली तर त्याचा इतर प्रांतांतील संघटनेवर किती विपरीत परिणाम होईल? कीं आपल्याबरोबर ज्यांनीं गेलीं दोन तपें उन्हाळे पावसाळे सोसले, त्यांना स्वतःला थोडी दुरवस्था प्राप्त झाल्याबरोबर खुशाल सोडून द्यावयाचें? छे छे! ही होळकरी वृत्ति प्रथम संघटनेचा व नंतर सबंध देशाचा नाश केल्यावांचून राहणार नाहीं. देशामधील दुःख-दैन्याचा, दुराचारांचा व परशत्रूंच्या संकटांचा नाश करण्यासाठीं सर्व राष्ट्र-भक्तांनीं एकत्रित यावें, आम्ही आमच्या घरांतील व बाहेरील देशद्रोह्यांचा आणि समाजवाद विरोधकांचा निपटा करण्यास तयार आहों, अशी हांक काँग्रेसनें दिली तर तिचा विचार करणें वेगळें आणि निवडणुकींतील अपयशाचा मतलबी अर्थ लावून काँग्रेसकडे पळत सुटणें वेगळें !

तिसरा मुद्दा असा कीं, प्रसोपाला कम्युनिस्ट, जनसंघ अथवा लोहियावादी यांच्यासारख्या अतितायी भूमिका घेणें कधीं जमणार नसल्याकारणानें त्याची पकड जनमानसावर कधींच बसणार नाहीं. त्यावर उत्तर असें कीं परवां परवां मध्यप्रदेशांतील विधान सभेंत लोहियावाद्यांनीं जें केलें तसें केल्यावांचून भारतामधील जनमत जर आम्हांला अनुकूल होणार नसेल तर भले न होवो 'घटं भिंद्यात्पटं। चिंध्यात् कुर्याद्वा रासभध्वनिम् । येन केन प्रकारेण प्रसिद्धः

पुरुषो भवेत् ॥' हें तंत्र आम्ही कधींच स्वीकारणार नाहीं. जनतेपासून आम्ही जसें शिकूं तसें तिला कांहीं शिकवूंहि. गोव्याच्या मोहिमेंत व संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यांत आम्ही अतिरेकी भूमिका घेतली नाहीं तर सुयोग्य भूमिका घेतली आणि पुढें जातां सर्व पक्षांना ती स्वीकारावी लागली. ह्याच मध्यम मार्गानें आम्ही जात राहूं. आंदोलनासाठीं आंदोलन करणार नाहीं, पण अवश्य तेथें तें करण्यास कचरणारहि नाहीं. ह्या मार्गानें वाट चालत असतांनाच कॉंग्रेसचा अथवा अन्य कोणाचा मार्ग जर आमच्या मार्गास मिळाला तर आम्ही त्यांचे आनंदानें सहयात्री बनूं. विटाळ मानणार नाहीं. असे सहयात्री न भेटले, तर यावच्छक्य एकटेच आमच्या मार्गानें जात राहूं. जे थकतील ते बसतील. कोणी मार्ग बदलतील तर त्यांचा द्वेष करणार नाहीं. मग एवढें तरी समाधान मिळेल कीं जे चालत राहिले वा मार्गांत पडले ते चांगल्या मार्गावर पडले व चांगल्या मार्गानें चालले.

कॉंग्रेसच्या कृपेनें निष्ठाशून्य बनत चाललेल्या ह्या जमान्यांत निष्ठेचेंहि कांहीं मूल्य आहे, एवढें तरी आम्हांला आत्मलोपाचा उपदेश करणारे आमचे सल्लागार मान्य करतील तर मोठी कृपा होईल.

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३५५३२६ वि: निबंध
क्रमांक ........ नों दि: १७-९-८६

# जयप्रकाशांशीं विचार-विनिमय *

श्री. जयप्रकाश नारायण यांचें कर्तृत्व एवढें सर्वश्रुत, व्यक्तित्व इतकें विलोभनीय आणि विचार मांडण्याची पद्धति अशी मृदु आहे कीं ते कोठेंहि गेले तरी त्यांच्यामागें अनेक लोक जातात आणि त्यांनीं कांहींहि सांगितलें तरी त्यावर चर्चा सुरू होते. ते नुकतेच आपला इंग्लंड, युरोप व पश्चिम आशियाचा दीर्घ दौरा संपवून परत आले असून त्यांनीं व्यक्त केलेल्या विचारांची वृत्तपत्रांमधून भरपूर प्रसिद्धि झालेली आहे. आपण दौऱ्यावर असतां जें कांहीं पाहिलें आणि आपल्या विचारावर तेथील परिस्थितीची जी कांहीं प्रतिक्रिया घडून आली त्याचें विवरण पुढच्या दोन महिन्यांत प्रबंधद्वारा मांडण्याचा विचारहि जयप्रकाशांनीं बोलून दाखवला आहे. तेव्हां तो प्रबंध प्रसिद्ध होईपर्यंत त्यांच्या एकंदर वैचारिक भूमिकेविषयीं आपणांस चर्चा करतां येणार नाहीं. सध्यां दिल्ली, मुंबई वगैरे ठिकाणीं मुलाखती आणि व्याख्यानें यांच्याद्वारें त्यांनीं जे विचार मांडले त्यांतील मुख्य सूत्रापुरताच विचार करतां येईल.

जयप्रकाशजींच्या विचारांपैकीं ज्या दोहोंविषयीं येथें कांहीं लिहावयाचें असें योजिलेलें आहे ते असे : ( १ ) पाश्चात्य राष्ट्रांत लोकशाही समाजवादानें जें साध्य केलेलें आहे तें पुष्कळ असलें तरी त्यांत अपुरेपणा आहे. आणि ( २ ) भारतांत पक्षपद्धतीवर आधारलेली शासनपद्धति अपेशी ठरलेली असून पक्षविरहित शासनपद्धतीचा अंगीकार आपण केला पाहिजे.

ह्या दोन सूत्रांमध्यें जयप्रकाशजींनीं कांहीं नवें सांगितलेलें आहे असें मला तरी वाटत नाहीं. युरोपांत जाण्यापूर्वींहि हेच विचार त्यांनीं वारंवार प्रकट केलेले होते. फरक इतकाच कीं युरोपांतील लोकसत्ताक समाजवादी सरकारांनीं जें कांहीं निर्माण केलेलें आहे तें पाहून आल्यानंतर देखील आपले भारत सोडण्यापूर्वींचे विचार कायम आहेत असें ते निक्षून सांगत आहेत ! युरोपांतील समाजवादी सरकारांनीं कामगारांच्या हितासाठीं नाना-

---

* जनवाणी : ११।१०।१९५८

प्रकारच्या गोष्टी केल्या आहेत. एकास दहा याहून अधिक विषमता तेथें उरलेली नाहीं; घर, कपडा, शिक्षण, औषधपाणी, बेकारी, वृद्धावस्था ह्या सर्व बाबतींत आतां तिकडच्या सर्वसामान्य स्त्री-पुरुषाला सतत काळीज पोखरणारी विवंचना अशी राहिलेली नाहीं, हें सर्व त्यांना कबूल आहे. पण ही सगळी भौतिक सुधारणा तेथें घडलेली असली तरी "समाजवादाच्या आदर्शा" पासून तीं राष्ट्रें फार दूर आहेत, समाजामधील आपलें "दायित्व" काय ह्याबद्दल त्यांच्या विचारांत सुधारणा नाहींत, कायद्यावांचून समाज चालवूं शकणारा आदर्श मानव निर्माण करण्याच्या दृष्टीनें अजून कांहीं जागृति तेथें दिसत नाहीं याची जयप्रकाशांना हळहळ वाटत आहे हें स्पष्ट आहे.

माझ्या अल्पबुद्धीला असें वाटतें कीं आदर्श मनुष्य निर्माण करण्याची तळमळ कोणत्याहि समाजांतल्या मूठभर लोकांनाच वाटणार, तो सर्वसामान्य जनांच्या जिज्ञासेचा विषय होऊं शकणार नाहीं. सर्वसामान्य जनतेला ज्या साध्यांबद्दल नेहमीं ओढ असते तीं जर एखाद्या समाजानें तिला देऊं केलीं असतील आणि त्याचबरोबर त्याहूनहि उच्चतर ध्येयांच्या दिशेनें प्रगति करून घेण्याचे मार्ग व्यक्तीला खुले ठेवले असतील तर त्या समाजांत आपल्याला पुष्कळच अनुकरणीय असा भाग आहे असें आपण मानावयास हवें. जयप्रकाश म्हणतात कीं मी तेथील लोकनेत्यांना सर्वोदयाचा विचार सांगितला. कशाच्या जोरावर त्यांनीं हें धाडस केलें ? तर ४००० ग्रामदानें विनोबांना मिळालेलीं आहेत त्याच्या जोरावर. ह्या ग्रामदानांची सध्यांची परिस्थिति काय आहे तें जयप्रकाशजींनीं जर एकदां निर्भीडपणें पाहिलें असतें तर त्यांच्या जोरावर युरोपीय समाजवाद्यांना सर्वोदयाचें श्रेष्ठतर तत्त्वज्ञान सांगण्याचा विचार जयप्रकाशजींनीं कदाचित् सोडूनहि दिला असता. कारण सर्वोदय विचार हा अजून केवळ विचार आहे, व्यवहार झालेला नाहीं. व्यवहाराच्या क्षेत्रांत दोन पावलें टाकलीं नाहींत तोंच सरकारी यंत्रणेच्या पांगुळगाड्यावांचून चालतां येईना असा सर्वोदयवाद्यांस अनुभव येत आहे. शिवाय सर्वोदयाचें प्राथमिक ऐहिक चित्र तरी बेघरांना घरें देणें, भूमिहीनांना भूमि देणें, शेती सुधारणें, सरकारीसंस्थांमार्फत ग्रामीण जनांचे व्यवहार उरकणें हेंच आहे ना ? कीं आणखी कांहीं वेगळें आहे ? या ऐहिक बाबतींत

तर पाश्चात्यांच्या आम्ही जवळपासहि नाहीं. अशी आमची केविलवाणी परिस्थिति असतां ज्यांनीं हे सर्व प्रश्न अगदीं ठाकठीक रीतीनें सोडवलेले आहेत आणि आतां या पुढें कोठें बरें जावें यांची चिंतना जेथील विचारकांच्या मनांत चालू आहे तेथील लोकांना आमच्यापाशीं चिंतामुक्तीचा मार्ग आहे असें आम्ही सांगावें हें जरा चमत्कारिक वाटतें. स्वतःच्या पोटासाठीं दारोदार भीक मागणाऱ्या बैराग्यानें आपल्या पोतडींत क्षुधाहरण करणारी मुळी असल्याची जाहिरात करण्याइतकेंच हें हास्यस्पद नाहीं काय?

जयप्रकाशजींनीं उपस्थित केलेला दुसरा मुद्दा पक्षाबाबतचा आहे. पक्ष संघटना फोल आहेत. आपल्या देशाचे प्रश्न सोडवण्यास त्या अपात्र आहेत हा विचारहि जयप्रकाशजी मोठ्या आग्रहानें राष्ट्रासमोर मांडीत आहेत. ग्रामपंचायतीपासून जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत, नगरपालिकांतून आणि महापालिकांतून, पहिलें पाऊल म्हणून पक्षपद्धतीवर उमेदवार उभे करण्याचें बंद करावें असें त्यांनीं सुचवलें आहे. जयप्रकाशांच्याप्रमाणें ज्यांना देशामधील आजची लांचलुचपत, दिरंगाई, उपासमार दूर व्हावी म्हणून पोटतिडीक आहे त्यांच्या मनांत देखील असा विचार अनेकदां येऊन जातो कीं पुरे झाली ही पक्षांची लढाई. ह्या रेड्यापाड्यांच्या झुंजींत जनता मात्र गवतासारखी तुडवली जात आहे. त्यापेक्षां ही लढाई बंद करावी, सगळ्यांनीं एकत्र यावें आणि जनतेचे प्रश्न एकजुटीनें सोडवावे. वस्तुतः हा विचार आजच निर्माण झालेला आहे असें नाहीं. लोकमान्य टिळक व नामदार गोखले एक झाले तर काय बहार होईल ? गांधीजी व जिना एक होतील तर इंग्रजांची काय मजाल आहे आम्हांला स्वातंत्र्य नाकारण्याची ? हे उद्गार गेल्या पन्नास वर्षांत आम्ही अनेकवार ऐकलेले नाहींत काय ? आज त्यांचाच पुनरुच्चार निराळ्या परिस्थितींत होत आहे. ग्रामपंचायतीपासून महापालिकापर्यंतचे पक्ष मोडले कीं त्यांचा कारभार बिनबोभाट चालू शकेल ह्या कल्पनेला आधार कोणता ? तेथील राजकीय पक्ष मोडले तर भगवान मनूनें दोन हजार वर्षांपूर्वीं चालू केलेले जातीय पक्ष सुरू होण्यास कोणती आडकाठी उरणार आहे ? पक्षसंघटनांना शिव्याशाप देण्यापूर्वीं राजकीय पक्षामुळें कांहीं भलें झालें आहे कीं नाहीं, खालच्या पातळीवर अन्याय झाला तर वर जाऊन दाद लावून घेण्याची कांहीं सोय निर्माण

केली आहे की नाहीं, जातीवर नव्हे तर कार्यक्रमावर एकत्र येण्याची वा वेगळें होण्याची नवी प्रथा पाडली आहे कीं नाहीं, त्याचा विचार करावयास नको का ? आम्हांला तर असें वाटत होतें कीं, पक्षसंघटनांवर एवढी शिस्त धरण्याऐवजीं जयप्रकाशजी आपल्या युरोपीय दौऱ्यानंतर हें सांगतील कीं, मतभेद होतांच पक्षांमधून फुटण्याची व चतकोर नितकोर पक्ष काढण्याची जी दुष्ट संवय आमच्या राजकीय कार्यकर्त्यांत आहे ती त्यांनीं सोडून द्यावी. ब्रह्मदेशांमधील घडामोडींचा अर्थ मी तरी हा समजतों कीं, तेथील एका बलाढ्य समाजवादी पक्षाचे दोन तुकडे झाल्याबरोबर लष्करशाही आणण्यावांचून अन्य गति राहणार नाहीं हें उ नू आणि चौनियेसारख्या सूज्ञांनीं ओळखावयास हवें होतें. आठ ऑक्टोबरला पाकिस्तानांत प्रस्थापित झालेल्या हुकूमशाहीचा देखील हाच अर्थ आहे.

माझ्या मतें आजची खरी समस्या पक्ष कसे मोडावेत ही नसून लोकशाहीच्या मर्यादांचें भान ठेवून ते कसे चालवावेत ही आहे. लोकशाही समाजवादाचीं मूल्यें आपण मानतों असें जर भारतामधील सर्व पक्षच मानीत आहेत तर लोकशाही शासनपद्धतीला अनुकूल असें वातावरण तयार करण्याच्या दृष्टीनें त्यांनीं फार मोठी मजल मारली आहे असें म्हटलें पाहिजे. कारण जेथें पक्षापक्षामध्यें मूलगामी व संपूर्ण मतभेद असतात तेथें लोकसत्ताक विरोधाला आणि परिवर्तनाला खरा अवसरच नसतो; पण जेथें उद्दिष्टांची एकवाक्यता असते तेथें लोकसत्तेची चौकट अबाधित राखून तींत नवा आशय भरतां येतो आणि तें कार्य शांततामय परिवर्तनानें साधतां येतें. भारतांमधील कॉंग्रेस, कम्युनिस्ट व प्रजा सोशलिस्ट ह्या तिन्ही पक्षांना तरी सत्तारूढ झाल्यानंतर कोणत्या समस्यांना तोंड द्यावें लागतें त्याचा अनुभव आलेला आहे. विरोधी पक्षांनीं विरोधासाठीं विरोध असें धोरण स्वीकारल्यामुळें आम्हांला राज्यशासन करणें अशक्य होतें अशी तक्रार करण्याची पाळी ह्या तिन्ही पक्षावर केव्हां ना केव्हां आलेली आहे. राज्ययंत्र जनतेच्या नव्हे तर आपल्या पक्षाच्या फायद्यासाठीं सत्तारूढ पक्ष वापरीत आहे अशी टीकाहि यांपैकीं प्रत्येक पक्षावर झालेली आहे. असें असतांहि राज्यारूढ पक्ष आणि आणि विरोधी पक्ष यांनीं लोकशाहीच्या नियमानुसार कोणत्या मर्यादा पाळल्या पाहिजेत याची संहिता तयार करतां कां येत नाहीं ? विद्यार्थी,

कामगार, शेतकरी यांना पक्ष स्वार्थासाठीं कोणताहि पक्ष वापरणार नाहीं, मग तो सत्तारूढ पक्ष असो कीं विरोधी पक्ष असो; साठेबाज, लांचलुचपतखोर, आयात-चोर, गिरण्या बंद पाडणारे मालक, यांना कोणीहि संरक्षण देणार नाहीं; भाषावार प्रांत-रचना, शिक्षणाचें माध्यम, सामाजिक कायदे ह्यांसारख्या बाबतींत सगळ्यांना एकाच मापानें न्याय देण्यांत येईल; अशा सारख्या धोरणावर जितके पक्ष एकत्र येऊं शकतील त्यांना एकत्र आणलें तर कितीतरी वृथावादळें बंद होतील आणि देशाच्या प्रकृतीला आराम पडेल. त्याकरतां पक्ष मोडण्याची जरूरी नाहीं. कार्यक्रम कोणता तें न ठरवतां पक्ष मोडले तर ते विकृत स्वरुपांत तयार होतील. म्हणून पक्ष संघटना न मोडतां ती लोकसत्ताक शासनास अधिकाधिक अनुरूप कशी बनत जाईल यासाठीं प्रयत्न करावयास हवेत.

पक्ष संघटना आपल्या देशांत पांच-पंचवीस वर्षांहून जुन्या नाहींत. त्या पूर्वी हजारों वर्षें सगळें पक्षातीतच होतें ना ? अगदीं गांवांपासून दिल्लीपर्यंत ? मग त्या काळांत आम्ही कोणती प्रगति केली ? कोणते प्रश्न सोडवले ? काय ध्वज लावले ? यंत्रशक्तीमुळें समाज बिघडला अशी मागें ओरड होती. आतां पक्षामुळें घाण होत आहे ही नवी पण त्याच मासल्याची ओरड सुरू होत आहे असें माझें मत आहे. पक्ष संघटनेंत जे दोष शिरले असतील ते जरूर दूर करा पण वाड्याबरोबर ऊंस फेंकून कशासाठीं द्यावयाचा तें मला तरी कळत नाहीं.

◎ ◎ ◎

# लोकसत्तेचें भवितव्य*

आज भारताचा पंधरावा प्रजासत्ताक दिन आपण साजरा करीत आहों. उत्तर सीमेवर चीननें केलेल्या आक्रमणामुळें आजच्या सोहळ्याचें बाह्य स्वरूप जरी कमी डामडौलाचें, कमी हौसेमौजेचें असलें तरी त्यामधील स्वातंत्र्याची लालसा, समष्टीच्या श्रेष्ठतर अधिकारांविषयींची जाणीव, देशाचें सार्वभौमत्व अबाधित राखण्याविषयींचा निर्धार हीं पूर्वीपेक्षां रतिमात्रहि कमी झालेलीं नसून उलट त्यांना अधिक तेज प्राप्त झालेलें आहे, नव्हे असलें पाहिजे असें मी मानतों. पण त्याचबरोबर मनामध्यें एका शंकेचे कुसळ सतत व्रणहि करीत राहतें. बरोबर शंभर वर्षांपूर्वी गेटिसबर्गच्या रणमैदानावर भाषण करीत असतां महामना एब्राहाम लिंकननें असे उद्गार काढले होते कीं, " जनतेची, जनतेनें व जनतेप्रीत्यर्थ स्थापलेली शासनव्यवस्था जगाच्या पाठीवरून नष्ट होणार नाहीं असा निर्धार ह्या रणांगणावर जे लढले आणि धारातीर्थी पतत पावले त्यांच्या साक्षीनें आपण जे आज जिवंत आहोंत त्यांनीं केला पाहिजे." लिंकनच्याहि पूर्वी सुमारें पाऊणशें वर्षें जगांतील अनियंत्रित राजेशाह्या नष्ट होऊन त्यांच्या जागीं प्रजासत्ताक राज्यपद्धति यावी यासाठीं प्रथम अमेरिकेच्या व नंतर फ्रान्सच्या भूमीवर क्रान्तीची रंगपंचमी खेळली गेलेली होती. तात्पर्य, प्रजासत्ताक क्रान्तीचा हा विचार गेलीं दोन शतकें तरी जगामधील निरनिराळ्या मानववंशांना व समूहांना सतत प्रेरणा देत आलेला आहे. त्या एकाच विचाराच्या ध्यासानें किती जणांनीं आपल्या आयुष्याची पणती तेलाच्या शेवटच्या बिंदुपर्यंत जाळली असेल, त्याच्या सिद्धीसाठीं आतांपर्यंत किती कष्ट झाले असतील, त्यांत किती मारले गेले असतील आणि त्यांच्यावर किती काव्यें गायिलीं गेलीं असतील त्याची गणना कोण करूं शकणार ?

**' सरफरोशीकी तमन्ना अब हमारे दिलमें है**
**देखना है जोर कितना बाजुए-कातिलमें है ।'**

---

* साधना : १६-१-६३

असें बेगुमानपणें म्हणत प्रत्यक्ष मृत्यूच्या समोर हंसतमुखानें किती जण उभे ठाकले असतील, तें तरी कोणास ठाऊक ?

पण प्रजासत्ताकाच्या ध्यासानें जे प्रयत्न झाले, जीं बलिदानें झालीं, त्या ध्यासाची परिणति कशांत झालेली आज दिसत आहे ? व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिविकासाची अकुंठित संधि, नागरिकांचीं अनिर्बंध स्वातंत्र्यें इत्यादि विचार मूलस्वरूपांत आजहि पाहावयास व भोगावयास मिळतात काय ? विशेषेंकरून जगामधील झोटिंगशाही समूळ नष्ट करून व्यक्तिमात्राला चतुर्विध स्वातंत्र्यें प्राप्त करून देण्याच्या भव्य प्रतिज्ञेनें जें दुसरें महायुद्ध खेळलें गेलें ती प्रतिज्ञा आजच्या दुनियेंत कोणत्या प्रकारें फलद्रूप झाल्याचें आपण पहातों आहों ? दुसरें महायुद्ध संपल्याला आतां अठरा वर्षें पूर्ण होत आलीं. एवढ्या अवधींत जीं अनेक स्वतंत्र राष्ट्रें आफ्रिका व आशिया खंडांत उदय पावलीं आहेत, त्यांच्यांत कोणत्या शासनपद्धति विद्यमान आहेत, कोणते विचार बळ करीत आहेत ?

## सद्यःस्थितीचें स्वरूप

अगदीं वरवर दृष्टि टाकली तरी असें लक्षांत येतें कीं, स्वातंत्र्य प्राप्त होण्याच्या आधीं ह्या सर्व देशांमधील जननेते अमेरिकन अथवा फ्रेंच राज्य-क्रान्तीला प्रेरणाभूत ठरलेल्या विचारांच्या आसऱ्यानेंच आपल्या संघटना बांधीत होते. आपल्या देशामधील एकतंत्री व जुलमी राजवट नष्ट झाली कीं तेथें आपण आपली, आपल्या गटाची अथवा पक्षाची सत्ता प्रस्थापित करणार आहों असें कोणताहि नेता चुकूनहि बोलला नसेल. ‘ कम्युनिस्ट पक्षाची सर्वाधिकारशाही स्थानापन्न झाल्याशिवायचें स्वातंत्र्य हें स्वातंत्र्य नव्हे आणि जनसत्ता ही जनसत्ता नव्हे ’ अशी खूणगांठ मनांत मारून बसलेले कम्युनिस्टदेखील स्वातंत्र्यपूर्व काळांत असेंच बोलत व लिहीत असतात कीं, “ जनतेचें, जनतेनें व जनतेसाठीं चालवलेलें शासन हेंच आमचें ध्येय आहे.” परंतु एकदां प्रस्थापित राजवट कोसळली कीं, ही सर्व भाषा जाऊन ह्या ना त्या सबबीवर सर्वाधिकारशाहीची वाट हे जननेते चालूं लागतात असा अनुभव गेल्या पंधरा वर्षांत भारताचा अपवाद सोडतां सर्व देशांत आलेला आहे. त्यांत संयुक्त अरब प्रजासत्ताक, इंडोनेशिया व पाकिस्तान असे इस्लामी

देश आहेत; व्हिएटनाम, कांबोडिया, सयाम व ब्रह्मदेश यांसारखे बुद्धधर्मीय देश आहेत; आणि घाना, टांगानिकासारखे आतांपर्यंत फार मागसले मानले गेलेलेहि देश आहेत. भारतामध्यें लोकसत्ता जीव धरून असली तरी ' एक नेता, एक विचार, एक संघटना ' अशा स्वरूपाच्या ज्या घोषणा प्रसंगोपात्त निघतात त्यावरून राज्यकर्त्या पक्षाला कशा प्रकारचीं स्वप्नें अधूनमधून पडत असतात तें दिसून येतें आणि त्यावरून वारंवार हेंच सिद्ध होतें कीं, भारतामध्येंहि एकपक्षीय अधिकारशाही स्थानापन्न झाल्यास त्यांत वावगें होणार नाहीं असें मानणारांचा एक मोठा वर्ग आपल्याकडे विद्यमान आहे. भारतांतील राज्यकर्ता पक्ष तर महात्मा गांधींचा प्रत्यक्ष वारसा सांगणारा असून आफ्रिकेमधील अनेक नेते आपण गांधीच्या विचारांनीं प्रेरित झालों असल्याचें मुद्दाम सांगत असतात आणि तरीहि अशी भाषा बोलतांना आढळतात हें विशेष.

## ही तफावत कां ?

मग असें कां व्हावें कीं स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळामधील विचारांत इतका फरक पडावा ? ह्यांपैकीं बरेच नेते पवनकोंबड्याप्रमाणें वारा येईल तशी पाठ फिरवणारे असतील, हें मान्य करण्यास हरकत नाहीं. पण सगळेच तसे असतील हें बोलणें योग्य होणार नाहीं. जे निष्ठावान् आहेत, त्यांनीं देखील आपले विचार बदलावे आणि प्रजासत्ताक शासनपद्धतीचा मार्ग सोडण्यावांचून गत्यंतर नाहीं अशा निर्णयाप्रत यावें असा बिनतोड पेंच परिस्थितीमुळें त्यांच्यासमोर निर्माण होत असावा काय ? टांगानिकाचे अध्यक्ष न्येरेरे यांनीं अलीकडे प्रसिद्ध केलेल्या दहा हजार शब्दांच्या प्रबंधांतील जीं अवतरणें वृत्तपत्रांमधून छापून आलीं आहेत तीं वाचलीं म्हणजे मी काय म्हणतों तें अधिक लक्षांत येईल. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा कीं, प्रजासत्ताक शासनपद्धति इष्ट खरी, पण आफ्रिकेमधील समाजांना एकमुखी व एकावयवी नेतृत्वाची संवय जमातबंद समाजरचनेमुळें लागलेली असल्याकारणानें पाश्चात्य पद्धतीचें प्रजाशासन त्यांना जमणार नाहीं; पण त्यांना मानवेल अशा शासनांत सत्ता केंद्रित होणार असली तरी तिला हुकूमशाहीचें स्वरूप प्राप्त झालेंच पाहिजे असें मात्र नाहीं. कांहीं प्रजासत्ताक पद्धतीचे

अंकुश निर्माण करतां येतील. सरकार परस्परविचारविनिमयानेंच चालावें पण त्याचा अर्थ त्यासाठीं वेगवेगळे पक्ष संघटित झालेले असण्याची जरूरी नाहीं. सनदी नोकर व जनतेचे प्रतिनिधि यांच्यांत अंतर राहूं नये. सनदी नोकरांमध्यें समाजांतील श्रेष्ठ बुद्धीचे लोक असतात. पण बहुपक्षीय शासनांत सत्तेचा खांदेपालट होण्याची शक्यता असल्याकारणानें कोणत्याहि प्रश्नावरील चर्चेत ह्या सनदी नोकरांना सहभागी करून घेण्यांत येत नाहीं. त्यामुळें त्यांच्या बहुमोल सल्ल्याचा लाभ समाजाला मिळत नाहीं, इत्यादि. पण हें नवल नव्हे काय कीं, जी गोष्ट न्येरेरे आफ्रिकेमधील जमातबंद समाजाचा दाखला देऊन अपरिहार्य ठरवतात तीच ज्या फ्रान्ससरख्या देशानें जगाला प्रजासत्ताक शासनांचा संदेश दिला व जो आज जगांतील एक अग्रगण्य उद्योगप्रधान देश मानला जातो त्या देशांतहि घडत असून तेथेंहि प्रजासत्ताक शासनाचें जवळजवळ एकपक्षीय राजवटींत परिवर्तन घडत आहे ! हा दाखला मीं अशासाठीं दिला कीं, प्रजासत्ताक शासनपद्धतीमध्यें जें पालट होत आहेत त्यांचीं कारणें केवळ मागसलेपणा, कृषिप्रधान समाजरचना, किंवा समाजाच्या अंगवळणी पडलेल्या शासनपद्धतींत न शोधतां, आणखी वेगळ्या ठिकाणीं शोधावयास हवींत. फ्रान्सच्या परिस्थितीची मीमांसा येथें करूं गेलें तर विवेचन लांबेल. म्हणून तेथील समस्या जरा बाजूला ठेवून ह्या ठिकाणीं नवमुक्त देशांचाच विचार थोडक्यांत करूं.

## नवमुक्तांची विवंचना

पारतंत्र्यामधून मुक्त झाल्याचा उत्साह पहिल्या स्वातंत्र्यदिनाचा सोहळा पार पडल्यानंतर पुरे चोवीस तास तरी टिकत असेल कीं नाहीं याची मला शंका वाटते. या स्वतंत्र झालेल्या देशांतील अधिकाराचीं पदें कोणीं भूषवावीं ह्याविषयीं लगोलग कसे वाद सुरु होतात व त्यांतून कोणत्या प्रकारची कटबाजी व गटबाजी सुरू होते तें ब्रह्मदेश अथवा कटांगा यांच्या उदाहरणा-वरून समजण्यासारखें आहे. राज्य करण्याचा अनुभव तर राहोच, पण साधें पुस्तकी ज्ञानसुद्धां ज्यांच्या गांठी नाहीं अशा नेत्यांना अनपेक्षितपणें अधि-काराच्या खुर्च्यांवर बसण्याची पाळी आल्यानंतर त्यांची तारांबळ व्हावी किंवा ते कोणाच्या तरी हातांतलें खेळणें बनावें, हें ओघानेंच येतें. परंतु नेते

जरी मुरलेले असले, विद्वान् असले तरी त्यांनाहि मार्ग दिसूं नये अशी प्रश्नांची कोंडी नवमुक्त देशांत निर्माण होते, यांत शंका नाहीं. जे परतंत्र देश स्वतंत्र होतात त्यांच्यासमोर सबंध समाजाची घडी नव्यानें बसवण्याचा प्रश्न उभा राहातो. शिक्षण, आरोग्य, शेती, कारखानदारी, दळणवळणाचीं साधनें असे एक ना दोन शेंकडों प्रश्न त्यांना भंडावूं लागतात. पाश्चात्य जगांतलीं राष्ट्रें, मग तीं प्रजासत्ताक असोत, नृपसत्ताक असोत कीं पक्षसत्ताक असोत, विकासाच्या बाबतींत इतकीं पुढें गेलेलीं आहेत कीं त्यांच्यासारखीं सुखें व संपत्ति आपणहि प्राप्त करून घेतलीं पाहिजे असें नवमुक्त देशांतील जनतेला साहजिकच वाटत असतें. मात्र त्याकरतां तिकडील अमेरिका-इंग्लंड आदि राष्ट्रांना जो कालावधि मिळाला तेवढा काळ दम धरण्याची जनतेची तयारी नसते ! त्यांना त्यांचें आजचें वैभव प्राप्त होण्याकरतां प्रथमच्या अवस्थेंत ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या त्या स्वेच्छया सहन करण्यास जनता तयार होत नाहीं आणि जनमतावर चालणारीं तेथील सरकारें जनतेकडून तसा त्याग करवून घेण्याची हिंमतहि करूं शकत नाहींत. त्याचबरोबर तेथील औद्योगिक प्रगतीला कारणीभूत झालेली जी विद्या तिचा तर येथें ओनामाहि झालेला नसतो.

'सर्वारंभास्तंडुला अर्थमूलाः ।' ही सर्वत्र लागू पडणारी म्हण आहे. कष्ट व त्याग यांतून धबधब्यासारखी निर्माण होणारी धनाची गंगा ही सगळ्या औद्योगिक विकासाचें मूळ आहे. ही गंगा अमेरिकेमध्यें रेड इंडियनांच्या जमिनी हिसकावून घेऊन व 'जंगल' या कादंबरींत वर्णन केल्याप्रमाणें कामगारांना १२–१६ तास राबवून १८६५ ते १९०० पर्यंतच्या काळांत निर्माण झाली. इंग्लंडच्या दारांत साम्राज्याची कामधेनु उभी होती आणि परसांत ८–१० वर्षांपासूनची कामगार मुलें अहोरात्र राबत होतीं. रशियाच्या स्टॅलिननें कामगारसत्तेच्या जयघोषानें आधीं कामगारांना कसा कैफ चढवला आणि नंतर त्यांना व शेतकऱ्यांना यमदरबार दाखवून त्यांच्याकडून रशियाचा कायापालट कसा करवून घेतला ती कथा ख्रुश्चोवनेंच कथन केलेली आहे. चीनमधील अतिरिक्त मूल्य कसें तयार केलें जातें आहे तें आपण पाहातच आहोंत. सर्वसामान्य जनतेला पायांत गाडल्यावाचून विकासाचें सुवर्ण-मंदिर उभें राहूं शकत नाहीं, असाच जर ह्या विकास-

स्थापत्याचा अटळ सिद्धांत असेल तर त्याचा उपसिद्धांत असा ठरतो कीं सर्वमामान्य जनतेला भुईंत गाडण्याचें काम कोणाला तरी करावें लागेल, ती कांहीं स्वखुषीनें स्वतःला गाडून घेण्यास तयार होणार नाहीं. जनतेचा आवाज उठवणारे पक्ष देशांत असतील तर ते स्वस्थ बसणार नाहींत व अधिकारारूढ पक्षाला जुलूमजबरदस्ती करूं देणार नाहींत. मग ह्यावर उपाय काय ? सहज सुचणारा उपाय असा कीं, विरोधी पक्ष व सर्वसाधारण जनता ह्यांच्या तोंडाला कुलपें ठोकायचीं व सर्व सत्ता कोणत्यातरी पक्षानें वा लष्करी गटानें आपल्या हातीं घेऊन आपल्या इच्छेनुसार राज्यकारभार करावयाचा. एकदां राज्यसूत्रें अशा प्रकारें हातीं घेतलीं कीं, आपण जें जें करूं त्याला जनतेचा ‘ एकमुखी ’ पाठिंबा आहे असा देखावा करणें हा राजसत्तेच्या हातचा मळ असतो. मग आपल्या कृत्यासाठीं योग्य तें तत्त्वज्ञानहि बनवतां येतें. पण सर्व सत्ता येणेंप्रमाणें एकाच गटाच्या हातीं आल्यानंतर तरी देशाचा विकास झपाट्यानें होईलच, असें निश्चित सांगतां येणार नाहीं. पण झाला तर तो याच मार्गानें होईल, असें ह्या विचाराच्या समर्थकांचें प्रतिपादन आहे.

## दोन संभाव्य उत्तरें

प्रजासत्तावाद जे मनापासून मान्य करतात त्यांना ह्यावर काय उत्तर देतां येईल ? माझ्या मतें दोन प्रकारें उत्तर देणें शक्य आहे. एक असें कीं मतस्वातंत्र्य, विचार, उच्चार व आचारस्वातंत्र्य ह्या बाबी राहावयास घर, नोकरीची शाश्वती, वृद्धवेतन इत्यादिकांचा लाभ करून घेण्याचीं साधनें नसून श्रेष्ठतर मानवी जीवनामधील वेगळीं स्वयंभू मूल्यें म्हणून त्यांना किंमत आहे हा विचार प्रजासत्तावाद्यांच्या मनांत सुप्रतिष्ठित व्हावयास पाहिजे. दुसरें असें कीं, व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि समाजाची ऐहिक उन्नति यांच्यांत मूलतःच विरोध आहे कीं काय, याचा विचार केला तर तशी वस्तुस्थिति नसून लोकसत्तेला खऱ्या अर्थानें संधीच दिली गेलेली नाहीं, खऱ्या अर्थानें तिचा वापरच झाला नाहीं, असें मला म्हणावेंसें वाटतें. भारतासारख्या देशांत लोकसत्ताक आहे म्हणूनच तेथें नाना प्रकारचे काळ्याबाजारासारखे, लांचलुचपतीसारखे, कामचुकारपणासारखे निंद्य प्रकार चालू आहेत असें म्हणणें

योग्य ठरेल काय? लोकसत्ता ही अशीच भोंगळ असावयाची, तिला खंबीर-पणानें शासन करणें जमावयाचेंच नाहीं, तिची गति नेहमींच मंद असावयाची असे कांहीं अपरिवर्तनीय सिद्धांत आहेत काय? चाबूक पाठीवर असेल तरच कामगार काम करणार, हा सिद्धांत मान्य केल्यावर आपणाला सर्व-काळ सर्वाधिकारशाहीच्या अंमलाखालीं रहाण्याचीच तयारी ठेवली पाहिजे. मग वेगळें कांहीं करणें आपणांस शक्य होणार नाहीं. स्वैरवर्तन आणि प्रजासत्ताकांत अभिप्रेत असलेलें मतस्वातंत्र्य यांच्यामध्येंहि असाच गोंधळ करण्यांत येत आहे असें मला वाटतें. प्रजासत्ताकामध्यें कष्टांना कामचुकार-पणापेक्षां व ज्ञानाला तोंडपुजेपणापेक्षां, उद्योगाला ऐतखाऊपणापेक्षां व नेकीला हरामखोरीपेक्षां अधिक मान मिळतो असा जर अनुभव जनतेला मिळत गेला आणि समाजकंटकांचें पारिपत्य कठोरपणें होतें असा दाखला मिळाला तर समाजाचा विकास जनतेचीं सर्व स्वातंत्र्यें अबाधित राखूनहि करतां येतील असा मला विश्वास वाटतो. हा विश्वास ज्या मानानें आपल्या देशांतील सर्वसाधारण नागरिकांत फैलावेल त्या मानानें आपलें प्रजासत्ताक बळकट व उत्कर्षशील बनेल. परंतु परिस्थिति त्याच्या उलट होत चालली असेल तर येथील प्रजासत्ताकाचें रूपांतर सर्वाधिकारशाहींत केव्हां होईल त्याचा पत्ताहि लागणार नाहीं. आणि भारतामधील प्रजासत्ताक जर नष्ट झालें कीं गेलीं दोनशें-अडीचशें वर्षें एकतंत्र व प्रजातंत्र यांच्यामधील अखंड चाललेल्या लढ्यांत प्रजातंत्राचा पराभव झाला असें ठरून येथून पुढें एकतंत्र राजवटीचा नवा जमाना जगांत पुनरपि सुरू झाल्याचें मान्य करावें लागेल.

◎ ◎ ◎

# भारतामधील संभाव्य संघर्षांचीं बीजें *

एकराष्ट्रीयत्वाची कल्पना ही सहजसाध्य नाहीं. त्या कल्पनेचें संगोपन जाणीवपूर्वक करावें लागतें. त्या मार्गांतील संभाव्य धोके टाळण्याचा प्रयत्न करावा लागतो. हिंदुस्थानांत आपल्याला जें ठोस राष्ट्रीयत्व निर्माण करायचें आहे त्या एकराष्ट्रीयत्वाचा आधार कोणता ? एकच आधार सांप्रत दिसतो आहे. धर्माच्या व संस्कृतीच्या आश्रयानें जोपासली गेलेली भारत एक असल्याची अस्पष्ट जाणीव, तेवढा एकच आधार. पण हा आधारहि खंबीर नाहीं. पसतीस कोटींचें एक राष्ट्र ही आधुनिक काळांतली राष्ट्रीयत्वाची कल्पना प्राचीन काळीं नव्हती. इंग्रज येथून गेले तेव्हां भारतीय भूमीचें विभाजन करावें लागलें ह्याचा अर्थच असा कीं, स्वातंत्र्य प्राप्त झालें त्या वेळींहि एकराष्ट्रीयत्वाची जाणीव सबंध देशांत म्हणावी अशी रुजली नव्हती. देशांत मुसलमानांइतक्या प्रबळ जर दुसऱ्या जमाती असत्या तर देशाचे आणखींहि तुकडे कदाचित् झाले असते. परस्परविरोधी धर्मभावनावर मात करूं शकेल, असें राष्ट्रीयत्व आपल्यापाशीं नव्हतें हाच विभाजनाचा अर्थ आहे. राजा राममोहन राय यांच्यापासून तहत गांधीजींपर्यंत सतत शंभर वर्षे नानाप्रकारें या देशांत एकराष्ट्रीयत्व, जातिधर्मातीत एकराष्ट्रीयत्व निर्माण करण्याचे प्रयत्न झाले, पण तरीहि स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळीं सर्वांचा समावेश असलेलें एकराष्ट्र आपण निर्माण करूं शकलों नाहीं. म्हणजे राष्ट्र-भावना पराभूत झाली हें उघड आहे.

## राजकीय क्षेत्रांतील संघर्ष

अमेरिका व रशिया या देशांत संघराज्यात्मक घटना आहे. भारताची घटनाहि त्याच स्वरूपाची आहे. पण त्यांच्याशीं तुलना करतां त्यांतील फरक ध्यानांत येतो. अमेरिकेंतील संघराज्यात्मक घटना आणि आपल्याकडील घटना यांच्या घडणींत फरक आहे. इंग्लंडशीं संबंध तुटला त्या वेळीं अमेरिकेंतल्या तेराहि वसाहती स्वतःला स्वतंत्र मानीत होत्या. तहाच्या वेळीं

* आहिताग्नि राजवाडे मंदिरांतील व्याख्यान, साधना, १६-११-१९५७

या सर्वांचा मिळून एकच प्रतिनिधि आलेला पाहिला तेव्हां इंग्लंडमध्यें त्याला-खोचकपणें विचारण्यांत आलें कीं इतर वासाहतींचे परराष्ट्रमंत्री कुठें आहेत? ह्या चुटक्याचें तात्पर्य असें कीं त्या वसाहती स्वतःला सार्वभौम स्वतंत्र देश समजत असत. अशा या सार्वभौम वसाहतींनीं लवकरच एक मध्यवर्ती सत्तेची गरज ओळखली व स्वेच्छेनें आपल्या अधिकारांत कांहीं कपात करून मध्यवर्ती सत्ता निर्माण करून तिच्या सुपूर्द ते केले. आपल्याकडील प्रक्रिया याच्या अगदीं उलट आहे. इंग्रजांच्या हातची सत्ता काँग्रेसला मिळाली. ह्या खंडप्राय देशांत एककेंद्री सत्ता इष्ट नाहीं, असा प्रांतोप्रांतींच्या प्रतिनिधींनीं एकत्र जमून विचार केला व मध्यवर्ती सत्तेनें आपले अधिकार कांहीं प्रमाणांत प्रांतांकडे सोपवले. रशियांतली परिस्थिति मात्र बरीचशी आपल्यासारखीच आहे. तेथेंहि प्रथम एक मध्यवर्ती सत्ता अस्तित्वांत आली आणि नंतर त्यांनीं तिला राज्यसंघाचें रूप दिलें. अमेरिकेंत घटकांनीं स्वेच्छया आपली सत्ता कमी करून एक केंद्रीय सत्ता निर्माण केली तर भारतांत आणि रशियांत केंद्रीय सत्तेनें कारभाराच्या सोयीसाठी घटकांना सत्ता दिली.

संघराज्याच्या सिद्धीच्या प्रक्रिया येणेंप्रमाणें वेगळ्या असल्या तरी ह्या सर्व देशांत घटक आणि केंद्र यांच्यांत संघर्ष झालेले आहेत. नुकताच निग्रोंना गोऱ्यांच्या शाळेंत प्रवेश करूं देण्याच्या निमित्तानें लिटलरॉकमध्यें बंडावा करण्याचा प्रयत्न झालेला आपण पाहिला. मध्यवर्ती सत्ता आणि घटकांची सत्ता यांच्या अधिकारमर्यादांबाबतचा तो प्रश्न होता. रशियांत एकपक्षीय हुकूमशाही असल्यानें घटक-केंद्र यांतील संघर्ष प्रकट रूपानें दिसत नाहींत, पण तसे संघर्ष तेथेंहि असले पाहिजेत, असें जाणवतें. तेथें संघर्ष करणारांवर देशद्रोहाचा शिक्का बसतो. त्यांना स्वतंत्र विचारकांची प्रतिष्ठा लाभण्याऐवजीं त्यांची रवानगी सैबेरियांत केली जाते. अमेरिकेंत दक्षिणेंतल्या व उत्तरेंतल्या संस्थानांचा संघर्ष झाला पण त्यामागें कांहीं विचार आहे, निव्वळ स्वार्थ नाहीं असें तेथें मानण्यांत आलें.

केंद्र आणि घटक असे संघर्ष जर बहुदलीय राज्यव्यवस्थेंत संभवतात आणि आपल्या देशांतहि आपण जर बहुदलीय राज्यव्यवस्था निर्माण केली आहे तर आपल्याकडे सुद्धां अशा प्रकारचे संघर्ष होण्याची शक्यता नाहीं काय? आपण त्यांचा परिहार कसा करणार आहों? आपल्या घटनेनें केंद्राला

भरपूर आधेकार दिलेले आहेत. घटकांचा बंडावा त्यांना मोडतां येईल. पण तेवढ्यानें समाधान मानून चालेल काय? खरा प्रश्न अशा प्रकारच्या संघर्षांच्या प्रसंगांत एकराष्ट्रीयत्वाची भावना जागृत आणि प्रबळ ठेवणारे भावनात्मक बंध निर्माण करण्याचा आहे. कारण अशा प्रकारचे भावनात्मक बंध निर्माण झाले तरच आपली एकराष्ट्रीयत्वाची भावना भरीव होईल व अधून-मधून उद्भवणाऱ्या संघर्षांवरहि ती मात करूं शकेल.

आज देशांतील सर्व घटकराज्यांत आणि केंद्रांत एकच पक्ष अधिकारावर आहे. पं. जवाहरलाल नेहरूंच्या हातीं त्या पक्षाचीं सर्व सूत्रें एकत्र गुंफल्या-सारखीं वाटतात व त्यामुळें केंद्र-घटक यांचे संबंध समजुतीचे व स्नेहाचे आहेत, असें भासतें. पण सबंध देशाच्या ऐक्याची मदार अशी एकाच पक्षावर वा व्यक्तीवर असणें हें आज सोयीचें वाटलें तरी अंतिम दृष्ट्या उप-कारक ठरणार नाहीं. आजचा हा आधार अजरामर असावा, अशी कितीहि प्रामाणिक इच्छा असली तरी वास्तवाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. एक दिवस हा व्यक्तीचा आधार तुटणार आहे, हें सत्य आहे व तें आपण ध्यानांत घेतलेंच पाहिजे. एकट्या पंडितजींमुळें आपलें ऐक्य टिकून आहे, ही भावना त्या व्यक्तीच्या कर्तबगारीला भूषणभूत ठरली तरी संघराज्याच्या निरंतर अस्तित्वाच्या दृष्टीनें विचार करतां ती घातकच आहे. पंडितजींच्या नंतर आपल्या एकराष्ट्रीयत्वाचा आधार काय, याचा विधायक विचार अद्याप होतांना दिसत नाहीं, हें दुर्दैव आहे. अशी एकतेची भावना निर्माण करणें हें सर्वांचें कार्य आहे. सर्व कारभारयंत्रणा त्या दृष्टीनें कार्यशील झाली पाहिजे. अमेरिकेंतील न्यायदान खात्यानें या दृष्टीनें फार महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. तेथील प्रारंभींच्या काळांतील न्यायाधीश मार्शल यांनीं न्यायपीठावरून ऐक्याची भावना जोपासण्याचा व केंद्राचें सार्वभौमत्व लोकांच्या मनावर बिंबवण्याचा फार मोठा प्रयत्न केला. केंद्र-घटक संघर्षांत केंद्राची सत्ता निर्णायक ठरावी, अशी भावना तेथील न्यायपीठांनीं लोकमानसांत रुजवली. आपल्या देशांतील न्याय खात्यांनींहि असा प्रयत्न केला पाहिजे. मनांतले दुरावे कायम राहिले तर घटनापुस्तकांतली एकराष्ट्रीयत्वाची कल्पना संघर्ष टाळूं शकणार नाहीं. कायद्याच्या झाडाभोंवतीं सहभावनांचें आळें पाहिजे. केंद्र-घटकांत सहसंवेदना हव्यात. भारतीय संघराज्याच्या भावी जीवनांत राजकीय

दृष्टीनें विचार करतां केंद्र-घटक संबंधाचा प्रश्न हें एक संभाव्य संघर्षबीज आहे, असें दिसतें.

## प्रादेशिक विषम आर्थिक विकास

आर्थिक रचनेंतहि संघर्षाचीं बीजें संभवत असतात. घटनात्मक संबंधांप्रमाणेंच आर्थिक संबंधहि एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेला पोषक असले पाहिजेत. अमेरिकेंतील उत्तर–दक्षिण घटकराज्यांच्या संघर्षाचीं कारणें मूलतः आर्थिकच होतीं. उत्तरेकडील राज्यांनीं औद्योगिक व यांत्रिक बाबतींत प्रचंड प्रगति करून घेतली होती. त्या मानानें दक्षिणेकडील राज्यें मागसलीं होतीं. उत्तरेकडे औद्योगिक शहरें वसलीं होतीं तर दक्षिणेकडे शेतीप्रधान उत्पादन-व्यवस्था होती. स्वाभाविकतःच व्यवसायपद्धतींच्या अनुषंगानें दोन्ही भागांचा विकास भिन्न झालेला होता व जीवनपद्धतीहि भिन्न होती. उत्तरेकडील विभागाचें कॉंग्रेसमध्यें प्राबल्य असल्यानें त्यांनीं आपल्या विकासाला साह्यभूत होणारे कायदे व कार्यक्रम पुढें आणले. परदेशांतून आयात होणाऱ्या मालावर जकाती बसवून आपल्या कारखानदारीच्या रक्षणाची सोय ते करूं पहात होते. उद्योगधंद्यांना उपकारक ठरणारी वांहातूक–व्यवस्था त्यांनीं आंखली होती. दक्षिणेंतल्या शेतकरी वर्गाची ह्या कायद्यांमुळें व कार्यक्रमामुळें आर्थिक कुचंबणा होत होती. त्यांच्या शेतीउत्पादनाला संरक्षण नव्हतें, भावांची शाश्वति नव्हती. उलट परदेशी माल आयात जकाती बसवून मर्यादित केल्यामुळें त्यांना उत्तरेकडला औद्योगिक माल महाग किंमतीला घ्यावा लागत होता. आपल्या जिवावर उत्तरेकडील संस्थानें श्रीमंत बनत आहेत आणि हा एक अन्याय आहे, अशी दक्षिणेकडल्या लोकांची भावना होती. प्रदेशांच्या विषम आर्थिक विकासामुळें घटक व केंद्र यांना समान सत्ता असावी, अशी मागणी जोरानें पुढें आली. दक्षिणेंतल्या संस्थानांना वाटे : संघराज्य हा एक देशी वसाहतवादच बनूं पहात आहे. आपल्या परदेशी वसाहतींच्या जोरांवर साम्राज्यें परिपुष्ट झालीं त्याच तऱ्हेनें घटक राज्यांना वसाहतीच्या दर्जाला आणून केंद्रीय सत्ताधीश आपलें हित साधीत आहेत, अशी भावना बळावली होती. दक्षिण व उत्तर यांच्यांतील विषम आर्थिक विकासामुळें मनांत धुमसणारा संघर्ष प्रकट होण्याला कांही तरी निमित्त

शोधीत होता. निग्रोंच्या मुक्तीचें निमित्त त्याला मिळालें. निग्रो गुलामांची मुक्तता हा तात्त्विक मुद्दा या संघर्षाच्या मुळाशीं नव्हताच. कारण संघराज्याचें ऐक्यच लिंकनलासुद्धां महत्त्वाचें वाटत होतें. 'गुलामीचा संपूर्ण विनाश करून, जरूर तर अंशतः ती कायम ठेवून किंवा जरूर तर त्याची चर्चा टाळून पण संघराज्याचें अस्तित्व कायम ठेवलें पाहिजे,' असा त्याचा दृष्टिकोन होता. 'उत्तरेचें दक्षिणेवरील आर्थिक वर्चस्व' हें कारण पुढें करण्याऐवजीं सर्व गौरकायांची सहानुभूति आपल्या बाजूला यावी या दृष्टीनें दक्षिणेकडील राज्यांनीं गोऱ्यांचें काळ्यांवरील वर्चस्व कायम राखण्याचें निमित्त करून हा लढा लढवला. प्रादेशिक आर्थिक विषमतेंतून अशा प्रकारें ऊग्र संघर्ष निर्माण होऊं शकतात हें याचें तात्पर्य आहे. पोलंड, हंगेरी, युगोस्लाव्हिया या रशियाच्या अंकित प्रदेशांनीं केलेले बंडावे अशाच प्रकारचे आहेत. पोलंड, हंगेरी, युगोस्लाव्हिया या देशांना कच्चा माल पुरवणाऱ्या वसाहतींच्या दर्जाला आणून रशिया आपला औद्योगिक उत्कर्ष करूं पहात आहे, असा त्या देशांचा आक्षेप होता.

आपल्या देशांतहि अशा प्रकारचा संघर्ष संभवतो. आपल्या देशांत प्रादेशिक विकासांत विषमता निर्माण होत आहे. राज्यकर्ते योजनापूर्वक पंक्तिप्रपंच करतात असें नव्हे, पण घडत आहे तें चिंताजनक आहे. छोटा-नागपूर ते कलकत्ता या विभागांत खनिजें विपुल आढळतात. त्यामुळें औद्योगिक विकास या भागांत होणार. प्रचंड भांडवल येथें गुंतवावें लागणार. पोलाद हा मूलभूत व्यवसाय आहे. सुमारें ५०० कोटींचें भांडवल त्यांत गुंतवावें लागणार आहे. तें सर्व या भागांतच येईल. त्याला पूरक म्हणून खाणीचा धंदा, त्याला आवश्यक म्हणून वाहातूक व वीजनिर्मिति अशी ही सांखळी बनणार आहे. अर्थातच ह्या कारखानदारीच्या भागांत जीवनावश्यक वस्तूंची रेलचेल व सुखसोयींची वाढ होईल. पण अशा प्रकारचीं खनिजद्रव्यें नसलेल्या प्रदेशांचें काय ? आसाम, पंजाब, राजस्थान, महाराष्ट्र हा विभाग खनिज द्रव्यांच्या दृष्टिनें दरिद्री असावा, असें दिसतें. औद्योगिकदृष्ट्या विकसित प्रदेशांत पुरुषार्थाला संधि असल्यानें होतकरू माणसांचा प्रवाह तिकडे वहात राहील. बुद्धिमत्ता, कला, सांस्कृतिक कार्य त्याच भागांत केंद्रित होईल. इतर प्रदेश कृषिप्रधान व एखादाच प्रदेश

उद्योगप्रधान झाला तर त्यांतून वैमनस्यें निर्माण होण्याची शक्यता आहे. तेलशुद्धीकरण कारखाने आपल्याच प्रदेशांत काढण्याची आसामची मागणी ही आपल्याला एक पूर्वसूचनाच होय.

अमेरिकेंत औद्योगिकदृष्ट्या विषम विकास झालेला असला तरी तेथील परिस्थिति आपल्यापेक्षां फारच भिन्न आहे. आपल्याकडील भूमि आणि लोकसंख्या यांचें प्रमाण व अमेरिकेंतील प्रमाण यांत फार तफावत आहे. औद्योगिक उत्पादनाशीं तुल्य उत्पादन साधण्याइतकी मोठी जमीन कसवटी खालीं आणण्याला तेथील शेतकऱ्यांना वाव आहे. आपल्याकडली स्थिति वेगळी आहे. औद्योगिक केंद्राभोंवतीं जो उत्कर्ष होईल त्याची बरोबरी शेतीप्रधान प्रदेशाला करतां येणार नाहीं. शेती हा बरकतीचा धंदा होईल, असें आर्थिक धोरण नसेल तर ही विषमता एकसारखी वाढत जाईल. खेड्यांत शहरांतील सर्व सुखसोयी जर मिळाल्या, वीज पोंचली आणि शेतीचा धंदा बरकतीचा झाला तर बुद्धिमान् माणसें त्या धंद्यांत राहातील. नाहींतर शेतीप्रमाणेंच खेडींहि बुद्धिमत्तेच्या दृष्टीनें धुपून निघतील. मग विषमता आर्थिक क्षेत्रापुरतीच मर्यादित न राहतां ती अशाप्रकारें जीवनव्यापी बनेल.

आपल्याकडील विकासाचें सूत्र सहजता हें आहे. सहज विकास साधण्यासारखा असेल तेथें चालना व साधनसामग्री दिली जाते. पण बुद्धिपुरःसर समान प्रादेशिक विकास करण्याची दृष्टि त्यामागें असल्याचें दिसत नाहीं. औद्योगिक विकासाच्या मानानें शेतीचा विकास जात्याच मंद असतो. धरणें बांधलीं, कालवे खोदले, शेतापर्यंत पाणी नेलें तरी त्याचा वापर करून उत्पादनक्षमता वाढण्याला अवधि लागतोच. हा प्रसूति वेदनांचा काळ वाढेल त्या प्रमाणांत संघर्षाची संभाव्यताहि वाढेल.

## सामाजिक संघर्षाचीं क्षेत्रें

समाजजीवन हें तुटक व कप्प्याकप्प्याचें बनलेलें नसतें. तें सरमिसळ असतें. त्यामुळें राजकीय, आर्थिक व सामाजिक अशी केलेली विभागणी ढोबळच असते. संघर्षहि त्यामुळें संमिश्र कारणांनीं निर्माण झालेले असतात. आतां सामाजिक संघर्ष म्हणून ज्यांचा निर्देश होईल ते केवळ सामाजिक स्वरूपाचेच आहेत, असें खात्रीनें सांगतां येणार नाहीं, राजकीय आणि

आर्थिक कारणेंहि त्यांत कांहीं प्रमाणांत असतील. हिंदुधर्मातील जातिभावना ही व्यापक राष्ट्रीयत्वाला फार घातक आहे. समानतेची वागणूक नसेल तर पस्तीस कोटींना एकराष्ट्रीयत्व आपण शिकवणार कसें? डॉ. आंबेडकर यांनीं घटना मान्य झाली त्या वेळीं जें भाषण केलें तें फार महत्वाचें होतें. ते म्हणाले, "ही घटना आतां मंजूर होईल. पण ती पुस्तकांतच रहायला नको. समानतेची भावना नित्य व्यवहारांतहि दिसली पाहिजे. घटनेला साजेशी जीवनदृष्टि असली पाहिजे." परिस्थिति जेवढी लाचारीची, जबरदस्तीची असेल तेवढ्यापुरतीच समानता आपण पत्करतों. स्वेच्छेची समानता कुठे दिसत नाहीं. आपलें धोरण केवळ बचावाचें असतें. उत्स्फूर्तता आणि निष्ठा आपल्यांत दिसून येत नाहीं.

नाग आणि नवबौद्ध ही दोन ज्वलंत उदाहरणें आपल्यापुढें आहेत. हरिजनांनीं एवढ्या मोठ्या प्रमाणावर बुद्धधर्माचा जाहीरपणें स्वीकार केला पण त्याची खंत आपल्याला वाटली नाहीं. आपला तो पराभव आहे, असें कोणा हिंदूला तीव्रतेनें वाटलेलें दिसलें नाहीं. सांस्कृतिक सात्मीकरणाची आपल्याला जणूं इच्छाच नाहीं. आपल्याला शेजाऱ्याबद्दल विश्वास वाटत नाहीं, त्याच्यापेक्षां परका बरा वाटतो.

आपलें एकराष्ट्रीयत्व उधार म्हणजे भविष्याच्या हवाल्याचें आहे आणि भेद मात्र रोख आहेत. नागांना भारतीय इतिहास ठाऊक नाहीं. मिशनऱ्यांचा तेथें फार प्रभाव आहे. शिक्षण आणि आरोग्य ह्या दोन जीवनावश्यक गोष्टींचा लाभ त्यांना मिशनऱ्यांमुळें मिळालेला आहे. त्यांनीं नागामध्यें वेगळेपणाची जोपासना केली. पण त्यावर मात करून नागांना आपल्याशीं एकरूप करण्याची जिद्द आपल्यांत नाहीं. पूर्वी इंग्रजांनीं या भागांत आपल्याला जाऊं दिलें नाहीं. पण स्वातंत्र्यानंतर हीं बंधनें गेलीं तरी आपली वृत्ति बदलली नाहीं. आपले जे सरकारी अधिकारी तिकडे जातात त्यांना ती सजा वाटते, कर्तव्य वाटत नाहीं. तेथून केव्हां परततां येईल याची संधि ते शोधीत असतात. नाग देशाच्या एका बाजूला आहेत, असें तरी म्हणतां येईल. पण हरिजनांचें काय? ते तर गांवोगांव पसरलेले आहेत. त्यांना आपण जवळ केलें का? काश्मीरच्या सीमेवर अखेरपर्यंत मशीनगन चालवून पाक हल्लेखोरांशीं निर्धारानें सामना दिला म्हणून एका हरिजन सैनिकाला महावीर

चक्र दिलें. राष्ट्रपतींनीं त्याचा सन्मान केला पण तो आपल्या खेडेगांवीं गेला तर लोक पाणोठ्यावर त्याला खुशीनें पाणी भरूं देतील का ? त्याच्या घरच्या मंडळींना, नातेवाईकांना त्यांच्या खेड्यांत काय वागणूक मिळते ? मग त्यानें निर्धारानें कशासाठीं लढावें ? लढायला एक, पण पाणी भरतांना भिन्न, हें काय आहे ? हिंदु समाजजीवन इतकें जड झालें आहे कीं त्याला जणूं नवा विचार झेपतच नाहीं. अपहृत स्त्रियांचें तरी काय ? स्त्रियांना पळवलें म्हणून ओरड केवढी, पण त्यांना सोडवून परत आणल्यावर त्यांना घरीं घ्यायला कोण तयार आहे ? अपहृत स्त्रियांना सोडवायला कोणीं गेलें कीं त्या म्हणतातः आज आम्ही कोणाच्या तरी घरवाल्या आहोंत. उद्यां भारतांत आलों तर वेश्या म्हणून जीवन कंठणें आमच्या नशिबीं येईल ! देशांत सहा-सात कोटि आदिवासी आहेत, त्यांचें काय ? आपला समाजदेह अशा रीतीनें छिद्रांकित झालेला आहे. भावी संघर्षांचीं बीजें समाजजीवनांत अशा प्रकारें सर्वत्र विखरून पडलेलीं आहेत, याची जाणीव करून घेतली पाहिजे.

**कारभाऱ्यांची नवी जाग**

आणखीहि एका नव्या संघर्षाची तयारी होत असलेली दिल्लीसारख्या शहरांत दिसूं लागली आहे. वरिष्ठ सरकारी नोकरवर्गाची एक नवी जातच तेथें तयार होत आहे. पिढ्यान्‌पिढ्या तेच कारभारी होत आहेत. वंशपरंपरागत श्रेष्ठता उपभोगीत आहेत. अमेरिकेंत वेगवेगळ्या देशांतले लक्षावधि युरोपियन आले पण ते पूर्ण अमेरिकन बनले. अमेरिकन राष्ट्रीयत्वाच्या मुशींत उगवती पिढी तयार होऊन येते. सर्वसामान्य परिस्थितींतले व भिन्न राष्ट्रीयत्व असलेले लोकहि तेथें अत्युच्च पदावर आरूढ झालेले दिसतात. पण आपल्याकडे काय स्थिति आहे ? इंग्रजीचा ठेकेदार वर्ग कारभार करीत आहे. इंग्रजी घालवून हिंदीची प्रस्थापना करण्याच्या घोषणा ह्या लोकानुरंजनापुरत्याच. दिल्लींत इंग्रजीची प्रतिष्ठा आहे. उत्तम इंग्रजी येणें ही उच्चपद मिळवण्याची शर्तच आहे. सर्व वरिष्ठ नोकरांचीं मुलें मिशनच्या शाळांतून शिक्षण घेतात. त्यांना मातृभाषा धड येत नाहीं. पण अखिल भारतीय नोकऱ्यांत त्यांचाच वरचष्मा. नोकरदारांचा एक नवाच वर्ग अस्तित्वांत येत आहे. त्यांचा आचार, विचार, दृष्टि एकूण समाजापासन सर्वस्वीं भिन्न होत आहेत.

समाजांत यामुळें एक नवा ताण निर्माण होत आहे. इंग्रजीपासून आपल्याला मुद्दाम वंचित ठेवून आपल्या हातीं राज्यकारभार ठेवण्याचा डाव रचला जात आहे, असें बहुजनसमाजाला वाटूं लागलें आहे. इंग्रजी न जाणणारे बावळट, नासमज आहेत, अशी भावना नोकरदार वर्गांत आढळते. इंग्रजी न जाणणाऱ्या बहुजनसमाजाशीं त्यांना आपलें कांहीं नातें आहे असें वाटतच नाहीं. दिल्लींतल्या अशोक हॉटेलांत वावरणारा हा एक नवा वर्ग आहे. सामान्य माणसाला तेथें गेल्यावर चुकल्यासारखें वाटतें. हें कांहींतरी परकें आहे, असें जाणवतें.

समाजाच्या सुप्त मनांत हे वेगवेगळे तणाव आहेत. यांतच भावी संघर्षांचीं बीजें मला दिसतात. अग्नि आंतून धुमसत आहे, कोणतेंहि निमित्त स्फोट होण्याला पुरेल. या संघर्षबीजांची आपण योग्य जाणीव करून घेतली पाहिजे म्हणजे त्यावर काय उपाययोजना करायची, तेंहि आपल्याला समजेल. पहिली गोष्ट आपण केली पाहिजे ती म्हणजे ऐहिकासंबंधींची उपेक्षाबुद्धि काढून टाकली पाहिजे. ‘ चिंतन ब्रह्माचें आणि बोलणें मीठ-मिरचीचें ’ अशी आपली स्थिति आहे. ऐहिकाबद्दल आपण बोलण्यांत उपेक्षा दाखवतों पण आपल्यासारखे आसक्तीनें लडबडलेले लोक पृथ्वीच्या पाठीवर क्वचितच असतील ! इतर देशांतले लोक ऐहिकाची आस्था बाळगतात, पण जीवन फेंकण्याची त्यांची तयारी असते आणि त्यामुळेंच ते जीवनाचा उपभोग घेऊं शकतात. आपण आपल्या परंपरागत कल्पना त्यासाठीं सोडल्या पाहिजेत. उद्यांचा हिंदुस्थान कसा घडवायचा, याचें स्पष्ट चित्र आपल्याजवळ नसतें. निःस्पृहपणें आणि निर्धारानें आपले आदर्श आपण अमलांत आणीत नाहीं. व्यक्ति, जात, प्रांत यांच्या श्रेष्ठत्वाचा अहंगंड ही एकराष्ट्रीयत्वाच्या निर्मितींतील फार मोठी अडचण आहे. ती भावना आपण काढून टाकली पाहिजे. विरोध व्यक्त व्हावे म्हणून उमदेपणानें आपण वाट करून दिली पाहिजे, नाहींतर त्यांना विकृत रूप येईल. विरोध दाबून ठेवण्यापेक्षां त्यांचीं बीजें नाहींशीं व्हावींत यासाठीं प्रयत्न करणेंच श्रेयस्कर ठरतें.

◎ ◎ ◎

# शातिसेनेची दिल्ली-पेकिंग यात्रा : एक रिकामा उद्योग *

भारतामधील शांतिसेनेनें विश्वशांतिसेनेला ( वर्ल्ड पीस ब्रिगेड ) पाचारण केलें कीं तिनें दिल्ली ते पेकिंग शांतियात्रेची आयोजना करावी. विश्वशांतिसेनेला ही कल्पना पसंत पडली असून लवकरच्च दिल्ली ते पेकिंग यात्रेला प्रारंभ होईल. ह्या पदयात्रेंत श्री. शंकरराव देव हे सहभागी होण्याचें निश्चित ठरलें आहे. ते नुकतेच पुण्यास आले असतां त्यांच्याच तोंडून ह्या संकल्पित यात्रेची कल्पना थोडी तपशीलवार ऐकावयास मिळाली. श्री. शंकररावांच्या बैठकीमध्यें यात्रेचें उद्दिष्ट व हेतु या विषयींचे एक पत्रकहि वांटण्यांत आलें. त्यामुळें त्यांच्या भूमिकेवर आणखीच प्रकाश पडला.

## विचारदरिद्री पत्रक

श्री. शंकरराव देवांच्या निवेदनामधून व तेथें वांटण्यांत आलेल्या पत्रकावरून कांहीं महत्वाचे प्रश्न उपस्थित होतात. माझ्या मतें त्यांची जाहीर चर्चा होणें फार अगत्याचें आहे. पत्रकावर श्री. मस्ते, मायकेल स्कॉट आणि जयप्रकाश नारायण या तिघांच्या सह्या आहेत. त्यांपैकीं श्री. मस्ते हे अमेरिकन गृहस्थ आहेत एवढीच त्यांच्याविषयींची माहिती मला आहे. मायकेल स्कॉट हे एक प्रसिद्ध चळवळे इंग्रज मिशनरी आहेत. श्री. जयप्रकाश नारायण हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नेते असून आज सर्वोदयी मंडळींचे ते अनभिषिक्त पंतप्रधान व परराष्ट्रीय मंत्री आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं ! त्यांच्या नांवामुळें ह्या रंगहीन पत्रकाला जी काय किंमत प्राप्त झाली असेल तेवढीच. कारण विचारांच्या दृष्टीनें हें पत्रक अगदीं दरिद्री वाटतें.

## शांति सैनिकांची चलाखी

पत्रकामधील दुसऱ्या परिच्छेदाचें पहिलेंच वाक्य घांसांतल्या खड्यासारखें दातांखालीं सांपडतें. “ ह्या संकल्पाचें तात्कालिक कारण म्हणजे अर्थातच चीन आणि भारत यांच्यामधील विद्यमान सीमा-तंटा हें असून तो शांततेनें मिटावा अशी जी आमची सर्वांची तीव्र इच्छा आहे, ती ह्या यात्रेच्या

---

* *साधना, १६-२-६३.*

द्वारां मूर्त होईल." चीननें भारतावर आक्रमण केल्यामुळें लढाई सुरू झाली, अपरिहार्य झाली ही गोष्ट जगजाहीर झालेली असली, ख्रुश्चोव-सारख्या कम्युनिस्टानें देखील 'पण, परंतु' करीत कां होईना, पण ती मान्य केलेली असली तरी आमच्या शांतिसैनिकांना त्याचा अजून पत्ता लागलेला दिसत नाहीं. १९५५ सालीं जी परिस्थिति होती तो सीमातंटाच, १९५९ सालींहि सीमा-तंटाच, ८ सप्टेंबर १९६२ च्या आधींहि सीमा-तंटा आणि नंतरहि सीमा-तंटाच. कोणत्याहि घटनेला तंटा, भांडण म्हटलें कीं चूक कोणाची, आगळीक कोणाची, न्यायअन्याय कोणते, याचा निर्णय देण्याची पाळीच शांतिसैनिकांवर येत नाहीं. शांतिसैनिक होण्यामधील ही एक फार मोठी सोय आहे. भांडण म्हटलें कीं दोन्ही पक्ष भांडखोर हें ओघानेंच आलें. म्हणून त्या दोघांनाहि 'शांत रहा' असा उपदेश करण्याचा हक्क शांतिसैनिकाला पदसिद्ध प्राप्त होतो. पण शांतिसैनिक न्याय करूं मागत नाहीं, तो फक्त मैत्रीसाठीं तडफडत असतो.

## श्रेष्ठ मूल्य कोणतें ?

सत्य आणि मैत्री यांपैकीं कोणत्या मूल्यास शांतिसैनिक श्रेष्ठ मानतों, असा प्रश्न जेव्हां शंकररावजींना कारण्यांत आला तेव्हां सत्याच्या आग्रहापेक्षां मैत्रीचा आग्रह श्रेयस्कर होय, असेंच निःसंदिग्ध उत्तर शंकरावांकडून मिळालें. इतकेंच नव्हे तर गांधीजींनीं जो सत्याग्रह आचरिला व प्रतिपादिला त्यांत जी प्रतिकाराची भावना बलवत्तर राहिली ती विनोबा आणि त्यांचे सहधर्मी यांनीं सूक्ष्म, सूक्ष्मतर व सूक्ष्मतम अशी कशा प्रकारें बनवतां येईल यांचा विचार चालवलेला आहे, हा फरकहि त्यांनीं स्पष्ट केला. कौरव-पांडव युद्धाचा दाखला देऊन त्यांनीं आपलें म्हणणें आणखी विशद केलें. तें असें कीं, धर्मराजाचा जय होऊन अठरा अक्षौहिणी सैन्यापैकीं सात माणसें शिल्लक राहिलीं; त्यापेक्षां धर्माचा पराभव झाला असता तरी कांहीं फारसें बिघडलें नसतें ! ही सर्व विचारसरणी बैठकींत असलेल्या गांधीवाद्यांना देखील सर्वस्वीं नवी आणि थक्क करून टाकणारी ठरली, मग माझ्या सारख्याची काय कथा ! कारण या सिद्धांतप्रणालीचा रोख अर्थ, सध्याच्या परिस्थितींत त्यांनीं असा सांगितला कीं ८ सप्टेंबर नंतरचें चीनचें आक्रमण,

नेफामधील घटना, राष्ट्रांत उठलेली संतापाची व प्रतिकाराची लाट या प्रकरणांत आपणांला कांहीं स्वारस्य वाटलें नाहीं. कारण मानवी जीवनांतलें सर्वश्रेष्ठ मूल्य म्हणजे मित्रता, तीच त्यांत नष्ट होत होती !

## यात्रेंत गर्दी होईलच

आतां हा निखालस मैत्रीचा संदेश जनतेला सांगत हे यात्रिक दिल्लीहून निघून आसाममधून वॉलांगच्या बाजूनें, गेल्या महायुद्धांतील लिडो मार्गानें चीनमध्यें प्रवेश करणार व तेथून पेकिंगपर्यंत जाणार. युद्ध करणें हें चुकीचें आहे, मानवताविरोधी आहे, सर्व प्रश्न शांततेच्या मार्गांनीं सुटले पाहिजेत, 'हिंदी-चिनी भाई भाई' हीच घोषणा पुन्हां दुमदुमूं लागली पाहिजे असा त्यांच्या संदेशाचा मथितार्थ असणार, हें त्यांच्या पत्रकांतील मजकुरावरून स्पष्ट दिसतें. यात्रा व यात्रेकरू, गांधीजी व अहिंसा हे शब्द भोळ्याभावड्या व अंधश्रद्ध हिंदी मनांत अशी ऊर्मि उठवणारे आहेत कीं शांतिसेनेची ही यात्रा सुरू झाली कीं भारताच्या सरहद्दीपर्यंत तरी त्यांचा शांतिसंदेश ऐकण्यास हजारोंनीं श्रोते जमतील याविषयीं माझ्या मनांत संदेह नाहीं. ज्यांना कोणताहि संदेश सांगावयाचा नसतो त्या नंग्या साधूंना पाहण्यासाठीं लक्षावधि लोक वेड्यासारखे धांवत सुटतात, अशी ज्या देशांत स्थिति आहे तेथें हा एवढा अपूर्व संदेश ऐकायला लोकसमुदाय जमणार नाहीं असें कसें होईल ? शिवाय प्रत्येक राज्यांतील कॉंग्रेस सरकारें, कॉंग्रेस संघटना आणि विशेषेंकरून रणदिवेगटाचे कम्युनिस्ट, आपल्याला इष्ट तो प्रचार परभारें होत असल्याचें पाहून ह्या थोर यात्रिकांच्या प्रत्येक पडावावर जनता मोठ्या संख्येनें उपस्थित राहावी या करतां योग्य त्या तरतुदी करतीलच.

## गांधीजींची विचारपरंपरा

गांधीप्रणीत जीवनदृष्टीमध्यें ईश्वर हा सत्यरूप आहे तेथपासून सत्य म्हणजेच–ईश्वर–गॉड इज ट्रुथपासून ट्रुथ इज गॉड ह्या मतापर्यंत विकास होत गेल्याचें दिसतें. त्याचें कारण असें असणें शक्य आहे कीं ईश्वर ही जितकी अनाकलनीय, अगोचर वस्तु आहे तितकें अनाकलनीय व अगोचर सत्य खासच नाहीं. तें तर्कगम्य असल्याकारणानें तें समजण्यासाठीं मनुष्याला कांहीं विशेष साधना अवश्य असते असेंहि नाहीं. सत्य काय, न्याय कोणतें तें

समजत नाहीं असें क्वचित होतें. समजून देखील तें आचरणांत आणण्याच्या कामीं मनुष्य हयगय करतो असें मात्र अनेकवार घडतें. कारण सत्यानुसारी आचरणामुळें त्याचा वृत्तिच्छेद संभवनीय असतो, त्याला देहदंड भोगावा लागण्याची शक्यता असते, लोकविरुद्ध वर्तन करावें लागणार असतें. "देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसीं तुटी ।।" अशी भूमिका घ्यावी लागते. धर्मांच्या वा अध्यात्माच्या क्षेत्रांत जें दिव्य पूर्वीच्या लोकांनीं केलें तें राजकारणांत आधुनिक भारतीयांनीं करावें आणि परदास्यामधून सर्वथैव मुक्त होण्याचा हक्क मनुष्यमात्राला आहे, हें सत्य सुप्रतिष्ठित करावें असा आदेश गांधीजींनीं दिला. तसें करीत असतां अहिंसेच्या मार्गानें जावें हें श्रेयस्कर. पण तें शक्य नसलें तर ? तशा परिस्थितींत हिंसाहि चालेल, पण अहिंसेच्या सबबीवर गुलामींत राहाणें प्रशस्त नाहीं. सत्याचें रक्षण अहिंसेनें करण्याची पराकाष्ठा करतांना मरण आलें तरी आनंदानें आत्माहुति द्या, तेवढी तयारी नसेल तर हिंसेनें प्रतिकार करा; पण असत्याला शरण जाऊं नका. सत्य आणि मैत्री यांत विरोध आला तर सत्य श्रेष्ठ; वीराची अहिंसा ही वीराच्या हिंसेहून श्रेष्ठ; आणि वीराची हिंसा ही भ्याडाच्या अहिंसेहून श्रेष्ठ, अशा पायऱ्या गांधीजींच्या अहिंसाशास्त्रांत होत्या, असें स्पष्ट दिसतें. परंतु मार्क्सच्या शिकवणुकींत लेनिननें जशी भर घातली तशी गांधीजींच्या शिकवणुकींत त्यांच्या शिष्यवरांनीं भर घालण्याचें ठरवलें असावें. आणि सत्य व मैत्री अथवा सत्य व प्रेम यांच्यांत जर विरोध आला तर मैत्री व प्रेम हीं श्रेष्ठ मानावीं‌त आणि त्यांच्या खातर राष्ट्राची इभ्रत, राष्ट्राचें सार्वभौमत्व आणि राष्ट्राची भूमि यांच्यावर किंबहुना सत्यावरसुद्धां पाणी सोडण्याची वेळ आल्यास खळखळ करूं नये, असा हा सत्याग्रहाचा ' सूक्ष्मतम ' प्रकार निर्माण केला असावा. येशूला क्रुसावर खिळवून मारण्याची शिक्षा सांगणाऱ्या पायलेटनें ' सत्य तें काय ? ' असा तिरस्कारयुक्त सवाल त्याला टाकला होता. चिनी-भारती संघर्षांत सत्य परिस्थिति काय आहे कोण जाणे, अशीच जणूं कांहीं ही शांतिसेनेंतील मंडळी आपली भूमिका ठेवीत आहेत !

## जीर्णमङ्गे सुभाषितम्

युद्धानें नाश होतो म्हणून तें टाळावें; अणुयुद्धानें तर सर्व नाश होतो

म्हणून तें अवश्य टाळावें, हें प्रमेय अमान्य कोण करील? पण कम्युनिझमच्या जगद्विजयासाठीं अणुयुद्ध अवश्य झाल्यास तें जो टाळूं पाहील तो खरा क्रांतिहृदयी नव्हे, तो उंदरासारखा भ्याड व अदूरदृष्टि आहे असें मानावें लागेल अशी आपली मार्क्सवादी भूमिका रशियाबरोबर चीनचें जें वाग्युद्ध सांप्रत चालूं आहे त्यांत चिनी कम्युनिस्टांनीं मांडलेली आहे. आणि एवं-गुणविशिष्ट चीनशींच आपला मुकाबला आहे याची जाणीव आमच्या शांति-सैनिकांनाहि असेल. चीनसारख्या दृढप्रतिज्ञ विरोधकांशीं गांठ असतांना हेंहि लक्षांत ठेवणें आवश्यक आहे कीं त्याच्या बाबतींत मतप्ररिवर्तनाचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. कारण त्यापैकीं जे राज्यकर्ते आहेत त्यांनीं शांति व युद्ध हे दोन्ही पर्याय एकाच उद्दिष्टासाठीं म्हणजे जग कम्युनिस्टांकित करण्यासाठीं वापरावयाचे असें पूर्ण विचारांतीं ठरवलेलें आहे. ‘ एषः पन्थाः । नान्यद्विद्यते । ’ अशी ज्यांची खात्री पटलेली आहे त्यांच्यासमोर आपला युक्तिवाद म्हणजे ‘ जीर्णमङ्गे सुभाषितम् ’ असाच अनुभव शांतिसैनिकांना येईल. बरें तेथील जनतेसमोर आपले विचार मांडण्याची जर त्यांची कल्पना असेल तर राज्यकर्त्यांपासून वेगळी असलेली, स्वतंत्र बुद्धीची, स्वतंत्र कर्तृत्वाची जनता कम्युनिस्ट राजवटींत शोधून काढणें म्हणजे गुलबकावलीच्या फुलाचा शोध लावण्यापेक्षांहि तो दुर्घट प्रयास होय, ह्याचाहि त्यांना साक्षात्कार घडेल.

## चीनमध्यें श्रोते कोण मिळणार ?

मग शांतिसैनिकांचे युद्धविरोधी आणि अव्यभिचारी शांतीचे विचार ऐकणार कोण ? तर भारतामधील जनता ! उत्तर प्रदेशांतील, बिहार-बंगाल-मधील आणि आसामांतील. भारतीय जनतेमध्यें आधींच युद्धाचा उत्साह फार, मग हे युद्धविरोधी युक्तिवाद ऐकल्यावर तर काय पुसावें ? देशावर एवढी आपत्ति आली तरी पंजाब, राजस्थान, केरळ आणि महाराष्ट्र यांच्या-व्यतिरिक्तच्या राज्यामध्यें सैन्यांत दाखल होण्याचा उत्साह कितपत आहे ? आणि भारताचा खडग्हस्त म्हणून ज्याला मिरवण्याची भारी हौस त्या महाराष्ट्रांतसुद्धां सातारा व रत्नागिरी जिल्हे सोडले तर इतर भाग जवळ जवळ ओसाडच नाहींत काय ? सगळ्या राष्ट्रांत एकत्वाची लाट उठून

शत्रूचा प्रतिकार करण्याची भावनिक सिद्धता होण्यास जरा कोठें, हजार दीड हजार वर्षांनंतर सुरुवात होते न होते तोंच हा युद्धविरोधाचा घूत्कार उठावा ही केवढी अभद्र घटना आहे! चिनी आक्रमकांसमोर आम्ही आमच्या छात्या उघड्या करून प्रथम उभें राहतों; आमचे मुडदे त्यांना प्रथम पाडूं देत, मग तुम्हीं तुमच्या हत्यारांनिशीं खुशाल लढा, अशी भूमिका जर शांतिसैनिकांनीं घेतली असती तर मी त्यांना समजूं शकलों असतों, मीं त्यांना त्रिवार धन्यवाद दिले असते. पण घडतें आहे तें नेमकें उलटें. आम्हींच काय पण सारें जग जर कम्युनिस्टांच्या अटीवर गुलामीची शांति पत्करण्यास तयार असेल तर रशियन अथवा चिनी कम्युनिस्टांची त्याला कांहींच हरकत असणार नाहीं. शांति, शांतिमय सहजीवन, पंचशील सगळें कांहीं त्यांना मान्य आहे; मात्र तें त्यांच्या अटीवर!

## युद्धाच्या दोन बाजू

युद्धामुळें मानवी मनांतील पशुता, निर्घृणता वाढते. पण ही युद्धाची एक बाजू झाली. दुसरी बाजू अशी कीं युद्धामुळें त्यागबुद्धि वाढते, निष्ठांची कसोटी लागते, राष्ट्र अधिक एकरस होतें. त्याकरतां युद्ध करावें, असें म्हणणें युद्धखोरपणा ठरेल. पण मग नैर्घृण्य वाढतें म्हणून युद्ध टाळावें असें म्हणणेंहि भ्याडपणाचें होईल. सहसा युद्ध करूं नये, स्वार्थसिद्धिसाठीं वा स्वमतप्रसारासाठीं करूं नये हें उचित. पण परचक्र आलें तरी लढूं नये, स्वार्थ रक्षणासाठीं वा स्वमत रक्षणासाठीं दोन हात करूं नयेत, हें अनुचित. युद्धामुळें सर्वनाश होईल म्हणून युद्ध टाळावें ही तर शुद्ध पंगू मनाची शिकवण होय. सर्वनाश झाला तरी हरकत नाहीं, पण अपमानास्पद, निःसत्व जिणें जगणार नाहीं, हीच कोणत्याहि सुसंस्कृत मनांतील भावना असावयास हवी. तरच कदाचित युद्ध होणार नाहीं आणि सर्वनाशहि टळेल. ज्या देशांतील मनें जिवंत आहेत ते देश युद्धाच्या राखेमधून परत जीवनांचीं नंदनवनें अवघ्या दहा वर्षांत कशी फुलवतात व जेथें पुरुषार्थ फजीत पावलेला आहे तेथें एका पानशेतसारख्या घटनेनें जीवन कसें परास्त होतें, तें सांगावयास नकोच. आपणांला अश्वत्थाम्याप्रमाणें दारोदार पळीभर तेल मागत कायमचें जगावयाचें आहे कीं शक्य तर मानानें जगावयाचें आहे, नाहींपेक्षां नाहीं,

तें भारतानें प्रथम ठरवलें पाहिजे. मग बाकीच्या प्रश्नांचीं उत्तरें आपोआप मिळत जातील.

चीनच्या आक्रमणामुळें आपलीं अनेक व्यंगें जगजाहीर झालीं. तीं दूर कशीं करावीं या प्रश्नाचें उत्तर एकदम देणें कदाचित् शक्य होणार नाहीं. पण तें देतां येत नाहीं म्हणून कांहींतरी करावें, दिल्ली-पेकिंग यात्रा सुरू करावी, हा उद्योग बरोबर नाहीं. दुर्बळानें सबळाकडून मार खाल्यावर जर मैत्रीची व अहिंसेची भाषा सुरू केली तर त्यामुळें त्याची दुर्बळता अधिक हास्यास्पद मात्र ठरेल. म्हणून शांतिसैनिकांना विनंति अशी कीं देशाची झाली एवढी अप्रतिष्ठा पुरे; तिच्यावर तत्त्वज्ञानाचा मुखवटा चढवण्याचा यत्न आपण कृपा करून करूं नका.

**हा शहाणपणा नव्हे, राजनीति तर नव्हेच नव्हे**

आश्चर्याची गोष्ट अशी कीं ह्या शांतिसैनिकांची ध्येयवादी भूमिका आणि कम्युनिस्टांची व्यवहारवादी भूमिका ह्यांचा तोंडवळा बरेच वेळां बराचसा जुळत असतो ! ग्रामराज्यें आमच्या कम्युनच्या कल्पनेप्रमाणेंच आहेत, असें बंगालमधील कम्युनिस्ट—मला वाटतें सोमनाथ लाहिरी—विनोबांना भेटल्या-नंतर उद्गारल्याचें जाहीर झालेलें आहे ! चीनबरोबर तडजोड करा, युद्ध करूं नका, युद्धानें सर्वनाश होईल, ह्या शांतिसैनिकांच्या भूमिकेशीं तर ते ताबडतोब सहमत होतील. परंतु असल्या प्रकारचा प्रचार हा राष्ट्राच्या सध्यांच्या भावनेशीं, धोरणांशीं व त्याहूनहि त्याच्या सध्यांच्या कर्तव्याशीं कितपत सुसंगत ठरतो त्याचा सरकारनें गंभीरपणानें विचार करावयास हवा आणि नागरिकांचा तेजोभंग करणारे हे उद्योग चालूं देतां कामा नये, असें मला वाटतें. सर्वकाळ द्विधा मनोवृत्तीनें वागणारें राष्ट्र टिकूं शकणार नाहीं. अर्जुनापासून चालत आलेली ही खोड आपण न सोडून देऊं तर परत एकवार गुलामीची बेडी आपल्या देशाच्या हातापायांत अडकणें अगदीं शक्य आहे. एखाद्या अथवा चारदोन व्यक्तींनीं हवे ते प्रयोग करावेत, पण कोणत्याहि व कितीहि थोर विचाराच्या पायीं संबंध राष्ट्राचा बळी देणें हा शहाणपणा नव्हे, राजनीति तर नव्हेच नव्हे.

◎ ◎ ◎

# आदरणीय विनोबाजींस *

काल देशभर मोठ्या इतमामानें प्रजासत्ताकदिन साजरा झाला. लष्करी कवायती झाल्या. विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या मिरवणुकी निघाल्या. बँड-चौघड्यांचें सूर निनादले. जेवणावळी व अल्पोपहार यांची गर्दी झाली. रात्रीं दिव्यांचा झगझगाट झाला. एका दिवसांच्या सणांत सर्व राष्ट्र जणूं कांहीं गेल्या तीनशें चौसष्ट दिवसाची दुःखें आणि निराशा विसरून जाण्याचा आणि पुढच्या तीनशें चौसष्ट दिवसांतील खडतर जीवनाला तोंड देण्यासाठीं ताजेंतवानें होण्याचा प्रयत्न करीत होतें.

कालच्या समारंभांत मींहि सामील झालों होतों. पण माझ्या मनांत अनेक विचारांचें काहूर माजलें होतें. त्यांपैकीं कांहीं तुम्हांला निवेदन करावेत म्हणून तुमच्यासमोर मांडीत आहे. चार साडेचार वर्षांपूर्वीं बनारस येथें मी आपणाला भेटलों होतों. पण त्याहून आपला अधिक परिचय झालेला नाहीं म्हणून पत्ररूपानेंच हे विचार आपणांसमोर ठेवीत आहे. असे विचार माझ्या एकट्याच्याच मनांत येत असतील असें नाहीं, अनेकांच्या मनांत येत असतील. म्हणून हें पत्र प्रातिनिधिक स्वरूपाचें आहे असेंहि म्हणतां येईल. आपण सर्व वेळ ‘ बहुजन सुखाय बहुजन हिताय ’ कष्ट करीत आहांत. ‘ बहुजन ’ याच्याऐवजीं ‘ सर्वजन ’ असा शब्द वापरला तर तो कदाचित अधिक उचित ठरेल. मीहि अल्पप्रमाणांत देशाचा विचार करतों. पण आपल्या मानानें माझी निष्ठा अल्प आहे. आपल्या सेवेप्रमाणेंच आपली दृष्टिहि थोर असणार म्हणून माझ्या अल्पमतीला या प्रसंगानें जें विचार सुचतात ते मी आपणांसमोर निःसंकोचपणें सादर करीत आहे. इच्छा अशी कीं त्यांतील ग्राह्याग्राह्याचा निवाडा व्हावा.

एकीकडे प्रजासत्ताक दिनाचा समारंभ चालू असतां दुसरीकडे मुंबईमध्यें मुंदडा प्रकरण म्हणून गाजलेल्या एका प्रकरणाची चौकशी न्यायमूर्ति छगला करीत आहेत. या प्रकरणाकडे राष्ट्राचें कसें लक्ष लागून राहिलें आहे याची कल्पना आपल्याला वर्तमानपत्रांवरून आली असेलच. या प्रकरणाबद्दल

---

* *साधना, १-२-५८.*

लोकांमध्यें दिसून येणारी उत्सुकता काय दर्शविते ? माझ्या मतें एक ही गोष्ट कीं, देशामध्यें श्रेष्ठांपासून कनिष्ठांपर्यंत जे भ्रष्टाचार चालू आहेत त्यापैकीं एकतरी चव्हाट्यावर आला म्हणून जनतेला समाधान वाटत आहे. लोकांच्या उत्सुकते-मधून एवढीच एक गोष्ट जर व्यक्त होत असती तर ती स्वागतार्ह ठरली असती. परंतु दुर्दैवानें वस्तुस्थिति तशी नसावी असा माझा अंदाज आहे. मला वाटतें कीं या उत्सुकतेमध्यें दुसरेंहि एक समाधान दडलेलें आहे आणि तें विकृत स्वरूपाचें आहे. सगळ्याच लोकांचे हात मोठमोठ्यांचेसुद्धां, जर असे बरबटलेले आहेत तर आपल्या हाताला थोडाफार चिखल लागला असला तर त्यांत शरमिंदे होण्यासारखें काय आहे, अशा प्रकारच्या समाधानाचाहि विचार या प्रकरणावरून निर्माण होणें अशक्य नाहीं. म्हणजे या चौकशी-मुळें भ्रष्टाचाऱ्यांना वचक बसण्याच्याऐवजीं त्यांना एकप्रकारचा सदर परवानाच मिळल्यासारखें होण्याचा संभव आहे. वस्तुतः अशा चौकशांचा परिणाम जनतेला जागृत करण्यांत, राष्ट्राची प्रकृति सुधारण्यांत व्हावयास हवा, परंतु तसा तो होईल असा संभव मला दिसत नाहीं. याचें कारण इतकेंच कीं आपल्या राष्ट्राची प्रकृति प्रमाणाबाहेर बिघडली आहे, राष्ट्राचें मन ठार मेलें नसलें तरी आसन्नमरण झालेलें आहे. वशिलेबाजी, लांच-लुचपती वगैरे राजकीय व सामाजिक भ्रष्टाचारांचे प्रकार सध्यांची सामाजिक व आर्थिक रचना जोंपर्यंत अस्तित्वांत आहे तोंपर्यंत कमी होतील अशी शक्यता मला तरी दिसत नाहीं. म्हणून ही सबंध घडी बदलणें आवश्यक आहे आणि तें कामहि खूप तांतडीनें व्हावयास हवें आहे.

किती तांतडीनें तें सांगतों. देशांतील आर्थिक परिस्थिति झपाट्यानें बिघडत चालल्याची जाणीव राजकारणांतील सर्वच पक्षांना आहे. राज्यकर्त्या पक्षालाहि आहे हें प्रागज्योतिषपूर येथें नुकत्याच पार पडलेल्या कॉंग्रेस अधिवेशनामधील आर्थिक परिस्थितीबाबतच्या ठरावावरून स्पष्ट होत आहे. पण वरंगळीला लागलेला हा गाडा आवरावयाचा कोणी व कसा ? खासगी उद्योगधंदे आणि राष्ट्रीय उद्योगधंदे अशीं दोन क्षेत्रें पाडण्यांत आलेलीं आहेत, परंतु खासगी उद्योगधंद्यांमध्यें जे दोष दिसून येत होते त्यांनीं राष्ट्रीय उद्योगधंद्यांनाहि ग्रासलें आहे. जमीनदार ऐतखाऊ झाले म्हणून त्यांच्या-कडून जमीन काढून घेऊन ती कुळांच्या हातीं सुपूर्द केली, पण आतां

तक्रारी अशा येत आहेत कीं, नवीन कूळकायद्यांमुळें गांवांत नसलेले तंटे तर उपस्थित झालेच पण त्याचबरोबर हातीं आलेल्या जमिनीमधून अधिक पीक काढण्याऐवजीं मालकाकडून होणारा खंडाचा तगादा कमी झाल्याबरोबर कुळें मुदलांतच कमी पीक काढूं लागलीं. शेतीला हमखास पाण्याची सोय व्हावी म्हणून देशभर लहान मोठीं धरणें उभीं केलीं, कालवे खणून पाणी दूरवर खेळविण्याची व्यवस्था केली, पण कोठें पाणीपट्टी अधिक म्हणून तर कोठें आंगवळणीं पडलेली शेतीची पद्धती बदलून अधिक कष्टाची शेती करण्याची तयारी नाहीं म्हणून शेतकरी पाणी घेण्यासच तयार होईना. शाळाकॉलेजें, विश्वविद्यालयें यांच्या संख्येमध्यें आणि त्यांच्यामध्यें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येमध्यें कितीतरी पटींनीं वाढ झाली परंतु शिक्षणाचा दर्जा कुठच्या कुठें घसरला. देशी मालाला संरक्षण मिळावें आणि परदेशीं निचरून जाणारा धनाचा ओघ थांबावा म्हणून ज्या वस्तूंची आयात बंद केली त्या वस्तूंचा काळाबाजार तरी सुरू झाला आहे किंवा ज्या वस्तु देशांत तयार होत होत्या त्यांच्या किंमती भरमसाट वाढून तरी बसल्या आहेत. एका बाजूनें दारूबंदी होत आहे आणि दुसऱ्या बाजूनें चोरून दारू गाळणाऱ्यांचा एक नवा वर्ग समाजांत कायमचा निर्माण होऊन बसला आहे. सर्व खात्यांमधील कामगार, शिक्षक, कारकून महागाईकडे बोट दाखवून पगारवाढ मागतात आणि त्याला माझा विरोधहि नाहीं, पण ते आपापलें यंत्रांवरचें, शाळांमधलें आणि टेबलांवरचें काम व्यवस्थितपणें करण्याची भाषा बोलत नाहींत, याचें मला दुःख होतें. सैन्य खातें हें समाजांतील वाद, गटबाजी, दाबादाबी, लांचलुचपत, दिरंगाई यापासून अलिप्त आहे असें माझ्या ऐकिवांत होतें. पण लोकसभेंत गेल्यापासून मला जो सैन्याचा थोडाफार परिचय होत आहे त्यावरून असें वाटत आहे कीं ह्या रंगीत बाहुलीमध्येंदेखील खूपच भुसा भरलेला आहे. अशीं उदाहरणें कितीं द्यावीं ? सांगावयाचें तें इतकेंच कीं राष्ट्राच्या सर्व शरीराची रोगानें चाळण केलेली आहे. अजूनहि कांहीं चांगले निकोप भाग आहेत; तांबड्या रक्ताच्या पेशी आहेत; सुरळीत विचार करणारीं ज्ञानकेंद्रें आहेत. पण शरीरांतील नित्य फैलावणाऱ्या या रोगबीजांचा फैलाव अटकावण्याचा आणि त्यांचें सतत निर्मूलन करण्याचा प्रयत्न फार नेटानें आणि दीर्घकाळ जर झाला नाहीं आणि

त्याची ताबडतोब सुरुवात जर झाली नाहीं तर या समाजपुरुषाचा केव्हां मृत्यु घडेल तें सांगतां येणार नाहीं. संघटित व दीर्घ प्रयत्न आणि त्याची तत्काळ सुरुवात ह्या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत, हें माझ्या आपल्या समोरच्या रडगाण्याचें आकणकडवें असणार आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू जागेवर आहेत तोंपर्यंत सर्व कांहीं निभावून जाईल, पण पुढें काय, हा प्रश्न आपल्या मंडळींमध्यें चर्चिला जातो कीं नाहीं मला ठाऊक नाहीं. पण दिल्लीपासून सगळीकडे, सर्व थरांमधून, जेथें माझा प्रवेश आहे तेथें तेथें तो चर्चिला जातो, हें मी पाहिलेलें आहे. त्यांच्या नंतर ह्या देशाचें काय होईल कोण जाणें, असें भलेभले लोक बोलतात. याचा अर्थ त्यांच्यानंतर काय होईल ह्याविषयीं त्यांना संदेह असतो असा नाहीं. उलट पंडितजी जर सावरून घेण्यास तयार नसतील तर भारतांत अराजक माजेल असेंच त्यांना सुचवावयाचें असतें. आपण जरी पंडित नेहरूंना मनःपूर्वक दीर्घायुष्य चिंतणारे असलों तरी त्या दीर्घतेलादेखील मर्यादा आहेत ना ? म्हणून देशाला सुस्थिर पायावर उभे करण्याचा, त्याचें शरीर निकोप करण्याचा व त्याचें नेतृत्व करण्याजोगी दुसरी एखादी राजकीय संघटना तयार आहे, असा विश्वास जनतेंत निर्माण करण्याचा जो कांहीं प्रयत्न व्हावयाचा तो पुढच्या आठ दहा वर्षांतच व्हावयास हवा.

राजकीय संघटना, राजकारण, राजसत्ता, याविषयीं आपले जे विचार माझ्या वाचनांत येतात, जयप्रकाशजींनीं परवांच्या दिल्लीच्या भाषणांत जे विचार मांडले ते सध्यां जे कांहीं चालू आहे त्या दृष्टीनें निरुपयोगी आहेत असें मला वाटतें. भारत हें जर पस्तीस कोटींचें राष्ट्र म्हणून ठेवावयाचें असेल, गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा, गोदावरी, नर्मदा, कृष्णा, कावेरी यांच्यासारख्या नद्या अडवून त्यांच्या कालव्यांनीं जर जमीन सुपीक करावयाची असेल, सगळ्यांच्या शिक्षणाची, आरोग्याची, उद्योगधंद्याची, पोटापाण्याची, देशाच्या संरक्षणाची जर काळजी करावयाची असेल तर ह्या देशांत सैन्य राहणार, प्रचंड कारखानदारी राहाणार, नियोजन खातें राहाणार, केंद्रीय सत्ता राहाणार आणि ती आपल्या हातीं रहावी म्हणून स्पर्धा करणारे राजकीय पक्षहि राहाणार, ही काळ्या दगडावरील रेघ आहे, असें मला वाटतें. ह्या सगळ्या गोष्टी मला सुस्पष्ट आणि समजण्यास इतक्या

सोप्या वाटतात कीं त्या आपल्या सारख्यांना कां स्पष्ट दिसूं नयेत, याचेंच मला नवल वाटतें. आज श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे कोरापुटच्या भागांत काम करीत आहेत म्हणजे काय करीत आहेत ? तेथील आदिवासींना ज्या जीवन-व्यवस्थेचा विचार आणखी दहा पिढ्यादेखील सुचला नसता आणि जरी सुचता तरी शक्य झाला नसता, तो ते करीत आहेत. याचा अर्थ तेथें ते योजनांचें केंद्र बनवीत आहेत. त्या प्रदेशांतील लोकांनीं घरें कशीं बांधावीं, जमिनीची मशागत कशी करावी, कोणते बैल खच्ची करावे, कोणतें बेणें वापरावें, रस्ते कोठून कोठें काढावें, इतकेंच काय पण मलमूत्रविसर्जन कोठें करावें व त्याचा पुढें उपयोग काय करावा, हेंहि त्यांना ते शिवकणार आहेत. एवढें शिकवून झालें कीं शेतीसाठीं, घरासाठीं, कुटुंबासाठीं लागणारा माल कोठून आणावा आणि त्यांनीं आपल्या शेतांत आणि डोंगरांत तयार केलेला माल कसा व कोठें विकावा तें त्यांना सांगावें लागेल आणि मग जे लोक समाजाच्या या निर्णयाविरुद्ध वागतील, चोऱ्या करतील, अफरातफरी करतील त्यांच्या शासनाचा विचारहि त्यांना करावा लागेल. एवढें झालें कीं सरकार आलेंच. सरकार म्हणजे तरी दुसरें काय असतें ? जें अण्णासाहेबांना टीचभर प्रदेशांत आज करावें लागत आहे वा उद्यां करावें लागणार आहे, तेंच पांच लाख खेड्यांसाठीं करण्याची कल्पना केली कीं दिल्ली सरकारच्या पसाऱ्याचा धिःकार करण्याचें कारण उरणार नाहीं. त्याचा अधिकार थोडा वाढवावा अथवा छाटून कमी करावा, असा मतभेद होऊं शकेल. पण केंद्र सरकारचा किंवा लखनौ, मुंबई किंवा कलकत्ता येथील राज्यसरकारांचा पसारा मूलतः लोकशाहीच्या आणि लोकक्षेमाच्या विरुद्ध आहे या म्हणण्यांत मला अर्थ दिसत नाहीं.

पण सर्वोदयवादी अशी भूमिका घेतात आणि त्यामुळें असें घडतें कीं, समाजामध्यें सर्वांत महत्तम असें बलस्थान जें शासनयंत्र त्याच्यावर समाजामधील विचारवंत लोकाग्रणी आणि निस्वार्थी सत्त्वशील व्यक्ति यांची जशी करडी नजर असावयास पाहिजे तशी ती राहात नाहीं. उलट समाजामधील हौशा, गवशा व नवशांसाठीं तें स्थान मोकळेंच राहातें. समाजामधील राजसत्तेचें आणि राजकारणाचें स्थान गांधीजींनीं अचूक हेरलें होतें आणि आपण तें हेरलेलें नाहीं, हीच आपली मोठी चूक होत आहे, अशी माझी

समजूत आहे. यामुळेंच गांधीजींनीं राजकारणांत अध्यात्म ओतण्याचा सतत प्रयत्न केला, राजसत्ता अन्यायी वाटली तेव्हां तिच्याशीं झुंज घेतली. आपण राजकारणाकडे पाठ फिरवली असल्यामुळें राजसत्तेशीं झुंज घेण्याचा प्रश्नच अद्यापि उद्‌भवलेला नाहीं. आपल्या कार्यामधून राजकीय दृष्टिकोन कटाक्षानें वगळण्यांत आल्या कारणानें सर्वोदयाच्या व्यासपीठावर सर्व पक्षांच्या पाठीराख्यांचा मेळावा भरलेला दिसतो. कोणाला हें दृश्य मोठें गोड वाटतें. पण मला मात्र तो गोड गोंधळ वाटतो! ज्या आपल्या आंदोलनांत डॉ. धनंजयराव गाडगीळांसारख्यांना पर्यायी सामर्थ्याचीं बीजें दिसलीं त्याला मी गोड गोंधळ म्हणावें याबद्दल मला कोणी क्षमा करील असें वाटत नाहीं. परंतु आजच्या घटकेला आणि अगदी नजीकच्या भविष्य काळांत ज्या प्रकारच्या धारदार व कार्यक्षम राजकीय सामर्थ्याची राष्ट्राला निकडीची गरज आहे तें सामर्थ्य आपल्या आंदोलनामधून निर्माण होण्याची आशा आतां ओसरूं लागलेली आहे म्हणूनच गोड गोंधळ ह्या शब्दांनीं मी त्याचें वर्णन केलें आहे.

द्वितीय पंचवार्षिक योजनेचें अपयश अथवा पंडित नेहरूंची राजकीय रंगभूमीवरून निवृत्ति यांपैकीं जी कोणती गोष्ट अगोदर घडेल तेथपासून भारताच्या स्थैर्याला हिसके-हादरे बसूं लागतील हें उघड आहे. द्वितीय पंचवार्षिक योजना यशस्वी होत गेली तर हिंदुस्थानांत लोकशाही दृढतर होत जाईल. मग पंडितजी जरी निवृत्त झाले तरी कांहीं बिघडणार नाहीं आणि भूदानाची चळवळ सध्याच्या राजकारणातीत संथ गतीनें जरी विकसत गेली तरी चालेल. पण द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या असफलतेचीं लक्षणें आजच दिसूं लागलीं आहेत. दुर्गापूर, भिलाई व रूरकेला येथील पोलाद कारखाने यद्यपि उभे राहिले तरी धान्योत्पादनांत वाढ कितपत होईल? बाजारभाव खालीं येतील काय? बेकारांची संख्या घटेल काय? हीं भेडसावणारीं प्रश्नचिन्हें कायमच राहणार असे दिसतें आहे. बरें राज्य-कारभार अधिक निर्मळ होईल, नफेबाजी, काळा बाजार बंद होईल असाहि विश्वास वाटत नाहीं. ह्या दुःस्थितीमधून जर तीन चार वर्षांनीं स्फोटक उद्रेक निर्माण झाले तर ते कह्यांत आणण्याचें आणि निराशेमधून जनतेमध्यें पुनरपि विश्वास निर्माण करण्याचें सामर्थ्य ज्या आंदोलनांत असेल त्यालाच

पर्यायी सामर्थ्य असें यथार्थतेनें म्हणतां येईल. भारतावरील हा गडांतरांचा काळ गृहीत धरून अनेक लोक चर्चा करतात आणि आपापल्या आवडी-नुसार कोणी लष्करी हुकूमशाही अथवा साम्यवादी हुकूमशाही येथें येईल असें मत देतात; तर कोणी म्हणतात कीं देशाचे तुकडे पडतील ! पण सर्वजण हुकूमशाहीच्या भाषेंत बोलतात आणि लोकशाही खर्चीं पडणार हें गृहित धरून बोलतात, ही त्यामधील चिंतनीय गोष्ट आहे. असा बाका प्रसंग आला तर आपली आणि आपल्या सहकाऱ्यांची भूमिका कोणती राहणार ?

आपण असें विचारूं शकाल कीं हा प्रश्न तूं आम्हांला काय म्हणून विचारतोस ? त्याचें उत्तर अगदीं साधें आहे. जयप्रकाशांसारखे देशाची धुरा पेलूं शकणारे सहकारी आपल्यापाशीं आहेत. हीं लढाऊ घोडीं आपण साकणीला वापरलींत म्हणून माझा आपल्यावर राग आहे. पंडितजीनंतर जयप्रकाश आले तरच प्रसंग निभाऊन नेतां आला तर येईल, असें ज्यांनीं माझ्यापाशीं बोलून दाखवलें त्यांचीं नांवें मी आपणांस सांगितलीं तर आपणाला कदाचित् आश्चर्य वाटेल. इतकेंच सांगतों कीं त्यांत सर्वश्रेष्ठ न्यायालयाचे न्यायाधीश, केंद्रसरकाचे मंत्री, लष्करी अधिकारी, आदीकरून मंडळींची गणना आहे. पण कोणत्याहि आंदोलनाला पाहिजे त्या वेळीं जशी राजकीय धार देतां येत नाहीं त्याचप्रमाणें त्यांतून राजकीय नेतेहि हवे तेव्हां निर्माण करतां येत नाहींत. नोकरशाहीच्या घोडीवर स्वार होऊन तिला वाटेल तशी मंडळावर धरणें अनुभवी चाबुकस्वारावांचून इतरांना जमणें नाहीं. राज्यकर्ते कर्तबगार आणि शुद्ध चरित् असतील तर प्रस्तुतच्या राज्ययंत्रामधूनहि कितीतरी चांगल्या गोष्टी करतां येतील, प्रगतीचा वेग कितीतरी वाढवतां येईल. म्हणून माझी आपणांस अशी विनंति आहे कीं आपल्या सहकाऱ्यांत पूर्वीं राजकाणाची धुरा वाहिलेले आणि इत्युत्तर वाहण्यास समर्थ असे जे लोक आहेत त्यांना आपण पुन्हा त्या आघाडीवर पाठवावें. ‘ भूदानमूलक ग्रामोद्योगप्रधान अहिंसक क्रांति ’ हें फार दूरचें स्वप्न आपण पाहात आहांत. त्याची साधना ही एक कधींच न संपणारी तपस्या ठरण्याचा संभव आहे. ‘ कालोह्ययं निरवाधिर्विपुलाच पृथ्वी ’ असें व्यक्ति किंवा एखादा गट म्हणूं शकेल, राष्ट्राला तसें म्हणतां येणार नाहीं. भारतांत लोकशाही राहाणें व भारत अखंड राहाणें म्हणजेच भारत सदेह व सजीव राहाणें होय.

त्या दोहोंवर गंडातर येण्याचा संभव मला स्पष्ट दिसत आहे. त्याचा मुकाबला राजकीय आघाडीवरच करावा लागेल. तो करण्याचें सामर्थ्य वा इच्छा आजच्या एकाहि पक्षांत नाहीं. म्हणून आपणांस ही विनंति करीत आहे. हें गंडांतर आपोआप टळलें तर सोन्याहून पिंवळें होईल. पण तें आलें आणि तें टाळण्याचा योग्य तो इलाज आजच झाला नाहीं तर सर्वोदयासकट सगळेच बुडतील.

सर्वोदयवादी मंडळींना आणि त्यांतल्या त्यांत जयप्रकाशजींना राजकारणाचा उबग येण्याचें कारण आपल्याकडील राजकारणांत दिसून आलेली असहिष्णुता, जातीयता, गटबाजी, त्याचप्रमाणें साम्यवादी देशांमधून घडून आलेलें राजकीय सत्तेचें कमालीचें केंद्रीकरण. परंतु कोणतेंहि शेत ओस टाकल्यानें तें सुधारत नाहीं, उलट त्यांत तण आणि काटेसराटे माजतात. साक्षेपी शेतकरी सतत मशागत करून, त्याच तुकड्याला ताली घालून, तिच्यांत खत घालून तें सुधारतो, हें आपणांस मी सांगणें म्हणजे भाइंदरच्या आतासाठीं पुण्याहून मीठ घेऊन जाण्यासारखें होणार आहे. रशिया व चीनसारख्या देशांत एक पक्षीय हुकमत येऊं शकली याचीं कारणें देशपरत्वें अनेक देतां येतील, पण जनमानस ओळखणाऱ्या, त्याच्यावर अधिकार असलेल्या, लोकसत्ता मानणाऱ्या, निःस्वार्थी आणि लोकसत्तेच्या द्वारां समाजक्रान्ति घडवून आणण्याचा निश्चय असलेल्या मंडळींची खंबीर फळी तेथें अस्तित्वांत नव्हती, हें मुख्य कारण आहे. साम्यवादी हुकूमशाही रशिया-चीनमध्यें प्रस्थापित होण्याला जें मुख्य कारण झालें त्याच कारणास्तव इटलीमध्यें आणि जर्मनीमध्यें १९२० ते १९३५ च्या दरम्यान फॅशी-नात्सी पक्ष सर्वाधिकारावर आले. लोकसत्ता आणि समाजक्रान्ति ह्यांवर निष्ठा असलेल्या भारतामधील नागरिकांनीं राजकारणाला पाठमोरें होण्याचें हें खूळ सोडलें तर येथें या ना त्या हुकूमशाहीखालीं राबण्याचें कारणच राहाणार नाहीं. खुद्द सर्वोदयाच्या भूमिकेला आणि कार्याला लोकशाहीची पार्श्वभूमि व चौकट अत्यावश्यक नाहीं काय ?

सर्वोदयवाद्यांनीं इंग्लंड आदिकरून देशांतील लोकसत्ताक राजवटीचें मूल्यमापनहि यथार्थतेनें केलें आहे, असें मला वाटत नाहीं. तेथील जनतेमधील असंतोष आणि आपल्याकडील असंतोष यांत जमीन अस्मानाची तफावत

आहे. सत्तेचें केंद्रीकरण आपल्याहि देशांत झालेलें आहे, असें जेव्हां तिकडील लोक ओरडतात तेव्हां त्याचा एवढाच अर्थ असतो कीं आधींच शक्तिसंपन्न असलेल्या त्या देशांतील स्थानिक संस्थांना अधिक अधिकाराची भूक आहे. तेथील सरकारच्या परराष्ट्रीय धोरणापासून सर्व विषयांबाबत समजुतीनें साधकबधाक चर्चा करणाऱ्या आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सरकारच्या बरोबरीनें भाग घेणाऱ्या इतक्या संस्था व मंडळी असतात कीं आपणांला ज्या केंद्रीकरणाची भीति वाटते आहे त्या प्रकारचें केंद्रीकरण तेथें शक्यच नाहीं. तेथील नागरिक राजकारणाला जीवनाचा भाग समजतात. राजकारण म्हणजे सर्व जीवन असें ते मानीत नाहींत आणि राजकारण जीवनबाह्य असेंहि मानीत नाहींत. राजकारणाला जीवनबाह्य ठरवून आपण न कळत सर्वोदयवाद्यांची एक जात तर बनवीत नाहीं आहांत ना, अशी शंका मला येते. यामुळें राजकीय सत्तेचें अधःपतन वा केंद्रीकरण कसें काय थांबवतां येईल ?

अजून बरेंच लिहितां येईल. पण आतां आवरतें घेतों. एवढ्या मोकळेपणानें लिहिलें आहे तें आपल्या विषयींच्या आदरामुळें आणि प्रेमामुळें हें सांगावयास नकोच.

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५३२७ वि: निबंध
क्रमांक .................. नों दि १७-८-६७

# पक्षपद्धति व श्री. न्यरेरे यांचे आक्षेप*

" ज्या राष्ट्रांना द्विपक्षात्मक लोकशासनाची संवय झालेली आहे त्यांना वेगळ्या प्रकारच्या लोकशासनाची कल्पनाच करतां येत नाहीं. त्यामुळें स्वतः लोकसत्ताक असल्याचा दावा करणारीं कांहीं राष्ट्रें 'दोन पक्ष असलेलें लोकशासन शक्य तरी कसें आहे ?' असा उलटा प्रश्न अलिकडे विचारूं लागलीं आहेत असें जर त्यांना कोणीं म्हटलें तर त्यांना हें बोलणें पाखंडीपणाचें वाटेल." अशा सूक्ष्म पण स्पष्ट उपहासाच्या शब्दांत टांगानिकाचे राष्ट्राध्यक्ष ज्यूलिअस न्यरेरे यांनीं आपल्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या प्रबंधांमध्यें लोकसत्तेविषयींच्या रूढ कल्पनांचा समाचार घेतलेला आहे. या प्रबंधामधील विचार कोणास पटोत वा न पटोत, पण नवमुक्त आफ्रिकी राष्ट्रांच्या नेते-मंडळींत न्यरेरे यांच्यासारखे प्रगल्भ व पक्व विचारांचे पुढारी आज विद्यमान आहेत ही गोष्ट सगळ्यानांच संतोषदायक व आश्वासक वाटेल यांत शंका नाहीं. रशियाचा ख्रुश्चोव्ह, चीनचा माओ, युगोस्लाव्हियाचा टीटो हे नेते आपापल्या राष्ट्रांतील जनतेसमोर वारंवार वैचारिक खाद्य ठेवीत असतात. अमेरिकेमध्यें विड्रो विल्सन, रूझवेल्ट यांनीं अशाच प्रकारची प्रथा ठेवली होती व ती प्रस्तुतचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष केनेडी यांनीं ती चालू ठेवलेली दिसते. आपल्या देशांत मात्र राष्ट्राच्या भाग्यविधात्याकडून अशा प्रकारचे मूलग्राही विचार जनतेसमोर सादर करण्याची प्रथा प्रायः नष्टच झाल्या-सारखी आहे. जे कांहीं विचार अधून मधून प्रकट केले जातात ते फुटकळ, तात्कालिक आणि उथळ वाटतात. अशा जुजबी विचारांत आत्मप्रत्ययाची खंबिरी कशी आढळावी आणि ते वाचणाऱ्यांच्या मनावर त्यांचा खोल ठसा तरी कसा उमटावा ? न्यरेरे यांनीं जानेवारी महिन्यांत दार-एस्सलाम येथें भरलेल्या टांगानिका आफ्रिकन नॅशनल युनियनच्या (टानू) वार्षिक अधिवेशनसाठीं जमलेल्या प्रतिनिधींच्या समोर एकपक्षीय लोकशासनासंबंधीं जे विचार प्रबंधरूपानें मांडले त्यांत त्यांचें पाश्चात्य लोकसत्ताक शासनांतील

---

** साधन, मे १९६३ ( टांगानिकाचे अध्यक्ष श्री. न्यरेरे यांनीं टानू पक्षाच्या अधिवेशनाला सादर केलेल्या प्रबंधाचा परामर्ष या लेखांत घेतलेला आहे. )*

द्विपक्षीय कारभारांचें बारीक अवलोकन आणि स्वदेशांतील परिस्थितीचें, संपूर्ण ज्ञान तर दिसतेंच; पण त्याच्या जोडीला आपल्याच देशाकरतां नव्हे तर इतरहि देशांसाठीं सांगण्यासारखें आपण कांहींतरी सांगत आहोंत अशी आत्मविश्वासाची जाणीवहि दिसते. म्हणूनच त्यांच्या विचारांचा परिचय व परामर्ष आवश्यक ठरतो.

न्यरेरे यांनीं द्विपक्षीय लोकशासनावर घेतलेले आक्षेप थोडक्यांत पुढील-प्रमाणें मांडतां येतील :

( १ ) विरोधी पक्षाची आवश्यकता लोकशासनासाठीं आहे असें आम्हां लोकनेत्यांना तत्त्वतः कितीहि मान्य असलें तरी आमच्या जनतेला विरोधी पक्ष निरर्थक वाटतो. त्यामुळें मतदानाचें स्वातंत्र्य असूनहि मतदारांनीं विरोधी पक्षांना थारा दिला नाहीं, अशी आमच्या देशामध्यें परिस्थिति आहे.

( २ ) सगळे पक्ष आपल्या अन्तर्गत कारभारांत अधिक लोकसत्ताक पद्धतीनें वागतात. परंतु ते संसदेंत गेले कीं पक्षशिस्तीच्या निमित्तानें पक्ष-सदस्यांच्या विचाराउच्चरावर बंधनें पडूं लागतात. देशांत एकच पक्ष असला म्हणजे अशा बंधनांची आवश्यकता राहात नाहीं अथवा राहाणार नाहीं. याचाच अर्थ तेथें अधिक लोकसत्ताक वातावरण निर्माण होईल.

( ३ ) जेथें अनेक पक्ष आहेत तेथें प्रत्येक पक्ष हा जनतेच्या एका विभागासाठीं असणें अपरिहार्य असतें. म्हणजेच तो जरी सबंध जनतेचें प्रातिनिधित्व करूं म्हणत असतो तरी खऱ्या अर्थानें आखिल राष्ट्राचा प्रतिनिधि असण्याचा त्याचा दावा फोल असतो. म्हणून ज्या देशांत एकच पक्ष असतो व तो सबंध देशांशीं एकरूप झालेला असतो त्या देशांत, जेथें दोन अथवा अधिक पक्ष जनतेच्या फक्त विभागांचें प्रतिनिधित्व करीत असतील अशा देशांपेक्षां, लोकशासनाचा पाया अधिक खंबीर असतो. द्विपक्षीय पद्धतीनें युक्त असलेल्या देशाचें राजकारण राष्ट्रीय राजकारण असणेंच शक्य नाहीं, तें गटांचें राजकारणच असणार.

( ४ ) दोन पक्षामधील भेद जर मूलभूत असतील तर तेथें संसदीय लोकशासन अशक्य आहे आणि ते मतभेद जर मूलभूत नसतील, विचार-विनिमयक्षम असतील तर दोन पक्षांची आवश्यकता उरत नाहीं.

( ५ ) आमच्या देशामधून साम्राज्यवादी निघून गेलेले असल्यामुळें शासित व शास्ते असा भेद जनतेमध्यें उरलेलाच नाहीं. अशा वेळीं मुद्दाम दोन पक्ष निर्माण करणें म्हणजे इतर देशाचें केवळ विडंबन ठरणार आहे. ऐतिहासिक प्रक्रियेमधून एखाद्या देशांत दोन प्रश्न निर्माण होणें वेगळें आणि लोकशासनासाठीं निदान दोन पक्ष तरी हवेतच असा सिद्धांत मांडून त्याच्या अंमलबजावणीसाठीं दोन पक्ष निर्माण करणें वेगळें. मनुष्याला बुद्धीचें देणें लाभलेलें आहे, मानव तितका समान आहे, म्हणून विचार-विनिमयानें चालणारें लोकशासन हेंच योग्य होय हें म्हणणें तर्कशुद्ध ठरतें. पण लोकशासन आहे म्हणून दोन पक्ष असलेच पाहिजेत हें तर्कशुद्ध ठरत नाहीं. एखाद्या देशांत दोन पक्ष चालण्यासारखी परिस्थिति नसली तर त्यामुळें तो देश लोकशासनाला पात्र नाहीं असा विचित्र निष्कर्ष यांमधून हातीं येईल. मानव जेथें जेथें आहे तेथें तेथें लोकशासन असलेंच पाहिजे असा ठाम सिद्धांत मांडतां येईल. पण जेथें जेथें मानव आहे तेथें तेथें दोन पक्ष असलेच पाहिजेत असा सिद्धांत जर आपण मांडूं लागलों तर तें वेडेपणाचें ठरेल.

( ६ ) द्विपक्षीय लोकशासनाचा आग्रह धरणारे लोक अप्रामाणिक नसतील. ते हातचलाखी करतात असेंहि म्हणावयाचें नाहीं. मग ते त्या विशिष्ट शासनपद्धतीचा पुरस्कार करतात तो कां ? तर त्यांना ती अंगवळणीं पडली आहे म्हणून. येथें सवयीला तत्त्वज्ञानाची प्रतिष्ठा देण्यांत आलेली आहे, इतकेंच

( ७ ) ज्या देशांत एकपक्षीय लोकशासन असेल तेथें पक्षाचें सभासदत्व सर्व नागरिकांना खुलें असावें. नागरिकांनीं पक्षाचें नेतृत्व गुप्तमतदान-पद्धतीनें निवडावें आणि संसदेंतसुद्धां खुली चर्चा होऊं द्यावी. देशांतील नागरिकांशीं एकरूप व समाव्याप्त झालेल्या ह्या पक्षाचें स्वरूप राष्ट्रीय आंदोलनाप्रमाणें असावें. ज्या सदस्याला इच्छा असेल त्याला संसदेसाठीं उमेदवार म्हणून उभे राहूं द्यावें. अशा देशांत राजकीय कार्यकर्ते आणि मुलकी अधिकारी यांच्यांत फरक करण्याचेंहि कारण नाहीं. अनेक पक्ष असले कीं शासनाच्या सातत्या-साठीं राजकर्त्यांहून वेगळा व कायमचा अधिकारीवर्ग लागतो. पण एकपक्षीय राष्ट्रीय आंदोलनात्मक शासनांत त्यांना वेगळे ठेवण्याचें कारण नाहीं. ते

वेगळे राहिल्यानें चळवळीमधून उत्तम बुद्धीचीं माणसें वगळलीं जातात, ही फार मोठी राष्ट्रीय हानि आहे.

न्यरेरे यांचे विचार सूत्ररूपानें वर संकलित केलेले असून त्यामध्यें कोठेंहि त्यांच्या विचारांचें सूत्र बिघडूं नये अशी शक्य तेवढी काळजी घेतलेली आहे. हे विचार प्रचलित शासनपद्धतीहून अगदीं वेगळे व स्फोटक आहेत यांत शंका नाहीं. आतां ते तर्कशुद्ध किती आणि व्यवहार्य किती ते पाहूं या.

एकपक्षीय शासनाची न्यरेरे यांनीं मांडलेली कल्पना नवीन नाहीं. कामगारवर्गाचें अधिराज्य भांडवलशाहीच्या विच्छेदनानंतर व्हावयास हवें असें प्रतिपादन करणारा मार्क्स एकपक्षीय शासनवादीच होता. आज जगांतील ज्या ज्या राष्ट्रांत कम्युनिस्टांची राजवट चालू आहे तेथें एकपक्षीय शासनाचाच व्यवहार चालत असतो. मग न्यरेरे यांच्या कल्पनेंत व कम्युनिस्टांच्या कल्पनेंत साधर्म्य आहे असें समजावें काय ? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, न्यरेरे यांना एकपक्षीय लोकशासन अभिप्रेत असून याच प्रबंधांत कम्युनिस्ट हे मूलतः जनतेमधील एका गटाचे प्रतिनिधि असल्यामुळें त्यांचा आखिल जनतेचें प्रतिनिधित्व करण्याबद्दलचा दावा अर्थशून्य असल्याची पूर्ण जाणीव त्यांना असल्याचें ठिकठिकाणीं त्यांनीं आपल्या खास शैलींत मारलेल्या शेप्यांवरून निर्विवाद सिद्ध होतें. कम्युनिस्ट हे नव्या प्रकारचे साम्राज्यवादी कसे होऊं शकतात हें ज्यांनीं नुकत्याच मोशी येथें भरलेल्या आफ्रो-एशियन एकजूट परिषदेच्या अधिवेशनांत स्पष्टपणें बोलून दाखवलें त्या न्यरेरेंची कल्पना मार्क्सवादी एकपक्षीय शासनाशीं जुळती असणें कसें शक्य आहे ! तथापि टांगानिकामध्यें जर कोणी कम्युनिस्ट असतील तर न्यरेरेंची एकपक्षीय शासनाची कल्पना आपणांस संपूर्णतया मान्य असल्याचें सांगून तेथील जनतेची दिशाभूल करण्यास ते मुळींच कचरणार नाहींत. आणि टांगानिकाच्या लोकसत्ताक वातावरणांत मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या स्वातंत्र्यांनीं पुष्ट झालेला कम्युनिस्ट पक्ष ज्यावेळीं आपलें खरें स्वरूप प्रकट करूं लागेल त्या वेळीं न्यरेरे यांच्यावर "करायला गेलों गणपति आणि तयार झालें माकड" असें म्हणून हळहळत बसण्याची मात्र पाळी येईल. अनेक लोकशाहीवाल्यांची ही फजिती झाल्याचें इतिहास सांगतो. म्हणून हें विधान करावें लागत आहे.

जेथें अनेक पक्ष असतात तेथे प्रत्येक पक्ष हा जनतेमधील एका प्रादेशिक विभागासाठीं, एका वर्गासाठीं वा एका स्तरासाठीं असतो हें जरी सत्य असलें तरी राज्यावर आल्यानंतर तो जें जें करील तें सर्व त्याच्या एका गटासाठींच असणार हा युक्तिवाद बिनचूक नाहीं. एकतर सध्याच्या परिस्थितींत देशासमोर ज्या शेंकडों समस्या उपस्थित होतात त्या पैकीं निम्याहून अधिकांचें स्वरूप सार्वजनिक असतें, एकजनिक नसतें. पाठबंधारे, रेल्वे आदि करून दळणवळणाचीं साधनें, संरक्षण, शिक्षण अथवा न्याय ह्या पैकीं कोणतीहि गोष्ट जरी घेतली तरी तिचा राष्ट्रीय दृष्टीनेंच विचार करणें प्राप्त होतें. त्यामध्यें आलींच तर वर्गीय बुद्धि अथवा गटबाजी एवढ्यापुरती येईल, नाहीं असें नाहीं कीं तीं तीं कामें करतांना त्या त्या गटाला किंवा विभागाला झुकतें माप मिळेल. पण तो दोष दुसऱ्या पक्षाच्या हातीं सत्ता गेली कीं दुरुस्त होऊं शकतो. शिवाय न्यरेरे म्हणतात त्या प्रमाणें एकपक्षीय शासनांत गटबाजी होणारच नाहीं असा पुरावा उपलब्ध नाहीं. पाकिस्तानांतील सर्व सभा केंद्रें लोकसंख्येच्या दृष्टीनें लहान असलेल्या पश्चिम पाकिस्तानांतील लोकांच्या व त्यातूनहि पंजाबी मुसलमानांच्या ताब्यांत आहेत असा उघड आरोप पूर्व पाकिस्तानांतील लोक करीत असतात व तो फार तीव्र असंतोषाचें कारण बनून राहिल्याचें प्रत्यंतरहि वरचेवर मिळत असतें.

## लोकसत्तावादी न्यरेरेंच्याविषयीं

" दोन पक्ष असल्यावांचून लोकशाही चालेल कशी ? " असा प्रश्न विचाणाऱ्यांना " दोन पक्ष असल्यावर लोकशाही नांदेलच कशी ? " असा प्रतिप्रश्न विचारून न्यरेरे यांनीं कुंठित करण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि तो बऱ्याच अंशी साध्यहि झालेला आहे असें आपण मान्य करूं. पण न्यरेरे यांच्या तर्कसांखळीला धरून जरा पुढें गेलों आणि आपण जर असा प्रश्न उपस्थित केला कीं, लोकशासनाच्या व्यवहारासाठीं एक पक्ष तरी हवाच आणि लोकांच्या योगक्षेमासाठीं लोकशासन हवेंच हे सिद्धांत तरी तुम्ही कोणत्या तर्कांच्या आधारावर मांडतां ? मानव हा बुद्धियुक्त असून तो समान आहे म्हणून शासन लोकसत्ताक असावें हा जो सिद्धांत तुम्हीं एवढ्या अभिनिवेशानें मांडलेला आहे तो, सिद्ध करावयाची गोष्ट गृहित

धरून मांडल्याप्रमाणें म्हणजे उरफाटा आहे, असा युक्तिवाद कोणी केला तर ? कारण बुद्धिशीलतेपेक्षां मानवाची भावनावशता आणि समानतेपेक्षां मानवामानवांतील विषमताच अधिक प्रकट नाहीं काय ? एवंच न्यरेरे यांनीं आपल्या प्रबंधांतील सर्वप्रथम मूल्य म्हणून ज्या लोकशासनाला स्थान दिलें आहे आणि तें तर्कमान्य असल्याचा दावा केलेला आहे तो मुळीं अशा प्रकारें पहिल्या हरकतीच्या मुद्यावरच फेंटाळतां येण्यासारखा आहे.' आणि एकदां लोकशासनाच्या विचाराची अशाप्रकारें विल्हेवाट लागल्यावर तें एकपक्षीय असावें कीं अनेकपक्षी असावें हा प्रश्न वंध्येला मुलगे होतील कीं मुली, या प्रश्नाइतकाच निरर्थक ठरतो.

न्यरेरे यांना हें विदितच असेल कीं, समाजविषयक अनेक विचार मानव कसा आहे यापेक्षां तो कसा व्हावा अथवा कसा असावा यांवर बसवलेले आहेत. धर्माचीहि स्थिति अशीच आहे. म्हणूनच तो मानवमात्राला मोक्षाचा अधिकारी समजतो. यांत क्रूर वास्तवाहून इष्ट संभाव्यतेकडे लक्ष अधिक दिलेलें आहे हें स्पष्ट दिसतें. लोकशासनाच्या अलिकडच्या कल्पना म्हणजे मानववादी भागवत धर्माचा राजकीय अवतार होय. 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं' म्हणणारा श्रीकृष्ण, 'सर्व मानव समान आहेत' असें म्हणणारा रूसो, 'नॉर्डिकवंश हा निसर्गतःच शास्तावंश आहे' असें प्रतिपादन करणारा हिटलर आणि 'कामगारवर्ग हा विश्वक्रांतीचा ध्वजधारी आहे' असा आक्रोश करणारा मार्क्स यांपैकीं स्वयंभू सत्य कोणीच सांगत नव्हता; सगळे सांगत होते आरोपित सत्य, इष्ट वा प्रिय सत्य. द्विपक्षीय लोकशासन हें सैद्धांतिक सत्य नसून तें ऐतिहासिक सत्य आहे असा युक्तिवाद करणाऱ्या न्यरेरेंनीं हें लक्षांत घ्यावयास नको काय कीं, मानवाची बुद्धिशीलता आणि समानता ही देखील स्वयंभू सत्यें नसून इतिहासाच्या प्रक्रियेंत परिणत होत गेलेली किंवा सज्जनांच्या सदिच्छेंतून उगम पावलेलीं सत्येंच आहेत ? मग प्रश्न उपस्थित होतो तो असा कीं, मानवाची समानता सिद्ध नव्हे तर इष्ट मानून जर लोकशासन मान्य करावयाचें तर तें एकपक्षीय असलेलें बरें कीं अनेकपक्षीय ? द्विपक्षीय लोकशासनाची संवय झाली म्हणून तशा शासना-खालीं नांदणारे पाश्चात्य वा पौर्वात्य लोक त्या शासनप्रकाराची वकिली करतात, त्यापलीकडे त्यांच्या बोलण्यांत दम नाहीं, हा न्यरेरे यांचा आरोप

साधार वाटत नाहीं. कारण ज्या दोन पक्षांत मूलभूत फरक नाहींत त्यांना विरोधी पक्ष म्हणणें म्हणजे शासनाला फुटबॉल मॅचच्या पातळीवर आणून ठेवण्याप्रमाणें होय, हें त्यांचें प्रतिपादन लोकशासनामधील विरोधी पक्षांच्या कार्याविषयींचें त्यांचें अज्ञान व्यक्त करणारें आहे असें निरुपायानें म्हणावें लागतें. विरोधी पक्ष लोकशासनासाठीं कृत्रिम रीत्या तयार करणें जसें हास्यास्पद ठरेल तसेंच वेळ येईल तेव्हां विरोधी पक्ष तयार होईलच हा त्यांचा विचारहि हास्यास्पद ठरेल.

न्यरेरे सांगतात कीं, ‘ आमच्या टांगानिकांत विरोधी पक्ष ही कल्पनाच मतदारांना अर्थहीन वाटते. ’ टांगानिकामधील मतदारांची ही प्रतिक्रिया त्या देशापुरती मर्यादित नसून ती मागासलेल्या सर्व देशांना व्यापणारी आहे. त्या दृष्टीनें हिटलरचा जर्मनी व स्टालीन–ख्रुश्चोव्हचा रशिया हे देखील मागासलेलेच होते व आहेत. आमचा भारतहि त्याला आपवाद नाहीं. पण मतदारांची जी ही प्रतिक्रिया न्यरेरे यांना शुभंकर वाटली ती ज्याची लोकशासनाबद्दलची निष्ठा त्यांच्याच इतकी दृढ आहे त्याला भयंकर वाटण्याचाहि संभव नाहीं काय ? टांगानिकासारख्या व भारतासारख्या शतकानुशतकें जमातबंद, नृपनिष्ठ राहिलेल्या जनतेनें लोकशासन आणणाऱ्या या नेत्यांना हे नव्या युगांतील सरदार, राजेमहाराजे, गणपति मानून त्यांच्या मागून मुकाट्यानें जाण्याचें ठरवलें नसेल कशावरून ? “ पंडित नेहरू कोण आहेत ? ” तर ते दिल्लीचे बादशाहा आहेत असें म्हणणारे राजस्थानी खेडूत एकपक्षीय लोकशाहीचे पाठीराखे कीं गतानुगतिक राजकीय आंधळे ? द्विपक्षीय लोकशासनाची तरफदारी करणाऱ्यांना संवयीचे पढतमूर्ख ठरवण्यापूर्वीं आपल्या पक्षावर मतांची खैरात करणारे मतदारहि जुन्या जातिजमातींची हुकूमशाही खालीं माना घालून सहन करण्याच्या “ संवयीमुळेंच ” आपणांलाहि मान्यता देत नसतील ना, आणि स्वातंत्र्यांतील आपली टिकून राहिलेली मानसिक गुलामगिरी प्रकट करीत नसतील ना, अशी शंका न्यरेरेंना येऊं नये याचेंच आश्चर्य वाटतें.

म्हणून आमच्या देशांत जनता दोन पक्ष चालूं देत नाहीं, ह्या विधानाचा अर्थ मी तरी एवढाच समजतों कीं विरोधी पक्षाला तेथें फार कमी मतें मिळतात, व त्यामुळें तो नजीकच्या भविष्यांत राज्यारूढ होण्याची अथवा

शासनाला निराळें वळण लावूं शकेल इतका सामर्थ्यवान् होण्याचीं लक्षणें दिसत नाहींत. भारतामधील परिस्थिति यापेक्षां मुळींच वेगळी नाहीं हें सर्वांना ठाऊक आहे. पण तेवढ्यावरून नाउमेद होऊन विरोधी पक्षांनीं आपापलीं बिऱ्हाडें गुंडाळण्याचा जर निर्णय घेतला तर त्यावरून एकच अनुमान काढणें प्राप्त होईल कीं त्यांना शास्ते बनण्याची फार उतावीळ झाली होती. ही त्यांची चूक आहे. उलटपक्षीं एकाद्या देशांत जर दोन पक्ष नसतील तर तो देश लोकशासनाला पात्रच नाहीं असा शेरा मारण्याची घाई लोकशासनाच्या सुयंत्र चालनासाठीं दोन पक्ष असणें इष्ट आहे असें प्रतिपादन करणारे जर मारीत असतील तर ती त्यांचीहि चूकच ठरेल. कारण शतकानुशतकें सरंजामदारींत पिचत पडलेल्या जनतेमधून दोन समबल पक्ष तयार होणें ही गोष्ट कायापालटाइतकीच अवघड आहे. ती सिद्ध होण्यास दीर्घकाळ चिकाटीनें प्रयत्न करण्याची आवश्यकता असते. ज्या देशांतील सरंजामदारी तेथील जनतेनें स्वप्रयत्नानें संपुष्टांत आणली ती जनता व जेथील सरंजामदारी परक्यांच्या आगमनानें निकालांत निघाल्यामुळें जेथें लोकशाहीचा जन्म बहुतांशीं कृत्रिम पद्धतीनें झालेला असतो तेथील जनता, यांची राजकीय जागृति व राजकीय कुवत एकाच पातळीवर असणें कसें शक्य आहे ? इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स हे देश पहिल्या वर्गांत मोडतात तर भारत, पाकिस्तान आफ्रिकेंतील नवमुक्त देश दुसऱ्या वर्गांत. ह्या दुसऱ्या वर्गांत बसणाऱ्या देशांतील विरोधी नेत्यांच्या संग्रहीं फार मोठ्या चिकाटीच्या प्रयत्नशीलतेची व प्रतीक्षेची जर शिदोरी नसेल तर त्यांना आपापले पक्ष सबळ बनवण्याचें उद्दिष्ट कधींच गांठतां येणार नाहीं.

ज्या पक्षामध्यें मूलभूत अनुल्लंघनीय फरक आहेत ते पक्ष लोकशासनाच्या चौकटींत राहून संसदेमध्यें काम करूंच शकणार नाहींत ही न्यरेरेंची टीका वाजवी आहे. पण संसदीय पद्धतीची चौकट स्वखुशीनें मान्य करणारे पक्ष जो विरोध करतात तें नाटक असतें हा त्यांचा उपसिद्धांत मात्र चुकीचा आहे. उलट असें दिसून आलेलें आहे कीं, जेथें एकपक्षीय राजवट चालू राहाते तेथें विरोधाची हिम्मतच मावळत जाते. आणि अनेकदां विरोधाचें बीजहि जळून नष्ट होतें. सन १९५६ सालीं म्हणजे स्टालिन मरून बराच काळ लोटल्यावर मिकोयान व ख्रुश्चोव्हनें त्याच्या अनेक दुष्ट कृत्यांचा व प्रमादांचा

पाढा कम्युनिस्ट पक्षाच्या प्रतिनिधींसमोर धडाधड वाचून दाखवला. पण स्टालिन हयात असेपर्यंत कोणाची चूं करण्याची टाप लागली नाहीं. रशियन राज्य-क्रांति होऊन बोल्शेव्हिक पक्षाच्या हातीं सर्व सत्ता आल्यानंतरच्या कांहीं दिवसांत जें मोकळ्या चर्चेचें वातावरण बोल्शेव्हिक पक्षाच्या सर्वश्रेष्ठ कार्य-कारिणींत होतें तें पुढें पुढें पार नाहींसें कां बरें झालें ? हिटलरला आतां राक्षस म्हणणारे व मुसोलिनीच्या प्रेतावर थुंकणारे लोक ते दोघे जिवंत असतांना त्यांची थुंकी झेलीत होते ते काय म्हणून ? रशिया, जर्मनी अथवा इटलींत एकपक्षीय सत्ता होती, पण ती हुकूमशाही नमुन्याची होती तर मला अभिप्रेत असलेली शासनपद्धति लोकसत्ताक असणार आहे, असें याचें उत्तर जर न्यरेरे देणार असतील तर तें समाधानकारक ठरणार नाहीं. कारण नवोदित लोकशाह्यांमध्यें देखील सत्ताधारी पक्षाचें व पक्षप्रमुखाचें झपाट्यानें रूपांतर होत जाऊन तो जवळ जवळ हुकूमशहा कसा बनतो त्याचीं उदाहरणें न्यरेरे यांच्या डोळ्यासमोर असतीलच. जर नसतील तर त्यांनीं टांगानिकांतील स्वतःच्या टानू पक्षाचा कायापालट पुढच्या दहा वर्षांत कशा प्रकारें होत जाईल तिकडे लक्ष द्यावें म्हणजे ज्याला ते विरोधाचें नाटक अथवा खेळ म्हणतात त्याचें देखील किती महत्त्व असतें तें त्यांच्या लक्षांत येईल आणि नाटकी विरोधाप्रमाणेंच मतैक्याचेंहि नाटक सत्ताधारी पक्षाचे तथाकथित अनुयायी कसें वठवतात तें त्यांना दिसून येईल.

ज्या पक्षाच्या हातीं सत्ता येते त्यांतले सगळे कांहीं अधिकारपदावर पोचत नाहींत. जे पोचतात ते तेथेंच राहण्याची खटपट करूं लागतात. आणि असें झालें कीं, सत्ताग्रहणापूर्वीच्या घोषणा, सत्ताग्रहणापूर्वीचें त्यांचें अखिलराष्ट्रीय स्वरूप मागें पडून पक्षाला गटाचें स्वरूप प्राप्त होतें. ही सार्वत्रिक निरपवाद प्रक्रिया माहिती नसल्याप्रमाणें न्यरेरे कां बोलतात व जो पक्ष राष्ट्राशीं एकरूपत्व पावला त्यांच्यांत हितविरोधच कोठें असूं शकतो असें कां विचारतात, तेंच कळत नाहीं. राष्ट्र वसाहतवादाच्या कोंडीमधून वर येऊन वाढूं लागलें कीं नसलेले हितसंबंध व हितविरोध निर्माण होऊं लागतात ही गोष्ट जणूं त्यांच्या गांवींहि नाहीं. बिचारा जिलास ! युगो-स्लाव्हियासारख्या कम्युनिस्ट देशांत सत्ताधाऱ्यांचा नवीन वर्ग पाहतां पाहतां कसा वाढला तें सांगतां सांगतां कायमचा तुरुंगांत अडकला, तरीहि न्यरेरे

सारख्यांनीं देशव्यापी पक्षांत हितविरोधांना जागा कोठें आहे, असें भाबडेपणानें विचारीत राहावें याचेंच दुःख होतें. विरोधी पक्ष हा राजकर्त्या पक्षावरील नित्याचा लगाम (करेक्टिव्ह) असतो व प्रसंगविशेषीं त्याचा तो पर्याय बनतो. राज्यकर्त्या पक्षाच्या चुका दाखवण्याचें अथवा त्याला विरोध करण्याचें कार्य राज्यकर्त्या पक्षांतील लोकांनींच करावें ही सूचना अनुभवपूत नाहीं. उलट जनतेची दिशाभूल करणारी आहे. प्रबंधांत एके ठिकाणीं न्यरेरे असें प्रतिपादन करीत आहेत कीं : ' जें राष्ट्रीय आंदोलन सर्वांना खुलें आहे–जें सर्व देशाशीं एकरूप बनलेलें आहे–त्याला समाजांतील असंतुष्ट अथवा बहिष्कृत गटापासून भय उरणार नाहीं. कारण असा गटच अस्तित्वांत नसणार. जे सत्तेवर आहेत ते वरच्यावर बदलले जातील. निवडणुकी त्यासाठींच योजलेल्या असतात. आपल्या आंदोलनाचें नेतृत्व सारखें बदलत नाहीं काय ? मग राष्ट्राचें नेतृत्व सतत कां बदलूं नये ?* त्याचा अर्थ विरोधी पक्षानें राजसत्तेला उलथून टाकली असा होण्याचें कारण नाहीं. आंदोलनाचें सभासदत्व न मिळाल्यामुळें वाढणारे असंतुष्ट गट न उरल्या कारणानें राजकर्त्यांना खुल्या टीकेची किंवा स्पष्ट विचारांची धास्ती वाटणार नाहीं. आंतून व बाहेरून नवीन कल्पनांचें सूचीभरण होत गेलें तर राष्ट्रीय आंदोलनाचें सामर्थ्य उलट वाढेल. मग टीका सुरू करण्यापूर्वी नेते मरण्याची वाट पाहात बसावें लागणार नाहीं व तशी वाट पाहात बसणें चुकीचेंहि ठरेल. "

वरील उतारा वाचल्यावर असें वाटल्याचून राहात नाहीं कीं, एक अनुभवी राजकारणी म्हणून न्यरेरे बोलत नसून स्वप्नरंजनांत मश्गूल असलेला एक ध्येयवादी अथवा तत्त्वान्वेषक येथें बोलत आहे. सत्ताप्राप्तीनंतर पक्षामध्यें होणाऱ्या आमूलाग्र परिवर्तनाचा अभ्यास करण्याचें त्यांचें राहून गेलें असावें, नाहींपेक्षां राजकारणाच्या धुमाळींत शासकवर्गांतील नोकरांना सामील करून घेण्याचा विचार न्यरेरे यांनीं या प्रबंधांत गंभीरपणें मांडला नसता. सुरुवातीस म्हटल्याप्रमाणें दिसावयाला हा विचार मोठा स्फोटक

---

* ( येथें काँग्रेसचे बदलते अध्यक्ष व स्थिर पंतप्रधान यांची आठवण होणें अपरिहार्य आहे. )

वाटतो. पण व्यवहारांत तो अशक्य नसला तरी तापदायक ठरण्याचा संभव आहे. आम्हीं अहिंसेनें स्वराज्य मिळवलें मग तें अहिंसेनें टिकवण्यास काय हरकत आहे ? आम्हांला लष्कराची गरजच काय ? आम्हीं विकेंद्रीकरण चाहतों, मग पोलिसदल जिल्हापरिषदांच्या अथवा ग्रामपंचायतींच्या ताब्यांत देण्यास हरकत काय ? आमचें कोणाशीं जर वैर नाहीं तर आमच्याशीं कोण कशाला वैर करील ? असला बालसुलभ आशावाद भारतामध्यें कमी कां प्रकट करण्यांत आला होता ? कम्युनिस्ट क्रान्तींचें भावरम्य चित्र ट्रॉटस्कीनें किती सुखद रंगांत रंगवलें होतें ? पण त्यालाच शेवटीं 'प्लॅनेट विदौट ए व्हिसा ' ( आश्रयाविना धरित्री ) असें स्वतःच्या परिस्थितीचें वर्णन करावें लागलें ना ? अमेरिकन क्रान्तीचा उद्गाता जेफर्सन शासनव्यवस्थेविषयीं कांहीं कमी मधुर बोलला नव्हता. सारांश, न्यरेरे यांच्या प्रबंधांतील जो सर्वांत आकर्षक भाग आहे तो चालू लोकसत्ताक शासनामधील दोषदर्शनाचा आहे अथवा अनागत कालांतील कल्पनाविलासाचा आहे. रोख किंमतीचा म्हणजे लगेच अंमलांत आणतां येईल असा विचार त्यांत एवढाच दिसतो कीं, टांगानिकामध्यें त्यांच्या टानू पक्षाव्यतिरिक्त कोणताहि पक्ष असूं देऊं नये. मात्र लोकशासनाला खंबिरी प्राप्त करून देण्याच्या सदिच्छेनें घेतलेल्या ह्या निर्णयांतून हुकूमशाहीची विकृति निर्माण होणें सहज शक्य आहे, अशी भीति येथें व्यक्त केल्यावांचून राहावत नाहीं.

द्विपक्षीय अथवा अनेकपक्षीय शासनाचा प्रकार सदोष आहे हें कोणीच नाकारणार नाहीं. तिच्यांत कालाचा व शक्तीचा अपव्ययहि होतो, हेंहि खरेंच. पण नागरिकांचीं सर्व स्वातंत्र्यें बाद होण्याची जी दाट संभाव्यता एकपक्षीय शासनांत आहे ती टळण्यासाठीं ही किंमत, जरी ती जबरदस्त वाटली तरी, द्यावी कीं नाहीं या विषयींचा विचार पक्का व्हावयास हवा. तो पक्का झाल्यावर राज्यकर्ता पक्ष व विरोधी पक्ष यांनीं आपल्या राजकारणांतील अनावश्यक व सदोष भाग काढून टाकण्याचे जरूर प्रयत्न करावेत. मतदारांना चौफेर विचार करावयास लावावें. आचारसंहिता ठरवून तिचें कांटेकोरपणें पालन होईल याची दक्षता घ्यावी. पण हें सर्व करीत असतांना आपल्या हातची सत्ता मतदार काढून घेऊं शकतील व दुसऱ्या कोणाला देऊं शकतील ही जाणीव राजकारणाचा प्रवाह शुद्ध व

वहात ठेवण्याला जितकी मदत करील तितकी ती दुसऱ्या कोणत्याहि उपायानें होणार नाहीं. ‘ निंदकाचें घर असावें शेजारीं ’ ह्या संतोक्तींत लोकशासनाच्या दृष्टीनेंसुद्धां फार खोल अर्थ आहे. सत्तारूढ पक्षाला आरसा दाखवणारा तुल्यबल पक्ष अस्तित्वांत नसला म्हणजे असा राजकीय विनोद निर्माण होतो कीं, पंडित नेहरूंसारखी मंडळीं अधूनमधून स्वतःच निंदकाची भूमिका घेऊन कॉंग्रेसचा समाजवाद कसा अयशस्वी झालेला आहे तें मोठ्या तिखट शब्दांत सांगूं लागतात ! आणि तेवढें मनांत साठलेलें पित्त एकदां घशांत बोटें घालून काढून टाकलें कीं, परत कॉंग्रेसचें नेतृत्व टुणटुणीतपणें करूं लागतात ! संभव असा दिसतो कीं, हें नाटक न्यरेरे यांनाहि करावें लागेल. आतां हें नाटक वठवावयाचें कीं विरोधी पक्ष राहूं देऊन वर सांगितलेल्या नाटकापेक्षां कितीतरी अंशांनीं कमी हास्यास्पद राजकीय नाटक त्यांना करूं द्यावयाचें, एवढाच प्रश्न आहे.

◎ ◎ ◎

REFBK-0013066
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
निबंध
दा. क्र. 73066

आणखी दोन
अभ्यसनीय पुस्तकें

**चीनचें आक्रमण**
राजकीय पार्श्वभूमि ०·६०
पन्नालाल सुराणा

**चीनचें आक्रमक आव्हान**
प्रा. देवदत्त दाभोलकर १·००

साधना प्रकाशन पुणें.